हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स, हुजुरपागा

प्रगतिपथावर

कु. वेणुबाई पानसे,
एम.ए., बी.टी.



श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड
महाराष्ट्र गर्ल्स् एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष



सोसायटीचें कौन्सिल इ. स. १९३४

Wagle Press, Bombay, 1

सुवर्ण-महोत्सव स्मारक ग्रंथ

हायस्कूल फॉर इंडियन् गर्ल्स्, हुजुरपागा

स्थापना १८८४

प्रगतिपथावर

लेखिका

कु. वेणुबाई पानसे, एम्.ए., बी.टी.

१९३४]

[किं. २ रुपये

बाल्योद्यानिं विहार सौख्यद गमे माता असे आसरा ।
विद्योद्यानिं सुविद्य मानस घडे शाला दुजा आसरा ॥
'शाला' ही अपुली अम्हांस गमते हें प्रीतिचें द्योतक ।
यावच्चंद्रदिवाकरौ सकलही मानोत हें स्मारक ॥ १ ॥

—कु. इंदुमती

माजी, विद्यमान

व

भावी विद्यार्थिनींस

सप्रेम अर्पण

—लेखिका



हायस्कूलचा दर्शनी भाग

Wagle Press, Bombay, 1

प्रस्तावना

ईश्वरकृपेनें ' हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स् ' ही संस्था स्थापन होऊन आज पन्नास वर्षें पुरीं झालीं. ह्या वर्षी या संस्थेचा सुवर्णमहोत्सवदिन ! हा आनंदाचा दिवस पाहण्याचा सुयोग परमेश्वरानें मला दिला म्हणून मी त्याची फारच आभारी आहें. खुद्द पुणें शहरांतील स्त्रियांच्या शिक्षणास ह्या संस्थेचा किती उपयोग झाला, दूरदूरच्या शहरांतून आलेल्या विद्यार्थिनींनीं तिचा किती फायदा करून घेतला, त्या सर्वांकडून समाजाचीं व देशाचीं किती कामें घडून आलीं व तिच्यामुळें महाराष्ट्रीय स्त्रियांची कशी प्रगति होत गेली, ह्या सर्व गोष्टींचा सविस्तर उल्लेख कु. वेणुबाई पानसे, एम्.ए., बी.टी., ह्यांनीं ह्या स्मारकग्रंथांत केलाच आहे. माझी प्रस्तावना केवळ ग्रंथकर्त्रीसंबंधाची आहे. कु. वेणुबाईंचे वडील कै. प्रो. पानसे बरींच वर्षें ह्या विद्यालयाचे सेक्रेटरी असल्यामुळें ह्या संस्थेशीं त्यांचा निकट संबंध होता. परंतु ग्रंथ लिहिण्याचें काम हातीं घेतलें नाहीं तोंच दुर्दैवानें ते परलोकवासी झाले. कु. वेणुबाईंस त्यांच्याकडून हा ग्रंथ लिहिण्यास बरीच मदत झाली असती; परंतु त्यांच्या निधनानें ती नाहींशी झाली. असा हा दुःखाचा डोंगर कोसळला असतांहि, मुळींच न डगमगतां, शाळेचें काम उत्तम रीतीनें बजावून, पुष्कळ वेळां रात्रीचा दिवस करून, कु. वेणुबाईनीं ग्रंथ लिहिण्याचें काम चालू ठेविलें. परंतु त्यांची कसोटी पाहण्यासच जणूं काय आणखी एक दुःखाचा घाला त्यांच्यावर आला. वडिलांनंतर फक्त सात महिन्यांनीं त्यांची एक धाकटी बहीण अकालीं मृत्युमुखीं पडली ! हेंहि दुःख मोठ्या धैर्यानें गिळून हातीं घेतलेलें काम अविश्रांत परिश्रम करून त्यांनीं तडीस नेलें. हा ग्रंथ लिहीत असतांना अशा बऱ्याच अडचणी आल्या. आर्थिक परिस्थितीहि प्रतिकूल असल्यामुळें हें कार्य कसें तडीस जाईल ह्याविषयीं बरीच काळजी उत्पन्न झाली होती. परंतु माजी विद्यार्थिनींकडून बरेंच साहाय्य मिळालें, म्हणून हा ग्रंथ त्यांजकडून प्रकाशित झाला आहे. कु. वेणुबाईनीं केलेल्या कामगिरी-बद्दल त्यांचा करावा तितका गौरव थोडाच होय. शाळेचे पन्नास वर्षांचे जुने लेख वाचून माहिती गोळा करण्यांत कु. सिंधुबाई गोखले, कु. मथुराबाई जोशी व कु. विजया-बाई घाटे ह्यांनीं फारच मेहनत घेतली. तसेंच माजी विद्यार्थिनींकडून आर्थिक साहाय्य मिळविण्यांत त्यांनीं व डॉ. काशीबाई नवरंगे, श्रीमती शांताबाई मेहेंदळे, सौ. सत्य-

वती बापट, मिसेस् गोरे, कु. इंदुबाई पानसे, कु. शांताबाई भालेराव, कु. गोदुबाई गोखले, सौ. शांताबाई वैद्य, कु. ताराबाई आपटे, कु. यमूबाई मांडके, कु. शारदा-बाई नागपूरकर यांनीं उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे, याचा उल्लेख करण्यास मला आनंद वाटतो. तसेंच मि. दीक्षित, स्कूल कमिटीचे जॉइन्ट सेक्रेटरी, ह्यांनीं आपला अमूल्य वेळ खर्च करून निरनिराळीं प्रकरणें वाचून व कांहीं महत्त्वाच्या सूचना देऊन ग्रंथासंबंधानें आपली पसंति प्रकट केली म्हणून सर्व त्यांचा आभारी आहे. शेवटीं ज्या शाळेचा आम्हां सर्व जुन्या व नव्या विद्यार्थिनींस अभिमान वाटतो, जिच्यामुळें आज अनेक स्त्रियांचें कल्याण झालें आहे व होत आहे ती दीर्घायु होऊन तिच्या योगानें स्त्रियांच्या उन्नतीचें प्रमाण अधिकाधिक वाढून देशाची खरी सुधारणा होवो अशी ईश्वराजवळ मी प्रार्थना करितें.

आर. बी. वेरुळकर,
ऑनररी प्रिन्सिपॉल, हायस्कूल फॉर इंडियन् गर्ल्स्.

निवेदन

हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स् (हुजुरपागा) या संस्थेच्या पन्नासाव्या वर्षाच्या सुवर्णमहोत्सवप्रसंगीं संस्थेनें केलेल्या कार्यांचा समग्र इतिहास कोणा तरी माजी विद्यार्थिनीनें लिहून जनतेस सादर करावा अशी कल्पना मुंबईच्या सुप्रसिद्ध डॉक्टर कुमारी काशीबाई नवरंगे यांनीं मिसेस् मोझेस् यांना सुचविली व त्यांना ती पसंत पडली. त्या दोघींच्या इच्छेवरून माजी विद्यार्थिनी-संघातर्फे हा इतिहास लिहिण्याचें काम मीं स्वीकारलें. ज्याच्या छत्राखालीं सरस्वतीची आराधना करण्यांत पूज्य अध्यापकवर्ग व प्रेमळ मैत्रिणी यांच्या सहवासांत आयुष्यांतील अत्यंत मनोरम सौख्याचे दिवस घालविले व ज्याच्या पवित्र वातावरणांतील निर्मल सुखस्मृति अद्यापहि हृदयास आनंदवीत आहेत त्या या मातेप्रमाणें प्रिय वाटणाऱ्या विद्या-मंदिराची अल्प सेवा करण्याची संधि दिल्याबद्दल माजी विद्यार्थिनी-संघाचे, आपला अमूल्य वेळ खर्चून जुनी माहिती पुरविल्याबद्दल डॉ. काशीबाई नवरंगे, डॉ. सुंदरा-बाई कीर्तने, प्रि. सौ. स्नेहलताबाई पगार, श्री. काशीबाई हेर्लेकर, श्री. लक्ष्मीबाई प्रधान, ऑ. प्रिन्सिपॉल मिस् वेरुळकर, मिसेस् गोरे, गुरुवर्य रड्डीशास्त्री, गु. बापट व पुराणिक यांचे, संस्थेचे निरनिराळे फोटो घेण्याची व्यवस्था करून इतर बाबतींत साहाय्य केल्याबद्दल श्री. देशमुख यांचे व आर्थिक साहाय्य मिळविणें, माजी विद्या-र्थिनींना पत्रें लिहिणें, शाळेंतील रेकॉर्ड वाचून माहिती गोळा करणें, माजी विद्यार्थिनी व लेडी सुपरिंटेंडेंट्स् यांचे फोटो मागविणें, ग्रंथाचीं परिशिष्टें तयार करणें व मुद्रितें तपासणें इत्यादि विविध कार्यें करून उत्साहानें एकतान सहकार्य केल्याबद्दल कुमारी मथुराबाई जोशी, कुमारी सिंधूबाई गोखले, कुमारी विजयाबाई घाटे यांचें, माजी विद्यार्थिनी नसतांहि मुद्रितें तपासण्यास अमूल्य साहाय्य केल्याबद्दल कु. अनसूयाबाई देवधर यांचे, स्मारक-ग्रंथ-कमिटीची चिटणीस या नात्यानें मी अंतःकरणपूर्वक आभार मानतें. स्मारक-ग्रंथ-फंड जमविण्याचे कामीं ज्या इतर भगिनींनीं साहाय्य केलें आहे त्यांचे आभार मिस् वेरुळकर यांनीं मानलेलेच आहेत.

श्री. सत्तूर यांच्या सांगण्यावरून श्रीमति सीताबाई मालणकर (आर्टिस्ट) यांनीं हायस्कूलच्या संस्थापकांचीं तैलचित्रें तयार केलीं असून तीं या उत्सवप्रसंगीं पुणें प्रार्थनासमाजाकडून हायस्कूलला अर्पण करण्यांत येणार आहेत. श्री. सीताबाई

या शाळेच्या माजी विद्यार्थिनी असल्यामुळें त्यांचा या कामाबद्दल गौरव करण्यास फार अभिमान वाटतो.

शाळेच्या ऑ. प्रिन्सिपॉल मिस् वेरुळकर व माझ्या सहकारी भगिनी यांनीं वेळोवेळीं जें प्रोत्साहन दिलें त्यामुळें अनेक कौटुंबिक आपत्ती आल्या असतांहि हा ग्रंथ पुरा करण्याचें धैर्य मला आलें. तेव्हां या ग्रंथाचें सर्व श्रेय त्यांनाच आहे.

स्मारक-ग्रंथाचें प्रत्येक हस्तलिखित प्रकरण वाचून पाहून अमूल्य सूचना केल्याबद्दल महाराष्ट्र गर्ल्स् एज्युकेशन सोसायटीचे जॉइंट सेक्रेटरी रावसाहेब दीक्षित यांची मी अत्यंत आभारी आहें. आमच्या शाळेंतील माजी विद्यार्थिनी हिंदुस्थानां-तील अनेक प्रान्तांत महत्त्वाचें कार्य करीत आहेत. ज्यांची माहिती मिळाली त्यांचा उल्लेख ग्रंथांत केला आहे. परंतु अज्ञानानें व नजरचुकीनें कोणाचा उल्लेख आला नसल्यास त्याबद्दल मी अगोदरच क्षमा मागून ठेवितें. त्यांचें नांव ग्रंथांत आलें नाहीं म्हणजे त्यांच्या कार्याचें महत्त्व कमी आहे असा कोणीही गैरसमज करून घेणार नाहीं अशी मला खात्री वाटते.

फोटोंचे ब्लॉक्स् व छपाई यांचें काम उत्तम रीतीनें केल्याबद्दल वागळे प्रोसेस् स्टूडिओचे मालक श्री. वागळे, माजी विद्यार्थिनी व संस्थापक यांच्या फोटोचे ब्लॉक वापरण्यास दिल्याबद्दल सुबोधपत्रिकेचे संपादक श्री. वैद्य, मिस् हर्फर्डचा फोटो दिल्याबद्दल मिसेस् सहाटोर यांचे, ज्ञानप्रकाशचे संपादक श्री. काका-साहेब लिमये व त्याचप्रमाणें स्मारक-ग्रंथाचें काम अत्यंत काळजीपूर्वक व वेळेवर तयार करून दिल्याबद्दल ‘ समर्थ भारत ’ छापखान्याचे व्यवस्थापक श्री. सरदेसाई यांचे मी मनापासून आभार मानतें.

ग्रंथलेखनास आवश्यक अशी शान्तता, निर्वेधता व प्रसन्नता मिळणें अशक्य झालें; त्यामुळें ग्रंथांत बराच उणेपणा राहिला असल्याची मला पूर्ण जाणीव आहे. परंतु ही सेवा आपण गोड मानून घ्याल अशी दृढ आशा व्यक्त करून आपली रजा घेतें.

हायस्कूल फॉर इन्डियन गर्ल्स्,
(हुजुरपागा) पुणें.
ता. २५ नोव्हेंबर १९३४

वेणूबाई पानसे

अनुक्रमणिका

प्रकरण पहिलें

प्राचीन स्त्री-शिक्षण

वेदकालीन ग्रंथांवरून तत्कालीन स्त्रियांस समाजांत व गृहांत विशेष मान होता असें दिसतें. त्यांचा दर्जा पुरुषांच्या बरोबरीचा होता. यज्ञप्रसंगीं यजमानाबरोबर त्याची पत्नीहि व्रतस्थ असे. गृहांत त्यांचें स्थान श्रेष्ठ प्रतीचें होतें. ज्ञानप्राप्तीसाठीं त्यांचा उपनयन-संस्कार करीत असत. स्त्रियांना उपनयन-संस्कार अनेक महर्षींनीं स्पष्ट सांगितला आहे. यावरून त्यांचा ज्ञानप्राप्तीचा अधिकार सिद्ध होतो. त्यांनीं वेद शिकणें, गायत्रीजप करणें हेंहि इष्ट होतें. स्त्रियांना पिता, चुलता, अथवा बंधू यांतून कोणीं तरी शिकवावें असें स्मृतींत म्हटलें आहे.

वेदांतील कित्येक सूक्तें स्त्रियांनीं केलेलीं आहेत. यावरून पुरुषांच्याप्रमाणेंच बौद्धिक विकास करून घेण्याची त्यांना मोकळीक होती असें दिसतें. ऋग्वेदांतील पांचव्या मंडलांत विश्ववारा नांवाच्या स्त्रीनें रचलेलें सूक्त आहे. घोषा नांवाच्या स्त्रीनें दहाव्या मंडलांतील कांहीं सूक्तें केलेलीं आहेत. त्याचप्रमाणें लोपामुद्रा, शची, रोमषा, इन्द्राणी इत्यादि अनेक स्त्रियांचीं सूक्तें ऋग्वेदांत आढळतात.

उपनिषदांमध्यें गार्गी, मैत्रेयी, सुलभा, अरुन्धती, वाचक्नवी, सुवर्चसा वगैरे विद्वान् स्त्रियांचीं नांवें आहेत. गार्गीनें विद्वानांच्या सभेंत स्थान मिळविलें होतें. मैत्रेयी आपला पति याज्ञवल्क्य याच्याशीं ज्ञेयअज्ञेय यांसंबंधीं तासानुतास वादविवाद करीत असे. पत्नी ही पतीची अर्धांगी आहे ही कल्पना तैत्तिरीय संहितेंत आढळते. सामवेद गाण्यांत स्त्रिया अनेक वेळां ऋषींची साथ करीत. वाद्यें वाजविण्यांतहि त्या कुशल असत.

त्या काळची विवाहसंस्था उच्च दर्जाची होती. कन्येला योग्य वर शोधून काढण्याची पिता काळजी घेत असे व वधूलाहि पतीची निवड करण्याची थोडीफार संधि देण्यांत येई. विवाहसमयीं मुली प्रौढ असत.

“ समंजंतु विश्वेदेवा समापो हृदयानिनौ ।
संमातारिश्वा संधाता समुदेष्ट्री दधातु नौ ॥ ”

अर्थः—सर्व देव आमचीं हृदयें एक करोत. मातरिश्वा, धाता आणि वाग्देवता आम्हांला एक करोत.

या व इतर विवाहसूक्तांवरून आर्यांची विवाहसंस्था किती श्रेष्ठ प्रकारची होती हें कळतें. नववधूनें घरांतील सेवकांना, तसेंच गाईबैलांना चांगलें वागवावें, पतीची काळजी घ्यावी व गृहकृत्यें उत्कृष्ट तऱ्हेनें करावींत अशा तऱ्हेचा उपदेश या सूक्तांमध्यें केलेला आहे.

फक्त राजे लोकांमध्यें बहुपत्नीकत्वाची चाल होती. दहाव्या मंडलांतील १८ व्या सूक्तावरून त्या काळीं सतीची व पुनर्विवाहाची चाल होती असें दिसतें. त्याचप्रमाणें कोठें कोठें अविवाहित स्त्रियांचे उल्लेख आढळतात. त्या बहुधा ब्रह्मवादिनी असून त्यांना उपनयन, अग्निकार्य, वेदाध्ययन, स्वगृहीं भिक्षा मागणें हे धर्म सांगितलेले आहेत. ब्रह्मवादिनी स्त्रियांमध्यें मुख्यत्वें पारलौकिक कर्मानुष्ठानामध्यें जीवित वेंचणाऱ्या अशा गार्गी, वडवाप्रातिथेयी इत्यादि स्त्रिया असत. विवाह करणें अथवा न करणें हें त्यांच्या इच्छेवर असे.

ब्राह्मणकालांत आर्यांचा उत्कर्ष झाला. वैभवप्राप्तीमुळें साधी रहाणी जाऊन थाटाची रहाणी आली. साधे यज्ञ गेले व सामुदायिक स्वरूपाचे मोठे यज्ञ करण्याचा प्रघात पडला. याच काळांत कुरु-पांचालांचें घनघोर युद्ध झालें. चातुर्वर्ण्य व ब्रह्मचर्यादि चार आश्रम ब्राह्मणकालांतच बहुधा रूढ झाले असावेत.

स्त्रियांचें श्रेष्ठ स्थान समाजांत कायम असून बालविवाहाची चाल त्या काळींहि अस्तित्वांत नव्हती; त्याचप्रमाणें पुनर्विवाहासहि बंदी नव्हती. वाचक्नवीसारख्या विद्वान् स्त्रिया याज्ञवल्क्यासारख्या ऋषींशीं वादविवाद करीत होत्या.

सूत्रकाळांत जाती निर्माण झाल्या. वैदिक व उपनिषत्कालाप्रमाणें या कालांत विदुषी स्त्रिया फारशा दिसत नाहींत. परंतु गृहांत व समाजांत त्यांस श्रेष्ठ प्रतीचा मान होता. आचार्य व पिता यांपेक्षांहि माता ही श्रेष्ठ ही भावना अजून होती. विनाकारण पत्नीचा त्याग करणाऱ्या पतीस कडक शिक्षा देत, असें आपस्तंबांतील सूत्रांवरून वाटतें. पतिपत्नींचीं कर्तव्यें न्याय्य बुद्धीनें धर्मसूत्रांत सांगितलेलीं आहेत.

या काळांत बालविवाहाची पद्धति थोड्याशा प्रमाणांत सुरू झाली. तथापि बालविधवांना पुनर्लग्नाची मोकळीक होती. प्रत्येकास रोज पंचमहायज्ञ करावे लागत. वैदिक कालापासून महाभारतकालापर्यंत जे विद्वान् स्त्रीपुरुष होऊन गेले त्यांचा उल्लेख ब्रह्मयज्ञामध्यें करण्यांत येतो. त्यांमध्यें गार्गी, वाचक्नवीं, वडवाप्रातिथेयी, सुलभा, मैत्रेयी यांनाहि स्थान मिळालें आहे. "गार्गी वाचक्नवी तृप्यताम् । वडवाप्रातिथेयी तृप्यतु । सुलभा मैत्रेयी तृप्यताम् ।" अशा रीतीनें ज्या आपल्या विद्वान्

पूर्वजांनीं आपणांस अमूल्य ज्ञान दिलें त्यांचें नित्य स्मरण करण्याची ही पद्धति स्तुत्य नाहीं असें कोण म्हणेल ?

सूत्र ग्रंथ तयार होत असतां वैदिक धर्मावर महान् संकट कोसळलें. यज्ञांच्या अतिरेकामुळें समाजांत अव्यवस्था माजली. वेदाधिकार नसल्यानें शूद्र वर्गांत पराकाष्ठेचें असमाधान उत्पन्न झालें. गौतम-बुद्धानें केलेल्या धर्मक्रान्तीचीं हींच कारणें असावींत. या धार्मिक व सामाजिक क्रान्तीचे परिणाम व्यापक स्वरूपाचे झाले व बौद्ध धर्माच्या प्रसाराबरोबर यज्ञसंस्थेचें निर्मूलन झालें.

बौद्धधर्म नीतीच्या उपदेशासाठीं प्रसिद्ध आहे. त्या काळीं पुरुष भिक्षु होण्यांत व स्त्रिया भिक्षुणी होण्यांत धन्यता मानूं लागल्या. परंतु संन्यास-धर्माचें त्यांच्याकडून योग्य रीतीनें पालन न झाल्यामुळें बौद्ध धर्म विनाश पावला. संन्यास व अहिंसा या दोन तत्त्वांचा अतिरेक झाल्यामुळें राष्ट्राचें बल कमी झालें.

पाणिनीच्या काळीं मुलींचीं लग्नें प्रौढपणीं होत. स्त्रिया क्वचित् अविवाहित असत. पुनर्विवाहास मोकळीक होती. कित्येक स्त्रिया अध्यापनाचें कार्य करीत. क्षत्रिय स्त्रियांना पडदा असे.

याच काळांत भारताचें महाभारतांत रूपांतर झालें. उपनिषदांमध्यें गार्गी, वाचक्नवी वगैरे विदुषी ब्राह्मणस्त्रिया वर्णिलेल्या आहेत. त्याचप्रमाणें महाभारतामध्यें सुलभा नांवाच्या संन्यासिनीचें वर्णन आहे. या क्षत्रियकन्येचा जनकाशीं झालेला तत्त्वज्ञानविषयक संवाद शान्तिपर्वांत आहे. “ योग्य पति न मिळाल्यामुळें, गुरूपासून मोक्षशास्त्राचें शिक्षण घेऊन, संन्यासधर्मानें मी राहतें ” असें तिनें जनक राजास सांगितलें. यावरून प्राचीन काळीं क्षत्रियांच्या कन्या विवाह न करतां संन्यास ग्रहण करीत असें दिसतें.

महाभारतकाळीं स्त्रियांना शिक्षण देत व हें शिक्षण उच्च प्रकारचें असावें असें वाटतें. द्रौपदीचें वर्णन “ प्रिया च दर्शनीया च पण्डिता च पतिव्रता। ” असें केलेलें आहे. स्त्रियांना घरींच पित्यापासून, बंधूपासून अगर घरीं येणाऱ्या आदरणीय वृद्ध लोकांकडून शिक्षण मिळत असे. पतीबरोबर वैदिक क्रियांचा अधिकार त्यांना होता.

लेखन, वाचन, धर्म यांशिवाय ललितकलांचें शिक्षण क्षत्रिय स्त्रियांना देत असत ही गोष्ट विराट पर्वांतील उत्तरेच्या उदाहरणावरून सिद्ध हाते. विराटराजाची कन्या उत्तरा हिला नृत्य, गायन व वादन शिकविण्यासाठीं बृहन्नडेची योजना

केलेली होती. तिच्यासाठीं एक स्वतंत्र नृत्यशाळाहि बांधलेली होती. कौमार्यांत मुलींना शिक्षण देण्याची चाल त्या वेळीं होती. ललितकलांचें शिक्षण क्षत्रियकन्यांनाच मिळणें शक्य असे. क्षत्रिय व ब्राह्मणकन्या यांना सहजच शिक्षणाचा लाभ होई; कारण ज्ञानदानाचें काम ब्राह्मणांच्याकडेच असे. गृहांतील ज्ञानदानाच्या पवित्र वातावरणांत वाढलेल्या ब्राह्मणकन्या सुलभ रीतीनें सुशिक्षित होत.

महाभारतकाळीं स्वयंवराच्या चालीमुळें विवाहसमयीं मुली प्रौढ असत. ' पंडिता, ब्रह्मवादिनी ' असें द्रौपदीचें वर्णन कवीनें केलें आहे. यावरून धर्मशास्त्रांत ती निपुण होती असें दिसतें. वनामध्यें युधिष्ठिराशीं केलेल्या संवादावरून तिची राजकारणकुशलताहि व्यक्त होते.

महाभारतकाळीं सतीची चाल होती, परंतु पडद्याची मात्र नव्हती. क्षत्रिय स्त्रिया मोकळेपणानें बाहेर हिंडत असत. महाभारतांत चंपारण्य, प्रियकारण्य इत्यादि उद्यानांचीं नांवें आढळतात. प्रत्येक नगराबाहेर मोठमोठीं उद्यानें असत व स्त्रीपुरुष तेथें उत्सवासाठीं जात असें महाभारतांत वर्णन आहे.

रामायणांतील कांहीं भाग महाभारताच्या व बौद्धधर्माच्या अगोदरचा आहे. महाभारतानंतर रामायणाची पुनः रचना करण्यांत आली. त्या काळांत स्त्रिया वेदांचें अध्ययन करीत व वैदिक आचारांचें पालन करीत. तेव्हां मूर्तिपूजा नव्हती. ब्राह्मण व क्षत्रिय मांसान्न सेवन करीत व त्यांच्यांत विद्येविषयीं चढाओढ असे. स्त्रियांना स्वतंत्र रीतीनें होम वगैरे धर्मविधि करण्याचा अधिकार होता. वनवासाला जाण्यापूर्वीं राम कौसल्येस भेटावयास गेला त्या वेळीं ती एकटीच होमहवन करीत बसली होती असें वर्णन आहे.

" सा क्षौमवसना हृष्टा नित्यं व्रतपरायणा ।
अग्निं जुहोति स्म तदा मन्त्रवत् कृतमंगला ॥ "

मारुतीला सीता सांपडेना तेव्हां ' या नदीचें पाणी शुद्ध आहे; तेव्हां संध्यावंदनासाठीं येथें सीता येईल,' असा विचार करून तो अशोकवनांतील एका सुंदर जलप्रवाहाच्या बाजूला बसला. यावरून संध्येचा अधिकार स्त्रियांना त्या काळीं होता हें सिद्ध होतें.

" संध्याकालमनाः श्यामा ध्रुवमेष्यति जानकी ।
नदीं चेमां शुभजलां संध्यार्थे वरवर्णिनी ॥ "

असें कवीनें वर्णन केलेलें आहे. यज्ञांतील घोड्याला तरवारीचे तीन घाव घालून

कौसल्येनें ठार मारलें असेंहि वर्णन एके ठिकाणीं आहे. कौसल्या खरोखरच मोठी पराक्रमी स्त्री असली पाहिजे! एकंदरींत या काळीं स्त्रियांना पुरुषांच्या इतकेंच महत्त्व, धार्मिक अधिकार व स्वातंत्र्य होतें ही गोष्ट निर्विवाद आहे.

महाभारतानंतरचा काल म्हणजे स्मृतींचा काल होय. मनुस्मृतीमध्यें स्त्रियांच्या विषयीं परस्परविरुद्ध वाटणारे असे अनेक उद्गार आहेत. स्त्रियांबद्दल अनुचित उद्गार काढून त्यांना स्वातंत्र्य देऊं नये असें मनूनें प्रतिपादन केलें आहे. विवाह-विधि हाच स्त्रियांचा उपनयनाख्यसंस्कार मन्वादिकांनीं मानला. " पतीची सेवा हाच त्यांचा गुरुकुलवास व गृहकृत्यें हाच सायंप्रातर्होम." (मनुस्मृति–अध्याय २)

वरील वचनांवरूनच स्मृतिकालीं स्त्रियांची परिस्थिति बदलून गेली असल्याचें वाचकांच्या ध्यानांत येईल. गार्गी, मैत्रेयी, सुलभा यांच्याप्रमाणें ज्ञानसंपादनाचें स्त्रियांचें स्वातंत्र्य लयास जाऊन गृह, पति व गृहकृत्यें एवढेंच त्यांचें कार्यक्षेत्र बनलें असें दिसतें. कौमार्यांत पित्यानें, तारुण्यांत पतीनें व वार्धक्यांत पुत्रानें स्त्रीचें रक्षण करावें, परंतु तिला स्वातंत्र्य देऊं नये, असें मनु म्हणतो. पिता, भ्राता, पति, दीर यांनीं त्यांना पूज्य मानावें व वस्त्रालंकारांनीं भूषित करावें. कारण

" यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।
यत्रैतासु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥
संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैव च ।
यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुवम् ॥ "

अशा तऱ्हेचा गृहसौख्याचा सुंदर आदर्शहि मनूनें समाजापुढें ठेविला आहे. पत्नीनें घरांतील सर्व उपकरणें टापटिपीनें ठेवावीं; स्वतंत्रपणें कोणतेंहि कृत्य करूं नये; पति कसाहि असला तरी साध्वी स्त्रीनें त्याची सेवा करावी; पतिसेवा हाच तिचा यज्ञ, हेंच तिचें व्रत; स्वर्गाची इच्छा करणाऱ्या साध्वीनें पतीचें यत्किंचित्‌हि अप्रिय करूं नये, तिनें गृहकृत्यांत दक्ष असावें, फार खर्च करूं नये, नेहमीं हंसतमुख राहावें, अशा प्रकारचा उपदेश मनुस्मृतींत आढळतो.

याज्ञवल्क्याच्या काळीं बालविवाह रूढ झाला. प्रौढविवाह, स्वयंवर इत्यादि उत्तम विवाहपद्धति जाऊन बालविवाहाची चाल सार्वत्रिक सुरू होण्याचीं कारणें कोणतीं असावींत याची चांगलीशी कल्पना येत नाहीं. परंतु बालविवाहपद्धति रूढ झाल्याकारणानें स्त्रियांच्या बौद्धिक विकासाच्या मार्गांत अडथळा उत्पन्न झाला.

त्यांचें शिक्षण सासरचीं माणसें व सासरची परिस्थिति यांवर पूर्णत्वानें अवलंबून राहिलें. घरांतील परिस्थिति अनुकूल असल्यास लेखन, वाचन, हिशेब, शिवण इत्यादि शिक्षण त्यांना घरच्या घरींच मिळे. रामायण, महाभारत व भागवतादि इतर पुराणें या ग्रंथांचें ज्ञान त्यांना श्रवणानें होई; परंतु अशा प्रकारच्या शिक्षणामुळें गार्गी-सुलभा निर्माण होणें अशक्य होऊन बसलें.

स्मृतिकालानंतर पौराणिक काळास प्रारंभ झाला. इ. स. ३०० ते इ. स. १००० या काळास पौराणिक असें नांव पडलें; कारण याच काळांत पुराणांची पुनर्रचना झाली. या काळांत अशोक, चंद्रगुप्त, विक्रमादित्य, श्रीहर्षादि अनेक राजे झाले. चन्द्रगुप्त व विक्रमादित्य हे हिंदु धर्माचे अभिमानी होते. त्यामुळें अर्थातच हिंदु धर्मानें आपलें डोकें वर काढलें. तथापि हे दोन्ही राजे परधर्मसहिष्णु असल्यानें बौद्ध विद्वानांचा ते योग्य परामर्ष घेत. गुप्तसम्राट हिंदु वैदिकधर्मीय असल्यामुळें बहुजनसमाजानें बौद्धधर्माविषयीं उदासीनता धारण केली, म्हणून बौद्धधर्माच्या ऱ्हासास सुरुवात झाली.

याच कालांत संस्कृतांतील अत्युत्कृष्ट वाङ्मय निर्माण झालें. कालिदास, शूद्रक, भवभूति यांचीं नांवें त्यांच्या काव्यनाटकादि ग्रंथांमुळें अजरामर झालीं आहेत. कालिदासानें आपल्या शाकुंतलम्, विक्रमोर्वशीयम्, मालविकाग्निमित्रम् व भवभूतीनें आपल्या उत्तररामचरितम् व मालती-माधवम् या नाटकांत स्त्रियांचीं जीं चित्रें रेखाटलीं आहेत त्यांवरून तत्कालीन स्त्रियांच्या समाजांतील दर्जाची चांगलीच कल्पना येते. मालती-माधवांतील कामंदकीचें चित्र या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें आहे. तिच्या भाषणावरून असें दिसतें कीं, एखाद्या प्रसिद्ध शहरांत एखाद्या विद्वान् आचार्याजवळ मुलगे व मुली अध्ययनासाठीं राहात. "लहानपणीं मी, भूरिवसु, देवरात व इतर देशोदेशचे विद्यार्थी अध्ययनाकरितां एके ठिकाणीं राहात असूं" असें कामंदकी स्वतः सांगते. मुलींना वरिष्ठ प्रतीचें शिक्षण देत असत व अध्ययनसमाप्तीनंतर इच्छा असल्यास त्या परमार्थमार्गाचा स्वीकार करीत व त्यांच्या-बद्दल लोकांत फार आदर असे. विद्वान् स्त्रिया मठाधिकारिणीहि होत असत.

मालतीनें मनाच्या करमणुकीसाठीं माधवाची तसबीर काढली होती. यावरून त्या काळीं मुलींना चित्रकला शिकवीत असें दिसतें. मुलींना चित्रकला, काव्यरचना इत्यादि कलांचें ज्ञान असणें योग्य असाच भवभूतीचा अभिप्राय आहे. शकुंतलेनें दुष्यंताला काव्यांत पत्र लिहिलें, मालविकेस नृत्यकलेचें शिक्षण देण्यास

एका पुरुष शिक्षकाची योजना केली होती असें कालिदासानें वर्णिलें आहे. उत्तर-रामचरितांत वाल्मीकीच्या आश्रमांत लव व कुश यांच्याबरोबर अध्ययन करणाऱ्या आत्रेयी तापसीचें चित्र भवभूतीनें रेखाटलें आहे. श्रीहर्षाची भगिनी राज्यश्री सुशिक्षित असून नृत्यगायनादि कला व शास्त्रें यांत निपुण होती. विवाहसमयीं राज्यश्री प्रौढ असल्याचें वर्णन बाणभट्टानें केलें आहे.

हर्षाच्या कालापर्यंत तरी मनूच्या वचनांचा पगडा समाजावर पडलेला दिसत नाहीं. मुलींना मुलांच्याप्रमाणें उच्च शिक्षण देत व याशिवाय चित्र, नृत्य, गायन, काव्य इत्यादि कला व शास्त्रें त्यांना शिकवीत. कामंदकी व आत्रेयी यांच्या उदाहरणांवरून मुलें व मुली यांना सहशिक्षण देण्यास हरकत होती असें दिसत नाहीं. हर्षाचे कालापर्यंत प्रौढ विवाह चालू होते. पडद्याची व सतीची चालहि होती. हर्षाच्या मातेनें पति मरणोन्मुख असतां अग्निप्रवेश केला. वैधव्य आलें असतां स्त्रिया भिक्षुणी होत. एकंदरीनें हर्षराजाचा काल म्हणजे प्राचीन व अर्वाचीन कालास जोडणारा संधिकालच होय.

श्रीहर्षानंतर पुनः धार्मिक चळवळ झाली व बौद्धधर्माचा हिंदुस्थानांत लोप होऊन श्रीशंकराचार्यांनीं वैदिक हिंदु धर्माची पुनः स्थापना केली. हर्षोत्तर कालांत उत्तर हिंदुस्थानांत रजपुतांचा उदय झाला व दक्षिणेंत चालुक्य, होयसल, देव-गिरीचे यादव इत्यादि वंशांनीं राज्य केलें.

मनूनें स्त्रियांसंबंधीं कडक नियम केले तरी पुढें कित्येक वर्षेपर्यंत ब्राह्मण-स्त्रियांना चांगलें लिहितांवाचतां येत असे. रामायण-महाभारतांतील कित्येक मनोरम भाग त्यांना मुखोद्गत असत. पुरुषांचीं संध्यासूक्तें ऐकून ऐकून त्यांस पाठ येत. नवव्या शतकांत अद्वितीय गणिती व ज्योतिषशास्त्रज्ञ भास्कराचार्य यानें आपली बालविधवा कन्या लीलावती हिला गणितशास्त्र शिकविलें. तेराव्या शतकांत यादवांच्या कार-कीर्दींत ज्ञानेश्वराचा उदय होऊन त्यानें ज्ञानेश्वरीद्वारें श्रीकृष्णाचा समतेचा संदेश बहु-जनसमाजास दिला. त्याची बहीण मुक्ताबाईहि ज्ञानेश्वराप्रमाणें विद्वान् असून आमरण अविवाहित होती. तिचे अभंग, कल्याणपत्रिका व हरिपाठ प्रसिद्धच आहेत.

इ. स. १२९३ मध्यें अल्लाउद्दीन खिलजीनें देवगिरीचें राज्य काबीज केलें व हिंदु धर्म व हिंदु संस्कृति यांवर भयंकर संकट गुदरलें. हिंदु संस्कृतीचें रक्षण करण्याचें कार्य नामदेव-एकनाथादि संतांनीं केलें. मुसलमानांच्या प्रवेशानंतर मनूचे कायदे कडक रीतीनें अमलांत आले. प्रौढविवाह बंद होऊन बालविवाह सुरू झाले.

पुनर्विवाहास बंदी झाली. जातिभेद तीव्र झाले. स्त्रियांचें स्वातंत्र्य नष्ट झालें. पडदा-पद्धति स्त्रियांच्या रक्षणार्थ सुरू झाली. अशा प्रतिकूल परिस्थितींत सुद्धां कित्येक कवयित्र्या निर्माण झाल्या. नामदेवाची आई, पत्नी, सुना व दासी जनाबाई या सर्वांनीं अभंगरचना केलेली आहे. श्रीसमर्थ रामदासांच्या शिष्यपरिवारांत वेणूबाई-सारख्या शिष्या होत्या. श्रीसमर्थांच्या मतें स्त्रीपुरुषांचा दर्जा सारखा असल्यामुळें त्यांनीं आपल्या शिष्यिणींच्याकडून पारमार्थिक ग्रंथांचें अध्ययन करविलें व कांहींना पुराणें व कीर्तनें करण्याचा अधिकार दिला. समर्थशिष्या वेणूबाई यांनीं 'सीतास्वयंवरादि' तीन चार ग्रंथ लिहिले. तुकारामशिष्या बहिणाबाई हिचे अभंग प्रसिद्ध आहेत. त्याच-प्रमाणें प्रेमाबाईचे कृष्णचरित्रावरील अभंग मधुर व भक्तिरसानें ओथंबलेले आहेत.

याशिवाय आपल्या पराक्रमानें व दिव्य तेजानें नेत्र दिपवून टाकणाऱ्या अशा स्त्रिया रजपूत व मराठे लोकांत निर्माण झाल्या. अद्वितीय धैर्य, पराक्रम व निःसीम देशप्रीति या गुणांमुळें राणी दुर्गावती, पद्मिनी व कृष्णाकुमारी यांचीं नांवें इतिहासांत चिरस्थायी झालीं आहेत. मराठी राज्यांत जिजाबाई, अहल्याबाई, बायजाबाई व झांशीची राणी लक्ष्मीबाई या स्त्रीरत्नांचीं नांवें सर्वतोमुखीं झालेलीं आहेत. राजकारण, पराक्रम व धैर्य या गुणांत आपण पुरुषांच्या बरोबरीच्या आहोंत हें त्यांनीं सिद्ध केलें.

पेशवाईत उमाबाई दाभाड्यासारखी तरवारबहाद्दर शूर स्त्री निपजली. तिनें कित्येक प्रसंगीं तरवार धारण करून लढाया केल्या. बाळाजी विश्वनाथाची पत्नी राधाबाई ही राज्यकारस्थानांत कुशल असून तिला लिहितांवाचतां येत असे. अनेक कौटुंबिक व सामाजिक बाबतींत ती पुढाकार घेई. नानासाहेब पेशवे यांची स्त्री गोपिकाबाई हीसुद्धां मोठी राजकारणी व महत्त्वाकांक्षी स्त्री होती.

राजघराण्यांतील स्त्रियांना शास्त्रीपंडितांच्याकडून शिक्षण मिळे. मध्यम वर्गांतील स्त्रिया पुराणें व महाभारत-रामायणादि ग्रंथांच्या श्रवणानें बहुश्रुत होत व त्याचमुळें उदात्त स्त्री-पुरुषांचीं आदर्श चित्रें त्यांच्या अन्तःकरणांत ठसत. हिंदु धर्मांतील उच्च तत्त्वज्ञानाचा लाभ श्रवणानें त्यांना होत असल्यानें त्यांच्या मनाचा विकास होत असे.

वैदिक कालापासून पेशवाईपर्यंतचा स्त्रीशिक्षणाचा इतिहास आपण येथवर पाहिला. यापुढें पाश्चात्य संस्कृतीच्या संसर्गानें आमच्या समाजावर काय काय परिणाम झाले तें पाहूं.

प्रकरण दुसरें

पाश्चात्य संस्कृतीचा संनिकर्ष

इसवी सन १८१८ सालीं पेशवाईचा अंत झाला व स्वराज्य नष्ट होऊन इंग्रजी राज्यास प्रारंभ झाला. या राज्यप्राप्तीचे परिणाम केवळ राजकारणाच्या मर्यादित क्षेत्रांतच झाले नाहींत, तर इंग्रजांच्या आगमनामुळें आमचा धर्म, आमच्या सामाजिक चालीरीति व आमचें वाङ्मय यांमध्येंहि विलक्षण क्रान्ति झाली.

त्या काळीं पुरुषांच्या शिक्षणाची स्थिति शोचनीय होती. मग स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल तर विचारच नको. बालबोध व मोडी लेखन-वाचन, देवाचे श्लोक, आरत्या, नक्षत्रें, तिथी, वार इत्यादिकांचीं नांवें, आणि संस्कृत विद्या इत्यादि विषयांचें शिक्षण ब्राह्मणांना मिळे. मुलींचीं लग्नें बहुधा आठव्या वर्षींच होत असल्यानें त्यांना गृहकृत्यांशिवाय विशेषसें शिक्षण मिळत नसे. पोथ्या वाचण्याइतकें ज्ञान फारच थोड्या स्त्रियांना असे. पुराणें व कीर्तनें ऐकून त्यांच्या अंगीं बहुश्रुतता येई. पुरुषमंडळींच्या तोंडची संध्या, स्तोत्रें त्यांना ऐकून ऐकून पाठ येत. त्यामुळें त्यांची स्मरणशक्ति वाढत असे. परंतु केवळ श्रवणानेंच ज्ञानसंपादन करण्याचा मार्ग त्यांना मोकळा होता व त्याचा फायदाहि थोड्याच स्त्रियांना घेणें शक्य होई. सासुरवासिनींचा काळ आठव्या वर्षापासून सासूच्या हाताखालीं केवळ गृहकृत्यांतच गेल्यानें त्यांचा मनोविकास होण्यास जागा नसे. रिकामपणचा काळ घालविण्याचें त्यांचें साधन म्हणजे गप्पाटप्पा व शेजारीपाजाऱ्यांची निंदा. घरांतील चार भिंती हेंच त्यांचें जग! अशा संकुचित वातावरणांत राहणाऱ्या स्त्रियांचीं मनें क्षुद्र गोष्टींतच रमत असत. दागदागिने, कपडेलत्ते हेच त्यांचे आवडते विषय असल्यास त्यांत नवल कोणतें? एकत्रकुटुंबपद्धतीमुळें जावा-भावांत दुस्वास, भांडणें होत असत, त्यामुळें घरांत असमाधानाचेंच साम्राज्य असे. इ. स. १८३३पूर्वी पतीच्या मृत्यूनंतर स्त्रियांना सती जावें लागे. कांहीं आपखुषीनें सती जात तर कांहींना त्यांचे स्वार्थ-साधू नातेवाईक पतीच्या चितेमध्यें निर्दयपणानें ढकलून देत. लॉर्ड विल्यम् बेंटिंक यांनीं इ. स. १८३३ सालीं सतीची चाल बंद केली. परंतु ज्यांच्या दीर्घ परिश्रमामुळें सतीच्या चालीविरुद्ध लोकमत तयार झालें, ते राजा राममोहन राय सतीनिषेधक

कायदा झालेला पाहण्यास हयात नव्हते. परंतु हा कायदा म्हणजे राजा राममोहनांच्या परिश्रमाचेंच फळ होय.

इंग्रजांचा संबंध प्रथम बंगालशीं आला. त्या वेळीं तेथील सामाजिक, राजकीय व धार्मिक स्थिति अत्यंत शोचनीय होती. हिंदुधर्माचें उज्ज्वल स्वरूप नष्ट होऊन केवळ रूढी व विधि म्हणजेच धर्म अशी बहुजनसमाजाची कल्पना झालेली होती. सरदार, जहागिरदार, जमीनदार हे आपल्याच चैनींत दंग होऊन राहिले होते व वाढत्या दारिद्र्यामुळें लोकांची स्थिति कष्टमय झाली होती.

अशा परिस्थितींत स्त्रियांच्या दुरवस्थेचें वर्णन काय करावें? आमच्या महाराष्ट्रीय स्त्रियांना निदान गोषा तरी नव्हता. परंतु आमच्या बंगाल्यांतील भगिनी कडक गोषाच्या बंदिशाळेंत कोंडलेल्या होत्या. बहुपत्नीकत्वाच्या चालीमुळें शेंकडों स्त्रिया दुःखाग्नींत होरपळत होत्या, तर कित्येक पतीबरोबर सहगमन करून अग्निप्रवेश करीत होत्या. या दुर्दैवी स्त्रियांच्या वेदनापूर्ण करुणोद्गारांमुळें देशाचें वातावरण भरून गेलें होतें. तेव्हां बंगाल्यांत प्रथम स्त्रियांची उन्नति, स्त्रीशिक्षण, सामाजिक सुधारणा इत्यादिसंबंधीं भाषा निघावी यांत आश्चर्य वाटावयास नको.

स्त्री-जातीसंबंधानें समाजांत जी अनुदात्त वृत्ति होती तिला तीव्र विरोध करणारा महात्मा स्त्रियांच्या सुदैवानें बंगालमध्यें निपजला. तो महात्मा म्हणजे राजा राममोहनच होत. दुर्दैवी मोंगल बादशहा दुसरे अकबर यांच्यातर्फे ते इंग्लंडमध्यें गेले असतां तेथील सामाजिक परिस्थिति व चालीरीतींचें त्यांनीं मार्मिकतेनें अवलोकन केलें. पाश्चात्य स्त्रियांच्या स्थितीशीं आमच्या स्त्रियांच्या स्थितीची तुलना करतांच दोन्ही समाजांत दोन ध्रुवांचें अंतर असल्याचें त्यांना आढळून आलें. स्त्री-जातीसंबंधानें अत्यंत आदर असल्यामुळें त्यांच्या दुःखानें राममोहनांच्या हृदयाला पाझर फुटे. स्त्रियांच्या अंगच्या नैसर्गिक गुणांचा विकास होण्यास समाज मोकळीक देत नाहीं, त्यांना समाजाकडून योग्य मान दिला जात नाहीं याबद्दल त्यांना दुःख होई. सती, बहुपत्नीकत्व इत्यादि दुष्ट चालींचा त्यांनीं कडक शब्दांत निषेध केला. स्त्रियांना पतीच्या इस्टेटीचा वारसाहक्क मिळावा यासाठीं त्यांनीं पुष्कळ खटपट केली. स्त्रियांच्या उन्नतीचें साधन म्हणजे शिक्षण असा त्यांचा दृढ समज असल्यामुळें हिंदु स्त्रियांना शिक्षण देण्यासाठीं एकादी संस्था काढावी म्हणून त्यांनीं एका खिस्ती बाईला बरीच मोठी रक्कम दिली होती. या बाई म्हणजे मिस् कुक् या होत.

पाश्चात्यांच्या संस्कृतीशीं परिचय झाल्यामुळें हिंदुस्थानांत सर्वांगीण क्रान्ति होऊन नवयुगास प्रारंभ झाला व या नवयुगाचे पुढारी व महापुरुष राममोहनच होत. आमच्या समाजांत सामाजिक सुधारणेसंबंधीं जी जागृति उत्पन्न झाली तिचें श्रेय राजा राममोहन यांनाच दिलें पाहिजे. स्त्रियांच्या उन्नतीप्रीत्यर्थ अविश्रांत श्रम करणारे दुसरे बंगाली थोर गृहस्थ म्हणजे पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर होत. राममोहन व ईश्वरचंद्र यांचा त्यांच्या सुधारकी मतांबद्दल स्वजनांकडून फार छळ झाला; परंतु त्या दोघां महात्म्यांनीं त्याची बिलकूल पर्वा केली नाहीं. पंडित ईश्वरचंद्रांच्या खटपटीमुळें इ. स. १८५६ मध्यें पुनर्विवाहाचा कायदा पास झाला.

इ. स. १८१८ सालीं शिक्षणासंबंधीं चौकशी झाली. त्या वेळीं हिंदुस्थानांत स्त्रियांना शिक्षण देणारी एकहि संस्था नसल्याचें आढळून आलें व एका लाखांत लिहितां वाचतां येणारी एक स्त्री आढळली. इ. स. १८२४ मध्यें माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन् यांनीं हिंदुस्थानांतील शिक्षणाचें ध्येय पुढील शब्दांत स्पष्ट रीतीनें व्यक्त केलें. " शिक्षणाचा उद्देश केवळ कारकून तयार करणें हा नाहीं. देशांतील सर्व जातींत ज्ञानप्रसार करून पाश्चात्य देशांच्या योग्यतेस हिंदुस्थानास पोहोंचविणें हाच हिंदुस्थानांतील शिक्षणखात्याचा मुख्य हेतु आहे." एल्फिन्स्टन्साहेबांनीं पेशवाईतील दक्षिणेची रक्कम बाजूस काढून ती विद्यावृद्धीसाठीं खर्च करण्याचें ठरविलें. इ. स. १८२१ सालीं विश्रामबागवाड्यामध्यें संस्कृत पाठशाळा स्थापन करण्यांत आली व तिचा खर्च दक्षिणेच्या रकमेंतून होऊं लागला. इ. स. १८४२मध्यें पाठशाळेलाच जोडून एक इंग्रजी वर्ग उघडण्यांत आला. पुढें पाठशाळा व इंग्रजी वर्ग या दोहोंस मिळून ' पूना कॉलेज ' हें नांव मिळालें. याच पूना कॉलेजचें इ. स. १८६८ सालीं ' डेक्कन कॉलेज ' असें नवीन नांव पडलें. १८४२मध्यें काढलेल्या इंग्रजी वर्गाचें इंग्रजी शाळेंत रूपांतर झालें व हेंच पुण्याचें पहिलें सरकारी हायस्कूल होय.

मुंबईमध्यें एल्फिन्स्टन्साहेबांनीं इ. स. १८२२मध्यें Bombay Native Education Society स्थापन केली. पुढें लॉर्ड एल्फिन्स्टन् यांच्या स्मरणार्थ एल्फिन्स्टन् इन्स्टिट्यूट निघाली. इ. स. १८५७ सालीं मुंबई विश्वविद्यालय स्थापन होऊन पुरुषांच्या दुय्यम व उच्च शिक्षणाची व्यवस्था झाली. कॉलेजमध्यें युरोपियन प्रोफेसरांकडून शिक्षण मिळाल्यामुळें विद्यार्थ्यांना पाश्चात्य वाङ्मय, पाश्चात्य राजकारण, पाश्चात्य तत्त्वज्ञान, पाश्चात्य समाज यांचें ज्ञान होऊन त्यांच्या आचारविचारांत

हळूहळू फरक पडूं लागला. आपली राजकीय, धार्मिक व सामाजिक अवनत स्थिति पाहून त्यांस विषाद वाटूं लागला; व ही स्थिति सुधारण्याचा मार्ग ते शोधूं लागले.

येथील लोकांनीं शिक्षणसंस्था सुरू करण्यापूर्वींच परदेशीय व परधर्मीय अशा ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं एतद्देशीय मुलामुलींसाठीं कलकत्ता, मुंबई वगैरे शहरांत नवीन शाळा स्थापन केल्या होत्या. मिशनऱ्यांनीं व आमच्याकडील नवशिक्षित मंडळींनीं स्त्रीशिक्षणासंबंधीं जे प्रयत्न केले ते पुढल्या प्रकरणांत पाहूं. परंतु अगोदर पाश्चात्य संस्कृतीच्या परिचयामुळें सुशिक्षितांच्या मतांत जी क्रान्ति झाली तिचें स्वरूप पाहणें अगत्याचें होईल.

इंग्रजी ग्रंथांच्या अध्ययनानें स्त्रियांस शिक्षण देण्याचें महत्त्व त्यांना पटलें. स्त्रियांस सुशिक्षण देऊन सुशिक्षित करणें हाच समाजोन्नतीचा व देशोन्नतीचा राजमार्ग आहे ही गोष्ट त्यांच्या ध्यानीं आली. पाश्चात्य देशांतील स्त्रियांचे विचार, त्यांची सुशीलता, समाजहिताविषयीं कळकळ, त्यांचें ग्रंथकर्तृत्व इत्यादिविषयीं माहिती ऐकून व वाचून ध्येयवादी तरुण सुशिक्षितांना आपल्या देशांतील स्त्रिया सुशिक्षित व सुसंस्कृत होऊन देशाच्या उन्नतीसाठीं केव्हां झटतील अशी उत्कंठा एकसारखी लागून राहिली.

हर्बर्ट स्पेन्सरचें ' एज्युकेशन ' व जॉन स्टुअर्ट मिल्चें ' सब्जेक्शन् ऑफ् वुइमेन् ' या ग्रंथांनीं तत्कालीन सुशिक्षितांच्या मतांमध्यें विलक्षण क्रान्ति घडवून आणिली. वस्तुतः स्त्री व पुरुष यांची योग्यता सारखीच असतां आमच्या हिंदु स्मृतिकारांनीं त्यांचा दर्जा हीन ठरविल्याचें त्यांस आढळून आलें. समाजांतील स्त्रियांच्या योग्यतेसंबंधीं तर्कशुद्ध पद्धतीनें लिहिलेला मिलचा तो सुंदर ग्रंथ वाचून त्यांना नवीन दिव्यदृष्टि प्राप्त झाली व त्या दृष्टीनें त्यांनीं आपल्या समाजाचें अवलोकन केलें. तेव्हां आमच्या समाजांतील राक्षसी रूढींच्या सत्य स्वरूपाचें त्यांना दर्शन झालें व त्यामुळें ' सब्जेक्शन् ऑफ् वुइमेन् ' हा ग्रंथ त्यांना गीतेइतकाच पवित्र व प्रिय वाटूं लागला. कौटुंबिक जीवनासंबंधीं ध्येयांत फरक झाला. पुरुषांचीं मनें उच्च शिक्षणानें सुसंस्कृत झालीं. परंतु स्त्रिया अशिक्षित राहिल्या, त्यामुळें गृहसौख्याचा पाया ढिला झाला, व गृहाचें रमणीयत्व कमी झालें. पतिपत्नी दोघेंहि सुशिक्षित सुसंस्कृत असल्यावांचून जीवित व्यर्थ होय असें त्यांना वाटूं लागलें. अशिक्षित स्त्रियांना पुरुषांचे उच्च विचार, कल्पना, आकांक्षा व ध्येयें समजणें अशक्य होऊन पुरुषांच्या जीवितांतील त्यांचें महत्त्व नष्ट झालें. खऱ्या गृह-

सौख्याच्या अभावीं पुरुषवर्गात असमाधान उत्पन्न झालें. गृहकृत्यें करावीं व मुलांचें संगोपन करावें एवढेंच काय तें स्त्रियांचें कार्यक्षेत्र राहिलें. पति व मुलें यांच्या कार्यांचें महत्त्व समजून त्या बाबतींत त्यांना प्रोत्साहन देऊन त्यांच्याकडून देशोन्नतीचीं कार्यें करवून घेणें हेंच सुशील, सुसंस्कृत स्त्रीचें कर्तव्य होय. केवळ प्रोत्साहनाच्या जोरावर मनुष्य कितीतरी महत्त्वाचीं कार्यें करूं शकतो! परंतु अशा प्रकारचें उत्तेजन व सहानुभूति घरांतून न मिळाल्यामुळें कितीतरी ध्येयवादी तरुणांचीं ध्येयें स्वप्नसृष्टींत राहिलीं असतील!

परंतु बालविवाह, केशवपन, जरठकुमारीविवाह, सासुरवास इत्यादि कराल रूढींच्या पाशांत आमच्या स्त्रिया सांपडलेल्या होत्या. एकत्रकुटुंबपद्धतीमुळें गुदमरलेल्या वातावरणांत त्यांना काळ घालवावा लागत होता. अंध समजुती व लोकभ्रम यांच्या भाराखालीं त्यांचा जीव दडपून गेला होता. स्वतंत्र व्यक्ति या दृष्टीनें त्यांना अस्तित्वच नव्हतें असें म्हटलें तरी चालेल. कोणाच्या तरी आज्ञेंत सदासर्वकाळ राहिल्यामुळें त्यांच्या अंगचें कर्तृत्व प्रगट होण्यास वावच नव्हता. अशा रीतीनें निम्मा समाज अज्ञानाच्या अंधःकारांत पडला होता. सामाजिक जुलमामुळें स्त्रियांची स्थिति करुणास्पद झालेली होती तर परकीय राजसत्तेमुळें देशांतील पुरुष परतंत्र व हतबल झाले होते.

नवशिक्षणामुळें अज्ञानाचें मेघपटल नाहींसें झालें. पाश्चात्यांचा देशाभिमान, उद्योग, महत्त्वाकांक्षा, एकी, स्त्रीदाक्षिण्य, दुसऱ्याच्या प्रामाणिक मतांविषयीं आदर, ज्ञानलालसा व स्वातंत्र्यप्रीति इत्यादि गुणांमुळें पाश्चात्य संस्कृतीविषयीं सुशिक्षितांच्या मनांत आदराची भावना उत्पन्न झाली. प्राचीन संस्कृत वाङ्मयाच्या परिशीलनानें आपल्या संस्कृतीचें श्रेष्ठत्व त्यांच्या ध्यानांत आलें. परंतु त्या उच्च संस्कृतीचें स्वरूप बदलत बदलत अखेरचें समाजाचें निकृष्ट रूप पाहतांच त्यांना खेद वाटला. पाश्चात्य व पौर्वात्य संस्कृतींतील उत्कृष्ट तत्त्वांचा मनोहर संगम घडवून आणण्याची उत्कट इच्छा त्यांच्या अन्तःकरणांत उदित झाली व त्या दृष्टीनें त्यांचे प्रयत्न सुरू झाले.

प्रकरण तिसरें

प्राथमिक प्रयत्न

हिंदुस्थानांत अर्वाचीन शिक्षणाचा पाया घालण्याचें श्रेय खिस्ती मिशनऱ्यांनाच देणें योग्य होईल. हिंदुस्थानांत येऊन वसति करण्यांत खिस्तीधर्मप्रसार हाच त्यांचा प्रधान हेतु होता. मराठ्यांच्याकडून पोर्तुगीजांचा पराभव होण्यापूर्वी पोर्तुगीजांनीं हिंदुस्थानांत शिक्षणसंस्था सुरू केल्या होत्या. इ. स. १५५६ मध्यें ठाणें जिल्ह्यांतील विहाड तलावानजीकच्या एक गांवीं त्यांनीं स्थापिलेल्या अनाथ-गृहांत १३० मुलें शिक्षण घेत होतीं. इ. स. १५४८ मध्यें वसईमधील कॉलेजांत तीनशें मुलांना मोफत शिक्षण दिलें जात होतें. डॉ. जॉन फ्रायर यांनीं ज्या वेळीं इ. स. १६७४ मध्यें मुंबईस भेट दिली त्या वेळीं वरील संस्था चांगल्या स्थितींत होत्या. एवढेंच नव्हे तर इंग्लिश विश्वविद्यालयाच्या कॉलेजच्या योग्यतेच्या या संस्था होत्या असें मत त्यांनीं प्रदर्शित केलें. वसई कॉलेजच्या ग्रंथालयाचेंहि त्यांनीं वर्णन केलेलें आढळतें.

परंतु इ. स. १७३९ मध्यें मराठ्यांनीं पोर्तुगीजांचा पूर्ण पराभव केल्यामुळें व कॅथोलिक धर्मसंघांची हकालपट्टी झाल्याकारणानें वर वर्णिलेल्या संस्था बंद पडल्या व खिस्ती मिशनऱ्यांच्या प्रयत्नांना आळा पडला. पुढें पेशवाई जाऊन इंग्रजी राज्य सुरू झाल्यावर अमेरिकन व इंग्रज मिशनरी हिंदुस्थानांत येऊं लागले. खिस्तीधर्मप्रसार हाच त्यांच्या आगमनाचा मुख्य हेतु असल्यामुळें त्यांच्या कार्यांत त्यांना अनेक अडथळे आले. हिंदूंच्या धार्मिक बाबतींत बिलकूल हात न घालण्याचें इंग्रज सरकारचें धोरण असल्यानें हिंदुस्थानांत प्रवेश मिळविण्यासाठीं मिशनऱ्यांना फारच त्रास सोसावा लागला. मिशनऱ्यांनीं हिंदुस्थानांत राहूं नये अशी खुद्द कोर्ट ऑफ डायरेक्टर्सची आज्ञा होती. कलकत्ता व मुंबई या शहरांत प्रवेश मिळविण्याचा कांहीं मिशनऱ्यांनीं इ. स. १८११ मध्यें व तत्पूर्वीहि अटोकाट प्रयत्न केला होता. परंतु परत निघून जाण्याविषयीं गव्हर्नरचा हुकूम झाल्यानें निघून जाण्यावांचून त्यांना गत्यंतरच उरलें नाहीं. दोन तीन वर्षें चिकाटीनें एकसारखा प्रयत्न करीत राहिल्यामुळें इ. स. १८१४ च्या सुमारास हिंदुस्थानांत येऊन राहण्याबद्दल त्यांना सरकारनें परवानगी दिली. प्रथमच धर्मप्रसार सुरू केल्यास लोक

बिथरून विरोध करतील म्हणून आरंभीं त्यांनीं शिक्षणप्रसाराच्या कार्याचा अंगिकार केला. इ. स. १८३४ सालीं अमेरिकन मिशननें मुलांच्यासाठीं एक प्राथमिक शाळा काढली. इ. स. १८२५ पर्यंत मिशनच्या एकंदर ३५ शाळा असून त्यांत २००० मुलें शिकत होतीं. मुंबईप्रमाणेंच कलकत्ता व श्रीरामपूर येथेंहि मिशनरी शाळा सुरू झाल्या.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं एका डॅनिश मिशनऱ्यानें मुलामुलींच्यासाठीं एक शाळा काढिली होती. परंतु मुलींच्यासाठीं स्वतंत्र शाळा त्या वेळीं एकहि नव्हती. बंगालमध्यें राजा राममोहन रॉय यांनीं सामाजिक सुधारणा व स्त्रीशिक्षण यांसंबंधीं लोकांत जागृति उत्पन्न केली होती व तेथील सुशिक्षित पुरुषांना स्त्री-शिक्षणाची किंमत वाटूं लागली होती. त्यामुळें अर्थातच British and Foreign School Society तर्फे स्त्रीशिक्षणप्रसार करण्याचा हेतु धरून हिंदुस्थानांत आलेल्या मिस् कुक् या सुशिक्षित युरोपिअन स्त्रीनें इ. स. १८२१ सालीं कलकत्ता शहरांत मुलींची शाळा स्थापन केली. हीच हिंदुस्थानांतील मुलींची पहिली शाळा होय.

इ. स. १८२४मध्यें अमेरिकन मिशनरींनीं मुंबईस एतद्देशीय मुलींच्या-करितां स्वतंत्र शाळा स्थापन केली. ही मुंबई इलाख्यांतील मुलींची पहिली शाळा होय. यानंतर दोनच वर्षांनीं मुलींच्या शाळांची संख्या ९ पर्यंत गेली व त्यांमध्यें एकंदर ३०० मुली शिकूं लागल्या. १८२९मध्यें शिकणाऱ्या मुलींची संख्या ४०० पर्यंत गेली. यांपैकीं एका शाळेस जोडून मुलींचें वसतिगृहहि होतें. ही शाळा भायखळ्यास कित्येक वर्षें चालू होती.

इ. स. १८२९-३० मध्यें डॉ. विल्सन् व मिसेस् विल्सन् (पूर्वाश्रमींच्या मिस् कुक्) यांनीं मुंबई शहरांत एतद्देशीय मुलींच्या साठीं ६ शाळा स्थापन केल्या. त्या शाळांत थोडक्याच काळांत सुमारें २०० मुली शिक्षण घेऊं लागल्या. बालविवाह, जातिभेद यांचें स्वरूप त्या काळीं अत्यंत तीव्र होतें. स्त्रीशिक्षणास कडक विरोध होता. मुलींनीं शाळेंत जाणें ही कल्पनासुद्धां हास्यास्पद वाटण्यासारखी समाजाची स्थिति होती. यावरून या शाळेंत आपल्या मुलींना पाठविण्याचें धैर्य दाखविणाऱ्या आईबापांना समाजाकडून किती भयंकर त्रास झाला असेल याची कल्पनाच करणें बरें ! अशा परिस्थितींत स्त्रीशिक्षणाच्या प्रगतीची अपेक्षा करणें वेडेपणाचें होईल.

इ. स. १८३० च्या सुमारास साऱ्या हिंदुस्थानांत मिळून मुलींच्या ३० शाळा स्थापन होऊन त्यांमध्यें ५०० वर मुली शिकत होत्या. इ. स. १८४०मध्यें एकट्या बंगाल इलाख्यांत ५०० मुली शिकत असल्याचें मिसेस् विल्सन् यांस आढळून आलें. त्याच सालच्या शिक्षणखात्याच्या रिपोर्टांवरून त्या वेळीं पुणें शहरीं मुलींच्या पांच शाळा असल्याचा उल्लेख सांपडतो.

इसवी सन १८४९ पर्यंत मुलींच्या शिक्षणाच्या बाबतींत सरकारचें धोरण तटस्थपणाचें होतें. बालविवाहाच्या रूढीमुळें फारच थोड्या मुली शाळेस जात; त्यामुळें सरकारी शाळा स्थापन करणें म्हणजे प्रजेच्या धार्मिक व सामाजिक बाबतींत ढवळाढवळ करण्यासारखेंच होतें व सरकारला तर त्या वेळीं प्रजेच्या सहानुभूतीची व सहकार्याची विशेष जरूर होती. अर्थातच त्यांनीं स्त्रीशिक्षणाच्या प्रश्नाकडे बुद्धिपुरःसर दुर्लक्ष्य केलें व त्याबद्दल त्यांना दोषहि देतां येत नाहीं.

स्त्रीशिक्षणाबद्दलची ही तटस्थ वृत्ति तत्कालीन कौन्सिलचे कायदेपण्डित ऑनरेबल बेथ्यून यांच्या प्रेरणेवरून लॉर्ड डलहौसी यांनीं सोडिली व १८४९ मध्यें बंगालच्या शिक्षण-कौन्सिलला "यापुढें तुम्ही मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारणें आवश्यक आहे" अशी सूचना दिली. त्यावरूनच ऑ. बेथ्यून यांनीं खासगी रीतीनें स्थापन केलेली मुलींची शाळा सरकारनें आपल्या ताब्यांत घेतली.

मुंबई इलाख्यांत ऑनरेबल माउंट स्टुअर्ट एलिफन्स्टन् यांनीं इ. स. १८२१ सालीं पुण्यामध्यें संस्कृत कॉलेज या पहिल्या शिक्षणसंस्थेची स्थापना केली. त्यांच्याच प्रेरणेवरून 'दि बॉंबे एज्युकेशन सोसायटी' या संस्थेची १८२२ सालीं स्थापना झालेली होती हें मागल्या प्रकरणीं सांगितलेंच आहे. माउंट स्टुअर्ट एलिफन्स्टन् यांनीं मुंबई इलाख्यांत शिक्षणसंस्था सुरू करून त्यांस उत्तेजन दिलें. त्यांच्याच कारकीर्दींत स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ रोंवली गेली. पडद्याची अनिष्ट चाल मुंबई इलाख्यांत नसल्यानें बंगालपेक्षां मुंबई इलाख्यांतच स्त्रीशिक्षणाची अधिक वाढ झाली.

इ. स. १८२७ मध्यें माउंट स्टुअर्ट एलिफन्स्टन् यांच्या स्मरणार्थ एलिफन्स्टन् कॉलेजची मुंबईमध्यें स्थापना झाली होती. या कॉलेजमध्यें अध्ययन करणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांचा पाश्चात्य विद्वान् अध्यापकांशीं संबंध आल्यामुळें त्यांच्या मनांत सामाजिक प्रश्नांविषयीं विशेष कळकळ दिसूं लागली. सामाजिक विषयांवरील विद्यार्थ्यांच्या निबंधांमध्यें त्यांचीं समाजविषयक प्रगतिपर मतें व समाजहिताविषयीं पूर्ण सहानुभूति दिसून येते, असा अभिप्राय सदर कॉलेजच्या सन १८४९च्या रिपोर्टांत

नमूद केलेला आहे. याच संस्थेच्या उत्साही विद्यार्थ्यांनीं युरोपिअन अध्यापकांच्या प्रेरणेवरून इ. स. १८४५ सालीं Students' Literary and Scientific Society या नांवाची संस्था स्थापन करून तिच्या विद्यमानें मुलींच्यासाठीं शाळा मुंबई शहरांत सुरू केल्या. सोसायटीचे तरुण सभासद दर आठवड्यास सभा भरवून त्यांमध्यें सामाजिक प्रश्नांची चर्चा करीत. एल्फिन्स्टन् कॉलेजचे विद्वान् अध्यापक प्रो. पॅटन (Patton) व प्रो. रीड (Reid) या दोघांनींहि 'सभेंतील चर्चेचे विषय बहुधा सामाजिक स्वरूपाचे असत,' असे उद्गार काढलेले आढळतात. हे नव्या युगांतील नव्या दमाचे तरुण केवळ शाळा स्थापन करून स्वस्थ बसले नाहींत, तर मुलींना योग्य अशीं शालोपयोगी पुस्तकेंहि त्यांनीं तयार केलीं. बालविवाहाच्या रूढीमुळें मुलींचीं लग्नें लौकर होत व अर्थातच त्यांना लिहितांवाचतां येऊं लागतांच शाळा सोडणें भाग पडे. अशा मुलींना घरच्या घरीं आपलें ज्ञान वाढवितां यावें यासाठीं त्यांनीं एक मासिक सुरू केलें. या तरुण विद्यार्थ्यांच्या उत्साहाचें, कर्तबगारीचें अत्यंत कौतुक वाटल्यावांचून राहत नाहीं. तत्कालीन रूढिशृंखलांचा एक एक दुवा हळूहळू काढण्याचा त्यांचा हा प्रयत्न अभिनंदनीय होता. या गोष्टीचें बरेंच श्रेय त्या वेळच्या एल्फिन्स्टन् कॉलेजांतील विद्वान् अध्यापकांच्या शिक्षणास व सहानुभूतीस दिलें पाहिजे. हिंदु समाजाचे त्या वेळचे मुंबईतील पुढारी श्रीमंत जगन्नाथ शंकरशेट, डॉ. भाऊ दाजी, सर मंगळदास नथुभाई, श्री. भगवानदास पुरुषोत्तमदास यांचा या विद्यार्थ्यांनीं सुरू केलेल्या स्त्रीशिक्षणाच्या चळवळीस पूर्ण पाठिंबा होता. महर्षि दादाभाई नवरोजी हे सोसायटीचे आधारस्तंभ होते. त्यांनीं व इतर दोनचार गृहस्थांनीं मुलींच्याकरितां शाळा सुरू करून त्या चालविण्याची जबाबदारी स्वीकारली होती. तेव्हां या मंडळींना मुंबईतील स्त्रीशिक्षणाचे आद्य पुरस्कर्ते असें म्हणावयास बिलकूल हरकत नाहीं.

परंतु सामाजिक सुधारणेची चळवळ केवळ मुंबईपुरतीच राहिली नाहीं. इ. स. १८५१-५२च्या शिक्षणखात्याच्या रिपोर्टांत सर अर्स्किन पेरी यांचे पुढील उद्गार आढळतात: "संतोष वाटण्याजोग्या बऱ्याच गोष्टी आम्हांस पुण्यास आढळल्या. इंग्लिश शिक्षण घेणाऱ्या तरुणांनीं शिक्षणप्रसाराची चळवळ हौसेनें सुरू केली आहे व मुंबईतील सुशिक्षितांप्रमाणें स्त्रीशिक्षणविषयक चळवळीकडेहि त्यांनीं लक्ष पुरविलें आहे." वरील उद्गारांवरून तत्कालीन पुण्यांतील सुशिक्षित तरुणांच्या मनांतहि स्त्रीशिक्षणासंबंधीं आवड उत्पन्न झाली होती असें स्पष्ट दिसतें.

मुंबईंतील हौशी व उत्साही तरुणांनीं मुलींच्या एकंदर ९ प्राथमिक शाळा सरकारच्या मदतीवांचून चालविल्या होत्या. इ. स. १८५१मध्यें श्री. मगनभाई करमचंद यांनीं अहमदाबादेस मुलींची शाळा स्थापन करण्यास वीस हजारांची देणगी दिली. त्याच सुमारास श्री. ज्योतीराव गोविंद फुले यांनीं पुण्यास एक मुलींची खासगी शाळा सुरू केली होती. सर् अर्स्किन् पेरि यांची त्यांच्यावर मर्जी होती. इतक्या जुन्या काळांतहि त्यांनीं आपल्या पत्नीस शिक्षण दिलें होतें. तीहि त्या मुलींच्या शाळेंत शिकवीत असे. मराठा जातीच्या पतिपत्नींनीं ही मुलींची शाळा सुरू केली होती ही गोष्ट खरोखर अभिनंदनीय आहे.

इ. स. १८५५-६५ पर्यंतच्या काळांत स्त्रीशिक्षणाकरितां सरकारी शिक्षणखात्यानें कांहींच केलें नव्हतें. ज्या कांहीं मुलींच्या शाळा मुंबई इलाख्यांत होत्या त्या खाजगी रीतीनें लोकांनीं चालविलेल्या होत्या. १८५७ सालीं जे मराठी शाळेंतील मास्तर मुलींचे वर्ग सुरू करतील त्यांना वार्षिक देणगी देण्याचें सरकारी शिक्षणखात्यानें ठरविलें. याचा परिणाम म्हणजे इ. स. १८६४-६५च्या दरम्यान सरकारी शाळांमध्यें सुमारें साडेसहाशें मुली शिकूं लागल्या.

इ. स. १८७१ पर्यंत खाजगी प्रयत्नांनींच स्त्रियांमध्यें शिक्षणाचा प्रसार चालू होता. त्याच सुमारास मिस् मेरी कार्पेंटर यांनीं मुंबई व पुणें येथील स्त्रीशिक्षणास विशेष उत्तेजन दिलें. मुंबई व पुण्यांतील सामाजिक पुढाऱ्यांनींहि त्यांचें उत्कृष्ट स्वागत केलें व त्या करीत असलेल्या कार्याविषयीं सहानुभूति व्यक्त केली. पुणें, मुंबई व अहमदाबाद येथें स्त्रियांचीं नॉर्मल स्कूल्स् सरकारनें स्थापन केलीं होतीं.

यापुढील दहा वर्षांत शाळांची व शिकणाऱ्या मुलींची संख्या अधिक वाढली. मॅट्रिक परीक्षेच्या निकालामध्यें एकदोघी मुलींचीं नांवें चमकतांना लोकांस दिसूं लागलीं व प्रौढ विवाहित स्त्रियांमध्यें ज्ञानप्रसार करण्याचे यत्न सुरू झाले. इ. स. १८७१च्या सुमारास पुण्यास 'विचारवती स्त्री सभा' नांवाची संस्था स्थापन झाल्याचा टिळकचरित्रकारांनीं उल्लेख केला आहे. या सभेच्या सभासद स्त्रियाच होत्या. परंतु पुण्यासारख्या शहरीं त्या वेळीं स्त्रियांची सभा हा एक चेष्टेचाच विषय होता. त्या वर्षीं स्त्रियांचा एक वक्तृत्वसमारंभ साजरा झाला. त्याचप्रमाणें कै. केरो लक्ष्मण छत्रे यांनीं पेन्शन घेतल्यानंतर स्त्रीशिक्षणाचें काम पुण्यास हौसेनें चालविलें होतें. त्यांच्या क्लासाला श्री. रमाबाई रानडे, श्री. काशीबाई कानिटकर,

रा. बा. भिडे यांची मुलगी इत्यादि स्त्रिया जात. त्यांच्या प्रोत्साहनामुळें त्या लहान लहान निबंध लिहून सर्वांच्यासमोर वाचीतहि. या वर्गाचें सुंदर वर्णन श्री. रमाबाईनीं लिहिलेल्या 'आयुष्याच्या आठवणी' या ग्रंथांत आढळतें. पंडिता रमाबाईचें आगमन पुण्यास झालें त्या वेळीं श्री. रमाबाई रानडे, श्री. काशीबाई कानिटकर इत्यादि स्त्रियांनीं त्यांचें उत्कृष्ट स्वागत केलें व त्यांच्याच मदतीनें पंडिताबाईनीं इ. स. १८८२ मध्यें आर्यमहिला समाजाची स्थापना केली. पुण्यास मुलींचें हायस्कूल स्थापन व्हावें यासाठीं आर्यमहिला समाजानेंहि पुष्कळ खटपट केली होती. इ. स. १८८२ मध्यें हंटर कमिशनपुढें आर्यमहिला समाजातर्फे पंडिता रमाबाईची साक्ष झाली. या बाईच्या हुषारीचा हंटरसाहेबांच्यावर उत्तम परिणाम झाला व हिंदी स्त्रियांच्या योग्यतेबद्दल त्यांची खात्री झाली.

अशा रीतीनें स्त्रीशिक्षणाचा प्रसार खाजगी रीतीनें चालला होता. परंतु मुलींच्या उच्च शिक्षणाची मात्र कांहींच व्यवस्था पुण्यांत नव्हती. ती पुढें दोन वर्षांनींच झाली. त्याचा वृत्तान्त पुढील प्रकरणीं वाचावयास सांपडेल.

प्रकरण चवथें

हुजुरपागा

प्राथमिक शाळा व स्त्रियांचें नॉर्मल स्कूल (स्थापना इ. स. १८७०) इत्यादि संस्था जरी स्थापन झालेल्या होत्या तरी मुलींना उच्च शिक्षण देणारें एकहि सरकारी हायस्कूल मुंबई इलाख्यांत नव्हतें. सुखवस्तु घराण्यांतील मुलींना शिक्षकिणी होण्याची गरज नसल्यानें त्यांना नॉर्मल स्कूलचा कांहींच उपयोग नव्हता. ज्या गृहस्थांना मुलींना मॅट्रिक्युलेशनपर्यंत शिक्षण देण्याची इच्छा असेल त्यांना मुलींना मिशनरी शाळांमध्यें पाठविण्यावांचून दुसरा मार्ग नसे. बहुजनसमाज मुलींना मिशनरी शाळांत पाठविण्यास कचरत असे. अशा परिस्थितींत मराठी चार इयत्तांचें शिक्षण घेण्यापलीकडे मुलींची मजल जाणें अशक्यच होतें.

हिंदुस्थानाबद्दल प्रेम बाळगणारे जे कांहीं थोडे युरोपियन महात्मे होऊन गेले त्यांत सर विल्यम् वेडरबर्न यांची गणना अवश्य केली पाहिजे. स्त्रियांचें अज्ञान दूर झाल्यावांचून हिंदुस्थानची स्थिति सुधारणार नाहीं या विचारानें आपले स्वर्गवासी बंधु सर डेव्हिड वेडरबर्न यांच्या स्मरणार्थ दहा हजार रुपयांची देणगी लोककार्यासाठीं, विशेषतः स्त्रीशिक्षणाप्रीत्यर्थ देण्याची इच्छा त्यांनीं रा. ब. महादेव गोविंद रानडे यांस पत्रद्वारें कळविली. या देणगीसंबंधीं विचार करण्यासाठीं न्या. रानडे, प्रो. रामकृष्ण गोपाळ भांडारकर, रा. ब. शंकर पांडुरंग पंडित, सर विल्यम् वेडरबर्न यांनीं खाजगी रीतीनें चर्चा करून पुण्यांतील नागरिकांची जाहीर सभा बोलाविली.

शनिवार तारीख १९ जुलै १८८४ रोजीं सायंकाळीं पांच वाजतां मुलींच्या दुय्यम (Secondary) शिक्षणाविषयीं विचारविनिमय करण्यासाठीं हिराबागेंतील टाउन हॉलमध्यें पुणें शहरांतील सुशिक्षित व वजनदार नागरिकांची सभा भरली. त्या दिवशीं मुसळधार पाऊस पडत असतांहि सभेचा हॉल भरून गेला होता. यावरून सभासदांच्या उत्साहाची कल्पना येईल. सर्व प्रमुख जातींच्या प्रतिनिधींच्याखेरीज बरेच युरोपियन स्त्रीपुरुष सभेंत हजर होते. पैकीं मिस्टर के. एम्. चॅटफील्ड (डिरेक्टर ऑफ् पब्लिक् इन्स्ट्रक्शन्), सर विल्यम् वेडरबर्न, मिस्टर एल्फिन्स्टन्, मिस्टर व मिसेस् शेपर्ड, झनाना मिशनच्या मिस् बर्नार्ड, मिस्टर व मिसेस् कर्कहॅम,

प्रो. फॉरेस्ट, कर्नल प्रिचर्ड, डॉ. पोलन्, फलटणचे चीफसाहेब श्रीमंत बापूसाहेब नाईक निंबाळकर, सरदार बळवंतराव पटवर्धन, सरदार पुरंदरे, सरदार मुदलीयार, खानबहादूर दस्तुर, मि. नवरोजी पदमजी, खानसाहेब नवरोजी, दोराबजी खंडाळावाला, श्री. राजमाचीकर, श्रीमंत रास्ते, सरदार नातू, सरदार बाबामहाराज, रा. ब. नूलकर, न्या. रानडे, रा. ब. पण्डित, डॉ. भांडारकर, श्री. भाऊ मनसाराम, श्री. जव्हेरीलाल याज्ञिक, प्रि. वामन शि. आपटे, रे. सोराबजी, मि. सय्यद याकूब, श्री. दाण्डेकर इत्यादि मंडळी सभागृहांत प्रामुख्यानें दिसत होती.

टाळ्यांच्या गजरांत सर विल्यम् वेडरबर्न यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें व पुढील आशयाचें भाषण केलें. "या सभेच्या हेतूबद्दल मला पूर्ण सहानुभूति आहे. स्त्रीशिक्षणाच्या प्रश्नाचा धार्मिक समजुतींशीं संबंध असल्यामुळें तो प्रश्न अत्यंत नाजुक झाला आहे. यासाठीं या विषयास जनतेकडून चालना मिळावी अशी सरकारची अपेक्षा आहे व म्हणून या बाबतींत सरकारनें स्वीकारलेलें तटस्थ धोरण रास्त आहे यांत शंका नाहीं. इ. स. १८५४ चा सर चार्ल्स वुड यांचा खलिता अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यांच्या मतें मुलांच्या शिक्षणापेक्षां मुलींच्या शिक्षणाकडे लक्ष देणें अधिक जरूर आहे. गेल्या तीस वर्षांत मुलांच्या शिक्षणाची प्रगति पुष्कळ झालेली आहे. त्यामुळें मुलांच्या व मुलींच्या शिक्षणांत एका पिढीचें अंतर पडलें आहे. सामाजिक दृष्ट्या ही स्थिति स्पृहणीय नाहीं. सार्वजनिक कार्यांत तत्पर अशा पुण्याच्या विद्वान् पुढाऱ्यांनीं या प्रश्नास चालना दिली हें योग्यच झालें. विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे पुण्याच्या आर्यमहिला समाजाची या कार्यास पूर्ण सहानुभूति आहे ही होय. आर्यमहिला समाजाचा संदेश रा. ब. रानडे हे आपणांस सांगतील."

अशा प्रकारचें सर विल्यम् वेडरबर्न यांचें प्रास्ताविक भाषण झाल्यानंतर न्या. रानडे यांनीं आर्यमहिला समाजाचा सहानुभूतिपर संदेश वाचून दाखविला. आर्यमहिला समाजातर्फे फीमेल नॉर्मल स्कूलमध्यें ज्या वेळीं स्त्रियांची सभा भरली होती त्या वेळीं शंभर स्त्रिया हजर होत्या. ज्यांच्याकडून सहानुभूति मिळणें अशक्य वाटत होतें त्यांच्याकडून ती मिळाल्यामुळें स्त्रीशिक्षणाच्या कार्यारंभीं मोठा शुभ शकुनच झाला. सहानुभूतिपर संदेशाबद्दल आर्यमहिला समाजाचे आभार मानण्याचा ठराव न्या. रानडे यांनीं सभेपुढें मांडला व प्रो. वामन शिवराम आपटे यांनीं त्यास अनुमोदन दिल्यानंतर एकमतानें ठराव मंजूर झाला.

अध्यक्षांनीं, लेडी रिपन यांनीं हायस्कूलसाठीं दिलेली रु. १००० ची देणगी जाहीर केल्यानंतर रा. ब. शंकर पांडुरंग पंडित यांनीं मुलींच्या उच्च शिक्षणाची योजना सभेपुढें मांडिली. उच्च शिक्षणाच्या बाबतींत त्या वेळीं मुलामुलींच्या शिक्षणांत दोन ध्रुवांचें अंतर होतें. सुशिक्षित तरुण व त्यांच्या अशिक्षित पत्नी व भगिनी, यांच्यांतील बौद्धिक अंतर हें देशोन्नतीच्या मार्गांतील भयंकर संकट आहे, ही गोष्ट रा. ब. पंडित यांनीं उत्कृष्ट रीतीनें सभेच्या निदर्शनास आणिली. एकांगी शिक्षणाचे दुष्परिणाम टाळण्यासाठीं सर्व जातींच्या व सर्व धर्मांच्या मुलींच्या उच्च शिक्षणासाठीं पुणें शहरीं हायस्कूल स्थापण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादन केली. स्त्रीजातीच्या उन्नतिसाठीं व बालविधवांची अनुकंपनीय स्थिति सुधारण्यास सुशिक्षणाच्या गुरुकिल्लीवांचून दुसरा मार्ग उरला नसल्याचें त्यांनीं सभासदांच्या ध्यानीं आणून दिलें. त्यासाठीं मॅट्रिक्युलेशनपर्यंत मुलींना शिक्षण देणारें हायस्कूल पुण्यामध्यें स्थापन करून मुलींच्या शिक्षणाची सोय करणें नागरिकांचें कर्तव्य आहे असें सांगून त्यांनीं सर विल्यम् वेडरबर्न यांची दहा हजार रुपयांची उदार देणगी जाहीर केली. ता. १९ जुलै १८५४ मध्यें ईस्ट इंडिया कंपनीच्या कोर्ट ऑफ् डायरेक्टर्सकडून हिंदुस्थान सरकारला आलेल्या खलित्यांतील पुढील भाग त्यांनीं वाचून दाखविला. तो महत्त्वाचा वाटल्यावरून खालीं उद्धृत केला आहे.

"The importance of female education in India cannot be overrated, and we have observed with pleasure the evidence which is now afforded of an increased desire on the part of many of the natives of India to give a good education to their daughters. By this means a far greater impulse is imparted to the educational and moral tone of the people than by the education of men. We have already observed that schools for females are included among those to which grants-in-aid may be given and we cannot refrain from expressing our cordial sympathy with the efforts which are being made in this direction. Our Governor-General-in-Council has declared in a communication to the Governor of Bengal, that the Government ought to give to native female education in India its frank and cordial support. In this we heartily concur, and we especially approve of the bestowal of marks of honour upon such native gentlemen as Rao Bahadur Maganbhai Karamchand, who devoted Rs. 20,000 to the foundation of our native female

schools in Ahmedabad, as by such means our desire for the extension of female education becomes generally known."

यावरून सरकारची मदत नवीन योजनेस मिळण्याची शक्यता सिद्ध झाली. सर विल्यम् वेडरबर्न यांनीं आपले बंधू सर डेव्हिड वेडरबर्न यांच्या स्मरणार्थ दहा हजार रुपये केवळ शिष्यवृत्त्या व बक्षिसें यांसाठींच दिले होते. परंतु शाळेच्या वार्षिक खर्चासाठीं लोकांकडून देणग्यांच्या रूपानें मदत झाल्यावांचून शाळा स्थापन करणें अशक्य असल्याचें सांगून त्यांनीं आर्थिक साहाय्य देण्याची सभासदांना विनंति केली व श्रीमंत जयसिंगराव आबासाहेब घाटगे, कागलचे चीफसाहेब व कोल्हापूरचे रीजंट, यांची दहा हजारांची, भावनगरचे जस्टिस ऑफ दि पीस हरिप्रसाद देसाई यांची सहा हजारांची, लेडी माईसाहेब डफळे यांची दरमहा १० रुपयांच्या दोन शिष्यवृत्त्यांची देणगी, अशा अनेक देणग्या त्यांनीं जाहीर केल्या व कर्नल रीव्हज् (पोलिटिकल एजंट, कोल्हापूर), हरिप्रसाद देसाई, श्रीमंत आबासाहेब घाटगे यांचीं व इतरांचीं बरींच सहानुभूतिपर पत्रें वाचून दाखविलीं. "या सभेच्या मतें मॅट्रिक्युलेशनपर्यंत शिक्षण देणारें मुलींचें हायस्कूल स्थापन करण्याची वेळ आतां आली आहे व असें हायस्कूल पुणें शहरांत स्थापन करावें," असा ठराव रा. ब. पण्डित यांनीं मांडला व रा. ब. रानडे यांनीं त्यास अनुमोदन दिल्यानंतर फलटणचे चीफसाहेब, मिस्टर एल्फिन्स्टन् व प्रो. भाण्डारकर यांचीं भाषणें झालीं. प्रो. भाण्डारकर यांनीं वैदिक कालांतील विद्वान् स्त्रियांचीं उदाहरणें देऊन स्त्रीशिक्षणाची आवश्यकता सिद्ध केली. "बंगालप्रमाणें महाराष्ट्रांत पडद्याची चाल नसल्यानें मुलींना रस्त्यानें शाळेस जातांना फारसा त्रास होणार नाहीं. संस्कृत, गणित, मराठी, इतिहास इत्यादि सर्व विषय घरीं शिकविणें शक्य नाहीं. मुली सुशिक्षित झाल्यास गृहसौख्य कमी न होतां अधिक वाढेल. गार्गी, मैत्रेयी, वडवा यांच्यासारख्या विद्वान् स्त्रिया जर प्राचीन काळीं होऊन गेल्या तर अर्वाचीन काळांत श्री. बाळ गंगाधरशास्त्री, श्री. भाऊ दाजी, श्री. केरो लक्ष्मण छत्रे यांच्या तोडीची एकादी जानकीबाई, सावित्रीबाई अथवा रमाबाई निर्माण होणें बिलकूल अशक्य नाहीं. प्राचीन ध्येयाचें पुनरुज्जीवन करण्याची वेळ येऊन ठेपली आहे." अशा आशयाचें उत्कृष्ट भाषण करून त्या बाबतींत सरकारशीं वाटाघाट करण्यासाठीं, वर्गणी जमविण्यासाठीं व त्या सभेचे हेतू पार पाडण्यासाठीं एक कमिटी नेमावी अशी सूचना प्रो. भाण्डारकर यांनीं केली व ती सर्वानुमतें मंजूर झाली. त्या कमिटीमध्यें

पुढील सद्गृहस्थ होतेः—हिज हायनेस आबासाहेब घाटगे, कर्नल रीव्हज्, सर वि. वेडरबर्न, रा. ब. नूलकर, रा. ब. रानडे, रा. ब. पंडित, श्री. वामन आबाजी मोडक, प्रो. रामकृष्ण गोपाळ भाण्डारकर, श्री. गंगाराम भाऊ म्हस्के, डॉ. विश्राम रामजी घोले, रा. ब. दांडेकर, श्री. हरिपंत चिपळोणकर, सरदार मुदलियार, रा. ब. पटवर्धन, श्री. श्रीधर रामकृष्ण भाण्डारकर (सेक्रेटरी). सरदार रास्ते यांच्या सूचनेवरुन गव्हर्नरसाहेबांच्याकडे डेप्युटेशन पाठविण्याचें नक्की ठरलें.

श्री. हरि सीताराम चिपळोणकर यांनीं अध्यक्षांचे आभार मानले. त्यास उत्तर देतांना " आपण जें बीज आज लाविलें आहे त्याचा लौकरच वृक्ष होऊन त्याचा विस्तार होवो " अशी आशा सर विल्यम् वेडरबर्न यांनीं प्रदर्शित केल्यावर सभा बरखास्त झाली.

ता. ९ ऑगस्ट १८८४ रोजीं दुपारीं ४॥ वाजतां पुण्यांतील लोकप्रतिनिधींचें डेप्युटेशन कौन्सिलहॉलमध्यें गव्हर्नरसाहेबांच्या भेटीस गेलें. या डेप्युटेशनमध्यें हिंदु, पारशी, मुसलमान, मराठा इत्यादि सर्व जातींचे पुढारी होते. कोल्हापूरचे रीजंट श्रीमंत आबासाहेब घाटगे यांनीं रा. ब. शंकर पांडुरंग पंडित यांची ओळख करुन दिल्यानंतर रा. ब. पंडित यांनीं गव्हर्नरसाहेबांस उद्देशून लिहिलेलें भाषण वाचून दाखविलें व त्यांत शाळेसाठीं लेडी सुपरिन्टेन्डेन्ट व शिक्षक सरकारनें नेमून कांहीं वर्षेंपर्यंत सरकारी संस्था म्हणून शाळा चालवावी अशी विनंती केली. शाळेच्या इमारतीसाठीं लोकांकडून रक्कम मिळण्याची खात्री असल्याचें सांगून रा. ब. पंडित यांनीं लेडी कमलाबाईसाहेब शिरके राजे, लेडी उमाबाईसाहेब बिबलकर, सुरतेच्या मिसेस लल्लुभाई यांचीं अभिनंदनपर पत्रें वाचून दाखविलीं व मुलींच्या हायस्कूलची आवश्यकता स्त्रीवर्गासहि वाटत असल्याचें सिद्ध केलें. त्याचप्रमाणें अहमदाबादच्या नागरिकांनीं सर विल्यम् वेडरबर्न व स्त्रीशिक्षणाचे पुण्यांतील कैवारी यांच्या अभिनंदनार्थ भरविलेल्या सभेची हकीकत सांगितली. अखेर शाळेसाठीं शिष्यवृत्त्या व बक्षिसें देणाऱ्या उदारधी गृहस्थांचीं नांवें वाचून त्यांप्रीत्यर्थ रु. ५८,००० मिळाले असल्याचें त्यांनीं स्पष्ट दाखविलें व गव्हर्नरसाहेबांची त्या कार्यास मदत होईल अशी दृढ आशा व्यक्त केली.

गव्हर्नरसाहेबांनीं सर्व भाषण काळजीपूर्वक ऐकून डेप्युटेशनच्या सर्व मागण्या आनंदानें कबूल केल्या. अशा रीतीनें डेप्युटेशनला अपूर्व यश मिळालें. त्याच दिवशीं तारेनें गायकवाड सरकारनें दरमहा २० रुपयांची शिष्यवृत्ति देण्याचें कबूल



कै. न्या. महादेव गोविंद रानडे हायस्कूलचे संस्थापक



कै. रा. ब. शंकर पांडुरंग पंडित
हायस्कूलचे संस्थापक व सोसायटीचे पहिले सेक्रेटरी

Wagle Press, Bombay, 1



के. डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर
हायस्कूलचे संस्थापक व सोसायटीचे माजी उपाध्यक्ष



कै. श्री. वामन आबाजी मोडक
हायस्कूलचे संस्थापक

Wagle Press, Bombay, 1

केलें, व बोहरी लोकांचे धर्माध्यक्ष सरदार अब्दुल कादर यांनीं एक हजार रुपयांची देणगी देण्याचें तारेनें आश्वासन दिलें.

२९ सप्टेंबर १८८४ सोमवार रोजीं सकाळीं आठ वाजतां विजयादशमीच्या सुमुहूर्तावर मुंबई इलाख्याचे उदारधी गव्हर्नर सर जेम्स फर्गसन् यांच्या हस्तें "हायस्कूल फॉर नेटिव्ह गर्ल्स्" या संस्थेचा उद्घाटन समारंभ हिराबागेंतील टाउन हॉलमध्यें साजरा करण्यांत आला. त्या प्रसंगीं पुण्यांतील बहुतेक प्रतिष्ठित व वजनदार गृहस्थ, अनेक संस्थानिक, सरदार व जहागिरदार, तसेंच कित्येक युरोपियन स्त्री-पुरुष व हिंदु स्त्रिया हजर होत्या. नववस्त्राभरणांनीं नटलेल्या व शिकण्याची हौस व उत्साह ज्यांच्या मुखांवर झळकत होता अशा बालिकांमुळें सभागृहास अनुपम शोभा आली होती. कलकत्याच्या बेथ्यून स्कूलनंतर स्थापन झालेलें व दुय्यम शिक्षण देणारें हें दुसरेंच हायस्कूल होतें. शाळा उघडली असें जाहीर करतांना सर जेम्स फर्गसन् यांनीं इच्छिल्याप्रमाणें सर्व गोष्टी घडून आल्याबद्दल समाधान व्यक्त केलें. झनाना मिशनच्या मिस हर्फर्ड यांची लेडी सुपरिंटेंडेंटच्या जागीं नेमणूक करण्यांत जी उदार वृत्ति दृष्टोत्पत्तीस आली तीबद्दल त्यांनीं कमिटीचें अभिनंदन केलें.

हिंदुस्थानचे सेक्रेटरी ऑफ् स्टेट यांची परवानगी येण्याच्या अगोदर शाळा स्थापन झाली. परंतु यामुळें कांहींतरी भानगड उपस्थित होईल अशी शंका मनांत येऊन त्याच दिवशीं दुपारीं रा. ब. पण्डित यांनीं गव्हर्नरसाहेबांची भेट घेतली. शाळेच्या लेडी सुपरिंटेंडेंट यांची जागा नवीनच निर्माण करावयाची असल्यानें सेक्रेटरी ऑफ स्टेटची मंजुरी येणें आवश्यक होतें. सर् जेम्स फर्गसन् यांनीं व्हाइसरॉय यांना स्वतः पत्र लिहिण्याचें कबूल केलें. परंतु सुदैवानें कोणतीच भानगड उपस्थित झाली नाहीं. असो.

विजयादशमीच्या दिवशीं जरी हायस्कूल स्थापन झालें तरी ता. २ ऑक्टोबरपासून दाणेआळींतील वाळवेकरांच्या वाड्यांत नियमितपणें वर्ग सुरू झाले. पहिल्याच दिवशीं हजेरीपटावर १८ मुलींचीं नांवें होतीं. तारीख ११ ऑक्टोबर १८८४ रोजीं ४५ मुलींचीं नांवें शाळेंत नोंदलीं गेलीं. त्यांपैकीं कांहीं पुढें दिलीं आहेतः--आवडीबाई भिडे, ताईबाई नूलकर, यमुनाबाई नूलकर, कृष्णाबाई पंडित, रमाबाई भिडे, सेरा ॲरन, मिरियम ऐझक, काशीबाई देव, तानीबाई जाधव, लक्ष्मीबाई रानडे, ॲबिगेल एलायझा, धाकीबाई व मोथीबाई पतंगे वगैरे वगैरे. आठ दिवसांत शाळेंत ४५ मुली झाल्या, यावरून शिक्षणाची आवड समाजांत

अल्प प्रमाणांत कां होईना, परंतु पसरत चालली होती हें स्पष्ट दिसतें व त्याचप्रमाणें प्रारंभापासूनच या हायस्कूलमध्यें सार्वजातीय वातावरण असल्याचें आढळून येतें.

१७ नोव्हेंबर १८८४ रोजीं बुधवार पेठेंतील किबेवाड्यांत शाळा भरूं लागली. पहिले दोन मजले शाळेसाठीं वापरण्यास इन्दूर येथील किबेबंधूंनीं बिनभाड्यानें दिले. मुख्य दरवाजांतून आंत शिरल्यावर एक वाट शाळेकडे जाण्याची असे व एक वाट वाडयाच्या दुसऱ्या भागाकडे जाई. शाळेच्या भागांत शिरल्याबरोबर एक चौक लागे. चौकाच्या बाजूच्या सोप्यामध्यें वर्ग भरत असत. इ. स. १८८५मध्यें एक खाजगी प्राथमिक शाळा व्यवस्थापकांच्या ताब्यांत आली. ही शाळा कोणा एका सद्‌गृहस्थाच्या उदार देणगीमुळें अस्तित्वांत आली होती. प्राथमिक शाळेचे वर्ग किबेवाडयाच्या तळमजल्यावर भरत. याशिवाय हायस्कूलचे दोन वर्गहि तेथेंच भरत. त्या वेळीं मराठी तिसरीला इंग्रजी पहिली इयत्ता मानीत. कांहीं वर्षांनंतर म्हणजे इ. स. १८८९च्या डिसेंबर महिन्यांत फीमेल ट्रेनिंग कॉलेज हें शाळेच्या व्यवस्थापकांच्या ताब्यांत आल्यानंतर किबेवाडयाच्या तिसऱ्या मजल्यावर कॉलेजचे वर्ग असत व दुसऱ्या मजल्यावर हायस्कूलचे वरचे वर्ग असत. असो.

हिराबागेंतील सभेनें नेमलेली कमिटी हीच शाळेची पहिली व्यवस्थापक कमिटी होय. या कमिटीचे सेक्रेटरी रा. ब. पंडित व रा. ब. नारायणभाई दांडेकर हे होते. पुण्यांतील मंडळींना परिचित अशा मिस हर्फर्ड यांची सेक्रेटरींनीं शिक्षण-खात्याकडून शाळेच्या लेडी सुपरिंटेंडेंट म्हणून नेमणूक करविली. शाळेच्या स्थापने-पासून पंधरा दिवसांच्या आंतच कमिटीनें शाळेच्या स्वतंत्र इमारतीसाठीं जागा शोधण्याचे प्रयत्न सुरू केले. तशी जागा त्यांना लौकरच आढळली ती म्हणजे सांगलीचे चीफसाहेब श्रीमंत धुंडिराज चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब पटवर्धन यांच्या मालकीची हुजुरपागा होय. शनिवार, सदाशिव, नारायण व बुधवार या चार राजमार्गांच्या मध्यें असलेली ही जागा व्यवस्थापक मंडळास अत्यंत आवडली. कारण विशेषतः त्याच भागांतील मुली शाळेंत येण्यासारख्या होत्या. त्याचप्रमाणें मुलांचें सरकारी हायस्कूल व ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन या संस्था या जागेपासून जवळ होत्या. शाळेंत येणाऱ्या मुलींना रस्त्यांतून येतांना समाजाकडून त्रास होत असल्यामुळें त्यांच्या घरीं बैलगाड्या पाठवून त्यांना शाळेंत आणाव्या व पोहोंचवाव्या लागत. परंतु हुजुर-पागेची जागा मिळाल्यास कांहीं वर्षांनीं तरी गाड्यांचा खर्च वांचण्यासारखा होता.

हुजुरपागेच्या तीन बाजूंस रस्ते व एका बाजूस ओढा वहात होता. चोहों बाजूंनीं जागेभोंवतीं चार भिंती असून आंतल्या जागेंत घोड्यांच्या तबेल्यांवांचून एकहि इमारत नव्हती. मळा करण्यासाठीं एका माळ्याला ती जागा खंडानें दिलेली होती. शाळेची इमारत, मुलींचें वसतिगृह, लेडी सुपरिंटेंडेंट व शिक्षकिणी यांच्यासाठीं घर, क्रीडांगण, बाग इत्यादि सर्व कांहीं व्यवस्था होण्याइतकी ती जागा विस्तृत होती. ही जागा सरकारकडून मिळवून देण्यासाठीं व्यवस्थापक मंडळानें ऑनरेबल जे. बी. रिचि (Richey), सी. एस्. आय्., चीफ सेक्रेटरी, मुंबई सरकार, यांना १५ ऑक्टोबर १८८४ रोजीं पत्र पाठवून विनंति केली. डेक्कन एज्युकेशन सोसायटीची मंडळी न्यू इंग्लिश स्कूलसाठीं ही जागा सरकारकडून मिळविण्याच्या खटपटींत होती. परंतु अखेर हायस्कूल कमिटीच्या मंडळींचें अधिक वजन पडल्यामुळें व मुलींच्या हायस्कूलसाठीं हुजुरपागा सोयीची असल्यामुळें मुलांच्या हायस्कूलसाठी नाना वाडा सरकारनें दिला. अशा रीतीनें दर वर्षी २५० रु. भाड्याच्या ९९ वर्षांच्या करारानें हुजुरपागा इ. स. १८८५ सालीं हायस्कूल कमिटीच्या ताब्यांत आली. ४ मार्च इ. स. १८८५ रोजीं शाळेच्या इमारतीची कोनशिला सर जेम्स फर्गसन् यांच्या हस्तें बसविण्याचा समारंभ झाला. हुजुरपागेच्या दाराशीं असलेले तबेले दुरुस्त करून बाहेरगांवच्या मुलींच्यासाठीं तेथें खोल्या तयार करण्यांत आल्या. मिस् हर्फर्ड यांचीहि तेथें राहण्याची सोय कमिटीनें करून दिली. अशा रीतीनें वसतिगृहांतील मुली हुजुरपागेमध्यें राहात व शाळेला किबे वाड्यांत जात. बाहेरून येणाऱ्या मुलींच्यासाठीं धमन्या (बैलगाडया) ठेविल्या होत्या. परंतु हुजुरपागेमध्यें इमारत तयार होऊन तेथें शाळा भरूं लागण्यास बरींच वर्षें लागलीं.

प्रकरण पांचवें

संस्थापक

मागील प्रकरणीं लिहिल्याप्रमाणें शाळा तर स्थापन झाली. परंतु ज्यांचे दीर्घ परिश्रम ही शाळा अस्तित्वांत येण्यास कारणीभूत झाले त्या थोर संस्थापकांच्या-बद्दल चार शब्द येथें लिहिणें अस्थानीं होणार नाहीं.

रावबहादूर **शंकर पांडुरंग पंडित** हे हायस्कूल कमिटीचे पहिले सेक्रेटरी होत. सर विल्यम् वेडरबर्न यांच्या दहा हजारांच्या देणगीच्या मागोमाग कोल्हापूर, बडोदें, जत, धार, मिरज, फलटण, जंजिरा, जुनागड, पोरबंदर, गोंडाळ, औंध, सावंतवाडी, मुधोळ, रतलाम, विशाळगड, इचलकरंजी, सांगली, नवानगर, देवास इत्यादि संस्थानाधिपतींकडून व इतर दानशूर स्त्रीपुरुषांकडून ज्या उदार देणग्या हायस्कूल-साठीं मिळाल्या त्यांचें सर्व श्रेय रा. ब. पंडित यांनाच आहे. हिराबागेंतील सभेमध्यें व गव्हर्नरसाहेबांच्याकडे जें डेप्युटेशन गेलें त्यामध्यें त्यांचाच पुढाकार होता. सांगलीकरांच्याकडून हुजुरपागा त्यांनींच मिळविली. इतकेंच नव्हे तर युरोपियन अधिकारी, युरोपियन स्त्रिया, मोठमोठे संस्थानिक यांच्या मनांमध्यें शाळेच्या कार्याविषयीं सहानुभूति त्यांनींच उत्पन्न केली. डिस्ट्रिक्ट डेप्युटि, हुजुर डेप्युटि कलेक्टर, मॅजिस्ट्रेट, ओरिएण्टल ट्रान्स्लेटर, पोरबंदरचे ॲडमिनिस्ट्रेटर इत्यादि मोठमोठ्या अधिकारांचीं कामें करून त्यांनीं लौकिक संपादन केला होता. त्यांच्यासारखा करारी, बाणेदार व धर्मनिष्ठ पुरुष विरळाच. स्पष्टवक्तेपणा व सत्यप्रियता हे त्यांचे विशेष गुण होते. विद्वान् अध्यापक व ग्रंथकार म्हणूनहि ते प्रसिद्ध होते. ' वेदार्थयत्न ' नांवाचें मासिक त्यांनीं अनेक वर्षे चालविलें होतें. इंग्लिश, मराठी, संस्कृत, गुजराथी, कानडी, जर्मन, लॅटिन व फ्रेंच या सर्व भाषांमध्यें ते निष्णात होते.

ते प्रार्थना समाजाचे सभासद असून पहिल्या प्रतीचे समाजसुधारक होते. स्त्रीजातीबद्दल त्यांची अत्यंत उदार वृत्ति असून स्त्रियांच्या उन्नतीप्रीत्यर्थ त्यांनीं अविश्रांत परिश्रम केले. अस्पृश्यांच्या उद्धाराबद्दल त्यांच्या अन्तःकरणांत निःसीम कळकळ वसत असे. नगर येथें असतां त्यांनीं सामाजिक सुधारणेचीं अनेक कामें केलीं. महारांच्या शाळेंत जाऊन ते स्वतः शिकवीत व त्यांना कळकळीचा उपदेश

करींत. समाजास हानिकारक अशा सर्व दुष्ट रूढींचे ते शत्रु होते. असो. परंतु ज्या शाळेसाठीं त्यांनीं कित्येक वर्षें त्यागबुद्धीनें, प्रेमानें व एकतानतेनें श्रम केले त्या शाळेच्या पायींच कांहीं काळ त्यांस फार दुःख सोसावें लागलें ! सज्जनांच्यावरच संकटें कोसळावीं असा ईश्वरी संकेत दिसतो. इ. स. १८८५ सालीं मुलींच्या हायस्कूलचा बक्षिससमारंभ बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव महाराज यांच्या हस्तें झाला. इंग्लिश राष्ट्रस्तवन मराठींत बसविलेलें होतें. हें स्तवन म्हटलें जात असतां उभे राहण्याची पद्धति आहे. परंतु त्या दिवशीं युरोपियन व एतद्देशीय मंडळींचा मिश्र समाज एकत्र जमणार होता. एतद्देशीय मंडळींना राष्ट्रगीताची पद्धति तितकीशी माहित नसल्यानें कांहीं मंडळींनीं उभें राहावें, कांहींनीं बसावें असें होऊन सर्व प्रकार अनुचित दिसेल या हेतूनें समारंभाच्या कार्यक्रमांतून तें गीत आयत्या वेळीं गाळण्यांत आलें. समारंभास हजर असलेल्या अधिकाऱ्यांनीं आग्रह धरल्यामुळें तें गीत मुलींनीं म्हटलें. परंतु या प्रकरणीं शाळेच्या कमिटीचे सेक्रेटरी म्हणून रा. ब. पंडितांच्यावर ठपका आला. त्या वेळचे मुंबई सरकारचे सेक्रेटरी ली वॉर्नर यांची गैरमर्जी होऊन सरकारची इतराजी झाल्यामुळें पंडितांना कांहीं दिवस घरीं बसावें लागलें. त्या वेळच्या त्यांच्या मनःस्थितीचें करुण वर्णन कै. श्रीमती रमाबाई रानडे यांनीं आपल्या ‘ आमच्या आयुष्यांतील आठवणी ’मध्यें केलेलें आहे. परंतु न्या. रानडे व सर रेमंड वेस्ट यांनीं त्यांच्यासंबंधीं झालेला सरकारी अधिकाऱ्यांचा गैरसमज दूर केला व पुनः डिस्ट्रिक्ट डेप्युटि कलेक्टरच्या जागेवर त्यांची नेमणूक झाली. अखेरीस पोरबंदर संस्थानच्या ॲडमिनिस्ट्रेटरचें काम करीत असतां त्यांस फार परिश्रम होऊन, त्यांची प्रकृति ढांसळली व १८ मार्च १८९४ रोजीं मुंबई मुक्कामीं त्यांनीं देहत्याग केला. शाळेच्या संस्थापकांपैकीं प्रमुख असे हे गेल्यानें शाळेचा आधारस्तंभ नाहींसा झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत त्यांनीं शाळेच्या कौन्सिलच्या सेक्रेटरीचें काम सतत अकरा वर्षें केलें. आपल्या प्रिय ध्येयाच्या सिद्ध्यर्थ त्यांनीं तनमनधन वाहिलें होतें. अशा प्रकारचा विद्वान्, स्त्रीशिक्षण व इतर सामाजिक सुधारणांचा पुरस्कर्ता नाहींसा झाल्याकारणानें शाळेच्या सोसायटीचें व समाजाचें अपरिमित नुकसान झालें.

शाळेचे दुसरे प्रमुख पुरस्कर्ते म्हणजे सर विल्यम् वेडरबर्न हे होत. हिंदुस्थानवासीयांच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक ध्येयांबद्दल खरी कळकळ बाळगणारे जे थोडे इंग्रज गृहस्थ होऊन गेले त्यांमध्यें यांना वरचें स्थान देणें योग्य

होईल. ह्यूमसाहेबांच्याप्रमाणें राष्ट्रीय सभेबद्दल त्यांना पराकाष्ठेची सहानुभूति होती. इ. स. १८८० सालीं व इ. स. १९१० सालीं अलाहाबाद येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या दहा हजार रुपयांच्या उदार देणगीमुळेंच पुण्यांतील मुलींचें हायस्कूल अस्तित्वांत आलें असं म्हटल्यास वावगें होणार नाहीं. सेवानिवृत्त झाल्यावर ते हिंदुस्थान सोडून स्वदेशीं गेले. परंतु शाळेची आठवण ते विसरले नाहींत. इ. स. १८९१ सालीं सरकारनें शाळेची ग्रँट कमी करण्याचें ठरविलें होतें. तसें झालें असतें तर शाळा थोडक्याच वर्षांत नामशेष झाली असती. परंतु सर विल्यम वेडरबर्न यांनीं सेक्रेटरी ऑफ स्टेटपर्यंत हा प्रश्न नेऊन हा अनर्थ टाळला. ही मुलींची शाळा चिरकाल टिकावी यासाठीं अनेक थोर सत्पुरुषांनीं आपली पुण्याई खर्च केली आहे.

न्यायमूर्ति **महादेव गोविंद रानडे** यांच्यासंबंधानें लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनीं केसरींतील मृत्युलेखांत काढलेले उद्गार संस्मरणीय आहेत. "महाराष्ट्र देश म्हणजे त्या वेळीं एक थंड गोळा होऊन पडला होता. या थंड्या गोळ्यास कोणत्या तऱ्हेनें ऊब दिली असतां तो पुनः सजीव होईल, याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करून अनेक दिशांनीं, अनेक उपायांनीं त्यास पुनः जिवंत करण्याचें दुर्धर काम अंगावर घेऊन त्याकरितां जिवापाड जर कोणीं मेहनत केली असेल तर ती प्रथमतः माधवरावजींनींच केली, असें म्हटलें पाहिजे." हिंदुस्थानांतील राजकीय, सामाजिक, औद्योगिक व धार्मिक चळवळींचें उगमस्थान म्हणजे न्या. रानडेच होत. सरकारी नोकरी करून देशसेवा करणें मुळींच अशक्य नाहीं ही गोष्ट त्यांनीं स्वतःच्या उदाहरणानें सिद्ध केली.

"रावसाहेबांचा जन्म जर कांहीं शतकांपूर्वी झाला असता तर त्यांची गणना अवतारी पुरुषांमध्यें खास झाली असती." असे उद्गार त्यांचे पट्टशिष्य नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनीं 'आयुष्यांतील आठवणी' या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत काढले आहेत. महाराष्ट्रांतीलच नव्हे तर अखिल भारतवर्षांतील सर्व चळवळींचे आद्यप्रवर्तक म्हणून नाणावलेल्या अशा या महात्म्याचें नांव संस्थापक या नात्यानें मुलींच्या हायस्कूलशीं निगडित असलेलें पाहून कोणास धन्यता वाटणार नाहीं ? न्या. रानडे हे स्त्रीशिक्षणाचे कट्टे भक्त होते. त्यांनीं आपल्या पत्नी श्री. रमाबाई यांना स्वतः उत्कृष्ट शिक्षण दिलें. हायस्कूलच्या ले. सुपरिंटेन्डन्ट होण्यापूर्वी मिस् हर्फर्ड रमाबाईना इंग्लिश शिकवीत असत. पतीनें दिलेल्या सुशिक्षणामुळेंच प्रेरणा होऊन श्रीमती रमाबाई यांनीं

सेवासदन संस्थेची स्थापना केली. इ. स. १८८४ पासून इ. स. १९०१ पर्यंत ते शाळेच्या व्यवस्थापक कमिटींत असून, त्यांच्या मुत्सद्दी सल्ल्यानें शाळेच्या कौन्सिलचीं कामें चालत. सरकारदरबारीं त्यांचें वजन असल्यामुळें शाळेच्या सोसायटीचीं कामें सहज होत. पाकशास्त्र, शिशुसंगोपनशास्त्र व शाळेचा अभ्यास यांत प्राविण्य संपादन करणाऱ्या विद्यार्थिनीस दरवर्षी ४० रुपयांचें बक्षीस देण्यासाठीं त्यांनीं देणगी दिली. ती अद्यापपर्यंत चालू आहे. १६ जानेवारी १९०१ रोजीं त्यांनीं आपली जीवितयात्रा संपविली. त्यांच्या मृत्यूनें साऱ्या हिंदुस्थानचा आधार एका क्षणांत नाहींसा झाला.

डॉ. **रामकृष्ण गोपाळ भांडारकर** हेहि हायस्कूलच्या संस्थापक मंडळांत होते. हायस्कूलच्या सोसायटीचे उपाध्यक्ष व कौन्सिलचे कार्याध्यक्ष म्हणून सतत तीस वर्षें त्यांनीं काम केलें. हें काम करीत असतां विविध प्रकारच्या संकटांपासून त्यांनीं संस्थेचें रक्षण करून तिच्या विकासास हरएक प्रकारची मदत केली. हायस्कूलच्या सोसायटीचेच नव्हे तर डेक्कन एज्युकेशन सोसायटी, शिक्षणप्रसारक मंडळी यांच्या कौन्सिलचेहि ते कित्येक वर्षें कार्याध्यक्ष होते. ते जें काम हातीं घेतील तें सफल होणारच असा सर्वांचा दृढ विश्वास असे. उत्कृष्ट अध्यापक, विद्वान् ग्रंथकार, आदरणीय समाजसुधारक व परमेश्वराचे परमनिष्ठ भक्त असा त्यांचा सर्वत्र लौकिक आहे. " Long after you and I have gone, Dr. Bhandarkar's name will remain." हे प्रिन्सिपॉल सेल्बि यांनीं डेक्कन कॉलेजच्या एका संमेलनप्रसंगीं विद्यार्थ्यांना उद्देशून भाषण करतांना काढलेले उद्गार यथार्थ आहेत. पुराणवस्तुसंशोधक व संस्कृत पंडित अशी त्यांची कीर्ति जगविख्यात आहे. न्या. रानडे यांच्या प्रमाणेंच ते सामाजिक सुधारणेचे कट्टे पुरस्कर्ते होते. समाजसुधारणेच्या पोकळ गप्पा न मारतां त्यांनीं त्या तंतोतंत आचरणांत आणून दाखविल्या. त्यांच्या घराण्यांतील तिन्ही पिढ्यांतील स्त्रिया सुशिक्षित आहेत.

बोलण्याप्रमाणें आचरण करणारे सत्पुरुष या जगांत क्वचितच जन्माला येतात. आमच्या विद्यामंदिराचें वातावरण त्यांच्या पुण्य स्मृतींनीं भरून राहिलें आहे. इ. स. १८८४त लाविलेल्या बीजाचें सुंदर वृक्षांत रूपांतर झालेलें पाहण्याचें भाग्य संस्थापकांपैकीं फक्त एकट्या डॉक्टर भाण्डारकरांनाच लाभलें. सामाजिक सुधारणेच्या प्रथम कालांत जीं ध्येयचित्रें त्यांनीं रंगविलीं होतीं तीं सत्यसृष्टींत अवतरलेलीं त्यांना दिसलीं. २४ ऑगस्ट १९२५ रोजीं संगमाश्रमांतील हे महर्षि ईशपदीं लीन झाले.

संस्थापक

नामदार रावबहादुर **कृष्णाजी लक्ष्मण नूलकर** हे रानड्यांच्या पिढीचे एक नामांकित सार्वजनिक कार्यकर्ते होते. ते मोठे अभिमानी, स्पष्टवक्ते व स्वतंत्र बाण्याचे गृहस्थ होते. स्त्रियांच्या उन्नतीप्रीत्यर्थ झटणारे त्या वेळीं जे थोडेलोक होते त्यांपैकीं रा. ब. नूलकर हे एक होत. हायस्कूलच्या संस्थापकांत त्यांची गणना होते. सोसायटीच्या अगदीं पहिल्या कौन्सिलचे ते सभासद होते. त्यांची कन्या व सून या शाळेंतील पहिल्या दिवशीं हजर असणाऱ्या विद्यार्थिनी होत्या. सार्वजनिक सभेच्या कार्याध्यक्षाचें त्यांनीं आठ नऊ वर्षें काम केलें. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या मंडळींचे ते चहाते होते. २० मार्च १८९३ रोजीं महाबळेश्वर येथें रा. ब. नूलकर यांस देवाज्ञा झाली.

सामाजिक सुधारणेच्या बाबतींत श्री. **वामन आबाजी मोडक** हे न्या. रानडे, रा. ब. पण्डित व डॉ. भाण्डारकर यांचे सहकारी होते. स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह या दोन सुधारणांचे ते निःसीम भक्त होते. त्यामुळें साहजिकच मुलींच्या हायस्कूलच्या स्थापनेमध्यें त्यांनीं हौसेनें भाग घेतला होता. ते उत्कृष्ट शिक्षणशास्त्रज्ञ व नमुनेदार हेडमास्तर होते. एल्फिन्स्टन् हायस्कूलचे पहिले हिंदू हेडमास्तर म्हणजे श्री. मोडकच होत. त्यांच्या पूर्वी कोणाहि एतद्देशीय गृहस्थास ही जागा मिळालेली नव्हती. शाळेंतील कडक शिस्तीबद्दल त्यांची ख्याति असे. सरकारी नौकरींतून सेवानिवृत्त झाल्यानंतर सार्वजनिक कार्यांत आयुष्य वेंचण्याचा त्यांचा बेत होता. परंतु त्यांचीहि इच्छा अपुरी राहिली. कारण १८९७ च्या सप्टेंबर महिन्यांत त्यांस मृत्यूनें गांठलें. त्यांनीं आपल्या मुलींना शिक्षण दिलें व त्यांचे प्रौढपणींच विवाह केले. असो.

रा. ब. **नारायणभाई दाण्डेकर** हे शाळेच्या स्थापनेपासून कौन्सिलचे जॉइंट सेक्रेटरी होते. रा. ब. पण्डित यांच्या मृत्यूनंतर तेच शाळेचे सेक्रेटरी व ट्रेझरर झाले. स्थापनेपासून सतत सोळा वर्षें शाळेची व्यवस्था पाहून त्यांनीं हायस्कूल नांवारूपास आणिलें. ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल असतांना ट्रेनिंग कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं आपल्या पत्नींस स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेजमध्यें पाठवावें यासाठीं त्यांनीं पुष्कळ खटपट केली. परंतु इ. स. १८५९च्या नोव्हेंबर महिन्यांत या उत्कृष्ट कार्यकर्त्याचा मृत्यु पाहण्याचें दुर्दैव सोसायटीवर ओढवलें. त्यांची जागा भरून कशी काढावी अशा चिन्तेंत कौन्सिलची मंडळी पडली होती.

रा. ब. **चिन्तामण नारायण भट** हे सामाजिक कार्यांतील न्या. रानडे यांचे सहकारी होते. ते हायस्कूलच्या कौन्सिलचे उत्साही सभासद व प्रमुख कार्यकर्ते होते.

त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांची गणना तत्कालीन पुण्यांतील सुशिक्षित व पुढारी स्त्रियांत होत असे. रावबहादुरांनीं आपल्या बुधवार पेठेंतील रहात्या घरीं प्रौढ स्त्रियांकरितां 'Home Classes' सुरू केले होते. त्या कामीं त्यांस त्यांच्या पत्नीचें सहकार्य लाभलें. त्यांनीं आपल्या कन्येचा विवाह लोकमतास न जुमानतां प्रौढपणीं केला व त्यांची कन्या ही पुण्यांतील ब्राह्मणवर्गातील पहिली मॅट्रिक होय. इ. स. १८९७ सालीं रा. ब. भट हे प्लेगनें कालवश झाले. त्यांच्या मृत्यूमुळें हायस्कूल सोसायटीचा एक आधारस्तंभ व सामाजिक सुधारणेचा पुरस्कर्ता नाहींसा झाल्या-कारणानें पुण्यांतील समाजसुधारणेच्या कार्यास मोठाच धक्का बसला.

डॉ. **विश्राम रामजी घोले** हे हायस्कूलच्या संस्थापकांच्यापैकींच एक होत. इ. स. १८८४ पासून १९०१ पर्यंत ते हायस्कूलच्या कौन्सिलचे सभासद होते. तत्कालीन सर्व सार्वजनिक संस्थांशींहि यांचा निकट संबंध असे. स्त्रीशिक्षणाच्या कार्यास त्यांची सक्रिय सहानुभूति असे. त्यांच्या कन्येचें शिक्षण हायस्कूलमध्येंच झालें. पुण्यांतील त्या काळचे सुप्रसिद्ध डॉक्टर असा त्यांचा लौकिक होता. सन १९०१ सालीं हे स्वर्गवासी झाले.

रावबहादुर **सीताराम वि. पटवर्धन** हे इ. स. १८८४ पासूनच सोसायटीच्या कौन्सिलचे सभासद होते. रा. ब. दाण्डेकर यांच्या मृत्यूनंतर ते सोसायटीचे सेक्रेटरी झाले. त्यांनीं १९ वर्षे शाळेच्या व्यवस्थेचें काम पाहिलें. त्यांची शिस्त कडक असून शाळेमध्यें त्यांचा फार दरारा असे. आठवड्यांतून दोन तीन वेळां ते शाळेमध्यें येऊन सर्व व्यवस्था जातीनें पहात. त्यांनीं आपल्या पत्नी सौ. जानकीबाई पटवर्धन यांच्या स्मरणार्थ शाळेंतील विद्यार्थिनींच्यासाठीं दोन शिष्यवृत्त्या ठेविल्या आहेत.

डॉ. भाण्डारकर यांचे ज्येष्ठ चिरंजीव **प्रो. श्रीधरपंत भाण्डारकर** हे हाय-स्कूलची स्थापना करण्यासाठीं जी पहिली कमिटी नेमली गेली तिचे सेक्रेटरी होते. आपल्या वडिलांच्या प्रमाणेंच डेक्कन कॉलेजमध्यें ते संस्कृत भाषेचे अध्यापक होते. प्रो. काथवटे यांनीं पेन्शन घेतल्यानंतर त्यांच्या जागीं श्रीधरपंतांची नेमणूक झाली. वडिलांच्याप्रमाणेंच ते उत्कृष्ट अध्यापक व कर्ते सुधारक होते. त्यांच्या ज्येष्ठ कन्या सौ. अनसूयाबाई कामत या शाळेच्या माजी विद्यार्थिनी आहेत. कनिष्ठ कन्या कु. अहल्याबाई या इंदूर येथील अहल्याश्रम व चंद्रावती गर्ल्स् हायस्कूल या संस्थांच्या प्रिन्सिपॉल आहेत. त्यांचा बराच काळ मुंबईंत गेल्यामुळें सोसायटी त्यांच्या साहाय्यास मुकली.

संस्थापक

रा. ब. **विष्णु मोरेश्वर भिडे** हे तत्कालीन सार्वजनिक कार्यांचे पुढारी असून त्यांस सामाजिक सुधारणेसंबंधीं विशेष कळकळ होती. त्यांची कन्या आवडीबाई हिला बालपणींच वैधव्य प्राप्त झालें होतें. तिला व सुनेला त्यांनीं हायस्कूलमध्यें पाठविलें. या दोघीहि शाळेच्या प्रथम दिवशीं हजर असणाऱ्या मुलींपैकीं होत. रा. ब. भिडे हे शाळेच्या कौन्सिलचे अनेक वर्षे सभासद व ट्रस्टी होते. शाळेला त्यांनीं एक पिआनो बक्षीस दिला होता. पुण्यांतील सामाजिक चळवळींशीं त्यांचा निकट संबंध होता. पुण्याच्या सार्वजनिक सभेचे ते आठ नऊ वर्षे चेअरमन होते. १९०१ सालच्या नोव्हेंबर महिन्यांत त्यांनीं स्वर्गलोकीं प्रयाण केलें.

यांशिवाय सरदार मुदलिआर, श्री. गंगारामभाऊ म्हस्के इत्यादि मंडळी सोसायटीच्या संस्थापक मंडळामध्यें होती. यांपैकीं प्रत्येकानें आपआपल्या परीनें संस्थेच्या उन्नतीप्रीत्यर्थ प्रयत्न केले. या सर्व विद्वान् व थोर गृहस्थांनीं सरस्वतीच्या मंदिराचें द्वार खुलें करून जी चिमुकली ज्ञानज्योत पन्नास वर्षांपूर्वीं लाविली तिच्या शांत व निर्मल प्रकाशांत शेंकडों महाराष्ट्रीय स्त्रियांना आपल्या जीवितयात्रेचा मार्ग सांपडला. असो.

यापुढें मुंबईसरकारनें ज्या सोसायटीच्या देखरेखीखालीं ही शाळा प्रथमपासून ठेविली तिची घटना कोणत्या प्रकारची होती हें पाहूं.

प्रकरण सहावें

महाराष्ट्र गर्ल्स् एज्युकेशन सोसायटी

पुण्याच्या ज्या स्त्रीशिक्षणेच्छु पुढारी मंडळींनीं सरकारशीं वाटाघाट करून मुलींचें हायस्कूल स्थापन केलें त्या मंडळींनीं प्रारंभीं 'The Board of the Poona High School for Native Girls" असें नांव धारण केलें होतें. या मंडळानें नेमलेल्या कमिटीला "Poona Girls' High School Committee" असें नांव दिलेलें आढळतें. त्यांचें कार्यक्षेत्र प्रथम फक्त पुणें शहरच होतें. अज्ञान, अंध समजुती व जुलमी रूढी यांच्या दास्यत्वांत असलेल्या समाजांत जागृति उत्पन्न करणें हें सोपें काम नव्हतें. शेंकडा नव्याण्णव लोक विरुद्ध असतां पुण्यासारख्या प्राचीन परंपरेला अंधपणें चिकटून राहणाऱ्या ऐतिहासिक नगरांत मुलींच्या शिक्षणाचा उपक्रम करणें म्हणजे दक्षिणेकडे वहात जाणाऱ्या नदीला उत्तरेकडे वहात जा असें सांगण्याइतकेंच दुष्कर होतें. त्यामुळें या मंडळींनीं पुणें शहरापुरतेच आपले स्त्रीशिक्षणाचे प्रयत्न मर्यादित केले याबद्दल नवल वाटण्याचें कारण नाहीं.

परंतु या बोर्डाचे अध्यक्ष श्रीमंत आबासाहेब घाटगे (कागलचे चीफ व कोल्हापूरचे रीजंट) असून ते स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत हौसेनें मन घालून उत्तेजन देत आहेत हें पाहून सरकारनें जानेवारी १८८५ रोजीं पत्र पाठवून बोर्डानें पुण्याशिवाय, महाराष्ट्र व दक्षिणी संस्थानें यांमध्येंहि स्त्रीशिक्षणाचा प्रसार करण्याचें ध्येय आपल्यापुढें ठेवावें अशी इच्छा व्यक्त केली. मुलींच्या हायस्कूलला त्या वेळचे मुंबईचे गव्हर्नर सर जेम्स फर्गसन् यांची मनःपूर्वक सहानुभूति असल्यानें शाळेच्या व्यवस्थेसंबंधीं योजना तयार करण्याचें कार्य त्यांनीं ऑनरेबल मिस्टर जार्डिन् यांच्यावर सोंपविलें. मिस्टर जार्डिन् यांनीं शाळेस भेट देऊन एकंदर सर्व गोष्टींचें काळजीपूर्वक निरीक्षण केलें व इ. स. १८६० च्या २१ व्या ॲक्टान्वयें महाराष्ट्र, दक्षिणी संस्थानें व कोंकण या प्रांतांमध्यें स्त्रीशिक्षणाचा प्रसार करण्यासाठीं सोसायटी रजिस्टर करावी असें आपलें मत दिलें.

त्याप्रमाणें ९ डिसेंबर १८७७ रोजीं १८६० च्या २१ व्या ॲक्टाप्रमाणें 'महाराष्ट्र फीमेल एज्युकेशन सोसायटी' या नांवानें हायस्कूलचें व्यवस्थापकमंडळ

रजिस्टर झालें. या सोसायटीचे पहिले अध्यक्ष श्रीमंत आबासाहेब घाटगे हे होत. सोसायटीची घटना ठरली तींतील कलमें खालीं दिलीं आहेत.

१. सोसायटीमध्यें अध्यक्ष, पेट्रन्स् व असोशिएट्स् यांचा समावेश होतो.

२. गव्हर्निंग बॉडीस सोसायटीचें कौन्सिल म्हणावें.

३. १००० रुपये (पूर्वी दहा हजार) देणगी देणाऱ्यांना कौन्सिलनें पेट्रन्स् नेमावे. स्त्रियांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांस पेट्रन् नेमण्याचा कौन्सिलला हक्क आहे.

४. ५० रुपये अथवा अधिक देणगी (पूर्वी २०० रु. अथवा अधिक देणगी) देणारांस Associates म्हणून नेमावें.

५. चालू काळापर्यंत झालेल्या सर्व पेट्रन्स् व असोशिएट्सची यादी कौन्सिलनें ठेवावी.

६. सोसायटीच्या अध्यक्षांची नेमणूक तहाहयात राहील. राजीनामा अथवा मृत्यू या कारणामुळें रिकाम्या झालेल्या जागेवर सोसायटीच्या सर्व सभासदांच्या सभेंत निवडणूक करून अध्यक्ष नेमावा. नेमणूक होईपर्यंत उपाध्यक्षानें अध्यक्षाचें काम पाहावें.

७. उपाध्यक्ष हेच सोसायटीच्या कौन्सिलचे अध्यक्ष समजावे.

८. कौन्सिलमध्यें अध्यक्ष व निदान आठ तरी सभासद असलेच पाहिजेत. सर्वसाधारण सभेमध्यें ठरलेल्या नियमांप्रमाणें कौन्सिलनें आपलें कार्य करावें.

९. कौन्सिलचे दोन सीनिअर सभासद दरवर्षी सेवानिवृत्त करावे. परंतु त्यांना पुन्हा निवडणुकीस उभें राहण्याचा हक्क आहे.

१०. वार्षिक दोन सर्वसाधारण (General) सभा व्हाव्यात.

११. सोसायटीचे हिशेब तपासण्यास कौन्सिलमध्यें नसणाऱ्या कोणातरी सद्गृहस्थांची ऑडिटर म्हणून नेमणूक करावी. ऑडिटर सोसायटीचे सभासद असल्यास हरकत नाहीं.

१२. **सोसायटीचें कार्य:**—सोसायटीनें पुढील कार्यें करावीं.

(१) मुलींना उच्च शिक्षण देणारें हायस्कूल पुण्यामध्यें स्थापन करावें.

(२) मुली शाळेस रोज हजर राहतील अशी कांहींतरी व्यवस्था करावी. शाळेस जोडलेल्या वसतिगृहामध्यें येणाऱ्या मुलींची योग्य व्यवस्था पाहावी व अशा रीतीनें मुलींना उत्तेजन द्यावें.

(३) मुलींना उत्तेजनार्थ शिष्यवृत्त्या व नादाऱ्या देण्याची तजवीज करावी.

(४) महाराष्ट्रांत इतरत्र कोंकण व दक्षिणी संस्थानें या प्रान्तांमध्यें सोसायटीजवळ ज्याप्रमाणें पैसा अधिकाधिक वाढेल त्याप्रमाणें मुलींच्या शाळा स्थापन कराव्या.

(५) सरकारनें विनंति केल्यास सरकारतर्फे इतर स्त्रीशिक्षणसंस्थांवर देखरेख ठेवून त्यांची व्यवस्था पाहावी.

(६) योग्य सल्ला, देखरेख व द्रव्यसहाय्य या तीन साधनांनीं स्त्रीशिक्षणास उत्तेजन द्यावें. त्याचप्रमाणें प्राथमिक शाळांवरसुद्धां देखरेख करून त्यांस सामान्यतः उत्तेजन द्यावें.

(७) स्त्री-शिक्षणासंबंधीं जे महत्त्वाचे प्रश्न उपस्थित होतील त्यांसंबंधीं सरकारकडे दाद मागावी.

१३. सोसायटीनें आपल्याजवळील द्रव्याचा विनियोग प्रथम पुण्यांतील हायस्कूलसाठीं करून त्याची उत्तम व्यवस्था ठेवणें हें आपलें पहिलें कर्तव्य समजावें. सोसायटी व सरकार यांच्यामध्यें झालेल्या कराराबरहुकूम या संस्थेची व्यवस्था पाहावी.

१४. सरकार व सोसायटी यांच्यामध्यें ठरलेल्या कराराप्रमाणें सोसायटीस मिळालेल्या देणग्यांची ज्या ध्येयासाठीं सोसायटी स्थापन झाली तें ध्येय लक्षांत ठेवून कौन्सिलनें योजना करावी.

१५. सोसायटीच्या सभासदांपैकीं एकास कौन्सिलनें सेक्रेटरी नेमावें. त्याचप्रमाणें खजिनदाराचीहि नेमणूक व्हावी.

१६. कौन्सिलच्या सभासदांपैकीं एकास जॉइंट सेक्रेटरी नेमावें.

१७. सोसायटीच्या फंडाची, सोसायटीच्या मालकीची जमीन, इमारती इत्यादि इस्टेटीची जबाबदारी ट्रस्टींच्यावर टाकण्यांत यावी.

१८. सोसायटीचे दोन ट्रस्टी (पूर्वी तीन) नेमावेत.

याप्रमाणें सोसायटीची घटना आहे. वर सांगितलेल्या नियमांशिवाय सोसायटीच्या व कौन्सिलच्या सभांविषयीं बारीकसारीक पुष्कळ नियम आहेत. परंतु ते सर्व येथें देण्याची आवश्यकता नाहीं. या नियमांमध्यें फरक करण्याचा सोसायटीला अधिकार आहे. परंतु त्यासाठीं सर्वसाधारण (General) सभेस हजर असणाऱ्या सभासदांपैकीं $\frac{3}{5}$ सभासदांचें बहुमत होण्याची जरूरी आहे. असो.

यापुढें सोसायटीचा वृत्तान्त पाहून सोसायटींत जीं स्थित्यंतरें झालीं त्यांचा विचार करूं.

प्रकरण सातवें

सोसायटीचा इतिहास

१९ जुलै १८८४ रोजीं हिराबागेंतील सभेमध्यें नेमली गेलेली कमिटी हेंच सोसायटीचें पहिलें कौन्सिल होय. त्यामध्यें पुढील सभासद होते:—

(१) रा. ब. महादेव गोविंद रानडे, एम्.ए., एलएल्.बी.

(२) प्रोफेसर रामकृष्ण गोपाळ भाण्डारकर, एम्.ए.

(३) रा. ब. शंकर पांडुरंग पण्डित, (सेक्रेटरी व ट्रेझरर).

(४) रा. ब. कृष्णाजी लक्ष्मण नूलकर.

(५) सरदार पुरंदरे.

(६) सुलेमान अबदुल वाहिद.

(७) रावसाहेब सी. वि. पटवर्धन.

(८) रा. ब. नारायणभाई दांडेकर (जॉइंट सेक्रेटरी).

डॉ. भांडारकर हे कौन्सिलचे अध्यक्ष व सोसायटीचे उपाध्यक्ष होते. कागलचे चीफसाहेब श्रीमंत जयसिंगराव आबासाहेब घाटगे यांची सोसायटीच्या अध्यक्षस्थानीं नेमणूक केली होती. त्याचप्रमाणें श्रीमंत आबासाहेब घाटगे, सर विल्यम् वेडरबर्न व श्रीयुत हरिपंत चिपळोणकर यांना सोसायटीनें ट्रस्टी म्हणून नेमिलें होतें.

शाळेच्या स्थापनेनंतर थोडक्याच काळांत सोसायटीचे उत्साही व कर्तृत्ववान् अध्यक्ष श्रीमंत घाटगे हे कालवश झाल्याकारणानें सोसायटीच्या कार्यास आरंभींच मोठा धक्का बसला. कोल्हापूर व पुणें यांचा निकट संबंध जडण्यास श्रीमंत आबासाहेबच कारणीभूत झाले. कोल्हापूर दरबार व महाराष्ट्रांतील इतर संस्थानाधिपति यांच्याकडून मुलींचें हायस्कूल व फर्गसन् कॉलेज या संस्थांना ज्या देणग्या मिळाल्या त्यांचें श्रेय श्रीमंत आबासाहेब यांनाच देणें युक्त होय. अशा प्रकारचा लोकप्रिय संस्थानाधिपति व सार्वजनिक कार्याचा पुरस्कर्ता गेल्यामुळें शिक्षणप्रसाराच्या कार्याचें फार नुकसान झालें.

यानंतर इंदूरचे श्रीमंत शिवाजीरावमहाराज होळकर यांनीं सोसायटीचें अध्यक्षपद स्वीकारलें. इ. स. १८८८ सालीं महाराजांनीं पुण्यास भेट दिली. त्यानिमित्त पुण्यांतील निरनिराळ्या लोकोपयोगी संस्थांना देणग्या देण्यासाठीं म्हणून

महाराजांनीं ११ हजार रुपये दिले होते. त्या वेळीं हायस्कूलला त्यांनीं पांचशें रुपयांची देणगी दिली. श्री. शिवाजीरावमहाराज इ. स. १९०९ सालीं स्वर्गवासी झाल्या-नंतर बडोदें संस्थानचे नरेश श्रीमंत सयाजीरावमहाराज गायकवाड यांनीं कृपावंत होऊन सोसायटीचें अध्यक्षपद स्वीकारलें. अशा प्रकारच्या उदारमतवादी, प्रजाहित-तत्पर, विद्वान् अधिपतींच्या नेतृत्वाचा लाभ झाल्यामुळें सोसायटीच्या कार्यास विशेष प्रोत्साहन मिळालें. महाराजांनीं आपल्या संस्थानांत स्त्रीशिक्षणासंबंधीं अत्यंत बहुमोल कामगिरी केली आहे. बडोदें संस्थानाइतका शिक्षणप्रसार म्हैसूरखेरीज-करून कोणत्याहि हिंदी संस्थानामध्यें झालेला नाहीं. बडोद्याच्या राजघराण्यांतील सर्व स्त्रिया सुशिक्षित आहेत. महाराजांच्या कन्या–कुचबिहारच्या राणीसाहेब–यांनीं विश्वविद्यालयांत शिक्षण घेतलें असून राजपौत्री कुमारी निर्मला राजे या हल्लीं बडोदा कॉलेजमध्यें शिकत आहेत. निर्मला राजे या आमच्या शाळेंतूनच विश्वविद्यालयाच्या प्रवेश परीक्षेंत उत्तीर्ण झाल्या. श्रीमंत सौ. महाराणी चिमणाबाईसाहेब यांनीं श्रीयुत मित्र यांच्या साहाय्यानें लिहिलेला '*Position of Indian Women*' हा ग्रंथ सुप्रसिद्ध आहे. महाराजांच्या संस्थानांत मुलामुलींचें प्राथमिक शिक्षण सक्तीचें आहे. महाराणी गर्ल्स् हायस्कूल व ट्रेनिंग कॉलेज या संस्था कित्येक वर्षें स्त्रीशिक्षणाचें कार्य महाराजांच्या राजधानींत करीत आहेत. आपल्या संस्थानामधील मुली आदर्श गृहिणी व्हाव्या यासाठीं मिस् नीड्हॅम यांच्या साहाय्यानें त्यांनीं 'Domestic Economy' शिकविण्यासाठीं संस्था सुरू केली होती. बडोदा सेंट्रल लायब्ररीची जी मुलामुलींची शाखा आहे तीवर त्यांनीं एका सुशिक्षित स्त्रीची नेमणूक केली आहे. मुलामुलींच्यासाठीं बडोद्याशिवाय साऱ्या हिंदुस्थानांत एकहि उत्कृष्ट सार्व-जनिक ग्रंथसंग्रहालय नाहीं. मुलामुलींच्या व्यायामासाठीं संस्थानांत उत्तम व्यवस्था आहे. स्त्रियांच्या उन्नतीप्रीत्यर्थ महाराजांनीं आपल्या संस्थानांत कित्येक कायदे केले आहेत. मुलामुलींची विवाहमर्यादा वाढविण्याचा कायदा बडोदें संस्थानांत कित्येक वर्षांपासून सुरू होता. घटस्फोटाचा कायदाहि महाराजांच्या संस्थानांत सुरू झाला आहे. त्याच्या इष्टानिष्टतेबद्दल समाजामध्यें जरी तीव्र मतभेद असला तरी कांहीं दुःखी स्त्रियांची स्थिति या कायद्यानें सुधारेल अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं. जुन्या परंपरेंतील उत्कृष्ट गोष्टींचें रक्षण करून नवयुगांतील समाजो-पयोगी न्यायी तत्त्वांचा स्वीकार करून त्यांचा प्रसार करणारे असे हे प्रागतिक संस्थानाधिपति सोसायटीस अध्यक्ष म्हणून लाभले ही अभिमानास्पद गोष्ट होय.

महाराजांचा ७१ वा वाढदिवस गतवर्षींच सार्वजनिक रीत्या साजरा करण्यांत आला. प्रजाहित हेंच ध्येय मानणाऱ्या या अर्वाचीन नृपश्रेष्ठांना परमेश्वर दीर्घायुषी करो. असो.

रा. ब. शंकर पांडुरंग पण्डित हे सोसायटीचे सेक्रेटरी व ट्रेझरर असतां त्यांनीं २२ मार्च १८८५ रोजीं सोसायटीच्या देणगीदारांचीं नांवें प्रसिद्ध केलीं. अवघ्या सहा महिन्यांच्या आंत त्यांनीं निरनिराळे संस्थानाधिपती व इतर धनिक यांजकडून एक लाखावर रक्कम मिळविली. त्यावरून रा. ब. पण्डित यांनीं सेक्रेटरी या नात्यानें शाळेची जी सेवा केली तिची खरी कल्पना येईल.

शाळेच्या स्थापनेनंतर चार पांच महिन्यांच्या आंतच रा. ब. पण्डित यांनीं बरीच खटपट करून हायस्कूलची इमारत बांधण्यासाठीं म्हणून श्रीमंत सांगलीकर यांच्याकडून त्यांच्या मालकीची हुजुरपागा नांवाची जमीन मिळविली. त्या जागेंत हायस्कूलच्या इमारतीची कोनशिला बसविण्याचा समारंभ मुंबईचे तेव्हांचे गव्हर्नर सर जेम्स फर्गसन् यांच्या अध्यक्षतेखालीं ४ मार्च १८८५ रोजीं पार पडला. त्या प्रसंगीं केलेल्या भाषणांत इमारतीसाठीं $\frac{२}{३}$ खर्च देण्याचें गव्हर्नरसाहेबांनीं आश्वासन दिलें.

शालागृह, वसतिगृह, नोकरांच्या राहण्याच्या जागा इत्यादिकांस मिळून सुमारें १ लाख रुपये खर्च लागेल असा अंदाज होता व त्या अंदाजाप्रमाणें सरकारकडून ६०,००० रुपयांची ग्रँट मिळावयाची होती. परंतु इ. स. १८८८ मध्यें पुनः खर्चाचा अंदाज काढविला गेला. त्यावरून एकंदर खर्च रु. ६०,००० होणार असल्याचें समजलें. म्हणून सोसायटीच्या कौन्सिलनें ४०,००० रुपये ग्रँट मिळावी असा सरकारकडे अर्ज केला. बाकीच्या वीस हजारांची सोय सोसायटीनें करावी असें ठरलें. इमारतीच्या बाबतींत सतत चार पांच वर्षें सोसायटीचा सरकारशीं पत्रव्यवहार चालू राहिला. परंतु इमारत बांधण्याच्या जबाबदारींतून मुक्त होण्यापूर्वींच सोसायटीस एक नवीन जबाबदारी स्वीकारावी लागली. त्याची हकीकत देण्यापूर्वी हायस्कूलच्या संस्थापकांना स्त्रीशिक्षणविरोधकांकडून जो त्रास सोसावा लागला व शाळेच्या शिक्षणक्रमाबद्दल इतरांनीं जे आक्षेप घेतले त्यांचा इतिहास पाहूं.

प्रकरण आठवें

आक्षेप

पुण्यांत मुलींचें हायस्कूल स्थापन होणार ही वार्ता ऐकतांच पुण्यांतील पुराणमताभिमानी जनांत खळबळ उसळली. 'पुणेंवैभवा'दि पत्रकर्त्यांनीं स्त्रीशिक्षणाविरुद्ध शस्त्र उपसलें. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' या महामंत्राची मोहिनी त्यांच्यावर असल्यामुळें स्त्रियांना शिक्षण देणें म्हणजे महापाप करणें अशी त्यांची समजूत होती. स्त्रियांना शिक्षण दिल्यास त्या उद्धट, वडील मंडळींची पर्वा न करणाऱ्या होतील, त्यामुळें समाजाची नीति बिघडेल, गृहव्यवस्थेंत घोंटाळा होईल, अशा प्रकारच्या भीतीनें ते गांगरून गेले. सुशिक्षित स्त्रिया नौकरीवर गेल्या आहेत व घरामध्यें त्यांचे पति पाकशास्त्र, शिशुसंगोपन इत्यादि गृहकृत्यें करीत आहेत, असा अद्भुत चित्रपट त्यांना नेत्रांसमोर दिसूं लागला व त्याच्या दर्शनानें त्यांचा थरकांप झाला. मुलींना नोकऱ्या करावयाच्या नाहींत तर त्यांना शाळेंतलें शिक्षण काय करावयाचें आहे ? त्यांनीं स्वयंपाकादि गृहकृत्यें करून मुलांना सांभाळावें; मनुस्मृतींत सांगितल्याप्रमाणें स्त्रीनें पतीस देव मानून राहावें; तो कसाहि असला तरी त्याची आज्ञा पाळणें हें तिचें कर्तव्य आहे; म्लेंच्छ भाषा शिकून पुरुष बाटले आहेत, तेव्हां निदान आमच्या पवित्र गृहराज्यांत तरी असला भ्रष्टाकार न शिरावा ! या पद्धतीचे ज्यांचे संकुचित विचार त्यांना न्या. रानडे, भाण्डारकर, पंडित, मोडक इत्यादिकांचा मुलींची शाळा स्थापन करण्याचा विचार पसंत न पडावा यांत कोणतें आश्चर्य ? हिंदुस्थानची संपत्ति स्त्रीशिक्षणाकडे खर्च करण्यापेक्षां समुद्रांत ओतणें अधिक बरें असें त्यांना वाटत होतें. देशोन्नतीचे, औद्योगिक सुधारणेचे विचार बाजूस टाकून मुलींची शाळा स्थापन करणाऱ्या समाजसुधारकांचे विचार त्यांना वेडगळपणाचे वाटले.

स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, पुनर्विवाह इत्यादि सामाजिक सुधारणांचे पुरस्कर्ते व प्रार्थना-समाजाचे पुढारी म्हणून रानडे, पंडित, भांडारकर ही मंडळी जुन्या मंडळींच्या डोळ्यांत खुपत होतीच. त्यांतच मुलींच्या हायस्कूलची स्थापना होणार ही बातमी कळतांच वर लिहिल्याप्रमाणें त्यांच्यावर विरोधकांचे चोहों बाजूंनीं हल्ले झाले.

या निकराच्या हल्ल्याला तोंड देण्याचें अवघड कार्य त्या वेळचे केसरीचे संपादक श्री. गोपाळ गणेश आगरकर यांनीं उत्कृष्ट रीतीनें केलें. स्त्रियांची उन्नति करणें हेंच त्यांचें प्रियतम ध्येय होतें. हायस्कूलची स्थापना होण्यापूर्वीच 'हिंदुस्थान देश बुडाला हो, ढार बुडाला,' (वर्ष ४, अंक ३२) या मथळ्याखालीं त्यांनीं केसरीमध्यें लेख प्रसिद्ध केला. त्यांत ते म्हणतात, "त्यांना (स्त्रीशिक्षणाच्या शत्रूंना) अशी घमेंड वाटत आहे कीं, आपल्या वाक्शल्यांनीं या पुरस्कर्त्यांचीं अंतःकरणें विदारून टाकून आपण त्यांचा गर्व उतरूं, त्यांनीं मोठ्या परिश्रमानें रचिलेला व्यूह ढांसळून टाकूं! पण आमची अशी खात्री आहे कीं, या शेंदाडशिपायांच्या शस्त्रसंपातानें स्त्रीशिक्षणाच्या किल्ल्याचें एक ढेंकूळहि न ढांसळतां त्याला अधिकच बळकटी येईल! आम्ही या अविचारी निंदकांना असें बजावितों कीं......त्यांचा आक्रोश अरण्यरुदिताप्रमाणें होणार आहे......विद्यार्जनानें किंवा सुशिक्षणानें स्त्रिया अनीतिवती, अविनयवती व अनयवती होतील असें म्हणण्याहून दुसरें अजागळ मूर्खपण तें कोणतें? स्त्रियांवर विद्येचा किंवा ज्ञानाचा असा परिणाम होईल असें मानणें म्हणजे त्या मनुष्य जातींत येत नाहींत असें कबूल केलें पाहिजे; कारण आम्हां पुरुषांवर ज्ञानाचा तसा परिणाम होत आहे असें वाटत नाहीं. ज्ञानाच्या संबधानें त्यांच्यांत व पुरुषांत जें जमीन-अस्मानाचें अंतर दृष्टीस पडत आहे, तें जसजसें कमी होत जाईल तसतसें मनुष्यजातीचें सुख वाढत जाईल. प्रस्तुतचे रानडे, मानकर, पंडित वगैरे पुढारी गेले तरी त्यांच्या पाठीमागें जिकडेतिकडे भटजी, दीक्षित व आचार्य यांचें राज्य होईल असें नाहीं. सध्यांच्या चिन्हांवरून प्रस्तुतच्या पुढाऱ्यांपेक्षां सवाई पुढारी निघतील व स्त्रीशिक्षणाचें काम अधिक हौसेनें पुढें चालवतील, असा संभव दिसत आहे." अशा रीतीनें श्री. आगरकरांनीं रानडे, पंडित, भांडारकर यांच्या विरोधकांचा समाचार घेतला. यानंतर स्त्रियांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ संस्थानिक, सुशिक्षित, श्रीमंत स्त्री-पुरुष व सरकार पैसा खर्च करण्यास तयार झाले हें ज्यांस पसंत पडलें नाहीं व त्याचप्रमाणें स्त्रियांना इंग्रजी शिकविणें ज्यांना आवडलें नाहीं त्यांस उत्तर म्हणून 'स्त्रीशिक्षणावर शेवटचे दोन शब्द' हा लेख त्यांनीं केसरींत छापून प्रसिद्ध केला. (वर्ष ४, अंक ३८) "कांहीं झालें तरी हा वाद क्षुल्लक आहे. ... ... कोणत्या मुलीचा कोणत्या पद्धतीवर अभ्यास चालावयाचा हें एकदां तिच्या नवऱ्याला, बापाला, भावाला किंवा जो पालक असेल त्याला विचारून, सुरुवात केली म्हणजे कांहीं अडचण पडणार नाहीं. या व असल्या प्रकारच्या ज्या दुसऱ्या बारीक मोठ्या

व्यवस्था करावयाच्या आहेत, त्या करण्यास नेमलेल्या म्यानेजिंग कमिटींतील लोक विद्वान्, समंजस व विचारी आहेत व त्यांच्या हातून त्या सर्व योग्य रीतीनें पाहिजे तसतशा होत जातील अशी आमची पक्की खात्री आहे. " याप्रमाणें आपला अभिप्राय दिल्यानंतर त्यांनीं अखेर जो आशावाद प्रगट करून शाळेस आशीर्वाद दिला आहे तो सर्व उद्धृत करण्याचा मोह आवरत नाहीं. कारण स्त्रीहितासाठीं अहर्निश तळमळणाऱ्या साधुपुरुषाचें तें आशीर्वचन आहे. तें अन्यथा कसें होईल? "येत्या विजयादशमीस या स्त्रीविद्यालयाची प्रतिष्ठा होणार. या सुमुहूर्तावर त्याची प्रतिष्ठा होऊन त्याला अखंड विजय येवो व त्यांत सुसंस्कृत होऊन संसारांत प्रवेश करणाऱ्या युवती आपआपल्या मातापितरांस व भर्त्यांस आपल्या समर्याद सुशिक्षेनें प्रमुदित करोत. परिश्रमानें प्राप्त करून घेतलेल्या आपल्या ज्ञानानें आपल्या अपत्यांस लहानपणापासून सुशिक्षण देऊन नीति, देशाभिमान, व लोककल्याण यांचीं बीजें त्यांच्या कोमल अन्तःकरणभूमींत काळजीपूर्वक लावोत. सुविद्या प्राप्त झाल्यापासून अन्तःकरणांत उत्पन्न होणारी जी स्वहितत्यागक्षमता व प्रेमबुद्धि, तिच्या योगानें वैधव्यादि अनेक अत्यंत दुःखकारी क्लेशांत सांपडलेल्या व सांपडणाऱ्या अनाथ भगिनींची मुक्ति करण्याच्या कामांत सदा रत होवोत, आणि मनुष्यास ऐहिक व पारमार्थिक सुखप्राप्ति करून घेण्यास व शेवटीं मुक्ति संपादण्यास ज्ञानाशिवाय सुलभतर साधन नाहीं हें निरंतर ध्यानांत वागवून त्याची शांत आणि कल्याणप्रद पताका सर्व भरतखंडभर लावोत असें आम्ही अन्तःकरणापासून चिंतितों." पन्नास वर्षांनंतर वरील भाग वाचतांना आनंद व खेद अशा मिश्र भावना अन्तःकरणांत उदित होतात. आशीर्वचन खरें झालें; परंतु स्त्रियांच्या उन्नतीसाठीं समाजांत जागृति उत्पन्न करणारे व त्याबद्दल समाजाकडून होणारा असह्य छळ शांतपणें सहन करणारे असे सुधारकाग्रणी प्रिं. आगरकर आपलें ध्येय सत्यसृष्टींत अवतरलेलें पाहण्यास हयात नाहींत याबद्दल अत्यंत वाईट वाटतें.

इ. स. १८८७ सालीं आगरकरांच्याकडील केसरीचें संपादकत्व गेलें व लो. बाळ गंगाधर टिळक हे केसरीचे संपादक झाले. जुन्या परंपरेचे अभिमानी लो. टिळक व नवपरंपरेचे पुरस्कर्ते श्री. आगरकर या दोघां तत्कालीन समाजाच्या सुशिक्षित पुढाऱ्यांमध्यें मुलींच्या हायस्कूलमधील शिक्षणक्रमासंबंधानें जो वादविवाद झाला त्यामध्यें जुन्या व नव्या परंपरेच्या अनुयायांच्या मनःस्थितीचें उत्कृष्ट प्रतिबिंब पडलेलें आढळून येतें. टिळक-आगरकरांच्या मतांतील विरोध हा त्यांच्या ध्येयांच्या

भिन्नत्वाचें निदर्शक होय. टिळकांची दृष्टि फक्त तत्कालीन गरजा भागविण्याकडे होती तर आगरकरांची दृष्टि ध्येयसृष्टींतील मनोहर चित्रें पाहण्यांत तन्मय झाली होती.

हायस्कूलवरील सर्वांत मोठा हल्ला केसरीनें केला. 'फीमेल हायस्कुलांतील शिक्षणक्रम' या विषयावरील टिळकांचा पहिला लेखांक २८ सप्टेंबर १८८७ रोजीं केसरीमध्यें झळकला. त्यांतील मुख्य मुद्दा म्हणजे, मुलामुलींना एकच शिक्षण देणें अयोग्य होय; फीमेल हायस्कुलांत मुलींना मुलांप्रमाणें शिक्षण दिलें जात त्यापासून समाजाचें अनहित होईल, हा होता. दुसरा लेखांक ४ ऑक्टोबर १८८७ रोजीं प्रसिद्ध झाला. त्यांतील महत्त्वाचा भाग पुढें उद्धृत केला आहे. "आपले विवाह प्रौढपणीं होऊं लागले, आपली अविभक्तकुटुंबावस्था मोडून गेली, आपलीं धर्म व नीति यांचीं जुनीं बंधनें शिथिल झालीं, व आपल्याकडील मध्यम स्थितींतील गृहस्थ लोक दोन पैसे संग्रहीं राखून राहूं लागले म्हणजे तुमच्या इंग्रजी शिकलेल्या, पियानोवर सुस्वर गाणाऱ्या व किंडर गार्टन डान्स नाचणाऱ्या, व सीता, अहिल्याबाई यांच्याऐवजीं ग्रेस डार्लिंग व एलिझाबेथ यांच्या गोष्टी सांगणाऱ्या, स्त्रीहायस्कुलांतून निघालेल्या मुलींस किंमत येईल. ज्यांस आपल्या धर्माचा व गृहकृत्यांचा कंटाळा आला नाहीं अशाच, पण थोडेंसें लिहितां वाचतां येणाऱ्या स्त्रिया आजमितीस पाहिजे आहेत व ज्या स्कुलाच्या शिक्षणानें एतद्विरुद्ध परिणाम होतात त्याची आम्हांस जरूरी नाहीं. सासरीं किंवा माहेरीं रोजचें थोडेंबहुत घरचें काम करून मधल्या वेळांत दोन तीन तास स्त्रीधर्मास व हिंदु धर्मास उचित असें स्त्रियांस शिक्षण देण्याचें जर कोणीं मनांत आणिलें तर ती गोष्ट साध्य आहे. पण जेथें सर्व धर्मांच्या मुली एकत्र करून त्यांस पुरुषांप्रमाणें ११ ते ५ वाजेपर्यंत इंग्रजी बाई आंग्लभौम शिक्षण देणार, ती शाळा एक अति श्रीमंतांच्या किंवा अनाथ झाल्यामुळें कांहीं तरी धंदा करण्याची ज्यांस जरूर आली आहे, अशा स्त्रियांच्या मात्र उपयोगी पडणार. मध्यम स्थितीच्या गृहस्थांस त्या शाळेपासून कांहीं एक उपयोग होणार नाहीं. इतकेंच नव्हे तर उलट उपद्रव मात्र होईल."

तारीख ११ ऑक्टोबर १८८७ मधील तिसऱ्या लेखांकांत केसरीकार लिहितात, "या हायस्कुलाच्या व्यवस्थापकांनीं सध्याच्या समाजस्थितीचा विचार न करतां दहा पांच 'काल्पनिक सुधारणा' एकदम करण्याच्या आतुरतेनें या स्कुलाची अशी स्थिति करून सोडली आहे. स्त्रीशिक्षणाचें सासर हें एक

वर्कशॉप आहे. त्या वर्कशॉपमधून न काढितां त्यांस उपयुक्त व स्वधर्मानुकूल उदार शिक्षण देण्याची जर कांहीं सोय असेल तर ती आम्हांस पाहिजे आहे. या फीमेल हायस्कुलापासून असा कांहीं उपयोग होईलसें वाटत होतें, पण तें स्कूल मध्यम प्रतीच्या लोकांस असून नसून सारखेंच झाल्याप्रमाणें आहे. ”

आमच्याकडे प्रौढ विवाह प्रचलित नसल्यानें व विवाहित मुली अथवा सुना यांना शाळेंत पाठविणें बहुतेकांस अशक्य असल्यामुळें शाळेचा शिक्षणक्रम विवाहितांस सोयीवार नाहीं असें प्रतिपादन करून केसरीकार म्हणतात, “ फीमेल हायस्कूलचे उत्पादक हो, आपल्या चातुर्याची या कामीं तारीफ करावी तेवढी थोडीच. मुलांच्या शाळांसहि आपण खालीं पाहावयास लाविलेंत यांत अगदीं शंका नाहीं. ज्याप्रमाणें फीमेल हायस्कूल हें फक्त कांहीं श्रीमंत व अनाथ स्त्रियांच्याच उपयोगी, त्याप्रमाणें ह्या बोर्डिंगाचा अनाथ स्त्रीगृहापेक्षां जास्त कांहीं उपयोग होणार आहेसें आम्हांस वाटत नाहीं.” (लेखांक ४था, २५ ऑक्टोबर १८८७).

अशा रीतीनें हायस्कूलच्या संस्थापकांवर तीन चार निकराचे हल्ले चढवून, त्यांचा उपक्रम अविचारीपणाचा आहे असें सिद्ध केल्यावर चार पांच महिने केसरीकारांनीं आपल्या लेखणीस विश्रांति दिली. परंतु त्यांचे प्रतिपक्षी स्वस्थ बसले नव्हते. त्यांनींहि त्यांच्यावर उलट हल्ले चढविले. तेव्हां ' स्त्रीशिक्षणाची दिशा ' या शीर्षकाखालीं ६ मार्च १८८८ मध्यें केसरीकारांनीं आपली स्त्रीशिक्षणासंबंधींची कल्पना वाचकांपुढें मांडिली व तीमध्यें ' स्त्रीशिक्षणक्रमाच्या पुरस्कर्त्यांइतकेच किंबहुना जास्तहि स्त्रीशिक्षणाचे आम्ही कैवारी आहों व स्त्रीशिक्षणाकडे आमच्या मनाची जात्याच प्रवृत्ति आहे. ” असें मोघम विधान प्रारंभींच ठोकून दिलें. म्हणतात ना “ बोलेल तो करील काय, आणि गर्जेल तें पडेल काय ! ” आम्ही स्त्रीशिक्षणाचे कैवारी आहोंत अशी केसरीनें कितीहि गर्जना केली तरी त्याचा खरा अर्थ न समजण्याजोगे हायस्कूलचे संस्थापक अज्ञ नव्हते. केसरीकारांचा मुद्दा इतकाच कीं आमच्याकडे बालविवाह रूढ आहेत, तेव्हां १०–११ वर्षांपर्यंतचें प्राथमिक शिक्षण संपल्यानंतर मुलींचे विवाह होऊन त्या सासरीं जातात. तेव्हां हायस्कूलमध्यें मॅट्रिक्युलेशनपर्यंतचें शिक्षण घेणें त्यांना अशक्य आहे. “ पुढील शिक्षणाची तजवीज करावयाची ती, मुलगी सासरीं गेल्यावर घरचें थोडेंबहुत काम संभाळून राहिल्या वेळांत तिला उपयुक्त विषयांची माहिती मिळेल अशा रीतीनें केली पाहिजे. मुलांप्रमाणें अकरा वाजल्यापासून पांच वाजेपर्यंत त्यांच्याकडून घोकं-

पट्टी करून शिवाय राहिल्या वेळांत त्यांनीं शाळेंतील धडे करावे हें त्यांच्या पुढील कर्तव्यास विरुद्ध आहे. " अशा तऱ्हेनें गुळमुळीतपणें स्त्रीशिक्षणाची दिशा दाखवून फीमेल हायस्कूलचा वाद त्यांनीं संपविला.

कोणत्याहि गोष्टीचा आरंभ नेहमीं लहानच असतो; कोणताहि नवीन उपक्रम सुरू करणाराला निंदेचे आघात सहन करावे लागतात. त्याप्रमाणें हायस्कूलच्या संस्थापकांची स्थिति होती. त्या काळीं बालविवाह रूढ होता म्हणून ती चाल बदलून कालांतरानें प्रौढविवाह सुरू होतील याची कल्पना केसरीकारांना नसावी ही गोष्ट संभवत नाहीं; परंतु आमच्या बालविवाहाच्या रूढीवर सर्व मुद्दा आणून त्यांनीं हायस्कूलची निरर्थकता प्रतिपादन केली. स्त्रियांना लिहितां वाचतां यावें हेंच ज्यांचें संकुचित ध्येय त्यांना हायस्कूलची कल्पना कशी पटावी ? परंतु हायस्कूलच्या संस्थापकांची दृष्टी भविष्यकाळाचा पडदा सारून तीस चाळीस वर्षांपुढच्या गोष्टी पाहण्याइतकी तीक्ष्ण होती. 'गार्गी, मैत्रेयी' सारख्या विद्वान् स्त्रिया अर्वाचीन काळांतहि निर्माण व्हाव्या अशी आकांक्षा त्यांनीं मनाशीं धरली होती. पत्नी पतीची बौद्धिक सहचारिणी नसल्यास गृहसौख्यांत पराकाष्ठेची उणीव राहील याबद्दल त्यांच्या मनाची खात्री झाली होती. आपल्या मार्गांत ज्या अडचणी आल्या त्या पुढील पिढ्यांच्या मार्गांत न याव्या याच कारणाकरितां त्यांनीं या संस्थेची स्थापना केलेली होती. आरंभिलेल्या कार्याच्या उपयुक्ततेबद्दल पूर्ण खात्री असल्यामुळें तीव्र विरोधाला न जुमानतां त्यांनीं आपला उद्योग चालविला व त्यासाठीं शारीरिक, मानसिक व आर्थिक झीज सोसली. परंतु स्वतःस ' स्त्रीशिक्षणाचे कैवारी ' समजणाऱ्या केसरीकारांनीं स्त्रीशिक्षणाकरितां काय केलें ? कोणत्या स्त्रीशिक्षणसंस्थेस त्यांनीं देणग्या देऊन उत्तेजन दिलें ? का फक्त लिहिणें वाचणें शिकविणारी एकहि संस्था न आढळल्यामुळें मदत करण्याची जरूरीच त्यांना भासली नाहीं ?

टिळकचरित्रकारांनीं ' फीमेल हायस्कूलचा वाद ' असा या प्रकरणाचा उल्लेख केला आहे. त्यांना एकंदरीनें केसरीकारांचे मुद्दे पटलेले आहेत. " पण विद्यमान् फीमेल हायस्कुलांत सगळें धोरण विलायती थाटाचें या गोष्टीची चीडहि मनांतून आल्यावांचून राहणारी नाहीं. गांवांत दुसरी मुलींची शाळा नाहीं म्हणून नाइलाजान या शाळेंत लोकांना आपल्या मुली पाठवाव्या लागत ही गोष्ट वेगळी; पण तेथील सर्व शिक्षणक्रम नसला तरी लक्ष्य बाडगेपणाची होती. " अशा प्रकारें त्यांनीं केसरीकारांचें समर्थन केलें आहे. परंतु ' विलायती थाटाचें वळण ' व

'बाडगेपणाची लकब' या शब्दांचा अर्थ आम्हांस नीट समजला नाहीं. कारण शाळेस ज्या लेडी सुपरिंटेंडेंट म्हणून परकीय स्त्रिया लाभल्या त्यांच्या हाताखालीं शिक्षण घेतलेल्या मुलींच्यामध्यें वरील दोन्ही गोष्टी आम्हांस आढळल्या नाहींत. 'बाडगेपणा' या शब्दाची व्याख्या काय ? पूर्वी सोडावॉटर पिणें अथवा आगगाडींत फराळ करणें या साध्या गोष्टीसुद्धां बाडगेपणांत मोडत. 'बाडगेपणा'चा अर्थ अशाच प्रकारचा असल्यास हल्लींचा आमचा सारा महाराष्ट्र समाजच बाडगा आहे असें कबूल केल्यावांचून गत्यंतर नाहीं. शाळेवरील युरोपिअन अधिकारी स्त्रिया आमच्या कोणत्याहि सामाजिक रूढींच्या विरुद्ध मुलींना वागावयास सांगत नसत. उलट सोंवळ्या ओंवळ्याचे सर्व प्रकार मुलींच्या वसतिगृहांत असत. इ. स. १९२३ सालीं हायस्कूलवर टिळकचरित्रकारांनीं 'बाडगेपणाचा' शेरा मारावा याबद्दल आश्चर्य वाटतें.

या लेखमालेस उत्तर म्हणून आगरकरांनीं लेख लिहून स्वतःच्या नांवावरच 'लिहून आलेला मजकूर' या सदराखालीं प्रसिद्ध केला.

कै. आगरकर व कै. टिळक यांचे फीमेल हायस्कूलसंबंधींचे वाद येथें इतके विस्तृत देण्याचें कारण हें कीं, तत्कालीन समाजांत हायस्कूलसंबंधीं जीं रणें माजलीं त्याचा वृत्तान्त वाचकांच्या नीट ध्यानांत यावा. इ. स. १८८८ सालीं आगरकरांनीं 'सुधारक' वर्तमानपत्र काढलें. त्यामधील 'मुलांइतकीच मुलींच्या शिक्षणाची आवश्यकता', 'स्त्रियांस वरिष्ठ प्रतीचें शिक्षण द्यावें किंवा नाहीं', 'स्त्रीपुरुषांना एकच शिक्षण द्यावें व तेंहि एकत्र द्यावें'—इत्यादि निबंध स्त्रीशिक्षणाच्या दृष्टीनें वाचनीय आहेत. हे लेख तत्कालीन समाजास ज्वालामुखीच्या स्फोटाइतकेच भयंकर वाटले असतील. परंतु गतानुगतिक अशा समाजास धक्का देऊन जागृत करणारे असे आगरकरांसारखे वीर पुरुष देशोन्नतीसाठीं मधून मधून निर्माण व्हावे लागतात. असो.

प्रकरण नववें

नवी जबाबदारी

इसवी सन १८७० सालीं स्थापन झालेली ' ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन ' ही संस्था इ. स. १८८९च्या डिसेंबर महिन्यांत सरकारी शिक्षणखात्यानें सोसायटीच्या ताब्यांत दिली. सोसायटीच्या कौन्सिलमधील मंडळी विद्वान्, अनुभवी व विचारी असल्यानें बहुजनसमाजास त्यांच्याबद्दल विशेष आदर वाटे. अशा सोसायटीच्या कडक देखरेखीखालीं ट्रेनिंग कॉलेज राहिल्यास कॉलेजमध्यें अधिक मुली येतील व कॉलेजची विशेष प्रगति होईल या हेतूनेंच ही संस्था सरकारनें सोसायटीच्या स्वाधीन केली होती. अशा रीतीनें १८८९ सालीं हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज, हायस्कूलचें प्रायमरी स्कूल व ट्रेनिंग कॉलेजचें प्रॅक्टिसिंग स्कूल या चार संस्थांची जबाबदारी सोसायटीवर येऊन पडली. ट्रेनिंग कॉलेजसाठीं सोसायटीनें इमारत बांधावी असा सरकारचा विचार पडला व तो सोसायटीस मान्य होण्यासारखा नसल्यानें इमारत बांधण्याचें काम लांबणीवर पडत चाललें. बराच पत्रव्यवहार झाल्यानंतर अखेर सोसायटीच्या ताब्यांत ट्रेनिंग कॉलेज असेपर्यंत हायस्कूलच्या इमारतीचा दक्षिण भाग ट्रेनिंग कॉलेजसाठीं सोसायटीनें राखून ठेवावा असें नक्की झालें व इमारतीचें काम एकदांचें इ. स. १८९४ सालीं सुरू झालें.

ट्रेनिंग कॉलेज सोसायटीच्या देखरेखीखालीं आल्यामुळें सोसायटीची जबाबदारी दुपटीनें वाढली. परंतु स्त्रियांच्या शिक्षण-संस्थांना मदत करणें हें त्यांचें ध्येय असल्यानें सोसायटीच्या सभासदांनीं ही जबाबदारी आनंदानें स्वीकारली. कारण मुलींना उच्च शिक्षण देण्याइतकेंच, प्राथमिक शाळांकरितां उत्तम शिक्षकिणी तयार करण्याचें काम महत्त्वाचें होतें. पुढील चार अटींवरच त्यांनीं ही जबाबदारी अंगावर घेतली होती.

(१) ट्रेनिंग कॉलेजसाठीं सोसायटी पैसे खर्च करणार नाहीं. (२) हायस्कूलप्रमाणेंच मुलींना ट्रेनिंग कॉलेजमध्यें घेणें व त्यांजवर पूर्ण देखरेख ठेवणें या गोष्टी सोसायटीच्या स्वाधीन राहतील. (३) कॉलेजांतील अभ्यासक्रम, परीक्षा, तास, शिष्यवृत्त्या वगैरे गोष्टी शिक्षणखात्यानें ठरवाव्या. शिक्षकांच्या नेमणुका हायस्कूलप्रमाणेंच सरकारनें कराव्या. (४) हायस्कूल व ट्रेनिंग कॉलेज यांना पुरेशी



मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क, कौन्सिलचे सभासद व अध्यापक वर्ग इ. स. १९०८

Wagle Press, Bombay, 1

इमारत सोसायटीनें बांधावी. बांधकामास लागणाऱ्या रु. ६०,००० पैकीं सरकारनें $\frac{2}{3}$ म्हणजे रु. ४०,००० खर्च द्यावा. इ. स. १८८५ पासून सोसायटीला किबेवाड्यासाठीं महिना ४० रुपये भाडें भरावें लागत होतें व ट्रेनिंग कॉलेजसाठीं अधिक जागेची जरूरी असल्यामुळें इ. स. १८९० सालीं ९० रुपयांपर्यंत भाडें वाढलें. यासाठीं शक्य तितक्या लवकर शाळेची इमारत व्हावी म्हणून त्यांना पुष्कळ परिश्रम करावे लागले.

हायस्कूल किबेवाड्यांत असतांना सोसायटीनें एकंदर तीन बक्षिससमारंभ घडवून आणले. त्यांपैकीं पहिला बक्षिससमारंभ हल्लींचे सोसायटीचे प्रेसिडेंट श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या हस्तें हिराबागेंत साजरा झाला. दुसरा समारंभ इ. स. १८८८ मध्यें ड्यूक ऑफ कॅनॉट यांच्या हस्तें झाला. त्या प्रसंगीं मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड रे, लेडी रे, डचेस ऑफ कॅनॉट, श्री. सयाजीराव महाराज गायकवाड इत्यादि थोर थोर मंडळी हजर होती. त्याच वर्षी म्हैसूरचे महाराज, त्रावणकोरचे महाराज, भावनगरचे महाराज व त्यांचे दिवाण, गोंडाळ व वढवानचे अधिपति, सावंतवाडीच्या राणीसाहेब ताराबाईसाहेब, मिस् मॅनिंग इत्यादि मंडळींनीं हायस्कुलास भेट दिली व उदार देणग्या देऊन शाळेच्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिलें. तिसरा बक्षिससमारंभ तेव्हांचे गव्हर्नर लॉर्ड हॅरिस यांच्या हस्तें झाला.

इ. स. १८९० सालीं लेडी हॅरिस व सॅन्फ्रॅन्सिस्कोच्या मिस् हॅमलीन यांनीं शाळेस भेट दिली व शाळेविषयींचा अभिप्राय पुढील शब्दांत व्यक्त केला.

"The existence of such an institution will in future be regarded as one of the great instrumentalities by which this intellectual Hindu people is emancipating itself from its "Dark Ages" and "Coming Forth" into freedom of thought and 'true living,' as the people of the West emancipated themselves from a thousand years of superstition and error, when the Renaissance opened with the advent of Greek Scholarship into Italy in the 15th century....... One can only hope for the multiplication of such Schools throughout the country, that education may prevail among women, for 'the hand that rocks the cradle rules the world'."

इ. स. १८९२ सालीं नॅशनल इंडियन असोसिएशननें मिस् मॅनिंगच्या नांवानें दोन शिष्यवृत्त्या व एक बक्षिस शाळेसाठीं देण्याचें ठरविलें व त्याच वर्षी

श्रीमंत होळकर यांनीं रु. २५० ची देणगी पाठविली. एज्युकेशनल इन्स्पेक्टर कर्कहॅम यांचे शाळेसंबंधीं उत्तम अभिप्राय आले. अशा प्रकारें शाळेसंबंधीं जिकडून तिकडून स्तुतिपर व प्रोत्साहनपर उद्गार शेंकडों लोकांच्या तोंडून निघत असतां आकाश गढूळ होऊन वादळाचा रंग दिसूं लागला व भयंकर वादळांत हायस्कूलची इतिश्री होणार कीं काय अशा चिंतेनें सोसायटीच्या कौन्सिलचे सभासद ग्रासून गेले.

हें संकट म्हणजे १७ मे १८९२ रोजीं जाहीर झालेला सरकारचा ठराव होय. 'अहमदाबाद व सिंध या ठिकाणीं मुलींच्या शाळा काढण्याकरितां पुण्याच्या हायस्कूलची ग्रँट कमी करावी व तो पैसा दुसरीकडे खर्च करावा' असा मुंबई सरकारचा विचार नक्की झाला. इ. स. १८८५ मध्यें स्त्रियांचें ट्रेनिंग कॉलेज सोसायटीच्या ताब्यांत दिल्यामुळें दर वर्षास सरकारचे रु. ४८०० वांचत होते. तेव्हां ट्रेनिंग कॉलेज सोसायटीच्या ताब्यांत असेपर्यंत त्याच्या खर्चासाठीं रु. ४००० व हायस्कूलवर होणाऱ्या खर्चाचा निम्मा हिस्सा म्हणजे रु. ५१०३ सरकारनें सोसायटीस द्यावे अशी योजना करण्यांत आली. हायस्कुलासाठीं सरकार जी रक्कम देईल तिचा $\frac{1}{6}$ दर वर्षी कमी करून इतर शाळांप्रमाणें $\frac{1}{3}$ ग्रँटच सरकारकडून सोसायटीला देण्यांत यावी असा ठराव झाला. हा ठराव सोसायटीच्या सभासदांस मिळतांच ते अतिशय काळजींत पडले. या संकटाचें निवारण करण्यासाठीं जी उपाययोजना झाली ती सांगण्यापूर्वी सरकार व सोसायटी यांच्यामध्यें इ. स. १८९२ पूर्वी शाळेसंबंधीं जे करार झाले ते पाहणें आवश्यक आहे.

इ. स. १८८४ मध्यें सर विल्यम् वेडरबर्न इत्यादि मंडळींनीं, सरकारी शिक्षणखात्याच्या ताब्यांतील सरकारी संस्था म्हणूनच सरकारी शिक्षक ठेवून पंचवीस वर्षेपर्यंत ही संस्था चालवावी अशी विनंति मुंबई सरकारास केली होती. शाळेचा पाया भक्कम झाल्यानंतर व ज्या वेळीं याच संस्थेंत शिक्षण घेऊन तयार झालेल्या एतद्देशीय स्त्रिया लेडी सुपरिंटेंडेंट, हेड मिस्ट्रेस व शिक्षकिणी यांचीं कामें करण्यास पुढें येतील त्या वेळीं ही संस्था सरकारनें सोसायटीच्या पूर्णपणें स्वाधीन करावी अशी मागणी त्यांनीं सरकारकडे केली. त्याला पुढीलप्रमाणें सरकारचें उत्तर आलें. "जोंपर्यंत व्यवस्थापक कमिटीचें काम समाधानकारक रीतीनें चालेल तोंपर्यंत हायस्कूलची व्यवस्था सरकारकडून होईल. परंतु अमुक वर्षेपर्यंत सरकार मदत करील असा नक्की करार सरकारला करतां येत नाहीं." १८८५ मध्यें जार्डिनसाहेबांच्या

प्रयत्नानें सोसायटी स्थापन करण्याचें ठरलें. त्या वेळींहि 'हायस्कूलच्या सोसायटीचें कार्य उत्तम असेपर्यंत हायस्कूलच्या शिक्षकांस सरकारी पगार मिळेल व इतर कामांसाठीं म्हणजे इमारतीसाठीं वगैरे ठरल्याप्रमाणें ग्रँट मिळेल. कौन्सिलनें बाकी खर्चासाठीं जमविलेल्या फंडांतून व्यवस्था करावी. सोसायटीची सांपत्तिक स्थिति बरी आहे व त्यांच्याकडे शाळेची संपूर्ण व्यवस्था देण्याची वेळ आली आहे असें सरकारचें मत झालें म्हणजे इतर खाजगी प्रयत्नानें चालणाऱ्या शाळांप्रमाणें या हायस्कूलला सरकारी ग्रँट मिळेल,' असा करार झाला.

यानंतर १८८९ मध्यें ट्रेनिंग कॉलेज सोसायटीच्या देखरेखीखालीं आलें. त्या वेळीं पुनः नवीन करार करावा लागला. त्यामध्येंहि हायस्कूल तूर्त सरकारी असलें तरी कालांतरानें ग्रँट घेणाऱ्या हायस्कुलांत त्याचें रूपांतर होणार आहे हा मुद्दा पुनः एकदां सरकारनें स्पष्ट केला.

ता. १७ मे १८९२ चा ठराव व त्याचप्रमाणें ८ ऑक्टोबर १८९२ चा ठराव असे दोन्ही ठराव सोसायटीच्या कौन्सिलकडे आले. त्याप्रमाणें १६ वर्षांमध्यें म्हणजे इ. स. १९०९ मध्यें हायस्कूलची ग्रँट $\frac{1}{3}$ होणार होती. सोसायटीशीं यापूर्वी झालेल्या करारामध्यें सरकार किती वर्षेपर्यंत नक्की मदत करणार हें न ठरल्यामुळें हे करार सोसायटीच्या दृष्टीनें समाधानकारक नव्हते. ग्रँट कमी होत गेली कीं, शिक्षकांचे पगार कमी होणार, फीचें तर विशेष उत्पन्न नाहीं, दर वर्षास ७५० रु. पर्यंत तूट येणार ती कशी भरून काढावी या विचारांत मंडळी पडली. अखेर उच्च स्त्रीशिक्षणासंबंधीं लेख तयार करावा असें ठरलें व त्याप्रमाणें लेख लिहिण्याचें काम डॉ. भांडारकर यांजकडे सोपविण्यांत आलें. 'The Female Education in India–The Poona Native Girls' High School' हा लेख लिहून त्यांत थोडक्यांत त्यांनीं शाळेचा इतिहास दिला. खाजगी सोसायटीकडे शाळा इतक्या लौकर दिल्यास स्त्रीशिक्षणाच्या कार्यास मोठा धक्का बसेल असें आपलें स्पष्ट मत त्यांनीं दिलें. ते म्हणतात:—

"To those unacquainted with the all-pervading influence of Government in India as compared with the weakness of private enterprize, it may not appear that such a transfer need prove fatal. But this is not the opinion of the local friends of female education, who understand best the inner working of Native society. They consider the transfer would mean a death-blow

to the School, and irreparable injury to the cause of higher female education in Western India."

सोसायटीचें व लेडी सुपरिंटेंडेंट मिस् हर्फर्ड यांचें काम उत्कृष्ट चाललें आहे असे दरवर्षींचे शिक्षणखात्याचे अभिप्राय असतांना व ट्रेनिंग कॉलेज सोसायटीस दिल्यामुळें सुमारें ३०० पौंडांची बचत होत असतां, केवळ काटकसर करावयाची एवढ्याकरितां महाराष्ट्रांत उच्च शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या या संस्थेला, सोसायटीची इच्छा नसतां, शिक्षणखात्याकडे पूर्ण चौकशी केल्यावांचून व स्त्री-शिक्षणाच्या कार्याचें नुकसान होणार नाहीं अशी खात्री झाल्यावांचून खाजगी संस्थेचें स्वरूप देऊं नये अशी सोसायटीच्या कौन्सिलनें सरकारला विनंति केली.

या वेळीं हायस्कूलचे कैवारी व सहाय्यक सर विल्यम् वेडरबर्न विलायतेंत होते, त्यांच्याकडे हा लेख पाठविण्यांत आला. त्यांनीं त्या वेळचे सेक्रेटरी ऑफ स्टेट लॉर्ड किंबर्ले यांना उद्देशून एक मेमोरिअल तयार केलें. त्यांतील मुख्य भाग खालीं उद्धृत केला आहे.

"That your Memorialists have learned with satisfaction that upon the initiative of the Maharashtra Female Education Society, for 6 years ago, an efficient and well-conducted High School for Native Girls has been established, as a Government institution, in the City of Poona; but they are informed that the Bombay Government contemplates diminishing its contribution and reducing the School to the position of a private aided institution; a proposal which the managers of the School view with the greatest alarm.

And your Memorialists pray that, in accordance with the principles laid down by Sir C. Wood and re-asserted in convincing terms by the Education Commission, more strenuous efforts may be made and larger grants allowed for the promotion of female education in India; and further in particular, that looking to the importance of the Poona Native Girls' High School as a pioneer institution in the Deccan, and the good results obtained from its working, the support hitherto given by the Government to that institution may be continued."

या मेमोरिअलवर इंग्लंडमधील पुढील सुप्रसिद्ध स्त्रीपुरुषांच्या सह्या आहेतः— लेडी हॉब्हाउस, लेडी रिपन, मिस् फ्लॉरेन्स नाइटिंगेल, काउंटेस ऑफ ॲबरडीन, मिसेस फॉसेट, लेडी फ्रेडरिक कॅवेन्डिश, लेडी पील, लेडी मार्कबी, मिस् वर्डस्वर्थ (प्रिन्सिपॉल, लेडी मारगारेटस् कॉलेज, ऑक्सफर्ड), मिस् फॉसेट, लेडी वेडरबर्न, प्रो. मॅक्स मुलर, सर डब्ल्यु. मोनिअर विल्यम्स्, सर रिचर्ड टेंपल, सर विल्यम् हंटर, मिस् मॅनिंग, मिस्टर एस्. डिग्बि, M.P., मिस्टर दादाभाई नवरोजी, M. P., मिस्टर जस्टिस जार्डिन, बाई रखमाबाई, सर जी. बार्डवुड, सर डब्ल्यु. केन, M.P., इत्यादि इत्यादि.

ता. २३ नोव्हेंबर १८९२ रोजीं हायस्कूल फॉर नेटिव्ह गर्ल्स् तर्फेचें प्रतिनिधि-मंडळ, वरील मेमोरिअल व त्यास जोडलेला ‘Higher Female Education in India’ हा लेख देण्यासाठीं सेक्रेटरी ऑफ स्टेट लॉर्ड किंबर्ले यांस इंडिया ऑफिस-मध्यें भेटलें. त्या प्रसंगीं सर विल्यम् वेडरबर्न, सर विल्यम् हंटर, मिस्टर जस्टिस जार्डिन, दादाभाई नवरोजी यांनीं हिंदुस्थानांतील स्त्रीशिक्षणासंबंधीं व विशेषतः हायस्कूलच्या कार्यासंबंधीं उत्कृष्ट भाषणें केलीं. मिस्टर जस्टिस जार्डिन यांचा शाळेशीं प्रत्यक्ष संबंध आला असल्याकारणानें त्यांचें भाषण फार महत्त्वाचें होतें. लॉर्ड किंबर्ले यांनीं सर्व भाषणें अत्यंत सहानुभूतिपूर्वक ऐकलीं व शाळेसंबंधीं मुंबई सरकारकडे चौकशी करण्याचें व शाळेस मदत करण्याचें आश्वासन देऊन मेमोरिअल मुंबईच्या गव्हर्नरसाहेबांकडे पाठविण्याचें अभिवचन दिलें.

या मेमोरिअलमुळें इंग्लंड व हिंदुस्थान या दोन्ही देशांत खळबळ उडाली. याबद्दल लंडन टाइम्स्, दि डेली न्यूज्, Women's Herald या विलायती वर्तमान-पत्रांत व आपल्याकडील टाइम्स, क्रॉनिकल, इंदुप्रकाश इत्यादि वर्तमानपत्रांत अग्रलेख प्रसिद्ध झाले; व शाळेची ग्रँट कमी करूं नये अशी सर्वांनीं एकच घोषणा केली. याचा परिणाम जो व्हावयाचा तोच झाला; सोसायटीची भीति अस्थानीं ठरली व हें भयंकर वादळ अखेर पेल्यांतील वादळच ठरलें. यामुळें शाळेच्या उज्ज्वल भवितव्यतेबद्दल आशा करण्यास जागा झाली व स्त्रीशिक्षणाच्या एतद्देशीय व परदेशीय कैवारी स्त्रीपुरुषांना अत्यंत आनंद वाटला. या सत्कृत्याचें सर्व श्रेय सर विल्यम् वेडरबर्न यांनाच आहे. ते केवळ हायस्कूलचे संस्थापकच नव्हते तर प्राणदातेहि होते. या मेमोरिअलसंबंधीं त्यांनीं शाळेच्या लेडी सुपरिंटेंडेंट यांना लिहिलेलें पत्र वाचनीय आहे.

23rd Nov. 1892
Meredith, Gloucester

Dear Miss Hurford,

I send you a copy of the *Times* from which you see that we had a most successful deputation to Lord Kimberley. He was very cordial.

I think, this shall encourage all the supporters of the Society. Will you please give my best compliments to the Committee? It was very fortunate that Mr. Jardine was able to attend, as he was able to speak with authority as to the excellence of the management and high character and qualifications of the Committee.

Sd/ Yours Sincerely,
W. Wedderburn.

मिस्टर जस्टिस जार्डिन यांचेंहि त्याच दिवशीं लिहिलेलें पत्र मिस् हर्फर्ड यांस आलें. त्यांत ते लिहितातः—' I spoke up strongly for the School, laid stress on the high character and reputation of the managers naming and describing Justice Telang, Vice-Chancellor of the University, Prof. Bhandarkar, R. B. Shankar Pandurang Pandit and Krishnaji Laxman.

I told about the inspection of the School in 1885 and said that no better management could be devised for dealing with the numerous and delicate questions they have to settle. I spoke up for them as men of the highest position who being animated by liberal sentiments were setting a noble example."

अशा प्रकारचे वजनदार व उदार वृत्तीचे साहाय्यक लाभल्यामुळें सोसायटीचे कार्यकर्ते चिंतामुक्त झाले यांत कांहींच आश्चर्य नाहीं.

प्रकरण दहावें

पुढील इतिहास

इ. स. १८९४ सालीं सोसायटीच्या कौन्सिलचे पहिले सेक्रेटरी रा. ब. पण्डित यांजवर मृत्यूचा घाला पडला. त्यांच्यासारखा निरपेक्ष, निःस्वार्थी व हायस्कूलचा खरा हितकर्ता गेल्यामुळें सोसायटीचें अपरिमित नुकसान झालें. त्यांच्यामागून रा. ब. दाण्डेकर हे सोसायटीचे सेक्रेटरी व ट्रेझरर झाले. याच्याच आदल्या वर्षी सोसायटीचे परमनिष्ठ साहाय्यक रा. ब. नूलकर हे स्वर्गवासी झाले होते.

पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटच्या देखरेखीखालीं शाळा, वसतिगृह इत्यादि इमारती बांधण्याचें काम १८९४ सालापासून सुरू होतें तें १८९६ मध्यें संपलें व त्याच वर्षी मे महिन्याच्या पहिल्या तारखेपासून नवीन इमारतीमध्यें शाळा भरू लागली. याच वर्षी पुण्यांत पहिला प्लेग सुरू झाला. प्लेगाची सांथ हायस्कूलला बरीच जाचक झाली. इ. स. १८९७ सालीं हायस्कुलच्या संस्थापक मंडळापैकीं एक व सोसायटीच्या कौन्सिलचे उत्साही सभासद रा. ब. चिन्तामणराव भट हे प्लेगच्या सांथीस बळी पडले. यानंतर दोन वर्षांतच रा. ब. दाण्डेकर यांस मृत्यूनें गांठलें. त्यांच्या जागीं रा. ब. श्रीराम भिकाजी जटार यांची सेक्रेटरीच्या जागीं नेमणूक झाली. परंतु सेक्रेटरी झाल्यानंतर महिना दीड महिन्याच्या आंतच हे स्वर्गवासी झाले. तेव्हां शिक्षणखात्यांतील सेवानिवृत्त अधिकारी रावसाहेब सीताराम विश्वनाथ पटवर्धन यांनीं कौन्सिलच्या सेक्रेटरीचें काम पतकरलें.

इ. स. १८९४ पासून १९०० पर्यंतच्या सहा वर्षांत सोसायटीस पुढील देणग्या मिळाल्या. सोलापूरचे श्री. किर्लोस्कर वकील यांनीं आपल्या मातेच्या स्मरणार्थ शिष्यवृत्ति व बक्षीस ठेवण्यासाठीं ३५०० रुपये सोसायटीच्या स्वाधीन केले. मेजर-जनरल हिल हे कित्येक वर्षें हायस्कूलला देणगी म्हणून ३ पौंड पाठवीत असत. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नीहि शाळेची आठवण ठेवून दर वर्षास ३ पौंड पाठवीत. हायस्कूलच्या इमारतीसमोर कारंजें बांधण्यासाठीं फलटणचे चीफसाहेब श्रीमंत बापूसाहेब नाईक निंबाळकर यांनीं रु. २००० देणगी म्हणून दिले. परंतु कांहीं अडचणीमुळें कारंजें बांधलें गेलें नाहीं.

संस्थेस त्रास न व्हावा यासाठीं शाळेला अगदीं लागून असलेलें श्रीयुत कोंडो अमृत महाराव वकील यांचें घर व एका माळणीच्या दोन झोंपड्या सोसायटीस विकत घ्याव्या लागल्या.

इ. स. १९०१ सालीं सोसायटीवर दैवी आपत्ति कोसळल्या. न्या. रानडे, डॉ. विश्राम रामजी घोले, रा. ब. पी. डी. अधिकारी, रा. ब. गंगाराम भाऊ म्हस्के व रा. ब. वि. मो. भिडे असे सोसायटीचे पांच प्रमुख कार्यकर्ते या वर्षी एका मागोमाग स्वर्गवासी झाले.


इ. स. १९०० सालीं डॉ. जे. पी. वाडिया, नामदार गोपाळ कृष्ण गोखले व श्री. हरि नारायण आपटे ही मंडळी सोसायटीचे सभासद झाली. त्यापुढील वर्षांत दिवाणबहादुर श्रीनिवास राघव आयंगार, सी.आय.ई., सरदार मुदलियार, प्रो. कर्वे, रा. ब. मराठे व मिस् हर्फर्ड या सर्व मंडळींनीं सोसायटीचें सभासदत्व स्वीकारलें.

मुलींचें वसतिगृह, प्रायमरी स्कूल व मुलींना खेळण्यासाठीं प्लेशेड बांधावी असें पुष्कळ दिवस सोसायटीच्या मनांत होतें. या इमारतींसाठीं सरकारकडून ग्रँट मिळविण्याची खटपट कौन्सिलच्या सेक्रेटरींनीं सुरू केली. सरकारनें वरील इमारतींसाठीं $\frac{2}{3}$ खर्च (३०६९५ रु. ५ आ. ४ पै) देण्याचें कबूल करून पी. डब्ल्यु. डी. कडे इमारती बांधण्याचें काम सोंपविलें. नवीन इमारतींसाठीं फंड जमविण्याचें सोसायटीनें ठरविलें. १९०५ सालीं मिसेस् मॅकेन्झि व इतर स्त्रिया यांनीं मुलींचे खेळ करून पैसा जमविला व इमारतफंडास देणगी म्हणून दिला. या इमारती १९०७ सालीं बांधून पूर्ण झाल्या.

याच वर्षापासून डॉ. वाडिया हे वसतिगृहाचे डॉक्टर या नात्यानें शाळेची व्यवस्था पाहूं लागले. मुलींच्याकडून फी वगैरे बिलकूल न घेतां ते मुलींना औषधोपचार करीत. निरपेक्ष बुद्धीनें हें कार्य त्यांनीं कित्येक वर्षे केलें.

इ. स. १९१० सालीं सरकार व सोसायटी यांच्यामध्यें हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज व प्रॅक्टिसिंग स्कूल या तिन्ही संस्थांच्या व्यवस्थेसंबंधीं नवा करार झाला. त्यामध्यें इ. स. १८९७ सालीं झालेल्या करारांतील सर्व मुद्दे असून शिवाय दोन तीन कलमें नवीं होतीं. सरकारची इच्छा असेल तोंपर्यंत सरकार लेडी सुपरिन्टेन्डेन्ट, शिक्षक व शिक्षकिणी यांचे पगार देईल; तथापि सोसायटीनें आपला फंड शक्य तितका वाढविण्याचा प्रयत्न करावा; हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज व प्रॅक्टिसिंग स्कूल या

१


२



१. इंग्रजी दुसरी व तिसरी – विद्यार्थिनी २. इंग्रजी पहिली – विद्यार्थिनी

Wagle Press, Bombay, 1

१



२




१. इंग्रजी चवथी व पांचवीच्या विद्यार्थिनी

२. इंग्रजी सहावी व सातवीच्या विद्यार्थिनी

Wagle Press, Bombay, 1

हायस्कूल फॉर इन्डियन् गर्ल्स्, प्रायमरी स्कूल



विद्यार्थी – विद्यार्थिनी

Wagle Press, Bombay. 1

स्वतंत्र संस्था मानाव्या; त्याचप्रमाणें सोसायटीच्या नियमांतील १५ व्या कलमाप्रमाणें खर्च करण्याचा प्रसंग आल्यास सोसायटीनें हायस्कूलची स्थिती उत्तम आहे अशी खात्री असल्याखेरीज दुसरीकडे पैसा खर्च करूं नये, कारण हायस्कूलची व्यवस्था उत्कृष्ट रीतीनें करणें हेंच तिचें प्रथम कर्तव्य आहे; सरकारशीं झालेल्या करारांतील अटींच्या बरहुकूम सोसायटीनें शाळेची व्यवस्था पाहावी, इत्यादि मुद्दे त्या करारामध्यें आहेत.

इ. स. १९११ सालीं सोसायटीनें हायस्कूलचा रौप्य-महोत्सव घडवून आणला. त्या प्रसंगीं मुंबई इलाख्याचे गव्हर्नरसाहेब सर जॉर्ज क्लार्क यांनीं अध्यक्षस्थान मंडित केलें होतें. शाळेंतील सर्व मुलींना बक्षिसें व खाऊ वांटण्यांत आला. तत्कालीन विद्यार्थिनी त्या उत्सवाचें स्मरण अद्यापपर्यंत करीत असतात.

यानंतर दोन वर्षांच्या आंतच ज्यांनीं रौप्यमहोत्सवासाठीं अत्यंत परिश्रम केले होते त्या मिस् भोर –लेडी सुपरिंटेन्डेन्ट–विलायतेमध्यें स्वर्गवासी झाल्या व त्यांच्या जागीं मिस् एम्. न्यूलंड यांची नेमणूक झाली.

इ. स. १९१३ सालीं सोसायटीनें कुंट्यांचा वाडा विकत घेतला, कारण तो शाळेला लागून असल्याकारणानें तेथें राहणाऱ्या मंडळीकडून शाळेला उपद्रव होत असे. सायन्सच्या उपकरणांसाठीं सोसायटीनें याच वर्षी ३००० रुपयांची मंजुरी दिली.

ट्रेनिंग कॉलेज हायस्कूलच्या इमारतींत असल्यानें हायस्कूलच्या प्रगतीस वावच राहिला नाहीं. दर वर्षी शाळेंत जागा नाहीं या सबबीवर अनेक मुलींचे अर्ज नाकारावे लागत. ही गोष्ट सोसायटीनें सरकारच्या कानांवर घातली. त्या वेळीं ट्रेनिंग कॉलेज व हायस्कूल या संस्था वेगळ्या केल्यावांचून या प्रश्नाचा निकाल लागणार नाहीं असें सरकारकडून उत्तर आलें.

या वर्षांची विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे लेडी विलिंग्डन् यांनीं शाळेला दिलेली भेट ही होय. इ. स. १९१६ च्या जानेवारीमध्यें हायस्कूल व ट्रेनिंग कॉलेज या दोन संस्था वेगळ्या करण्याचा सरकारी खात्याचा हुकूम झाला. परंतु जून महिन्यापर्यंत ट्रेनिंग कॉलेज हायस्कूलच्या इमारतीमध्येंच होतें. ट्रेनिंग कॉलेजांतील मुलींचें वसतिगृह, स्वयंपाकाची व भोजनाची जागा यांची वेगळी व्यवस्था करण्यांत आली. जून महिन्याच्या ६ तारखेस ट्रेनिंग कॉलेज लष्करमध्यें गेलें व तेव्हांपासून हायस्कुलांतील मुलींची संख्या उत्तरोत्तर वाढत गेली.

इ. स. १९१७ सालीं शिक्षणखात्याच्या हुकुमाप्रमाणें सोसायटीच्या व शाळेच्या नांवांमध्यें थोडा बदल करण्यांत आला. तेव्हांपासून सोसायटीचें ' महाराष्ट्र गर्ल्स् एज्युकेशन सोसायटी ' व शाळेचें ' हायस्कूल फॉर इण्डियन् गर्ल्स् ' असें नामान्तर झालें.

या वर्षी १६ वर्षेपर्यंत सतत ज्यांनीं सेक्रेटरी या नात्यानें शाळेवर देखरेख ठेविली ते रा. ब. पटवर्धन स्वर्गवासी झाले व त्यांच्या जागीं शिक्षणखात्यांतील सेवानिवृत्त अधिकारी रा. ब. गोडबोले यांची नेमणूक झाली.

इ. स. १९१९ सालीं सोसायटीचे हितचिंतक श्री. आठवले यांनीं आपल्या बंधूंच्या स्मरणार्थ शिष्यवृत्ति ठेवण्यासाठीं व दक्षिण हैद्राबाद येथील सुप्रसिद्ध डॉक्टर श्री. जी. के. किर्लोस्कर यांनीं मुलींच्या ग्रंथालयाकरतां फर्निचर विकत घेण्यासाठीं म्हणून उदार देणग्या दिल्या.

रावबहादूर गोडबोले यांच्या मृत्यूनें रिकाम्या झालेल्या जागेवर बॅरिस्टर गाडगीळ यांची १९२१ सालीं सेक्रेटरी म्हणून नेमणूक झाली. परंतु धंद्यानिमित्त व इतर अनेक कार्यांमुळें त्यांना फुरसत होत नसल्यानें सोसायटीचे सभासद प्रोफेसर नारायण सखाराम पानसे यांची १९२४ सालीं सेक्रेटरी म्हणून योजना झाली व प्रोफेसर गणेश हरी केळकर हे जॉइंट सेक्रेटरी झाले.

ता. ७ सप्टेंबर १९२२ रोजीं रौप्यमहोत्सवाच्यानंतर बरोबर अकरा वर्षांनीं मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज लॉइड यांच्या हस्तें शाळेचा बक्षिससमारंभ साजरा झाला. गव्हर्नरसाहेबांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत Domestic Science व Physical Training या दोन गोष्टींवर विशेष जोर दिला व मुलींच्या शाळेंतील अभ्यासक्रमांत या दोन विषयांचा अंतर्भाव करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली.

इ. स. १९२५ सालीं सोसायटीचे व्हाइस-प्रेसिडेंट व कौन्सिलचे चेअरमन डॉ.भाण्डारकर हे स्वर्गवासी झाले. त्यांच्या जागीं दिवाणबहादूर काशीनाथ रामचंद्र गोडबोल यांची सोसायटीनें निवड केली व हेच हल्लींचे व्हाइस-प्रेसिडेंट व कौन्सिलचे चेअरमन आहेत. पुण्यांतील सर्व सार्वजनिक संस्थांशीं त्यांचा निकट संबंध आहे. असो.

दर वर्षी शाळेंतील विद्यार्थिनींची संख्या वाढत चालली व अनेक मुलींना जागेच्या अभावीं शाळेंत प्रवेश मिळेनासा झाला. यासाठीं विश्रामबाग वाड्याची मागणी सोसायटीनें सरकारजवळ केली. विश्रामबागवाडा सरकारकडून मिळाल्यास

वर्गणी जमवून मुंबई विश्वविद्यालयास जोडून मुलींचें आर्टस् कॉलेज स्थापन करण्याची सदिच्छा कौन्सिलनें व्यक्त केली.

१९२३च्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यानुसार सोसायटीनें प्रायमरी स्कूल पूर्णपणें आपल्या ताब्यांत घ्यावें असें सरकारी शिक्षणखात्यानें कळविलें. ही गोष्ट सोसायटीला पसंत असली तरी त्यांनीं प्रायमरी स्कूलच्या शिक्षक वर्गाच्या पगारासाठीं सरकारकडे ठराविक ग्रँटची मागणी केली.

१९२६च्या मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेंत शाळेंतील विद्यार्थिनी कुमारी वेणुबाई अभ्यंकर यांनीं सर्व मुलामुलींमध्यें पहिला नंबर मिळवून अपूर्व यश संपादन केलें. कामा स्कॉलर्शिप, परमानंद प्राइझ, चॅटफिल्ड प्राइझ इत्यादि अनेक बक्षिसें त्यांनीं मिळविलीं. सोसायटीच्या कौन्सिलनें त्यांचा जाहीर सन्मान करून कौन्सिलचे चेअरमन दिवाणबहादूर गोडबोले यांच्या हस्तें त्यांना एक सोन्याचें वज्याळ बक्षीस दिलें.

इ. स. १९२८ सालीं शाळेच्या लोकप्रिय लेडी सुपरिंटेन्डेन्ट मिस् फील्डिंग या सेवानिवृत्त झाल्या. त्यांनीं केलेल्या उत्कृष्ट कार्याचें अभिनंदन करण्यासाठीं व त्यांना निरोप देण्यासाठीं सोसायटीनें त्यांना उद्यानोपहार दिला.

इ. स. १९१९ सालीं प्रो. पानसे यांनीं प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें सेक्रेटरीच्या जागेचा राजीनामा दिला. त्यांच्या जागीं शिक्षणखात्यांतील सेवानिवृत्त अधिकारी रा. ब. कृ. ग. जोशी, बी.ए., आय.इ.एस्., यांची कौन्सिलनें नेमणूक केली. हल्लीं रा. ब. जोशी हे सेक्रेटरी असून रावसाहेब दीक्षित हे जॉइंट सेक्रेटरी आहेत. दोघेहि अनुभवी शिक्षणशास्त्रज्ञ असल्यामुळें त्यांच्या देखरेखीखालीं शाळेची उत्तरोत्तर झपाट्यानें प्रगति होत आहे.

मिस् फील्डिंग यांच्यानंतर मिस् एम्. जे. वाडिया या हायस्कूलच्या लेडी सुपरिंटेन्डेन्ट झाल्या. त्या आल्या त्याच वर्षी शाळेच्या मुख्य इमारतीच्या दक्षिण भागावर एक मजला चढवून सोसायटीनें सायन्ससाठीं एका भव्य प्रयोगशाळेची व एका वर्गाची तजवीज केली. त्याप्रीत्यर्थ सोसायटीस सुमारें पंधरा हजार रुपये खर्च करावे लागले. परंतु कित्येक वर्षेंपर्यंत स्वतंत्र प्रयोगशाळेची जरूर भासत होती ती पूर्ण झाल्याबद्दल सर्वांस फार आनंद वाटला.

विश्रामबाग वाडा सरकारकडून समाधानकारक अटींवर मिळणें अशक्य झाल्यामुळें सोसायटीची फार निराशा झाली. सरकारनें त्यामध्यें दोन चार संस्थांची

सोय करण्याचा विचार चालविला होता. त्यांतील थोडा भाग हायस्कूलकरितां घेणें कौन्सिलला गैरसोयीचें वाटलें.

इ. स. १९३० च्या अखेर मिस् वाडिया यांची इन्स्पेक्ट्रेसच्या जागेवर नेमणूक झाली. त्यांच्या जागीं ठाण्याच्या मिड्ल् स्कूलच्या ले. सुपरिन्टेन्डेन्ट मिसेस् मोझेस यांची सरकारी शिक्षणखात्यानें नेमणूक केली.

इ. स. १९३०च्या जून महिन्यांत प्रो. केळकर यांनीं प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें कौन्सिलमधील जागेचा राजिनामा दिला. हॉस्टेलची व्यवस्था पाहण्यास कौन्सिलनें मिसेस् बेव्रूर व मिसेस् जटार यांची Lady Visitors म्हणून नेमणूक केली.

सर महादेव भा. चौबळ यांनीं प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें सभासदत्वाचा राजीनामा दिला. त्यांच्या अनुभवी व मुत्सद्दी सल्ल्यास मुकल्यामुळें कौन्सिलचें नुकसान झालें. १९३१ साल हें सोसायटीच्या इतिहासांतील महत्त्वाच्या क्रान्तीचें वर्ष होय. सरकारची आर्थिक परिस्थिति खालावल्यामुळें हायस्कूलवर होणारा सुमारें ४५००० रुपयांचा खर्च सरकारला भारी वाटूं लागला व तो कमी करण्यासंबंधीं बरेच दिवस सोसायटीचा व सरकारचा पत्रव्यवहार सुरू झाला. हायस्कूल व प्रायमरी स्कूल यांच्या खर्चासाठीं सरकारकडून मिळणारी रक्कम कमी होऊं नये म्हणून सोसायटीच्या कौन्सिलनें पराकाष्ठा केली. परंतु अखेर बदललेली परिस्थिति लक्षांत घेऊन सोसायटीला सरकारच्या म्हणण्यास मान द्यावा लागला. इ. स. १९१० सालानंतरचा सोसायटी व सरकार यांमधील हा पहिला करार होय. त्यांतील महत्त्वाचीं कलमें पुढीलप्रमाणें आहेतः —

(१) १ सप्टेंबर १९३१ पासून ८ नोव्हेंबर १९१०चा करार रद्द समजण्यांत यावा.

(२) सरकारनें शिक्षकांच्या पगारासाठीं दरवर्षी रु. ३०,००० द्यावे. ही सर्व रक्कम शिक्षकांच्या पगारावरच सोसायटीनें खर्च केली पाहिजे.

(३) हा करार १ सप्टेंबर १९३१ पासून ३१ मार्च १९३७ पर्यंतचा समजावा. या पांच वर्षांच्या अवधींत जो अनुभव येईल त्याच्या अनुरोधानें नवीन करार करण्यांत यावा.

(४) सध्यां शाळेंत असलेल्या सरकारी शिक्षकांचा पगार सरकारी नियमांप्रमाणें सोसायटीनें द्यावा. सोसायटीच्या अनुमतीनें सरकारी शिक्षकांची सोय दुसरीकडे करण्यांत येईल.

सोसायटीची नवी योजना

वरील कलमांवरून सोसायटीचें कौन्सिल व सेक्रेटरी यांजवर पडलेल्या जबाबदारीचें स्वरूप वाचकांच्या ध्यानीं येईल. इ. स. १८९२ सालीं जी आपत्ति सोसायटीवर कोसळूं पहात होती ती १९३१ सालीं मात्र खरोखरच कोसळली. या व्यवस्थेमुळें सोसायटीला दर वर्षाला १५००० रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. शाळेंतील मुलींची फी वाढवून व शिक्षकांचे पगार कमी करून हा तोटा थोडाफार भरून काढण्याचा प्रयत्न चालू आहे.

शिक्षकांच्या पगारांची योजना तूर्त पुढीलप्रमाणें ठरविली आहे.

		जागा
(अ) ले. सुपरिन्टेन्डेन्ट	रु. २५० (प्रारंभीं)	१
(ब) स्पेशल जागा	रु. १५०–१०–२००	२
(क) सीनिअर स्केल	रु. ८०–५–१०० वार १०–१५०	१०
(ड) ज्यूनिअर स्केल	रु. ५०–५–७५	१३

असो. शाळा सोसायटीच्या ताब्यांत आल्यापासून शाळेच्या अंतर्व्यवस्थेंत कांहींच फरक पडला नसून उलट शाळेचें काम जोरांत सुरू आहे. बालिकावस्तु-भांडार व Extension Classes हे दोन नवीन उपक्रम सोसायटीनें सुरू केले आहेत. २२ मार्च १९३३ रोजीं सोसायटीचे सन्मान्य प्रेसिडेंट श्रीमंत सयाजीरावमहाराज गायकवाड यांनीं श्रीमंत युवराजसाहेब, श्रीमंत सौ. महाराणीसाहेब यांच्यासह शाळेस भेट देऊन शाळेच्या चालकांना उपकृत केलें. महाराजांच्या सन्मानार्थ प्रेशेडमध्यें समारंभ झाला. दिवाणबहादूर गोडबोले यांनीं महाराजांच्या स्वागतपर भाषण केल्यानंतर उत्तरादाखल महाराजांचें सुमारें पाऊण तासपर्यंत भाषण झालें. सोसायटीच्या उत्कृष्ट कार्याबद्दल तिचें अभिनंदन करून Extension Classesबद्दल महाराजांनीं सहानुभूति व्यक्त केली.

गेल्या वर्षांत शाळेचे तीन हितचिंतक स्वर्गवासी झाले. ते म्हणजे सर महादेव भा. चौबळ, प्रो. पानसे व मिसेस मोझेस हे होत. सर महादेव हे सोसायटीच्या कौन्सिलचे १२ वर्षे सभासद असून चार वर्षे चेअरमनहि होते. त्यांच्यासारखा वजनदार, अनुभवी सल्लागार व शाळेचा हितचिंतक निवर्तल्यामुळें सध्यांच्या नाजूक परिस्थितींत कौन्सिलमधील त्यांचा अभाव सर्वांनाच विशेष जाणवत आहे. पुण्यांतील अनेक सार्वजनिक संस्थांशीं त्यांचा निकट संबंध होता. त्यांच्या मागोमाग दोन चार महिन्यांतच त्यांचे सहाध्यायी व परम स्नेही

प्रो. पानसे यांनींहि परलोकीं प्रयाण केलें. प्रो. पानसे हे अकरा वर्षे सोसायटीचे सभासद असून सुमारें पांच वर्षे कौन्सिलचे सेक्रेटरी होते. हायस्कूलला जोडून आर्ट्स् कॉलेज स्थापन व्हावें यासाठीं त्यांनीं बरीच खटपट केली.

१ ऑगस्ट १९३३ रोजीं Extension Class चा उद्घाटनसमारंभ झाला. त्यासंबंधीं विशेष माहिती पुढील प्रकरणीं देण्यांत येईल. कॉलेज-विद्यार्थिनींच्यासाठीं Domestic Science चा कोर्स दिवाळी अगर मे महिन्यांत सुरू करण्याचा कौन्सिलचा विचार आहे.

हायस्कूल व प्रायमरी स्कूल यांची भवितव्यता ठरविण्याची जबाबदारी सर्वस्वीं सोसायटीवर येऊन पडली आहे. ती पार पाडण्यासाठीं कौन्सिलचे सभासद व सेक्रेटरी सतत प्रयत्न करीत आहेत. ' महाराष्ट्र गर्ल्स् एज्युकेशन सोसायटी ' हें नांव सार्थ करण्यासाठीं सोसायटीचें कार्यक्षेत्र विस्तृत करण्याचा कौन्सिलचा विचार आहे. यासंबंधीं विचारविनिमय करण्यासाठीं डॉ. परांजपे, श्री. जटार, सी.आय.इ., श्री. घारपुरे, आय्.सी.एस्. (रि.), व रा. ब. जोशी या चार मंडळींची कमिटी कौन्सिलनें १९३२ च्या एप्रिल महिन्यांत नेमिली. मुलींचें स्वतंत्र आर्ट्स् कॉलेज स्थापन करण्याचा प्रयत्न सद्यःस्थितींत अयशस्वी होईल असें या कमिटीचें मत पडलें. Extension Class सुरू करावा व त्याचप्रमाणें सोलापूर व धुळें येथें सोसायटीचीं हायस्कुलें स्थापन करावीं असा कमिटीनें अभिप्राय दिला.

इ. स. १९३३ सालीं शाळेच्या लेडी सुपरिन्टेन्डेन्टसाठीं सोसायटीनें नवीन जागा बांधली. चित्रकलामन्दिर, ग्रंथालय यांसाठीं स्वतंत्र इमारती बांधण्याची सोसायटीस जरूरी भासत आहे. घराहून शाळेला येणाऱ्या मुलींना दुपारच्या सुट्टींत फराळ करण्यास जागा नसल्यानें त्यांना फार गैरसोय सोसावी लागते. ती दूर करण्याचा सोसायटीचा विचार आहे. शाळेंतील मुलींची संख्या दर वर्षी एकसारखी वाढत असल्यानें पूर्वीं केवळ अडीचशें मुलींना पुरणारें सभागृह ९५० मुलींना पुरेसें नसल्यामुळें वार्षिक बक्षिससमारंभ, सभा वगैरे कार्यक्रमांस निरुपयोगी झालें आहे. त्यामुळें सुमारें एक हजार मंडळी तरी निदान मावतील एवढें मोठें विशाल सभागृह बांधल्यावांचून ही वेळोवेळीं भासणारी गैरसोय दूर होणार नाहीं. परंतु हीं सर्व कार्यें केवळ पैशावर अवलंबून आहेत. " सर्व सोंगें साधतात, परंतु पैशाचें साधत नाहीं " ही म्हण अक्षरशः खरी आहे. दर वर्षास सरकारी ग्रँट कमी झाल्यामुळें १५००० रु. तूट पडत असल्यानें वरील आवश्यक गरजा भागविण्यास सोसायटी

असमर्थ आहे. तेव्हां महाराष्ट्रांतील धनिकांनीं सहाय्य केल्यावांचून वरील गोष्टी अस्तित्वांत येणें अशक्य झालें आहे. हायस्कूलची स्थापना हिंदुस्थानांतील संस्थानाधिपती व धनिक स्त्रीपुरुष यांच्या उदार सहाय्यामुळेंच झाली. शाळेच्या प्रथम दिवशीं १८ मुली हजर होत्या. पन्नासाव्या वर्षी हायस्कूल व प्रायमरी स्कूल मिळून सोसायटीच्या संस्थेंत एकंदर ९४६ मुली आहेत. यावरून सोसायटीच्या कौन्सिलचे सभासद व सेक्रेटरी यांनीं शाळेची उज्ज्वल परंपरा राखण्यासाठीं जे अविरत प्रयत्न चालविले आहेत त्यांची वाचकांना कांहींशी कल्पना येईल. हायस्कूलचें वसतिगृह ही महाराष्ट्रांतील एक नमुनेदार संस्था आहे. महाराष्ट्रीय व परप्रांतीय मुलींचा शारीरिक व बौद्धिक विकास करणारी ही उत्कृष्ट संस्था ज्या सोसायटीनें आज पन्नास वर्षेपर्यंत अनेक संकटांशीं झगडून चालविली तीबद्दल कृतज्ञता दाखविणें हें अखिल महाराष्ट्राचें पवित्र कर्तव्य होय.

प्रकरण अकरावें

प्रगति १८८४ ते १९००

मिस् हर्फर्ड

मिस् हर्फर्ड या हायस्कूलच्या पहिल्या लेडी सुपरिंटेंडेंट होत. प्रथमतः त्या झनाना मिशनच्या तर्फे इंग्लंडहून कलकत्त्यास आल्या. कलकत्त्यास कांहीं काल बेथ्यून कॉलेजमध्यें काम केल्यामुळें हिंदी मुलींच्या शाळेचा त्यांस अनुभव आला. पुढें कलकत्ता सोडून पुण्यांतील वान्टेजसिस्टर्सच्या वतीनें झनाना मिशनचें कार्य करण्यास त्या तेथें आल्या. हें काम करीत असतां आर्यमहिला समाजांतील श्रीमती रमाबाईसाहेब रानडे, मिसेस् भाण्डारकर, मिसेस् भट, मिसेस् भिडे इत्यादि स्त्रियांचा व त्यांचा परिचय झाला. त्या घरोघरीं जाऊन अनेक स्त्रियांना इंग्लिश शिकवीत. पुण्यांत मुलींचें हायस्कूल स्थापन करण्याचें ठरलें तेव्हां लेडी सुपरिंटेंडेंट कोणास नेमावें असा प्रश्न संस्थापकांच्या पुढें येऊन पडला. त्या वेळीं मिस हर्फर्ड यांची शिकविण्याची हातोटी, सहानुभूति, शिस्त व सौजन्य इत्यादि गुणांचा प्रत्यक्ष अनुभव आल्यामुळें आर्यमहिला समाजाच्या सभासद भगिनींनीं मिस हर्फर्ड यांचें नांव सुचविलें व तें संस्थापक मंडळासहि पसंत पडलें व त्याप्रमाणें लेडी सुपरिंटेंडेंटच्या जागेवर त्यांची नेमणूक झाली.

हुजुरपागा हायस्कूलनें घेतल्यापासून, शाळेच्या मुख्य दरवाजावर जी माडी आहे तेथें त्या राहत. त्यामुळें वसतिगृहांतील मुलींच्यावर त्यांची रात्रंदिवस सक्त देखरेख राही.

मिस् हर्फर्ड यांचा बांधा लहान होता. त्यांचें वयहि त्या वेळीं बरेंच होतें. तोंडावर सुरकुत्या पडलेल्या होत्या तरी त्यांचे डोळे तेजस्वी दिसत. त्यांच्याकडे पाहतांच त्या शांत व प्रेमळ असाव्यात असें वाटे. त्या जितक्या प्रेमळ तितक्याच कडक असत. त्यामुळें सर्व मुलींच्यावर त्यांचा विशेष दरारा असे. मुलींनीं वर्गात त्याचप्रमाणें वसतिगृहांतील खोल्यांमध्यें प्रत्येक वस्तु जागच्याजागीं टापटिपीनें ठेविलीच पाहिजे असा त्यांचा सक्त कायदा असे. जी मुलगी अव्यवस्थितपणें वागेल तिला शासन झाल्यावांचून राहत नसे.

हायस्कूलची पहिली विद्यार्थिनी



कै. श्री. आवडीबाई भिडे



मिस् हर्फर्ड, पहिल्या लेडी सुपरिंटेंडेंट–इ. स. १८८४ ते १९००

Wagle Press, Bombay, 1

आरंभीं वसतिगृहांतील मुलींना राहण्यास हल्लींसारखी चांगली हवाशीर व सोइस्कर जागा नव्हती. शाळेंत शिरल्यावर उजव्या बाजूला ज्या लहान लहान खोल्या आहेत तेथें मुलींना रहावें लागे. या खोल्या म्हणजे पूर्वीचे तबेले होते. ते दुरुस्त करून मुलींना राहण्यासाठीं जागा तयार केली होती. परंतु अशा रीतीनें राहण्याची जागा सुंदर नव्हती तरी वसतिगृहांतील मुलींना घरच्याप्रमाणें वाटावें यासाठीं मिस् हर्फर्ड फार प्रयत्न करीत. त्यांची घोड्याची गाडी असे. तीमध्यें बसून त्या एकट्याच फिरावयास कधींहि जात नसत. वसतिगृहांतील मुलींना आळीपाळीनें सायंकाळच्या वेळीं त्या बाहेर घेऊन जात. मुलींच्यासंबंधीं त्यांच्या अंतःकरणांत पराकाष्ठेची कळकळ व प्रेम वसत असे. त्यामुळें सर्व मुली त्यांना ' आई '—Mother—या नांवानें हांक मारीत व त्याहि मुलींशीं खरोखरीच मातेप्रमाणें अत्यंत प्रेमानें वागत.

वसतिगृहांतील मुली आजारी पडल्या तर त्या मुलींची मिस् हर्फर्ड जातीनें शुश्रूषा करीत. एकदां भीमा मोरे नांवाची एक मुलगी विषमज्वरानें आजारी पडली. मिस् हर्फर्डनीं रात्रंदिवस कष्ट करून तिची शुश्रूषा करुन मृत्यूच्या दाढेंतून तिला ओढून काढलें. देवीसारख्या सांसर्गिक रोगासहि त्या भीत नसत. एकदां एक मुलगी देवीनें आजारी असतां मिस् हर्फर्डनीं स्वतःचा जीव धोक्यांत घालून तिची शुश्रूषा केली. अशीच एक मुलगी विषमानें आजारी पडली. परंतु दुसऱ्या मुली फार आजारी असल्यानें त्यांनीं तिला तिच्या घरीं पाठविलें. परंतु तिला जरा बरें वाटूं लागतांच हवाबदल करण्यासाठीं त्यांनीं तिला पुनः बोलावून घेतलें व आईपेक्षांहि अधिक प्रेमानें तिची व्यवस्था ठेवून सहा महिनेपर्यंत काळजी घेतली. आजारी मुलींना सुंदर फुलें व बक्षिसें देऊन त्या शक्य तितकें त्यांचें मन प्रसन्न ठेविण्याचा प्रयत्न करीत. बागेमध्यें राखून ठेवलेलीं फुलें व शाळेंतील लहान मुलें यांच्यावर त्यांचा विशेष जीव असे. बागेंतील फुलें लहान मुली तोडूं लागल्या कीं, त्यांच्या पाठीला मिस् हर्फर्डच्या हातचा लहानसा धम्मकलाडू मिळायचाच. लहान मुलींनीं खोड्या केल्या तर आरडाओरड करून त्या त्यांना केव्हांच धमकी देत नसत. मात्र आपल्या दोन चिमुकल्या हातांनीं मुलींच्या हातावर फटफट मारीत. मुलींना मुळींच लागत नसे. तरीहि आपण मुलींना फार मोठी शिक्षा करीत आहोंत असें त्यांना वाटे.

मिस् हर्फर्डचा पोषाख अत्यंत साधा असे. काळ्या खणाचें Apron स्वतः शिवून त्या वापरीत असत. त्या एका हातांत एक सोन्याची पाटली व बोटांत

हिऱ्याची अंगठी घालीत. हिंदु स्त्रियांच्याप्रमाणें केंस विंचरून त्या मध्यें सरळ भांग पाडीत व दोन लहानश्या वेण्या घालून एकींत एक गुंतवून टाकीत. बाहेर जातांना त्या नेहमीं काळ्या रंगाची बॉनेट (Bonnet) घालीत. त्यांच्याकडे पाहतांच मुली व शिक्षक यांस त्यांच्याबद्दल आदरयुक्त दरारा वाटत असे.

शाळेंत शिरल्याबरोबर उजव्या बाजूस लहान लहान खोल्यांची एक लांबच लांब ओळ आहे, तेथे पूर्वी ज्यू व ख्रिश्चन मुलींचें बोर्डिंग असे. त्याच्या पलीकडे कांहीं खोल्या असून शिवाय एक आडवें दालन होतें; त्यामध्यें हिंदु मुलींच्या स्वयंपाकघराची व जेवणघराची व्यवस्था केलेली होती. या खोल्यांसमोरच आणखी एक चाळीसारखी अशी इमारत होती, तेथें हिंदु मुलींच्या झोंपण्याची सोय केलेली होती.

हल्लींच्या बदामबागेपर्यंतच त्या वेळीं मुलींना वावरण्याजोगी मोकळी जागा होती. त्याच्या पलीकडे मोठमोठीं चिंचेचीं व पपयांचीं झाडें असून जिकडे तिकडे रान पसरलें होतें. त्या भागामध्यें पावसाळ्याच्या दिवसांत कमरेइतकें गवत वाढत असे. मागील आवारांत एक मोठी विहीर असून तीजवळ एक मोठें चिंचेचें झाड होतें. सायंकाळच्या वेळीं मागची बाजू एकंदरीनें भयाण वाटे. रात्रींच्या वेळीं खोलीच्या बाहेर पडण्यास मुली फार भीत असत. यामुळेंच भुताखेतांच्याबद्दलच्या दंतकथा आतांपर्यंत परंपरेनें चालत आल्या आहेत. तत्कालीन विद्यार्थिनी त्या वेळच्या चमत्कारीक गोष्टी अद्यापपर्यंत सांगतात. असो.

वसतिगृहांतील मुलींचे करमणुकीचे खेळ म्हणजे फेर धरणें, फुगड्या, झिम्मा, खो खो, आट्यापाट्या इत्यादि असत. मिस् हर्फर्ड दोरीवरच्या उड्या व कांहीं इंग्लिश खेळहि शिकवीत असत. राजाराणी हा बोर्डिंगमधील मुलींचा विशेष आवडीचा खेळ असे. बोर्डिंगमध्यें कोणी नवी मुलगी आली कीं तिच्या स्वागतार्थ शनिवारच्या सुटीच्या दिवशीं मुली हा खेळ खेळत. शनिवारीं सकाळीं ८॥ ते १०॥ पर्यंत शाळा असे व त्या दोन तासांत मुली फक्त शिवणकाम करीत. त्यामुळें खेळ वगैरे करण्यास हा दिवस विशेष सोयीचा असे. दोन खुर्च्या एकमेकींपासून थोड्या अंतरावर मांडून त्यांवर चादर घालीत. त्या खुर्च्यांवर राजा-राणींचीं सोंगें घेऊन दोन मुली बसत. नंतर नवीन मुलीला मोठ्या सन्मानानें राजाराणींच्यामध्यें बसविण्यांत येई. ती मुलगी बसते न बसते तोंच राजा-राणी खुर्च्यांवरून चटकन् उठत. अर्थात् ती बिचारी नवी मुलगी दोन खुर्च्यांमध्यें अडकल्याबरोबर एकच हंशा

पिके. एकदां बोर्डिंगमधील मुलींनीं Blue Beard या नाटकाचा बोर्डिंगमध्यें प्रयोग केला. प्रयोग पाहण्यास फक्त शिक्षक व शाळेंतील मुली यांनाच बोलाविलें होतें. त्या वेळीं एका मुलीनें प्रथम पुरुषाचा पोषाख करून आपलें काम केलें. तें काम इतकें उत्कृष्ट वठलें कीं कोणी मुलगाच तें काम करीत आहे असा प्रेक्षकांना क्षणमात्र भास झाला.

दर महिन्याचा पहिला शनिवार म्हणजे बोर्डिंगच्या मुलींचा विशेष आनंदाचा दिवस असे. कारण त्या दिवशीं सायंकाळीं मिस् हर्फर्ड फिरून येतांना पेपरमिंट, चॉकोलेट वगैरे कांहीं तरी खाऊ आणीत व बोर्डिंगमधील लहान मुलींना वाटीत.

मिस् हर्फर्ड यांच्या प्रेमळ व शिस्तीच्या देखरेखीखालीं वसतिगृहांतील मुलींचें आयुष्य सुखांत व आनंदांत जात असे. त्या वेळीं ट्रेनिंग कॉलेज हुजुरपागे-मध्यें असल्यामुळें बोर्डिंगमध्यें ट्रेनिंग कॉलेजच्या मुलींचा विशेष भरणा असे. त्या वयानें मोठ्या असत. त्यामुळें बोर्डिंगमधील लहान मुलींची व्यवस्था पाहण्याचें काम त्याच करीत. एकेका मोठ्या मुलीच्या ताब्यांत एकेक लहान मुलगी असे. अशा प्रकारें ट्रेनिंगच्या मुली बहिणींप्रमाणें लहान मुलींची काळजी घेत. बोर्डिंगमधील मुलींच्यामध्यें उच्च दर्जाचा एकोपा व प्रेमभाव वसत असे. तान्हीबाई जाधव या त्या वेळीं वरच्या वर्गांत शिकत असत. त्यांची आई पुष्कळ वर्षें बोर्डिंगच्या गृहव्यवस्थेवर देखरेख करीत असे. बोर्डिंगमधील साऱ्या मुली त्यांना ‘ तान्हीची आई ’ या नांवानें हांक मारीत.

बोर्डिंगमध्यें मुलींना चांगल्या तऱ्हेचें जेवण मिळे. परंतु त्या वेळीं स्वस्ताई असल्यामुळें प्रत्येक मुलीला रु. ५-६ च्या वर बोर्डिंगचा खर्च येत नसे. शाळेला फी नसून बऱ्याच मुलींना शिष्यवृत्ति मिळे. तीमध्यें बहुधा बोर्डिंगचा खर्च भागत असे. बोर्डिंगमधील मुलींचें सायंकाळचें भोजन हल्लींप्रमाणेंच ६ वाजतां होत असे. रात्रींचा अभ्यास समयांच्या प्रकाशांत मुली करीत. लहान मुलींनीं बरोबर आठ वाजतां निजलेंच पाहिजे असा मिस् हर्फर्डचा सक्त कायदा असे. वरच्या वर्गांतील मुली नऊ वाजेपर्यंत अभ्यास करून झोंपावयास जात. एक कंदील हातांत घेऊन मिस् हर्फर्ड रोज रात्रीं सर्व खोल्यांतून हिंडत. प्रत्येकीला हांक मारून ‘ गुड् नाइट ’ म्हटल्याशिवाय त्या झोंपावयास जात नसत.

सकाळीं दहा वाजतां जेवण झाल्यावर मुली शाळेस जाण्यास तयार होत. पुढें मिस् हर्फर्ड, मध्यें मुली व मागें शाळेचा शिपाई अशा समारंभानें बोर्डिंगच्या

मुली रोज किवे वाड्यामध्यें शाळेला जात. सांप्रतच्या सुधारलेल्या काळांतहि शाळेंतील मुली रांगेनें रस्त्यावरून कोठें जाऊं लागल्या कीं कुतूहल वाटून रस्त्यावरील लोक त्यांना पाहावयास उभे राहतात; तर मग ज्या काळीं स्त्रियांना शिक्षण देणें म्हणजे धर्मविरहित कृत्य करणें अशी समजूत प्रचलित होती त्या काळीं एका युरोपिअन बाईच्या मागोमाग हिंदु, खिस्ती, ज्यू इत्यादि जातींच्या मुली हातांत पुस्तकें घेऊन शाळेस जात आहेत हें दृश्य समाजास कितीतरी चमत्कारिक वाटत असेल! लांबून शाळेला येणाऱ्या मुली त्यांच्यासाठीं मुद्दाम ठेविलेल्या धमनीमधून शाळेंत येत. परंतु त्यांनाहि टारगट लोकांचीं मुक्ताफळें ऐकण्याचा प्रसंग येई. कित्येकांची धारिष्टाची मजल गाडींत हात घालून मुलींच्या डोक्यांतील फुलें काढण्यापर्यंत जात असे. श्रीमंतांच्या मुली व सुना बहुधा घरच्या गाडींतून शाळेला येत. परंतु एखादे दिवशीं गाडी नसली तर डोक्यावरून पदर व त्यावरून शाल पांघरून गड्याला सोबतीला घेऊन त्यांना शाळेंत यावें लागे. वाटेनें येतांना टवाळ लोकांचीं निंदायुक्त भाषणें त्यांच्या कानीं पडत. शाळेस जाण्यामध्यें सर्वसामान्य समाजाविरुद्ध आपण विशेष कांहींतरी करीत आहोंत असें त्यांना वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. असो.

मिस् हर्फर्ड पदवीधर नव्हत्या व त्यांच्या अंगीं विशेष विद्वत्ताहि नव्हती. परंतु त्यांच्या ठिकाणीं अप्रतिम व्यवहारचातुर्य, शिस्त व दुसऱ्याकडून काम करून घेण्याची विलक्षण हातोटी होती. त्या लहान मुलींना फक्त इंग्रजी शिकवीत. त्यांचा सर्व वेळ हायस्कूल, ट्रेनिंग कॉलेज, प्रॅक्टिसिंग स्कूल व बोर्डिंग या चार संस्थांची व्यवस्था पाहण्यांत जात असे. याच कामांत त्या रात्रंदिवस गढलेल्या असत. कित्येक वर्षें शाळेच्या सुपरिंटेंडेंटचें, बोर्डिंगच्या मेट्रनचें व नर्सचेंहि त्यांनीं काम पाहिलें. त्या वेळीं शाळेंत थोड्या मुली होत्या म्हणूनच ही गोष्ट शक्य झाली. शाळा सुरू झाल्यापासून चार वर्षांमध्यें त्यांनीं एका दिवसाचीसुद्धां सुटी घेतली नाहीं. इतकेंच नव्हे तर दिवाळीच्या व मे महिन्याच्या सुट्यांमध्येंदेखील त्या विश्रांति घेत नसत.

तो काळ म्हणजे पुण्यांतील स्त्रीशिक्षणाच्या प्रारंभाचा काळ होता. शाळेची स्थापना हें एक प्रकारें बहुजनसमाजाविरुद्ध बंडच होतें. शाळेवर युरोपिअन सुपरिंटेंडेंट असल्यामुळें शाळेबद्दल समाजाची वृत्ति साशंक असे. शाळेंत घडणाऱ्या लहानलहान गोष्टींना मोठें रूप देण्यांत येऊन त्यांसंबंधीं वर्तमानपत्रांत चर्चा होई. मिरजेच्या एका लहान मुलीला तिच्या आईबापांनीं सासरच्या मंडळींच्या मनाविरुद्ध

ट्रेनिंग कॉलेजमधील एका मुलीबरोबर हुजुरपागेंत पाठविलें, तों त्या मुलीवर व शाळेच्या चालकांवर केवढा गहजब उडाला! अंबालहरी, शिवाजी, पुणें-वैभव इत्यादि वर्तमानपत्रांत अग्रलेख प्रसिद्ध झाले. मुलीच्या सासरच्या मंडळींनीं कोर्टांत फिर्याद केली. ज्या मुलीनें त्या मुलीस बरोबर आणिलें होतें तिचा यत्किंचित्‌हि अपराध नसतां तिला कोर्टामध्यें जावें लागलें. ती मुलगी अर्थात् दोषमुक्त झाली. परंतु मिस् हर्फर्ड व सोसायटीची मंडळी यांना या कामीं अत्यंत त्रास सोसावा लागला. त्या वेळच्या 'अंबालहरी' या वर्तमानपत्रांत 'फीमेल हायस्कूलची चमत्कारिक तऱ्हा' या मथळ्याखालीं एक चमत्कारिक अग्रलेख प्रसिद्ध झाला होता. शाळेचे चालक मुलींना फूस लावून आणतात असा घाणेरडा आरोप करण्यासहि त्या वर्तमानपत्रकर्त्यांना कांहीं वाटलें नाहीं.

'तरुणी-शिक्षण नाटिका' हें नाटक लिहून श्री. ना. बा. कानिटकर यांनीं अप्रत्यक्ष रीतीनें हुजुरपागेवर हल्ला चढविला होता. स्त्रीशिक्षणविरोधक कंपूंत हें नाटक फार लोकप्रिय झालें होतें. या नाटकावर टीका करतांना विविधज्ञानविस्तार मासिकाच्या संपादकांनीं, 'तरुणी-शिक्षण नाटिके'च्या कर्त्यास आजन्म प्रायश्चित्त भोगावें लागेल, असे उद्गार धैर्यानें काढिले होते. अशा रीतीनें मिस् हर्फर्ड यांना वर्तमानपत्रांतील टीका, बोर्डाचे कडक नियम, समाजाचा स्त्रीशिक्षणविषयक विरोध, बालविवाहादि रूढी, समाजाची हेटाळणी व निरुद्योगी तरुणांच्या चेष्टा इत्यादि अनेक अडचणींना धैर्यानें तोंड द्यावें लागत होतें. त्या काळीं मिस् हर्फर्डसारख्या पोक्त, अनुभवी, चतुर व बाणेदार स्त्रीचें नेतृत्व लाभल्यामुळें शाळा जिवंत राहिली यांत काडीमात्र संशय नाहीं. मनुष्यस्वभावाची त्यांना योग्य पारख असे. परक्या लोकांची समाजस्थिति व त्यांच्या रूढी समजावून घेऊन त्याप्रमाणें वागण्याचें चातुर्य त्यांच्या अंगीं होतें. वसतिगृहांतील प्रत्येक मुलीनें आपआपल्या धर्माप्रमाणें आचरण करावें असा त्यांचा कटाक्ष असे. शाळेमध्यें नाना जातींच्या मुली जरी एकत्र शिकत व खेळत तरी जेवणघरामध्यें जातिभेद पाळण्यांत येत असे. याप्रमाणें कसोशीनें वागत असतांहि फीमेल हायस्कूलच्या लेडी सुपरिंटेंडेंटनीं मुलींना 'उष्टें केळें खाऊं घातलें,' असा प्रवाद उठला होताच. प्रो. जिन्सिवाले यांनीं जाहीर सभेंत यासंबंधीं उद्गार काढले. अर्थात् त्याबद्दल त्यांना मिस् हर्फर्डची क्षमा मागावी लागली ही गोष्ट वेगळी. परंतु हायस्कूलच्या बाबतींत पराचा कावळा करण्याची तत्कालीन समाजामध्यें कशी वृत्ति होती हें या गोष्टीवरून सहज ध्यानांत येतें.

मिस् हर्फर्ड

हुजुरपागेचा कडक शिस्तीसंबंधीं जो लौकिक आहे याचें श्रेय मिस् हर्फर्ड यांनाच देणें योग्य होईल. वर्गांतील वस्तु मुलींनीं टापटिपीनें ठेविल्या आहेत किंवा नाहीं हें त्या रोजच्या रोज स्वतः पहात. एकदां एका वर्गांतील कपाट त्यांनीं उघडून पाहिलें तों त्यामध्यें दौती वेड्यावांकड्या ठेविलेल्या त्यांना आढळल्या. त्याबरोबर वर्गावरील शिक्षकाला बोलावून ती गोष्ट त्यांनीं त्यांच्या नजरेस आणिली. तेव्हांपासून कपाटांतील वस्तु व्यवस्थितपणें ठेविल्या आहेत किंवा नाहीं हें पाहण्याचें काम ते शिक्षक रोज करूं लागले. मुलींच्या पायांतील जोडे अथवा त्यांचे कपडे अव्यवस्थितपणें इकडे तिकडे टाकलेले दिसले कीं त्या ते नोकरांना देऊन टाकीत. अशी त्यांची अगदीं कडक शिस्त होती. वस्तु गेल्याबद्दल मुलींना वाईट वाटे; परंतु यापासून टापटिपीचा धडा घेतल्यावांचून त्या राहत नसत.

हाताखालच्या शिक्षकवर्गाशीं त्या सौजन्यानें वागत. शिक्षकवर्गावर त्यांचा विश्वास असून त्यांच्याबद्दल त्या अभिमान बाळगीत. कोणी शिक्षक आजारी पडल्यास त्या त्यांच्या घरीं जाऊन प्रकृतीची विचारपूस करण्यास चुकत नसत. या कारणामुळें हाताखालच्या शिक्षकवर्गाचें त्यांना चांगलें सहकार्य लाभलें.

मिस् हर्फर्डच्या वेळीं शिक्षकवर्गांत मिस् सोराबजी, मिस इसाबेल भोर, मिस् मेरी भोर, श्री. हरिशास्त्री भाटवडीकर, श्री. पांडुरंगपंत बापट, श्री. ताटके, श्री. पर्वते, श्री. नगरकर, श्री. गोगटे इत्यादि मंडळी होती. कांहीं वर्षांनीं त्यांच्या हाताखालीं शिकलेल्या शाळेंतील विद्यार्थिनी मॅट्रिक झाल्यानंतर शिक्षकिणी म्हणून काम करूं लागल्या. त्या म्हणजे मिस् रेचलबाई बेंजामिन, मिस् चंद्रिकाबाई सांगळे (मिसेस् जोशी), श्री. गोदूबाई देशपांडे व सौ. चंद्राबाई दांडेकर या होत. मिस् रोझॅरिओ या मेट्रन होत्या. त्यांच्यासंबंधीं पुढें माहिती येईलच.

प्रथम हायस्कूलचे वर्ग सुरू करण्यांत आले खरे; परंतु नवीन मुली येत त्यांपैकीं बऱ्याच जणींना साधारणच मराठी लिहितांवाचतां येई. त्यामुळें इ. स. १८८५ सालापासून प्राथमिक शिक्षणाची शाळा सुरू झाली. त्या वेळीं मराठी तिसरीपासूनच इंग्रजी शिक्षणाची सुरुवात होत असे. हायस्कूलमध्यें वरच्या वर्गांत फारच थोड्या मुली असत. किबेवाड्यांतील दिवाणखान्यांत इंग्रजी चौथीपासून सातवीपर्यंतचे वर्ग भरत.

इ. स. १८८५-१८८६ च्या वार्षिक अहवालामध्यें हायस्कुलांत एकंदर ५८ मुली असल्याचा निर्देश केला आहे. या अठ्ठावन मुलींमध्यें १९ ब्राह्मण,

६ प्रभु, ३ मराठा, ३ सोनार, १ वाणी, २ कासार, ७ इतर हिंदू, १० ज्यू व ७ ख्रिश्चन मुली होत्या. यावरून अगदीं प्रथमपासूनच हायस्कूलमध्यें सर्वजातीय व सर्वधर्मीय वातावरण असल्याचें वाचकांच्या ध्यानीं येईल. या मुली १२ ते १६ वर्षांच्या आंतील होत्या. इ. स. १९०० सालअखेरीं हायस्कूलमध्यें ५६ व प्रायमरी व प्रॅक्टिसिंग स्कूलमध्यें १४३ मुली होत्या.

लग्नसराई, कन्यागत यांसारख्या बारा वर्षांनीं लाभणाऱ्या पर्वकाळामध्यें मुलींची संख्या एकदम कमी होई. इ. स. १८९६ च्या प्लेगपासूनहि मुलींची संख्या एकदम कमी झाल्याचें आढळतें. लग्न झाल्यानंतर मुली क्वचित्‌च शाळेंत येत.

शिक्षणक्रमांत मुंबई विश्वविद्यालयानें प्रवेश परीक्षेसाठीं नेमलेले विषय असत. संस्कृत विषय ऐच्छिक असल्यानें तो विषय फारच थोड्या मुली घेत. बहुतेक मुली मराठी विषय घेत. अक्षर व शुद्धलेखन यांकडे विशेष लक्ष पुरविलें जात असे. त्या बाबतींत मुलींची नांवाजण्याजोगी प्रगति असे. मोडी लेखन व वाचन हाहि तेव्हां महत्त्वाचा विषय समजत. मुली घरून रोज पुस्त्या काढून आणीत व अक्षर वळवीत. आठवड्यांतून एकदां हस्तलिखित मोडी वाचनाचा तास असे. तत्कालीन विद्यार्थिनी उत्कृष्ट मोडी लिहीत. मोडी लिहिण्यावाचण्याचा प्रघात हल्लीं मोडत चालला आहे. परंतु बालबोधीपेक्षां मोडी अक्षर जलद लिहितां येतें, तेव्हां मोडी लिहिण्याची पद्धति नष्ट होऊं नये यासाठीं प्रयत्न करणें जरूरीचें आहे.

या परीक्षेच्या विषयांखेरीज शिवण, गायन व ड्रॉइंग या विषयांचें शिक्षण मुलींना देत असत. पुण्यांतील सुप्रसिद्ध गायक बाळकोबा नाटेकर हे कांहीं दिवस हायस्कूलमधील मुलींना गायन शिकवीत असत. त्यांच्यानंतर पर्वतीवरील गवई श्री. भलोबा यांच्याकडे तें काम आलें. पुण्यांतील उत्कृष्ट गायक असा यांचा लौकिक होता. त्यांच्यामागून श्री. बापट म्हणून एक गायन शिक्षक आले. या सर्वांच्या नेमणुका सोसायटीनें केलेल्या होत्या. कारण सरकारनें गायन शिक्षक नेमिलेला नव्हता. पुढें बऱ्याच वर्षांनीं ट्रेनिंग कॉलेज व हायस्कूलसाठीं शिक्षणखात्यानें श्री. आठवले यांस गायन शिक्षक म्हणून नेमिलें. परंतु ही पुढची गोष्ट झाली. मिस् हर्फर्डच्या कारकीर्दींत हिंदी गयानाची कायमची सोय होऊं शकली नाहीं. लेडी सुपरिंटेंडेंट इंग्रज असल्यानें इंग्लिश गायनवादनावर विशेष भर होता. मिस् हर्फर्ड, मिस् सोराबजी या मुलींना इंग्रजी गाणीं शिकवीत. रा. ब. भिडे यांनीं एक

पियानो व श्री. काणे यांनीं एक हार्मोनिअम शाळेस बक्षीस दिला होता. खासगी शिकवणी ठेवून मुली पियानो व हार्मोनिअम वाजवावयास शिकत असत.

हायस्कूलची स्थापना झाल्यानंतर सहा वर्षांनीं म्हणजे इ. स. १८९० सालीं सौ. द्वारकाबाई कमलाकर या मॅट्रिक्युलेशन परीक्षेत उत्तीर्ण होऊन त्यांचा नंबर बराच वर आला. याच हायस्कूलच्या पहिल्या मॅट्रिक होत. त्यांच्या परीक्षेचा निकाल कळतांच शाळेंत जिकडेतिकडे आनंदीआनंद झाला. मिस् हर्फर्ड यांनीं त्या-प्रीत्यर्थ सर्व शाळेला पेढे वाटले. इ. स. १९०० सालापर्यंत हायस्कूलमधून एकंदर दहा मुली मॅट्रिक झाल्या. त्यांपैकीं एकीचा साऱ्या मुलांत दहावा नंबर आला व एकीनें शंभर रुपयांचें चॅटफील्ड मेमोरियल बक्षीस मिळविलें. इ. स. १८८८मध्यें दोन मुलींनीं मिडल् स्कूल स्कॉलर्शिपच्या परीक्षेस बसून शिष्यवृत्त्या मिळविल्या. पहिल्या १६ वर्षांत शाळेची प्रगति मंद गतीनें चालू होती.

मिस् हर्फर्ड यांच्या कारकीर्दीतील पहिला बक्षिससमारंभ श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या हस्तें हिराबागेमध्यें इ. स. १८८५ मध्यें झाला. दुसरा बक्षिससमारंभ इ. स. १८८८ मध्यें ड्यूक ऑफ कॅनॉट यांच्या हस्तें कौन्सिल हॉलमध्यें झाला. त्या प्रसंगीं डचेस ऑफ कॅनॉट, मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड रे व लेडी रे व श्रीमंत सयाजीरावमहाराज वगैरे बडी मंडळी हजर होती. मुलींच्या गायन-संभाषणांचा कार्यक्रम अध्यक्ष व इतर पाहुणे मंडळी यांस अत्यंत आवडला. शिवणकाम, विणकाम इत्यादिकांचें जें प्रदर्शन भरविलें होतें तेंहि यशस्वी झालें. लेडी हॅरिस् यांच्या अध्यक्षतेखालीं इ. स. १८९६ मध्यें जो बक्षिससमारंभ झाला तो बऱ्याच मोठ्या प्रमाणावर होता.

इ. स. १८८६ सालापासून ज्या मुलींना ऐपत असेल त्यांनीं ४ आणे फी द्यावी असें ठरलें. प्रायमरीच्या मुलींना फक्त एकच आणा फी द्यावी लागे. इ. स. १८९२ सालीं इंग्रजी चौथी ते इंग्रजी सातवीच्या मुलींनीं आठ आणे व खालच्या वर्गांच्या मुलींनीं चार आर आणे फी द्यावी असा सोसायटीच्या कौन्सिलनें नियम केला. मुलींची संख्या थोडी असल्यानें फीचें उत्पन्न फार अल्प असे. त्याच वर्षा-पासून प्रायमरी स्कूलमध्यें लहान मुलगे घेण्याची परवानगी मिळाली.

इ. स. १८९५च्या मेच्या पहिल्या तारखेस किबेवाड्यांतून शाळा हुजुर-पागेंतील नवीन भव्य व सुंदर इमारतींत आली. तो दिवस त्या वेळच्या विद्यार्थि-नींना अर्थात् अत्यंत आनंदाचा वाटला.

इ. स. १८८८मध्यें मिस् हर्फर्ड तीन महिन्यांच्या रजेवर गेल्या. त्यांच्या गैरहजिरींत मिस् मेरी सोराबजी यांनीं लेडी सुपरिंटेंडेंटचें काम पाहिलें. त्या रजेवरून परत शाळेंत आल्या त्याच दिवशीं कौन्सिल हॉलमध्यें बक्षिससमारंभ होता व बोर्डिंग-मधील एक मुलगी विषमानें अत्यवस्थ होती. आल्याबरोबर अगोदर त्या आजारी मुलीजवळ जाऊन बसल्या. अशी त्यांची मुलींसंबंधानें कळकळ असे.

इ. स. १८९६ सालीं पुण्यास प्रथम प्लेग सुरू झाला. त्या वेळीं हायस्कूलची नवीनच बांधलेली इमारत स्त्रिया व मुलें यांच्याकरतां प्लेग हॉस्पिटलसाठीं सरकारनें मागितली. परंतु मिस् हर्फर्ड व डॉ. भाण्डारकर आदिकरून सोसायटीच्या मंडळींनीं, प्लेग हॉस्पिटलसाठीं शाळेची जागा दिल्यास मुली तेथें राहावयास भितील व त्याच-प्रमाणें आसपासच्या घरांत राहणाऱ्या मंडळींनाहि त्यापासून उपद्रव होईल म्हणून सरकारची मागणी नाकारली. मिस् हर्फर्डच्या कारकीर्दीचीं शेवटचीं चार वर्षें अत्यंत त्रासाचीं गेलीं. कारण त्या वेळीं प्लेग अतिशय जोरांत सुरू असल्यानें दर वर्षीं सुमारें चार महिने तरी शाळा बंद ठेवणें भाग पडे व अर्थात् मुलींचे अभ्यास मागें पडत. परंतु शाळा एकदा सुरू झाली कीं मुलींचे अभ्यास संपविण्यासाठीं शिक्षक पराकाष्ठेचे प्रयत्न करीत.

शिक्षकवर्ग व मुली यांच्यावर मिस् हर्फर्ड यांची सदैव देखरेख असे. शिक्षकांनीं शाळेला उशिरां आलेलें त्यांना बिलकूल खपत नसे. मुलींच्या वागणुकी-वर त्यांचें बारीक लक्ष असे. एखाद्या मुलीचें कुल चांगलें नाहीं असें कळल्यास त्या तिला शाळेंत ठेवीत नसत. अशा रीतीनें त्यांचा कडक स्वभाव होता तरी लहान मुलामुलींच्या सहवासांत त्या तन्मय होऊन जात. दुपारची सुटी झाली कीं लहान मुलें व मुली त्यांना येऊन बिलगत. मुलींच्या बरोबर त्या टग् ऑफ वॉर खेळत. परंतु घंटा झाली कीं तावडतोब मुलेंमुली आपआपल्या वर्गाकडे धांव घेत.

याप्रमाणें एकंदर सोळा वर्षें लेडी सुपरिंटेंडेंटचें काम करून इ. स. १९०० सालीं मिस् हर्फर्ड सेवानिवृत्त झाल्या. त्या वेळीं सर्व विद्यार्थिनी, शिक्षक वर्ग व सोसायटीच्या कौन्सिलचे सभासद यांस फार वाईट वाटलें. मिस् हर्फर्ड यांच्या प्रेमळ परंतु शिस्तीच्या देखरेखीखालीं शाळेचा पाया भक्कम झाला. अतिशय कठीण परिस्थितींत, अनेक विरोधांशीं झगडून मिस् हर्फर्ड यांनीं शाळा नांवारूपास आणिली. मनुष्यस्वभाव निसर्गतःच अपूर्ण आहे. त्याप्रमाणें मिस् हर्फर्ड यांच्या अंगीं कांहीं दोष असतील. परंतु नेत्याच्या अंगीं बाणेदारपणा, धैर्य, निश्चयीपणा,

क्षमाशीलत्व, कर्तव्यदक्षता, प्रेमळपणा इत्यादि गुण आवश्यक असतात ते सर्व
त्यांच्या अंगीं होते. त्यांच्या विद्यार्थिनींना त्यांच्याविषयीं आपलेपणा वाटे.
उलटपक्षीं जुन्या विद्यार्थिनी त्यांना भेटावयास आल्यास त्यांना फार आनंद व कौतुक
वाटे. त्यामुळें त्या सेवानिवृत्त झाल्या त्या वेळीं आपण मातेच्या प्रेमास पारखे
झालों असें कांहीं विद्यार्थिनींना वाटलें असल्यास त्यांत कांहींच आश्चर्य नाहीं.
परक्या धर्माच्या व परक्या जातीच्या मुलींबद्दल प्रेमभाव वाटण्यास हृदय उदार
असावें लागतें. मिस् हर्फर्डचें हृदय तशा प्रकारचेंच होतें. असो.

सेवानिवृत्त झाल्यावर कांहीं वर्षे सोसायटीच्या कौन्सिलच्या त्या सभासद होत्या.
इ. स. १९०९ सालीं त्यांनीं शाळेस भेट दिली होती. ती कित्येकांच्या स्मरणांत
अद्यापपर्यंत असेल! त्यानंतर मात्र त्या पुण्यास कधींच आल्या नाहींत. इ. स.
१९१७ सालीं त्या इंग्लंडमध्यें ख्रिस्तवासी झाल्या. त्या बातमीनें त्यांच्या अनेक
विद्यार्थिनींना फार दुःख वाटलें. त्या दिवशीं शाळा बंद ठेविण्यांत आली होती.

त्यांच्या कारकीर्दींत अनेक थोर संस्थानिकांनीं, धनिकांनीं व अधिकारी
युरोपिअन स्त्री-पुरुषांनीं शाळेस भेटी देऊन आपली गुणग्राहकता दाखविली.
मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड रे, लेडी रे, ड्यूक ऑफ कॅनॉट, डचेस् ऑफ् कॅनॉट, श्रीमंत
सयाजीराव महाराज, म्हैसूरचे महाराज, भावनगर व त्रावणकोरचे महाराज, गोंडळ
व वढवान या संस्थानांचे ठाकूरसाहेब, कोल्हापूरचे महाराज, लेडी हॅरिस् इत्यादि
मंडळींनीं शाळेस भेटी देऊन शाळेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केलें. शिक्षण-
खात्याचे इन्स्पेक्टर मिस्टर कर्कहॅम् यांनीं दरवर्षीं शाळेची इन्स्पेक्शन् घेऊन दिलेले
अभिप्राय उत्कृष्ट स्वरूपाचे आहेत. मिस् हर्फर्ड यांचा स्वार्थत्याग, कर्तव्यबुद्धि,
शिस्त, टापटीप यांची सर्वांनीं मुक्तकंठानें स्तुति केलेली आढळते.

या स्तुतीस मिस् हर्फर्ड सर्वथैव पात्र होत्या. अशा प्रकारें ज्यांनीं अहर्निश
मेहनत करून निःस्वार्थ बुद्धीनें या सुंदर विद्यामंदिराचा पाया भक्कम केला त्यांचें
प्रेमपूर्वक स्मरण ठेवणें हें या हायस्कूलच्या अखिल विद्यार्थिनींचें कर्तव्य होय.



मिस् मेरी सोराबजी,
लेडी सुपरिंटेंडेंट – १९०० ते १९०७



मिस कार्करी
लेडी सुपरिंटेंडेंट १९०७ ते १९०९

Wagle Press, Bombay

प्रकरण बारावें

१९०० नंतर

मिस् सोराबजी

मिस् हर्फर्ड यांच्यानंतर, ज्यांनीं त्यांच्या हाताखालीं फर्स्ट असिस्टंट म्हणून दहा बारा वर्षें काम केलें होतें त्या मिस् मेरी सोराबजी यांची लेडी सुपरिंटेंडेंट म्हणून नेमणूक झाली. इ. स. १८९१ सालीं मिस् हर्फर्ड तीन महिन्यांच्या रजेवर गेल्या असतां यांनीं लेडी सुपरिंटेंडेंटचें काम केलें होतें. इ. स. १८९७ मध्यें बडोदें संस्थानांत मोठ्या पगारावर त्यांची नेमणूक झाली होती. अशा रीतीनें वरिष्ठ कामाचा यांस चांगला अनुभव आला होता.

हायस्कूलमध्यें इंग्लिश, भूगोल व ट्रेनिंग कॉलेजमध्यें ' शिक्षण ' हे विषय त्या शिकवीत. त्या स्वतः हुशार असून शिक्षकांच्या कामावर त्यांचें फार लक्ष असे. अध्यापनाच्या बाबतींत शिक्षकांना सूचना करून त्या चांगलें वळण लावीत. शिक्षकांच्याबद्दल त्यांना विशेष सहानुभूति असून त्यांना हरएक बाबतींत साहाय्य करण्यास त्या नेहमीं तयार असत. वस्तुपाठ (Object lesson) देण्याचा प्रघात त्यांनींच सुरू केला व तो यशस्वी झाला. वस्तुपाठाची तयारी करण्याच्या कामीं शिक्षकांस त्यांची विशेष मदत होत असे. शिक्षकांचें अध्यापन पाहण्यास त्या वरचेवर वर्गांत जाऊन बसत असत. त्यांच्या हाताखालीं शिक्षक चांगले तयार होत.

मिस् सोराबजी यांचा स्वभाव मायाळू व उदार असे. परंतु एकंदरीनें त्या कडक व अत्यंत शिस्तप्रिय होत्या. शाळा सुटल्यानंतर त्या मुलींच्यामध्यें मिसळून त्यांच्याबरोबर सायंकाळीं खेळहि खेळत. वयस्कर असूनहि त्या धांवण्यांत इतक्या चपळ असत कीं धांवणाऱ्या टीमच्या तर्फे त्या खो खो खेळत असल्या तर धांवण्यांत अट्टल अशा एकदोघी मुलींच्याखेरीज त्यांना कोणी पकडूं शकत नसे.

मिस् हर्फर्डप्रमाणें मिस् सोराबजी यांनाहि मुली ' मदर ' या नांवानें संबोधीत असत. मुलींच्या सामान्य ज्ञानवर्धनासाठीं त्यांनीं बऱ्याच योजना केलेल्या होत्या. दर रविवारीं शाळेंत ' धर्म ' या विषयावर व्याख्यानें होत. मिस् सोराबजी यांच्या मातुःश्री व्हिक्टोरिया हायस्कूलच्या सुपरिंटेंडेंट होत्या. तेथून चांगल्या युरोपिअन शिक्षकिणींना बोलावून त्यांच्याकडून मुलींना त्या ड्रिलचें शिक्षण देववीत.

दर वर्षीं मुली मॅट्रिकच्या परीक्षेस बसाव्या व त्यांनीं परीक्षेंत उत्तीर्ण होऊन शाळेची कीर्ति वाढवावी अशी त्यांची फार इच्छा असे. मॅट्रिकच्या वर्गांतील प्रत्येक मुलीच्या अभ्यासाची त्या बारकाईनें चौकशी करून, रागें भरून तर केव्हां मायेनें पाठीवरून हात फिरवून मुलींना उत्तेजन देत व शिक्षकांनाहि मुलींची चांगली तयारी करून घेण्यास सांगत. मॅट्रिकच्या परीक्षेला मुली निघाल्या कीं त्या त्यांच्याबरोबर परीक्षेच्या मंडपापर्यंत जात व घंटा होईपर्यंत परोपरीनें उपदेश करून त्या त्यांना धीर देत. मधली सुट्टी होतांच त्या मंडपाकडे धांवत येत व मुलींच्या पेपरविषयीं अत्यंत प्रेमानें चौकशी करीत व त्यांना खाण्यापिण्याचा आग्रह करून त्यांचा श्रमपरिहार करवीत. एवढेंच नव्हे तर मुली परीक्षेला जातांना ख्रिश्चन पद्धतीप्रमाणें स्वतः प्रार्थना करून त्यांना शुभ आशीर्वाद देत. स्वतःच्या विद्यार्थिनीं-विषयीं किती ही काळजी व केवढा हा आपलेपणा !

त्यांच्या हाताखालीं काम करणारा शिक्षकवर्गहि अत्यंत कर्तव्यनिष्ठ होता. त्या वेळच्या शिक्षकांच्याविषयीं चार शब्द लिहिणें येथें अप्रासंगिक होणार नाहीं. श्री. पर्वते यांची मुलांच्या हायस्कूलमधून बदली होऊन ते मुलींच्या हायस्कूलमध्यें आले. ते बुद्धिमान् असून शांत व सरळ स्वभावाचे गृहस्थ होते. हे हायस्कूलच्या वरच्या वर्गांना मराठी व संस्कृत हे दोन विषय शिकवीत. ते १९०२ सालीं प्लेगनें वारले. त्यांच्या जागीं श्री. रा. भि. दातार यांची नेमणूक झाली. मराठी व संस्कृत या दोन्ही विषयांची त्यांची उत्कृष्ट तयारी असे. ते ट्रेनिंग कॉलेज व हायस्कूल या दोन्ही संस्थांमध्यें शिकवीत. ते ट्रेनिंग कॉलेजचें तिसरें वर्ष पास असून मॅट्रिक झालेले होते. ते दीर्घोद्योगी असून स्वतःचें ज्ञान वाढविण्याचा त्यांचा उद्योग नेहमीं चाले. वर्गांतील प्रत्येक विद्यार्थिनीकडे काळजीपूर्वक लक्ष देऊन ते त्यांचा अभ्यास करवून घेत. व्यवस्थित व काळजीपूर्वक काम करणारा स्वाभिमानी शिक्षक असा त्यांचा शाळेमध्यें लौकिक होता.

श्री. टी. डी. चित्रे हे एम्.ए., एल्एल्.बी., असून अगदीं साधे व विद्वान् गृहस्थ होते. हे इ. स. १९०६ सालीं प्लेगनें स्वर्गवासी झाले. त्यांच्या जागीं श्री. पेंढारकर यांची नेमणूक झाली. श्री. पेंढारकर हेहि विद्वान्, तरुण व हुषार शिक्षक होते. त्यांनीं शिकविलेला धडा पुनः वाचण्याची मुलींना गरजच पडत नसे. ते मॅट्रिकच्या वर्गाला गणित व सायन्स शिकवीत. कधींकधीं शास्त्रीय प्रयोग दाखविण्यासाठीं ते मुलींना सायन्स कॉलेजमध्यें नेत असत. एखाद्या विद्यार्थिनीनें त्यांना

विनोदानें "मी सुद्धां बी. एस्सी. होणार आहें. मी तुमची जागा घेतली तर तुम्ही काय कराल?" असें म्हटलें तर ते उत्तर देत, "तुम्ही जरूर या. माझ्या विद्यार्थिनीसाठीं मी ही जागा रिकामी करून देईन बरें. फार आनंदाची गोष्ट आहे. माझी तीच इच्छा आहे."

त्यांचें फळयावरील अक्षर फार सुंदर असे. टापटीप, नीटनेटकेपणा व स्वच्छता त्यांच्या प्रत्येक कामांत आढळून येई. वर्गांत गणित विषय ते उत्तम शिकवीत व त्या विषयाची प्रश्नपत्रिका चांगली अवघड काढीत. असे हे लोकप्रिय शिक्षक प्लेगनें आकस्मिक वारले. त्या वेळीं सर्व शिक्षक व विद्यार्थिनी यांना अतिशय हळहळ वाटली.

श्री. पां. गं. लिमये हे उत्तम शिक्षक असून ललितकलांची त्यांना विशेष आवड असे. ते चांगल्या प्रकारचीं काव्यें करीत असत. 'चतुरगडच्या विनोदी स्त्रिया' हें शेक्स्पिअरच्या *Merry Wives of Windsor* या नाटकाचें त्यांनीं केलेलें रूपांतर सुप्रसिद्ध आहे. शाळेंतील समारंभासाठीं ते नेहमीं सुंदर गाणीं व संभाषणें तयार करीत. विद्यार्थिनी, शिक्षक व अधिकारी मंडळी या सर्वांस ते प्रिय असत. हायस्कूल व ट्रेनिंग कॉलेज यांमध्यें कांहीं वर्षें काम केल्यानंतर त्यांची पुण्याहून बदली झाली. नाशीक येथील सरकारी हायस्कूलचे हेडमास्तर असतां हृदयविकारानें तीन चार वर्षांपूर्वीं त्यांचा अकालीं अंत झाला.

श्रीयुत बापट हे मिस् हर्फर्डच्या हाताखालीं इ. स. १८९२ सालीं नोकरीवर रुजू झाले. साऱ्या विद्यार्थिनींना ते पित्याप्रमाणें पूज्य वाटत. बापट मास्तर म्हणजे मुलींच्या विश्वासाचें स्थान. त्यांच्याकडून जो उपदेश होई तो अगदीं योग्य असा मुलींचा त्यांच्यावर भरंवसा असे. त्यांचें शिकविणें उत्तम असल्यानें मुलींना त्यांचा तास विशेष आवडे. त्यांच्या तासांत मुलींना निरनिराळ्या विषयांची माहिती, योग्य उपदेश व उच्च नीतिधर्म यांचा लाभ होई. त्यांचा स्वभाव मायाळू व मृदु असल्यानें एकादे वेळीं अभ्यास केला नसल्यास त्यांना खरें कारण सांगण्यास मुलींना भीति अगर संकोच वाटत नसे. "काय करावें मास्तर! मदरचा भूगोल होता ना आज, म्हणून श्लोक पाठ झाले नाहींत." असें एकाद्या मुलीनें प्रामाणिकपणानें कबूल केल्यास ते म्हणत, "बरें बाळ. उद्यां मात्र जरूर पाठ कर." ते सर्व मुलींना 'बाळ' म्हणून हांक मारीत. मुली क्वचित् प्रसंगीं त्यांचा अभ्यास करीत नसत; परंतु त्यांच्या-बद्दल मुलींच्या अंतःकरणांत खरा आदरभाव असे. त्यांच्या दयाळू, शांत व क्षमाशील

स्वभावाचा मुली फायदा घेत; कारण त्यांच्यावांचून मुलींच्या अडचणी कोणी नीट ऐकून घेत नसे व दुसऱ्या कोणाला त्या सांगण्याचें मुलींना धैर्यहि होत नसे. म्हणूनच वापट मास्तर मुलींना वडिलांप्रमाणें वाटत. त्यांचा पोषाख साधा, वागणें साधें व अंतःकरण सरळ असल्यानें ' आमचे मास्तर ' असें त्यांच्याविषयीं म्हणतांना मुलींना फार आनंद व अभिमान वाटे. इ. स. १९१३ सालीं त्यांची असिस्टंट डेप्युटीच्या जागीं नेमणूक झाली. त्यांनीं ज्या संस्थेंत वीस वर्षे आपलेपणानें काम केलें ती संस्था सोडून जातांना त्यांना व मुलींना फार वाईट वाटलें. इ. स. १९२४ सालीं ते सेवानिवृत्त झाले व हल्लीं शांतपणें पुण्यास आपला काळ घालवीत आहेत. त्यांना आपल्या विद्यार्थिनींबद्दल फार अभिमान वाटतो व जुन्या विद्यार्थिनी भेटल्या म्हणजे पूर्वीच्या आठवणी काढल्यानें त्यांस अजून आनंद होतो.

श्री. म. का. कारखानीस हे इ. स. १९०५ सालीं मिस् सोराबजी यांच्या हाताखालीं हायस्कूलमध्यें काम करूं लागले. पुढें लौकरच त्यांची बदली झाली. इ. स. १९०९मध्यें पुनः त्यांची हायस्कूलमध्यें बदली झाली. हे उत्कृष्ट शिक्षक असून त्यांच्याविषयीं मुलींना अत्यंत आदर असे. मुलींच्यासाठीं ते उत्तम गाणीं व संभाषणें तयार करीत. त्यांचा स्वभाव गंभीर व गोड असून सर्व शिक्षकमंडळी-वरहि त्यांचें वजन असे. इ. स. १९१४ मध्यें ट्रेनिंग कॉलेजमध्यें त्यांची बदली झाली. ट्रेनिंग कॉलेजमध्यें त्यांनीं केलेली कामगिरी उच्च दर्जाची आहे. ट्रेनिंग कॉलेजांतील ' कन्याशिक्षक ' मासिक त्यांनीं कित्येक वर्षे उत्तम प्रकारें चालविलें. लहान मुलांच्यासाठीं लिहिलेलीं त्यांचीं क्रमिक पुस्तकें व गाणीं सुप्रसिद्ध आहेत. सध्यां ते धुळें येथील ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपॉल म्हणून काम करीत आहेत.

श्री. गोगटे मास्तरांचा हायस्कूलकडे संबंध नव्हता. परंतु त्यांच्याविषयीं येथें लिहिल्यावांचून राहवत नाहीं. ' गोगटे मास्तर ' हे शब्द उच्चारल्याबरोबर एकदम ५०-६० मुलींचा बालकवर्ग दिसूं लागतो. गोगटे मास्तरांच्यासमोर गडबड करण्याचें धैर्य कोणासच होत नसे. अगोदर मुली गडबड करीत असल्या तरी गोगटे मास्तर दिसल्याबरोबर एकदम गप्प होत. असा त्यांचा मुलींवर दरारा असे. लहान मुलींना ते गोडीगुलाबीनें अक्षरओळख करून देऊन लिहावयास व वाचावयास शिकवीत.

स्त्रीशिक्षकांमध्यें मिस् इसाबेल भोर या उत्कृष्ट शिक्षक म्हणून प्रसिद्ध होत्या. त्यांचें छोटें चरित्र त्यांच्या विद्यार्थिनी व हायस्कूलच्या हल्लींच्या प्रिन्सिपॉल मिस्

रेचलबाई बेंजामिन वेल्ळकर यांनीं लिहिलें आहे तें तसेंच खालीं दिलें आहे, "ज्या शिक्षकिणींविषयीं मला अद्यापि अत्यंत प्रेम, आदर व अभिमान वाटतो त्या मिस् इसाबेल भोर ह्या होत. माझ्या आयुष्यांत जर शिक्षक या नात्यानें माझ्या हातून कांहीं चांगलें कार्य घडलें असेल तर त्याचें सर्व श्रेय मिस् इसाबेल भोर यांनाच दिलें पाहिजे. आम्हांला त्या इंग्रजी दुसरीमध्यें इंग्रजी शिकवीत असत. परंतु त्यांनीं शिकविलेले धडे मी अजूनहि विसरलें नाहीं. त्यांच्यामागें बोलत असतां आम्ही त्यांना 'धाकट्या मिस् भोर' या नांवानें संबोधीत असूं. त्या आम्हां सर्व मुलींना देवतेप्रमाणें वाटत. त्या निःपक्षपाती, शांत व उद्योगी होत्या. शिस्त व टापटीप यांची त्यांना विशेष आवड असे. शिक्षकांस आवश्यक अशा सर्व सद्गुणांचें त्या स्थान होत्या. त्यांची शिकविण्याची शैली उत्तम होती. मंद विद्यार्थिनींकडे त्या अधिक लक्ष पुरवून त्यांचे अभ्यास करवून घेत. मुलींनाच नव्हे तर सर्व शिक्षक-वर्गास त्या आवडत.

मुलींना त्यांचा तास कधींच कंटाळवाणा वाटत नसे. ज्या दिवशीं कांहीं कारणानें त्या शाळेंत येत नसत तो दिवस व्यर्थ गेला असें आम्हांस वाटे व कांहीं मुली त्या शाळेंत आल्या नाहींत म्हणून केव्हां केव्हां अश्रूहि गाळीत. वर्षाच्या शेवटीं वार्षिक परीक्षेंत पास झाल्यावर वरच्या वर्गात पाठविण्याकरितां आम्हांला रांगेनें उभें करण्यांत आलें. नापास झालेली एकहि मुलगी नव्हती, तरी आम्ही सर्व रडत रडत वरच्या वर्गात जाऊन बसलों. तो दिवस आम्हांला अत्यंत उदासीन व दुःखदायक वाटला. त्या दिवसाची आठवण झाली म्हणजे अद्यापहि मिस् इसाबेल भोर यांची स्मृति होऊन नेत्रांत अश्रु उभे राहतात.

पुढें चार वर्षेपर्यंत त्यांच्याकडे आमचा कोणताच विषय नव्हता. त्यामुळें पहिलें वर्ष आम्हां मुलींना अतिशय कंटाळवाणें गेलें; कारण मिस् इसाबेल भोर यांच्या वर्गात कोणताच विषय पाठ करावा लागत नसे. त्या जें शिकवीत तें मुलींच्या मनावर इतकें उत्तम ठसे कीं व्याकरणाचे नियमसुद्धां पाठ न करतांहि मुलींच्या लक्षांत ते रहात. अशी संवय लागल्यामुळें वरच्या वर्गातील अभ्यासाचा आम्हांला फार त्रास झाला.

शेवटीं आम्ही जेव्हां मॅट्रिकच्या वर्गात प्रवेश केला तेव्हां धाकट्या मिस् भोर इंग्लिश, इतिहास वगैरे विषय शिकविणार ही वार्ता कानीं येतांच आमचा आनंद गगनांत मावेना. मॅट्रिकच्या वर्गात असतांना माझी इंग्लिश विषयांत

इतकी प्रगति झाली कीं, केवळ मॅट्रिक असूनहि मॅट्रिक्युलेशनच्या वर्गास इंग्लिश विषय चांगल्या प्रकारें शिकविण्याचें माझ्या अंगीं सामर्थ्य आलें. मिस् इ. भोर जात्याच उत्कृष्ट अध्यापिका होत्या. त्यांच्या व्यक्तित्वाची छाप आम्हां विद्यार्थिनींवर फार पडे. त्यांचा आदर्श समोर असल्यामुळें त्यांच्या जीविताचा आमच्या पुढील आयुष्यावर फार चांगला परिणाम झाला.

मिस् इ. भोर त्या वेळीं प्रीव्हिअसपर्यंत शिकल्या होत्या. त्यामुळें उच्च अभ्यासक्रमासाठीं रजा घेऊन त्या इंग्लंडला गेल्या. केंब्रिज विश्वविद्यालयाची इकॉनॉमिक्स् ट्रायपॉसची परीक्षा पास झाल्यावर त्यांनीं एडिंबरो विश्वविद्यालयाची एम्. ए. ही पदवी मिळविली. परंतु दुर्दैवानें इंग्लंडची थंड हवा त्यांच्या प्रकृतीस मानवली नाहीं. त्यांना असाध्य व्याधि जडली व आजारी अवस्थेमध्यें त्या स्वदेशीं परत आल्या. हिंदुस्थानांत परत आल्यावर लवकरच (इ. स. १९०७ सालीं) त्या परलोकवासी झाल्या. त्यांच्या अकालीं मृत्यूनें आमच्या हायस्कूलचा कधींहि न भरून येणारा असा तोटा झाला. त्यांच्याविषयीं हे दोन शब्द लिहून मी धन्य झालें असें मला वाटतें. माझ्या पूर्वसंचितामुळेंच अशी सुशील, सद्गुणी व बुद्धिमान शिक्षकीण मला लाभली याबद्दल मी नेहमीं परमेश्वराचे आभार मानतें. ”

धाकट्या मिस् भोरवर त्यांच्या विद्यार्थिनी निरतिशय प्रेम करीत; त्यांचें ‘ Dear ’ उपपद मिळविण्यासाठीं मुलींची धडपड चाले. त्यांचा स्वभाव अतिशय शांत व एकमार्गी असे. त्या सदोदित आपल्या उद्योगांत गर्क असत. इकडे तिकडे उगीच वायफळ गप्पा मारतांना त्यांना कधींच कोणीं पाहिलें नाहीं. त्यांच्याकडे वरचे वर्ग असत; त्यामुळें मुलींच्या पास होण्यावर शाळेचा लौकिक अवलंबून आहे ही जाणीव त्यांच्या अन्तःकरणांत सदैव वास करीत असे. त्यांच्या अंगीं पराकाष्ठेची कर्तव्यदक्षता व सत्यनिष्ठा होती. त्यांच्या हाताखालीं शिकलेल्या पहिल्या मुली पास झाल्या त्या वेळीं जणू आपणच परीक्षा पास झालों असें वाटून त्यांस आनंद झाला. खरोखर, मिस् इसाबेल भोर या एक आदर्श शिक्षकीण होऊन गेल्या यांत शंका नाहीं.

मिस् मेरी भोर या त्यांच्या वडील भगिनी होत. परंतु दोघींच्या स्वभावांत विलक्षण फरक होता. धाकट्या मिस् भोर जितक्या शांत व मितभाषिणी तितक्याच या चळवळ्या व बोलक्या होत्या. त्यांचें शिक्षण मॅट्रिकपर्यंतच झालें होतें. परंतु या मोठ्या उत्साही व कर्तृत्ववान् होत्या. या खालच्या वर्गांना इंग्रजी शिकवीत.



मिस् मेरी भोर, लेडी सुपरिंटेंडंट – १९०९ ते १९१२



मिस् इसाबेल भोर, बी. ए. (ऑक्सफर्ड), एम्. ए. (एडिंबरो)

Wagle Press, Bombay, 1

रा. ब. चिन्तामणराव भट यांच्या घरीं प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाचे जे वर्ग होते त्यांमध्यें मिस् भोर शिकवीत असत. त्यांच्या खटपटीमुळें हायस्कूलच्या सोसायटीशीं हे वर्ग जोडले गेले व या वर्गांना सोसायटीकडून द्रव्यसाहाय्य मिळालें. पुष्कळ हिंदु स्त्रियांशीं यांची निकट मैत्री होती. त्यांचें 'पुष्प करंडक' नांवाचें लहान मुलांसाठीं लिहिलेलें गाण्याचें पुस्तक प्रसिद्ध आहे.

इ. स. १९०२ सालीं बदली होऊन त्या बडोदें संस्थानांत नौकरीवर गेल्या. त्याच वेळीं मिस् कॉर्करीसुद्धां राजकोट संस्थानांत नौकरीवर होत्या. मिस् सोराबजी यांच्या कारकीर्दींत मिस् न्यूलंड या फर्स्ट असिस्टंट होत्या. यांचा भूगोल हा विषय विशेष आवडीचा होता व तो विषय त्या मनोरंजक रीतीनें शिकवीत. मातीचे नकाशे त्या स्वतः तयार करीत. त्या जो विषय शिकवीत तो मुलींच्या मनावर चांगला ठसे.

मिस् नवलकर या इ. स. १९०० सालीं हायस्कूलमध्यें आल्या. या हायस्कूलच्या पहिल्या पदवीधर शिक्षकीण होत. या फार मनमिळाऊ असून मुलींना त्यांच्याबद्दल प्रेम वाटे. त्या क्वचित्‌च रागावत. मुली त्यांच्या विषयाचा अभ्यास करण्यास विशेष झटत असत. इ. स. १९०७–१९०८ च्या दरम्यान मिस् सोराबजी रजेवर असतां या कांहीं महिने हायस्कूलच्या लेडी सुपरिंटेंडेंट होत्या. पुढें त्यांची बदली अहमदाबादेस झाली. बरींच वर्षें पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजच्या या लेडी सुपरिंटेंडेंट होत्या. त्या संस्थेच्या प्रगतीचें श्रेय त्यांनाच दिलें पाहिजे. शिक्षणविषयक पुष्कळ वाङ्मय त्यांनीं लिहिलें आहे. सेवानिवृत्त होऊन त्या मुंबई युनिव्हर्सिटी सेटल्‌मेंटमध्यें ऑनररी काम करीत आहेत.

मिस् रेचलबाई बेंजामिन वेरुळकर या हायस्कूलच्या विद्यार्थिनी असून मॅट्रिक झाल्याबरोबर इ. स. १८९४ सालच्या डिसेंबर महिन्यांत शिक्षक म्हणून मिस् हर्फर्ड यांच्या हाताखालीं काम करूं लागल्या. त्या वेळीं एस्.टी.सीच्या ज्यूनिअर, सीनिअर व ऑनर्स अशा तीन परीक्षा असत. या सर्व परीक्षांमध्यें मिस् वेरुळकर यांनीं पहिला वर्ग मिळविला. या हुशार व उत्साही शिक्षक असून मुली त्यांच्या तासासाठीं वाट पाहात बसत. त्यांचे धडे मुलींना केव्हांच पाठ करावे लागत नसत. हायस्कूलप्रमाणेंच प्रायमरी स्कूल व ट्रेनिंग कॉलेजमध्येंहि या शिकवीत. त्यांना लहान मुलें प्रिय असत. प्रायमरी स्कूलमध्यें यांनीं पुष्कळ सुधारणा घडवून आणिल्या. किंडरगार्टन पद्धतीनें शिक्षण देणाऱ्या याच पहिल्या शिक्षकीण होत. लहान मुलांच्यासाठीं त्या सुंदर गाणीं रचीत. वनस्पतिशास्त्र (Nature study),

वस्तुपाठ इत्यादि विषय त्या शिकवीत. पाकोळ्यांचें संभाषण, गाणीं, मेपोल, हूपड्रिल, चेंडूचीं व आगगाडीचीं गाणीं इत्यादि खेळ लहान मुलींना त्या शिकवीत. त्या वेळीं प्रायमरी शाळेचे मनोरंजक कार्यक्रम गव्हर्नरसाहेबांच्या पुढें होत असत. त्याच्या यशाचें श्रेय मिस् वेरुळकर यांच्याकडे आहे. सर्व लहान मुलगे व मुली त्यांना 'रेचलबाई' या नांवानें ओळखीत. हायस्कूलमध्यें जे उत्कृष्ट शिक्षक होऊन गेले त्यांमध्यें मिस् वेरुळकर यांची गणना होते. व्हिक्टोरिया हायस्कूलमधील शिक्षकिणींच्या वर्गास त्या बरेच दिवस शिकवीत असत. इ. स. १९०९ सालीं डाक्का येथील ईडन् हायस्कूल फॉर गर्ल्स् या संस्थेंत काम करण्यासाठीं म्हणून हायस्कूल सोडून त्या गेल्या.

मिस् मून या इतर शिक्षकांप्रमाणें इंग्लिश, इतिहास, भूगोल हे विषय शिकवीत. परंतु इंग्लिश, गायनवादन व ड्रिल या विषयांत त्या प्रवीण होत्या. त्यांच्या वेळीं शाळेच्या ड्रिलची लोक फार वाखाणणी करीत. पियानो वाजवायला त्या मुलींना शिकवीत. ट्रिनिटि कॉलेजच्या म्यूझिकच्या परीक्षेस त्यांच्या हाताखालीं तयार झालेल्या मुली पाठवीत असत व त्या उत्तम रीतीनें पास होत. मिस् मून यांचा स्वभाव अत्यंत गोड असे. लहानापासून थोरापर्यंत त्या सर्वांना प्रिय वाटत. त्यांचा विवाह झाल्यामुळें त्या शाळा सोडून गेल्या. हल्लीं या इंग्लंडमध्यें आहेत. त्यांच्या विद्यार्थिनी त्यांची नेहमीं आठवण काढीत असतात.

मिस् चंद्रिकाबाई सांगळे (मिसेस् जोशी) या मिस् सोराबजींच्या कारकीर्दीतच शाळेंत आल्या. त्या हायस्कूलमधूनच मॅट्रिक झाल्या होत्या. त्यांचा आवाज मधुर असून गायनकलेंत त्या प्रवीण होत्या. कांहीं काळ त्या मुलींना हिंदी गायन शिकवीत असत. खाजगी रीतीनें त्यांनीं शाळेंत हार्मोनिअमचा वर्गहि चालविला होता. त्या खालच्या वर्गांना इंग्लिश शिकवीत. त्या लहान मुलांना फार आवडत. त्या वर्गांत शिरल्या कीं मुलांच्यांत त्यांना गुड मॉर्निंग करण्याबद्दल अहमहमिका चाले. त्या इ. स. १९१४ सालीं स्वर्गवासी झाल्या.

मिस् कोल्हापूरवाला, बी.ए., या इ. स. १९०७मध्यें आल्या. या दोनतीन वर्षेंच हायस्कूलमध्यें होत्या. परंतु तेवढ्या अवधींतहि त्या लोकप्रिय झाल्या होत्या. इंग्लिश विषय त्या उत्तम शिकवीत. लायब्ररीची व्यवस्था पाहण्याचें काम त्यांच्याकडे असे. यांचा स्वभाव सरळ व गोड असे. त्यांचा विवाह झाल्यामुळें त्या शाळा सोडून गेल्या.

यांशिवाय मिस् मालतीबाई भोंसले, मिस् सुझॅनाबाई डेव्हिड, मिस् लॅझरस (मिसेस् गोरे) या शाळेमधून मॅट्रिकमध्यें उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनी मिस्

सोराबजी ले. सुपरिंटेंडेंट असतांना काम करूं लागल्या होत्या. त्यांच्याकडे खालचे वर्ग असत.

वरील हकीकतीवरून ज्यांच्या कर्तबगारीच्या जोरावर मिस् सोराबजी यांनीं हायस्कूलची उन्नति केली त्यांची वाचकांना कल्पना येईल. यांच्या कारकीर्दीच्या अखेरीस हायस्कूलमध्यें ११० व प्रायमरीमध्यें सुमारें अडीचशें मुली असून वसतिगृहामध्यें हायस्कूल व ट्रेनिंग कॉलेज मिळून १३५ मुली होत्या.

यांच्या कारकीर्दींत मॅट्रिक परीक्षेला दरवर्षीं जास्त मुली बसूं लागल्या. १९०० ते १९०७ पर्यंत वीस मुली मॅट्रिक परीक्षेंत उत्तीर्ण झाल्या. इ. स. १९०४ मध्यें मिस् रिबेका रुबेन या मॅट्रिक परीक्षेंत सर्व मुलांमध्यें पहिल्या येऊन त्यांना ससून हिब्रू स्कॉलर्शिप, बाई बैरामजी माणेकजी सायन्स प्राइज् व चॅटफील्ड प्राइज् मिळालें. त्याच वर्षीं एका मुसलमान मुलीनें काझी शहाबुद्दीन स्कॉलर्शिप मिळविली. संस्कृत विषयाची यमुनाबाई आत्माराम दळवी स्कॉलर्शिप व चॅट्फील्ड प्राइज् बहुधा दरवर्षीं शाळेला मिळेच. स्कूल ऑफ् आर्ट्च्या ड्रॉइंगच्या परीक्षेस दरवर्षीं मुली बसत व बहुतेक उत्तीर्ण होत. त्याचप्रमाणें ट्रिनिटि ऑफ् लंडनच्या म्यूझिकच्या परीक्षेला शाळेंतून मुली परीक्षेला जात व उत्कृष्ट रीतीनें पास होत.

प्लेगनें दरवर्षीं पांच सहा महिने शाळा बंद असूनहि परीक्षेचे उत्तम निकाल लागत याबद्दल मिस् सोराबजी व शिक्षकवर्ग यांच्यासंबंधानें सर्वांच्या मुखांतून प्रशंसेचे उद्गार निघत.

हर एक्सलन्सी लेडी नॉर्थकोट यांनीं शाळेला एकंदर तीन भेटी दिल्या. त्यांनीं Visitors' Book मध्यें पुढील अभिप्राय दिला आहे. "My second visit to the Training College and High School on the 6th of December 1902, gave me great pleasure. I was struck with the cheerful and keen expression of interest on the pupils' faces, and their apparently high level of intelligence and attainments."

"The method of teaching seemed to me to be very thorough and practical. Miss Sorabji is certainly to be congratulated on the admirable system and order prevailing everywhere."

इ. स. १९०३ सालीं ऑस्ट्रेलियाला जाण्यापूर्वी लेडी नॉर्थकोट यांनीं शाळेला शेवटची भेट दिली. त्या वेळीं त्यांनीं Visitors' Book मध्यें पुढील अभिप्राय लिहिला:—"Miss Sorabji is indefatigable and if energy and devotion deserve success, she should certainly command it. I am

extremely sorry to say good-bye to the School and I shall hope to hear of its continued progress after my departure."

इ. स. १९०७ सालीं ऑनरेबल मिस्टर जाइल्स, D.P.I., यांनीं शाळेसंबंधीं पुढील उद्गार काढले: "As this is in all probability my last visit to this College and High School, I depart from my usual custom and place on record my full recognition of the very excellent work done in this institution which is in many respects a model and unique of its kind in India. I wish it all possible success in future."

वरील अभिप्राय शाळेच्या उत्कृष्ट कार्याची कल्पना देण्यास पुरेसे आहेत. यां-
शिवाय बडोद्याचे महाराज, जंजिऱ्याच्या बेगमसाहेब, मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड लॅमिंग्टन्,
न्या. चंदावरकर, ओरिएंटल ट्रॅन्स्लेटर श्री. बी. बी. जोशी, मिसेस् गिब्, मिसेस् नोबल,
मिसेस् टर्नबुल्, जमखिंडीच्या राणीसाहेब लेडी रमाबाईसाहेब पटवर्धन, मिसेस् कामाय-
केल यांचे अभिप्राय वाचनीय आहेत. परंतु जागेच्या अभावीं ते सर्व देतां येत नाहींत.

इ. स. १९०७ सालीं वसतिगृह, सिक्रूम व प्रायमरी स्कूल यांच्या इमारती बांधून पूर्ण झाल्या व बोर्डिंगच्या मुलींची राहण्याची उत्तम सोय झाली. डॉ. जे. पी. वाडिया हे रोज शाळेंत येऊन बोर्डिंगांतील आजारी मुलींना तपासून औषध-पाणी देत; परंतु त्यांच्याकडून फी बिलकूल घेत नसत. मिस् सोराबजी यांनीं डॉक्टर के. एन्. गोखले यांच्याकडून 'First Aid to the Injured' या अत्युपयुक्त विषयावर मुलींच्यासाठीं व्याख्यानें करविलीं. त्याचप्रमाणें ज्या ज्यू मुलींना हिब्रू भाषा मॅट्रिककरितां घ्यावयाची असेल त्यांच्यासाठीं रेव्हरंड रॉबर्टसन् यांची हिब्रू शिक्षक म्हणून नेमणूक केली. इ. स. १९०६ मध्यें फ्रेंच भाषा शिकविण्याची तजवीज झाली. पुण्यांतील गायनसमाजांतील शिक्षक हिंदी संगीत शिकविण्यासाठीं येत. श्री. एम्. जी. जोशी हे ड्रॉइंग शिकवीत. मिस् सुझनाबाई डेव्हिड या शिवण शिकवीत. मिस् हर्फर्डच्या कारकीर्दींत मिसेस् कर्कहॅम (इन्स्पेक्टर यांच्या पत्नी) व मिस् सोराबजी यांच्या वेळीं मिसेस् प्रायर व मिसेस् कॉव्हर्न्टन् यांनीं मुलींची शिवण-कामाची परीक्षा घेऊन स्तुतिपर उद्गार काढलेले आहेत.

बोर्डिंगची व्यवस्था उत्तम असे. ज्यू बोर्डिंगवर मिसेस् सिपोराबाई सालोमन व हिंदु बोर्डिंगवर श्री. यशोदाबाई भगत देखरेख करीत. सोसायटीनें नेमिलेल्या Lady Visitors मिसेस् रमाबाई रानडे, मिसेस् आनंदीबाई भट, मिसेस् वाडिया,

मिसेस् आपटे, मिसेस् सीताबाई भाण्डारकर, मिसेस् सेल्बि, मिसेस् प्रायर, मिसेस् अलि अकबर या असून त्या शाळेच्या वसतिगृहाची पहाणी करून समाधान व्यक्त करीत.

त्या वेळीं मुलींचें मराठी उत्तम असे. दर शनिवारीं तीन तास सर्व वर्गांतून शिवण चाले. महिन्यांतून एकदां इंग्लिश कविता म्हणण्याची मुलींच्यांत चढाओढ लावली जात असे. जी मुलगी उत्कृष्ट कविता म्हणेल तिला बक्षिस देत असत.

बोर्डिंगमधील मुली आनंदानें व एकोप्यानें राहात. हिंदु, ज्यू व ख्रिश्चन मुलींची राहण्याची व जेवणाची व्यवस्था वेगळी असे. परंतु एरवीं शिकणें, फिरणें, खेळणें, अभ्यास करणें, गप्पागोष्टी हें सर्व जातिधर्म विसरून मुली एकत्रच करीत. दोन्ही बोर्डिंगमध्यें जेवणाची व्यवस्था, हिशेब इत्यादि जबाबदारीचीं कामें मुली आळीपाळीनें करीत. सायंकाळच्या वेळीं भाज्या वगैरे मुलीच निवडून देत. मुलींना बोर्डिंगचा स्वयंपाक आवडत असे. बोर्डिंगचे नियम असे थोडेच असत. सकाळीं ७ वाजतां चहा, पोळी खावयास वेळेवर जाणें, सकाळीं दहा वाजतां व सायंकाळीं ५॥ वाजतां जेवावयास वेळेवर हजर असणें, आपले कपडे खोलींत व्यवस्थित रीतीनें ठेवणें, शाळेच्या कंपाउंडांत केरकचरा न टाकणें इतकेच नियम मुलींना पाळावे लागत. संध्याकाळीं ६ ते ७ पर्यंत मुली खोखो अगर आस्यापास्या खेळत. केव्हां केव्हां फुगड्या, झिम्मा इत्यादि खेळ खेळण्यांतहि त्या वेळ घालवीत. या खेळांत मिस् सोराबजी व मिस् भोसलेहि भाग घेत. सुट्टीच्या दिवशीं मुलींना देवदर्शनास जाण्याची परवानगी असे. रात्रीं ७ ते ९ पर्यंत मुली अभ्यास करीत. रात्रीं ९॥ च्या सुमारास मिस् सोराबजी यांची मुलींच्या खोल्यांमधून फेरी होत असे.

अशा प्रकारें शाळेचें काम उत्कृष्ट प्रकारें पार पाडून १९०७ सालीं मिस् सोराबजी प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें रजा घेऊन विलायतेस गेल्या. त्यांच्या कारकीर्दींत शाळेची कीर्ति व प्रगति जास्त झाली. विलायतेमध्यें असतांच त्या सेवानिवृत्त झाल्या. त्या हल्लीं इंग्लंडमध्यें असून मिशनचें काम करतात. त्या व त्यांच्या सर्व बहिणी कर्तबगार, धाडसी व हुषार आहेत. त्यांच्या भगिनी सुसी सोराबजी या सेंट हेलिना स्कूलच्या प्रिन्सिपॉल होत्या. त्याचप्रमाणें मिस् लेना सोराबजी या डाक्का येथील ईडन स्कूलच्या प्रिन्सिपॉल होत्या. मिस् कॉर्नेलिया सोराबजी बॅरिस्टरचें काम करीत असतात. असो.

मिस् सोराबजींच्या मागून मिस् कॉर्करी ले. सुपरिंटेंडेंट झाल्या. त्यांच्याविषयीं पुढील प्रकरणीं लिहूं.

प्रकरण तेरावें

उन्नतीच्या मार्गांत

इ. स. १९०७ सालीं मिस् कॉर्करी राजकोटहून पुण्यास आल्या व हायस्कूल व ट्रेनिंग कॉलेज या दोन्ही संस्थांच्या लेडी सुपरिंटेंडेंट झाल्या. मिस् सोराबजींच्या कारकीर्दीतील सर्व शिक्षणपद्धति त्यांनीं जशीच्या तशीच पुढें चालू ठेविली. मिस् सोराबजींइतक्या त्या कडक नसत. परंतु त्यांच्या वेळीं पूर्वीइतकीच शिस्त असे. मिस् हर्फर्डच्या हाताखालीं त्यांनीं कांहीं वर्षे काम केलें होतें. त्या इंग्लिश व गणित उत्तम शिकवीत. त्यांचा स्वभाव शांत व दिलदार असे. आयरिश असल्यामुळें त्या स्वाभाविकच फार विनोदी होत्या. शिकवितांना धड्यांतील पात्रें असतील त्याचप्रमाणें चित्रविचित्र तोंडें करून त्या शिकवीत असत. त्यामुळें त्यांच्या तासाला हंशा पिकला नाहीं असे क्वचितच होई. त्यांचा इंग्लिशचा तास मोठा गमतींत जात असे. मात्र भूगोलाच्या वेळीं मुलींनीं चांगली तयारी न केल्यास त्यांना रागावण्याचा प्रसंग येई. एक वर्षी मॅट्रिकच्या वर्गांत दहाबारा मुली होत्या. त्यामुळें त्या वर्गास बारभाईच्या कारभाराप्रमाणें महत्व आलें होतें. मॅट्रिकच्या वर्गांतील मुलींना मिस् कॉर्करी विनोदानें " नाइट्स् ऑफ दि राउंड टेबल " असें म्हणत. त्या जितक्या मायाळू तितक्याच कांहीं बाबतींत कडक असत. एकदां प्रिलिमिनरी चालली होती. मुली गणिताचा पेपर सोडवीत होत्या. इतक्यांत वेळ संपून घंटा झाली. मिस् कॉर्करी यांनीं ' लेखण्या खालीं ठेवा ' असा हुकूम केला. त्यांचा हुकूम न ऐकतां एका मुलीनें केलेलें उदाहरण सबंध उतरवलें. त्या मुलीनें लेखणी ठेवा म्हणतांच खालीं ठेविली नाहीं म्हणून ज्या पानावर तिनें तें उदाहरण केलेलें होतें तें पान त्यांनीं फाडून टाकून तिचा पेपर परीक्षकांकडे पाठविला. फाडलेलें उदाहरण बरोबर होतें. ती मुलगी गणित विषयांत हुशार होती म्हणून चांगली पास झाली ही गोष्ट वेगळी. मुलींना आज्ञापालनाचा योग्य धडा मिळावा यासाठींच त्यांनीं त्या मुलीला ही शिक्षा दिली. पण एरवीं मुलींना त्या फार आवडत. त्यांना मराठी, गुजराथी व संस्कृतहि चांगलें येत असे व त्या मुलींना हितोपदेशांतील गोष्टी नेहमीं सांगत.

मिसेस् कार्मायकेल यांनीं मुलींच्यासाठीं बॅडमिंटन व क्रोके हे खेळ खेळण्याची तजवीज करावी असें सुचविलें होतें. इ. स. १९०८ सालीं मिस्टर ए. पी. सेन, मिसेस् कीटिंग, श्रीमंत सयाजीरावमहाराज गायकवाड, मुंबई इलाख्याच्या गव्हर्नरसाहेबांच्या कन्या मिस् वायोलेट क्लार्क, मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क इत्यादि मंडळी शाळा पाहून गेली. मिसेस् कीटिंग यांचे शाळेसंबंधीं उद्गार महत्वाचे आहेत:--" I was interested to hear that no less than 14 languages are spoken in the school, which shows that the institution is becoming very widely known. Girls from places as distant as Mombasa and Burmah are sent to take advantage of an admirable course of instruction given by a thoroughly competent staff of teachers.

The Boarding arrangements are excellent and there is a well fitted up dispensary and sick ward in the compound.

We saw an excellent display of musical drill and heard some very useful songs of the elder girls who have been very well taught by Miss Moon.

There is a large Kindergarten class where the children seemed to be thoroughly enjoying their lessons and gave very bright and intelligent answers to questions."

मिस् क्लार्क यांनीं मुलींच्या आरोग्यासाठीं स्वीडिश ड्रिल सुरू करावें अशी सूचना केली. त्याचप्रमाणें मिसेस् प्रायर यांनीं उघड्या हवेंत मुलींनीं व्यायाम करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. या सूचनांप्रमाणें टेनिस कोर्ट व बॅडमिंटन् कोर्ट तयार करण्यासाठीं सोसायटीनें बरीच रक्कम मंजूर केली.

त्या वेळीं शिक्षक वर्गांपैकीं मिस् न्यूलंड या टीचर्स डिप्लोमा मिळविण्यासाठीं इंग्लंडला गेल्या होत्या व तेथून परत आल्यानंतर त्यांची धारवाडच्या ट्रे. कॉलेजच्या मुख्य जागेवर नेमणूक झाली. मिस् बर्न यांची नेमणूकहि त्यांच्या कारकीर्दींतच झाली. त्या वेळीं शिक्षकवर्गांत मागचे शिक्षक असूनहि शिवाय मिस् मेरीबाई सॅमसन, मिस् प्रीताबाई चितारी, मिसेस् सोनूबाई आढाव, मिस् बुटियाबाई रामदिन, मिस् चोंडिकर यांच्या नवीन नेमणुका झाल्या. हिंदी संगीत शिक्षक श्री. वापट हे असून, इंग्लिश गायनवादन शिकविण्यास मिस् कार्व्हलो (Carvalho) येत असत.


इ. स. १९०९ मध्यें मिस् कॉर्करी यांची इन्स्पेक्ट्रेस म्हणून बदली झाली व त्यांच्या जागीं ज्यांनीं मिस् हर्फर्डच्या वेळेपासून सुमारें १७ वर्षें हायस्कूलमध्यें

शिकविण्याचें काम केलें होतें त्या मिस् मेरी भोर यांची लेडी सुपरिंटेंडेंट म्हणून सोसायटीच्या अनुमतीनें सरकारनें नेमणूक केली.

मिस् कॉर्करी यांच्या सन्मानार्थ हायस्कूलच्या मुलींनीं मोठी पानसुपारी दिली. त्या वेळीं मिस् भोर ह्याहि ह्या समारंभास हजर होत्या. मिस् भोर यांच्या अंमलांत कडक शिस्त सुरू झाली. मुलींनीं बोर्डिंगमधील आपल्या खोल्यांत त्याच-प्रमाणें वर्गांत उत्तम टापटीप व स्वच्छता ठेविली पाहिजे असा त्यांचा हुकूम असे. अव्यवस्था आढळल्यास त्या मुलीस शिक्षा होई. या लेडी सुपरिंटेंडेंट असतांना शिकवीत नसत. हायस्कूल, ट्रे. कॉलेज, प्रायमरी स्कूल व वसतिगृह यांच्यावर सक्त देखरेख करण्यांत त्यांचा वेळ जाई. शाळेंतील प्रत्येक वर्गास त्या रोज भेट देत. ट्रेनिंग कॉलेजमध्यें त्यांच्या वेळेपासून शिक्षक जास्त आदर्शपाठ देऊं लागले.


त्यांच्या तीन वर्षांच्या कारकीर्दींत पंचवीस मुली मॅट्रिक्युलेशन परीक्षेंत पास झाल्या. इ. स. १९१० सालीं मॅट्रिक परीक्षेस आठ मुली पाठविल्या होत्या. त्या सर्व पास झाल्या म्हणून आनंद प्रदर्शित करण्यासाठीं मिस् भोर यांनीं सर्व शाळेला पेढे वाटले. त्याचप्रमाणें त्यांच्या वेळीं ड्रॉइंग परीक्षेचे निकाल चांगले लागून स्कूल ऑफ् आर्टच्या फर्स्ट ग्रेड, सेकंड ग्रेड, थर्ड ग्रेड इत्यादि परीक्षांमध्यें सुमारें पन्नास मुली उत्तीर्ण झाल्या. हायस्कूलमध्यें अडीचशें व प्रायमरी स्कूलमध्यें दोनशें नव्वद मुली होत्या. वसतिगृहामध्यें हायस्कूल, ट्रे. कॉलेज व प्रायमरी स्कूल मिळून एकंदर १८७ मुली होत्या. वसतिगृहांतील मुलींची संख्या पूर्वीइतकी केव्हांच नव्हती व पुढेंहि इतकी केव्हां वाढली नाहीं. मुलींच्या संख्येवरून वसति-गृहाची लोकप्रियता सिद्ध होते. टेनिस व बॅड्मिंटन् कोर्टें तयार होऊन बोर्डिंगच्या मुलींची खेळण्याची उत्तम सोय झाली. इतर मुलींना खेळ खेळण्यास शिवाय प्लेशेड होतीच. स्वीडिश् ड्रिल मिस् भोर यांनींच सुरू केलें.

मिस् भोर यांच्या कारकीर्दींतील मुख्य गोष्ट म्हणजे त्यांनीं घडवून आणि-लेला हायस्कूलचा रौप्यमहोत्सव होय. समारंभाची तयारी दोन चार महिने चालू होती. या समारंभासाठीं मागील चौकांत दीड हजार रुपये खर्चून मांडव घालण्यांत आला होता. पर्ण-पताकांनीं सर्व शाळा शृंगारिली होती. मेपोल, ड्रिल, मराठी गाणीं, मराठी, इंग्लिश व संस्कृत संभाषणें यांचा उत्कृष्ट कार्यक्रम झाला. सोसायटीच्या मंडळींनीं महोत्सवफंड जमविला होता. हा फंड जमविण्याचें बरेंच कार्य शाळेच्या माजी विद्यार्थिनी सौ. सीताबाई परांजपे यांनीं केलें होतें. समारंभास



टेनिस्‌चा खेळ

Wagle Press, Bombay, 1



बॅडमिंटन्‌चा खेळ

सुमारें दीड हजार मंडळी जमली असावीत. नियोजित अध्यक्ष सर जॉर्ज क्लार्क यांच्या हस्तें, वेळ फार नसल्यामुळें सुमारें तीस मुलींना बक्षिसें देण्यांत आलीं. दुसऱ्या दिवशीं मात्र डॉ. भाण्डारकर यांच्या हस्तें हायस्कूलमधील मुलींना बक्षिसें वाटण्यांत आलीं. प्रायमरी स्कूलमधील सर्व मुलींना मिस् भोर यांनीं बक्षिसें व खाऊ वाटला. समारंभाच्या वेळची शिस्त प्रशंसनीय होती. इतक्या मोठ्या प्रमाणावर अद्यापपावेतों दुसरा बक्षीस समारंभ झालेला नाहीं. रौप्यमहोत्सवाचा दिवस तत्कालीन विद्यार्थिनींना अत्यंत संस्मरणीय वाटतो.

अशा प्रकारें मिस् भोर यांच्या हाताखालीं शाळेची उन्नति होत असतां इ. स. १९१२ सालीं प्रकृति ढांसळल्यामुळें विलायतेला जाण्यासाठीं म्हणून त्यांनीं रजा घेतली. त्यांना निरोप देण्यासाठीं हायस्कूलच्या मुलींनीं त्यांना मोठी पार्टी दिली. मागच्या चौकांतील टेनिस कोर्टवर बसण्याची व्यवस्था केली होती. सर्वांचा निरोप घेतांना मिस् भोर यांचा कंठ सद्गदित झालेला अद्याप आठवतो! त्यांच्या जागीं मिस् बर्न यांची नेमणूक झाली. मिस् भोर ज्या गेल्या त्या पुनः परत आल्या नाहींत- त्यांची प्रकृति अधिकाधिक बिघडत जाऊन ७ फेब्रुआरी १९१३ सालीं लंडन येथें त्यांचा अन्त झाला. शाळेंत ही दुःखद वार्ता कळतांच सर्व शिक्षकवर्ग व विद्यार्थिनी यांना दुःख वाटलें.

मिस् भोर यांच्या कारकीर्दीत शाळेच्या माजी विद्यार्थिनी मिस् डेव्हिड, श्री. रंगाचार्य रड्डी व श्री. आठवले गायनशिक्षक यांच्या नेमणुका झाल्या. मिस् भोर यांच्या कर्तबगारीविषयीं सोसायटी व इतर मंडळी यांचें उत्तम मत होतें. त्यांच्या मृत्यूमुळें शाळेचें फार नुकसान झालें.

मिस् भोर रजेवर असतां मिस् बर्न यांनीं ले. सुपरिंटेंडेंटचें काम उत्तम रीतीनें चालविलें होते. त्या वर्षीं शाळा पाहावयास आलेल्या मंडळींनीं व इन्स्पेक्टरनेंहि त्यांच्या कामाची प्रशंसा केली होती. मिस् भोर यांच्या मृत्यूनंतर मिस् न्यूलंड यांची धारवाडहून येथील शाळेवर ले. सुपरिंटेंडेंट म्हणून नेमणूक झाली व टीचर्स डिप्लोमा मिळविण्यासाठीं मिस् बर्न इंग्लंडला गेल्या. तेथून परत आल्यानंतर इ. स. १९१३ मध्यें त्यांना हायस्कूलच्या ॲसिस्टंट लेडी सुपरिंटेंडेंट म्हणून नेमण्यांत आलें. मिस् पेन या ट्रेनिंग कॉलेजच्या असि. लेडी सुपरिंटेंडेंट होत्या. मिस् बर्न इंग्लंडमध्यें असतांना या हायस्कूलमधील वरच्या वर्गांना इंग्लिश, भूगोल इत्यादि विषय शिकवीत. मिस् न्यूलंड यांच्या कारकीर्दीत मिस् रुबेन, मिस् दस्तुर, मिस्

खरे इत्यादि अध्यापिका व श्री. गोखले, श्री. पुराणिक इत्यादि नवीन शिक्षक शाळेमध्यें आले.

मिस् रुबेन या शाळेच्या माजी विद्यार्थिनी असून त्या सर्व गुरुजनांना फार प्रिय असत. त्यांचा मराठीचा पेपर अत्युत्कृष्ट असे. शुद्धलेखन बिनचूक असून कोठें मार्क कापावे असा परीक्षकांना प्रश्न पडे. गव्हर्मेंट हायस्कूल स्कॉलर्शिपच्या परीक्षेंत सर्व पुणें जिल्ह्यांत त्यांचा पहिला नंबर येऊन त्यांना स्कॉलर्शिप मिळाली होती. विद्यार्थिदशेपासूनच त्यांचा स्वभाव अतिशय शांत असे. ' मिस् रुबेन-सारखी विद्यार्थिनी दुसरी झाली नाहीं ' असे उद्गार त्या वेळच्या अध्यापकांच्या मुखांतून नेहमीं निघत. इ. स. १९०५ मध्यें मॅट्रिक्युलेशन परीक्षेंत सर्व मुलांत त्यांचा पहिला नंबर येऊन त्यांनीं अनेक शिष्यवृत्त्या व बक्षिसें मिळविलीं. या त्यांच्या अपूर्व यशाबद्दल सर्वांकडून त्यांचा मोठा गौरव करण्यांत आला. कॉलेज-मधील परीक्षांतहि चांगल्या प्रकारचें यश संपादन करून बी. ए. झाल्यावर मिस् भोर यांच्या कारकीर्दींत अध्यापिका म्हणून त्या काम करूं लागल्या. परंतु लौकरच शाळा सोडून टीचर्स डिप्लोमा मिळविण्यासाठीं त्या इंग्लंडला गेल्या. तेथून परत आल्यावर त्या पुनः हायस्कूलमध्यें आल्या. त्या अत्यंत प्रेमळ, सरळ, शांत, विद्वान् व कर्तव्यदक्ष असल्यानें त्यांची मुलींच्यावर फार छाप असे. इंग्लिश विषय त्या फार परिणामकारक रीतीनें शिकवीत. अंगीकृत कार्यामध्यें सारें अंतःकरण ओतण्याचा त्यांचा स्वभाव असल्यानें मुलींचीं मनें त्यांनीं इतकीं आकर्षिलीं होतीं कीं, त्यांच्या शब्दाकरितां मुली वाटेल ती गोष्ट करावयास सदैव सिद्ध असत. बोर्डिंग-मध्यें रहात असल्यामुळें त्यांचा बराचसा वेळ मुलींच्या सहवासांत जाई व त्यांच्या आयुष्याला योग्य वळण देण्याचा मिस् रुबेन यांचा सदोदित प्रयत्न चाले. मिस् रुबेन या शाळेंतील मुलींच्या स्फूर्तिदेवताच होत्या. त्या ज्या वर्गाच्या शिक्षक होत्या त्या वर्गांतील मुलींच्याकडून वर्गणी जमवून त्यांनीं त्या वर्गाची इंग्लिश पुस्तकांची सुंदर लायब्ररी केली होती. वर्गाचा अभ्यास म्हणजेच विद्यार्थ्यांचें सर्वस्व नसून त्यापलीकडे त्यांनीं जाऊन स्वतःचें ज्ञान वाढविलें पाहिजे असा त्यांचा उपदेश असे. त्यांच्या प्रोत्साहनामुळें कितीतरी मुलींना इंग्लिश वाङ्मयाची गोडी लागली. विद्यार्थिनींबद्दल आपलेपणाचें प्रेम बाळगणाऱ्या ज्या थोड्या अध्यापिका होऊन गेल्या त्यांत मिस् रुबेन यांची गणना होते. त्यांचा स्फूर्तिदायक आदर्श सतत समोर असल्यानें आळशी मुली उद्योगी बनल्या व अभ्यासाव्यतिरिक्त

इतर पुस्तकांना स्पर्श न करणाऱ्या मुली इंग्रजी ग्रंथांच्या वाचनांत तन्मय होऊं लागल्या. मिस् रुबेनशीं एक शब्द तरी दिवसांत बोलावयास सांपडावा अशी मुलींची धडपड सुरू असे. एखादे शिक्षक गैरहजर असल्यास त्यांच्याऐवजीं मिस् रुबेन यांनीं तास घेतला तर मुलींचा आनंद विचारावयासच नको!

मुली सभाधीट होऊन वक्तृत्वकलेमध्यें प्रवीण व्हाव्या या हेतूनें त्यांनीं 'वनितासमाजा'चें पुनरुज्जीवन केलें. त्यांच्याच प्रोत्साहनामुळें वनितासमाजानें 'बालिकादर्श' मासिक सुरू केलें. वनितासमाजाच्या प्रत्येक सभेस हजर राहून त्या उत्तेजन देत. त्यांनीं हायस्कूलच्या शिक्षणक्रमांत नवचैतन्य निर्माण केलें. सायंकाळच्या वेळीं व सुटीच्या दिवशीं त्या मुलींना निरनिराळे खेळ खेळावयास लावीत. या सर्व गोष्टी कर्तव्य म्हणून नव्हे तर हौसेनें व स्वेच्छेनें त्या करीत ही लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. सारेच शिक्षक काम करतात, परंतु मिस् रुबेन-सारख्या आपल्या कर्तव्यास तनमनधन वाहणाऱ्या अध्यापिका क्वचितच आढळतात.

दिवाळीची अगर उन्हाळ्याची सुटी झाली म्हणजे मिस् रुबेन यांच्या सहवासास आपण अंतरणार या विचारानें मुली खिन्न होत व त्यांच्याकडून पत्रें पाठविण्याचीं वचनें घेतल्यावांचून त्यांना राहवत नसे. खरोखर, लहान मुलामुलींच्या शुद्ध अन्तःकरणांतील प्रेमापेक्षां या जगतांत अधिक निर्मल व मनोहर अशी कोणती वस्तु आहे? अशा निर्मल प्रेमाचा वर्षाव विद्यार्थिनी मिस् रुबेनवर करीत होत्या. कितीतरी बालकवयित्रींना मिस् रुबेन यांच्याकडून स्फूर्ति मिळाली होती.


याप्रमाणें मिस् रुबेन यांच्या प्रेमळ सहवासांत मुलींचें जीवित जात असतां हायस्कूल व ट्रेनिंग कॉलेज विभक्त होऊन मिस् रुबेन यांची नेमणूक ट्रे. कॉलेजवर होणार ही अनिष्ट वार्ता कानीं पडतांच किती कोंवळीं अंतःकरणें दुखविलीं जाऊन किती मुलींनीं अश्रू ढाळले असतील याची कल्पनाच कोणास येणें शक्य नाहीं. शाळेंतील चिमण्या जगांत शिक्षकीण म्हणजे मुलींना सर्वस्व वाटत असतें. व तिच्यावरच लहान जीवांचें सुखदुःख पूर्णपणें अवलंबून असतें. मिस् रुबेन हायस्कूल-मधून जाणार ही बातमी खोटी ठरावी म्हणून मुलींनीं परमेश्वराची प्रार्थना करावी. परंतु अखेर या प्रार्थनांचा कांहींच उपयोग झाला नाहीं. कारण एक दिवस मुली शाळेंत येतात तों सारीं वेळापत्रकें बदलून नवीन शिक्षक शिकवावयास आल्याचें त्यांना दिसलें. इतक्यांत 'बुडत्याला काडीचा आधार' या न्यायानें ट्रे. कॉलेज दोन चार महिने हुजुरपागेंतच राहणार असल्याचें वृत्त कळल्यानें मुलींना जरासा

थीर आला. त्या ज्या वर्गावर शिकवीत त्या वर्गातील मुलींनीं त्यांचा वाढदिवस मोठ्या समारंभानें साजरा केला. त्या प्रसंगीं मुलींनीं त्यांच्यावर रचलेलें एक संस्कृत संभाषण, मराठी संभाषण, गाणीं इत्यादि कार्यक्रम करून त्यांना एक छोटी पार्टी दिली. मुलींना उद्देशून भाषण करतांना मिस् रुबेन गहिंवरून आलेल्या दिसल्या. तो दिवस तत्कालीन विद्यार्थिनींच्या स्मरणांत कायम आहे.

मिस् रुबेन यांची ट्रेनिंग कॉलेजकडे बदली झाल्यामुळें त्यांच्या हाताखालीं शिकून तयार होण्याचीं अनेक मुलींचीं मनोराज्यें विलयास गेलीं व कांहीं काळपर्यंत त्यांचा उत्साह नष्ट होऊन शाळेच्या जीवनक्रमांतील त्यांचा आनंद बराच कमी झाला. ट्रेनिंग कॉलेजमध्यें मिस् रुबेन यांची कर्तबगारी उत्तम रीतीनें दृष्टोत्पत्तीस आली. त्यांच्याच परिश्रमानें ट्रे. कॉलेजचें प्रॅक्टिसिंग स्कूल म्हणजे एक नमुनेदार शाळा झाली. इ. स. १९१७ सालीं बडोद्याच्या स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेजच्या त्या प्रिन्सिपॉल झाल्या. परंतु ती मोठ्या मानाची नोकरी सोडून आपल्या ज्ञातीच्या उन्नतीसाठीं मुंबईस त्यांनीं स्वतंत्र शाळा स्थापन केली. हल्लीं बेने इस्राएल स्कूलच्या प्रिन्सिपॉल म्हणून त्या निःस्वार्थ बुद्धीनें काम करीत आहेत. आदर्श अध्यापिका व समाजसेविका या दृष्टीनें त्यांचें उदाहरण स्फूर्तिदायक आहे. असो.

मिस् न्यूलंड यांनीं हायस्कूलच्या लायब्ररीकरतां पैसा मिळविण्यासाठीं एक खेळाचा कार्यक्रम केला होता. भूगोल हा त्यांचा विशेष आवडता विषय असे. त्या नेहमीं नवीन कल्पना काढून शिक्षणक्रमांत सुधारणा करीत. त्यांच्या वेळींच 'बागकाम' हा विषय शिक्षणक्रमांत घालण्यांत आला. बागेंत अंगमेहनत करणाऱ्या मुलींना व्यायाम होऊन शिवाय त्यांची करमणूकहि होत असे. मिस् रुबेन यांनीं ट्रेनिंगच्या मुलींच्याकडून सुंदर बाग करविली असल्याचें पुष्कळांच्या ध्यानांत असेल. प्रत्येक मुलीची निरीक्षणाची वही असून तींत तिला बागेंतील फुलझाडांसंबंधीं टिपणें लिहावीं लागत. बागेचा तास साऱ्या मुलींना प्रिय असे.

इ. स. १९१४ सालीं महायुद्ध सुरू झालें. मिस् वाडिया यांनीं प्रत्येक वर्गाला त्या वेळीं महायुद्धाची माहिती करून दिली. युद्धाच्या हकिकती इतिहासाच्या पुस्तकांतच वाचावयाच्या अशी लहान मुलींची समजूत असल्यानें युद्धाच्या बातम्या ऐकून त्यांना फार आश्चर्य वाटे. 'War News' या सदराखालीं युद्धाचें वर्तमान शाळेच्या नोटिस बोर्डावर लागत असे. शाळेंत आल्याबरोबर त्याभोंवतीं मुलींचा गराडा पडलेला दिसे.



डॉ. मिस् झिराड, एम्. डी. (लंडन)



मिस् रिबेका रुबेन, बी. ए., टी. डी. (लंडन)
प्रि. एलिकदरी हायस्कूल, माजगांव

Wagle Press, Bombay, 1

ट्रेनिंग कॉलेजचें स्थलांतर

स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेजकडे हायस्कूलची अर्धी इमारत असल्यानें हायस्कूलच्या प्रगतीस प्रतिबंध झाला होता. बोर्डिंगमध्यें ट्रेनिंग कॉलेजच्या विद्यार्थिनींनीं बरीच जागा व्यापिली होती. त्यामुळें हायस्कूलमध्यें प्रवेश मिळविण्याची इच्छा करणाऱ्या अनेक मुलींचे अर्ज नाकारावे लागत होते. ट्रेनिंग कॉलेज म्हणजे मुख्य संस्था व हायस्कूल म्हणजे कनिष्ठ संस्था असा भास उत्पन्न होत असे. ही परिस्थिति दोन्ही संस्थांच्या प्रगतीस हानिकारक असल्यानें इ. स. १९१६ सालच्या जानेवारी महिन्यांत दोन्ही संस्था विभक्त होऊन त्याच वर्षीच्या जून महिन्यांत ट्रेनिंग कॉलेज हुजुरपागेंतून कँपमध्यें गेलें. अर्थात् मिस् न्यूलंड ट्रेनिंग कॉलेजच्या सुपरिंटेंडेंट म्हणून तिकडेच गेल्या. मिस् पेन, मिस् वाडिया, मिस् रुबेन व श्री. कारखानीस यांच्या साहाय्यानें त्यांनीं त्या संस्थेची फार उन्नति केली.

मिस् न्यूलंड यांच्यामागून मिस् बर्न हायस्कूलच्या लेडी सुपरिंटेंडेंट झाल्या व त्यांच्या कारकीर्दीपासूनच शाळेच्या खऱ्या प्रगतीस प्रारंभ झाला.

प्रकरण चौदावें

प्रगतीचें खरें स्वरूप

मिस् बर्न (मिसेस् ग्रीन)

ट्रेनिंग कॉलेज विभक्त होऊन सर्व ट्रेन्ड शिक्षक तिकडेच गेल्याकारणानें मिस् बर्न यांच्यावर हायस्कूलची मोठी जबाबदारी येऊन पडली. त्या वेळीं हायस्कूलच्या शिक्षकवर्गांत स्वतः मिस् बर्न यांच्याशिवाय मुंबईच्या ट्रेनिंग कॉलेजमधून शिक्षण घेऊन आलेले फक्त एकच शिक्षक होते. बहुतेक सर्व शिक्षक व शिक्षकिणी नवीन असून त्यांना शिकविण्याची पद्धति लाविण्याचें कार्य मिस् बर्न यांना करावें लागे. त्या वेळीं शिक्षकिणींना मुंबईच्या ट्रेनिंग कॉलेजमध्यें शिक्षण घेण्याची बंदी होती. त्यामुळें मिस् बर्न यांचें काम अधिक अवघड झालें. परंतु त्या स्वतः फार मेहनती व विद्वान् असल्यानें नवीन शिक्षकांच्या वर्गांवर वेळोवेळीं जाऊन, त्याचें शिकविणें पाहून त्या त्यांना उपयुक्त सूचना करीत. यामुळें शिक्षकांच्या कामावर योग्य देखरेख होऊन शिकविण्याच्या बाबतींत त्यांची प्रगति होत असे. शिक्षकिणींची एस्. टी. सी. ची परीक्षा इन्स्पेक्टर शाळेंत घेत. पाठाची तयारी करण्यास त्या शिक्षकिणींना होसेनें मदत करीत. केव्हां केव्हां शिक्षकवर्गासमोर त्या भूगोलाचे पाठ देत. पुरुषशिक्षक व स्त्रीशिक्षक असा भेद त्या केव्हांच करीत नसत अथवा शिक्षकांना टाकून बोलून दुखवीत नसत. यामुळें सारा शिक्षकवर्ग नेहमीं संतुष्ट असे. कोणी शिक्षक गैरहजर असल्यास त्या वर्गावर जाऊन मिस् बर्न स्वतः शिकवीत. याचा दुहेरी उपयोग होई. मुलींचा वेळ फुकट न जातां मिस् बर्न यांना त्या शिक्षकाच्या कामाची योग्य पारख करण्यास संधी सांपडे.

ऑफिसचें बरेंचसें काम त्या स्वतः करीत. शाळेंत येणाऱ्या नवीन मुलींचीं नांवें शाळेच्या जनरल रजिस्टरमध्यें घालणें व शाळा सोडून जाणाऱ्या मुलींचीं नांवें काढणें (Admissions & Withdrawals) हीं कामें अत्यंत त्रासाचीं व दगदगीचीं असूनहि त्या स्वतः करीत, ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. याशिवाय इतर शिक्षकांप्रमाणें शिकविण्याचें बरेंच काम त्या करीत. इंग्लिश सातवीचें इंग्लिश, इंग्लिश निबंध व व्याकरण, इतिहास, इंग्रजी सहावीचा भूगोल, इंग्लिश पांचवी व सहावीचें इंग्लिश गायन, पांचवी अथवा सहावीपैकीं एखाद्या वर्गाचें ड्रिल इत्यादि

विषय त्या घेत. भूगोल हा विषय त्यांचा विशेष आवडीचा होता. स्वाभाविक भूगोल (Physical Geography) त्या अत्यंत मनोरंजक रीतीनें शिकवीत. अवघड विषयहि मुलींच्या मनावर त्या सहज रीतीनें बिंबवीत. त्यांचा भूगोलाचा व इंग्रजीचा तास मुलींना फार आवडत असे व त्यांनीं विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याच्या बाबतींत मुलींची स्पर्धा चाले. इंग्लिश गायनाचा तास मजेंत जाई. आम्ही मुली दर आठवड्यास त्यांच्या पियानोभोंवतीं जमून नवीन गाणीं शिकत असूं. फ्रान्स, रशिया वगैरे देशांचीं त्यांनीं शिकविलेलीं राष्ट्रगीतें त्या वेळच्या विद्यार्थिनींना स्मरत असतील.

मिस् बर्न यांचा स्वभाव प्रेमळ असून त्यांच्या अंगीं पराकाष्ठेचें सौजन्य असे. त्यांच्याकडे मुलींचे पालक वगैरे भेटावयास गेल्यास त्या त्यांना आदरानें वागवीत. हिंदु लोकांच्या भावना, विचार व चालीरीती यांची त्यांना चांगली माहिती असून आजूबाजूची परिस्थिती लक्षांत घेऊन त्या वागत. इतर युरोपिअन अधिकाऱ्यांत एतद्देशीयांच्यासंबंधीं जी एक प्रकारची अनुदार व बेपर्वाईची वृत्ति असते तिचा लवलेशहि त्यांच्या अंगीं नव्हता. शाळा व शाळेंतील मुली यांच्या विषयीं त्यांच्या मनांत आपलेपणाची भावना सतत जागृत असल्यानें मुलींना व शिक्षकांना त्या आपल्यापैकींच वाटत.

बोर्डिंगच्या मुलींना त्यांच्या प्रेमळपणाचा वरचेवर अनुभव येई. कोणी मुलगी आजारी झाल्यास त्या रात्रीं अपरात्रीं सुद्धां तिला पाहावयास येत. त्या वेळीं श्री. सारजाबाई बापट, नर्स, या हिंदु बोर्डिंगच्या मेट्रन असत. मिस् एम्. जोसेफ या ज्यू व खिश्चन बोर्डिंगची व्यवस्था पाहात. परंतु केवळ मेट्रनवर बोर्डिंगची व्यवस्था टाकून त्या शाळेंतून एक दिवस सुद्धां बाहेरगांवीं जात नसत. एकदां त्यांची बहिण बरेच दिवसांनीं त्यांना भेटावयास आली. त्यामुळें चार दिवसांची रजा काढून त्यांना जावें लागलें. त्या वेळीं बोर्डिंगचा चार्ज मिस् डेव्हिड यांच्याकडे देऊन त्या येईपर्यंत शाळेमध्यें त्यांना राहावयास सांगितलें. यावरून बोर्डिंगवर त्यांची किती सक्त देखरेख होती याची कल्पना येईल.

मुलींच्या खोल्या व जेवणघर यांना त्या अचानकपणें भेट देत. प्रत्येक खोलीची व्यवस्था पाहणारी एक मुलगी असे. खोलींत अव्यवस्था असेल तर त्या ती गोष्ट तिच्या नजरेस आणीत. मिस् बर्न खोल्या केव्हां पाहावयास येतील याचा नेम नसल्यानें मुली नेहमीं आपआपली खोली शक्य तितकी स्वच्छ ठेविण्याचा

प्रयत्न करीत. आजारी मुलींना आवडतील असे पथ्याचे पदार्थ त्या केव्हां केव्हां पाठवीत असत. नाताळच्या सणांत हिंदु बोर्डिंगमधील मुलींच्यासाठीं कांहीं तरी पक्वान्न करण्यास त्या पैसे देत व ख्रिश्चन मुलींना आठवणीनें ख्रिस्मस् केक पाठवीत.

त्यांच्याच कारकीर्दीत नामदार चौबळ यांनीं शाळेमध्यें टेनिसकोर्ट करण्यासाठीं रु. ५०० ची देणगी दिली होती. टेनिस कोर्ट तयार झाल्यावर मिस् बर्न यांनीं मुलींना टेनिस खेळावयास शिकविलें. टेनिसच्या बाबतींत त्या वेळीं संस्थेंत असलेले सायन्स शिक्षक श्री. गोडबोले यांनींहि मुलींना उत्तम प्रकारचें साहाय्य केलें. सायंकाळच्या वेळीं मिस् बर्न मुलींशीं टेनिस खेळत अथवा केव्हां केव्हां त्यांच्याबरोबर मजेनें गोष्टी करीत बागेमध्यें हिंडत. त्यांच्या वेळीं 'राउंडर्स' हा खेळ लहान मुलींना विशेष आवडत असे. त्यांनीं मुलींच्यासाठीं चार बॅडमिंटन् कोर्टें तयार करविलीं होतीं. त्यांचा फायदा बोर्डिंगच्या व बाहेरून शाळेला येणाऱ्या विद्यार्थिनींनींहि घ्यावा अशी त्यांची इच्छा असे. परंतु खेळण्याचा कंटाळा म्हणून म्हणा अगर घरीं जाण्यास उशीर होतो म्हणून म्हणा, बाहेरून येणाऱ्या मुलींच्यापैकीं दोन चारच मुली काय त्या बॅडमिंटन् खेळावयास सायंकाळीं शाळेमध्यें थांबत. टेनिस, बॅडमिन्टन्खेरीज खो खो, हुतूतू इत्यादि देशी खेळहि मुली खेळत असत. मुलींच्या खेळांवर देखरेख करण्याचें काम वरच्या वर्गावरील शिक्षकिणींना आळीपाळीनें शाळा सुटल्यानंतर करावें लागे. त्या वेळीं मॅट्रिकच्या वर्गातील मुलीहि खालच्या वर्गातील मुलींच्यामध्यें मिसळून दुपारच्या सुट्टींत खो खो सारखा कांहीं तरी खेळ खेळत. या खेळांखेरीज स्वीडिश ड्रिल इंग्लिश सातवीखेरीज सर्व वर्गांना शिकविलें जात असे.

बोर्डिंगमधील मुलींना गृहव्यवस्थेचें शिक्षण देण्याची त्यांनीं व्यवस्था केलेली होती. दर महिन्यास कोठारावर दोन मुलींची नेमणूक करीत. कोठारांतील धान्य वगैरे रोज काढून देऊन हिशेब मांडणें हें काम त्या दोघींना करावें लागत असे. लहान मुलींनीं भाजी निवडून द्यावी व आळीपाळीनें जेवावयाच्या वेळीं वाढावें असा बोर्डिंगचा नियम होता. रोजच्या स्वयंपाकाचें काम मुलींच्याकडे नसलें तरी सणाच्या दिवशीं कित्येक वेळां मुख्य पक्वान्न मुली करीत. एखादे वेळीं वनभोजनास जावयाचें असलें तर फराळाचे पदार्थ मुली हौसेनें तयार करीत. वनितासमाजाचा पहिला वाढदिवस साजरा करण्यांत आला. त्या वेळीं सर्व पदार्थ मुलींनीं तयार केले होते. हिंदु मुलींना सामान्यतः स्वयंपाकाचें ज्ञान असतें असें मिस् बर्न यांचें मत होतें.



मिसेस् के. एस्. बर्न-ग्रीन,
लेडी सुपरिंटेंडेंट - १९१५ ते १९२०



मिस् एच्. एस्. फिल्डिंग,
लेडी सुपरिंटेंडेंट १९२१ ते १९२८

Wagle Press, Bombay, 1

याप्रमाणें स्वच्छता, टापटीप, शिस्त यांचें मुलींना बोर्डिंगमध्यें शिक्षण देऊन पुढील आयुष्यांत त्यांना घरांतील गोष्टी व्यवस्थितपणें पार पाडतां याव्या अशा दृष्टीनें बोर्डिंगच्या व्यवस्थेकडे मिस् बर्न लक्ष घालीत.

मॅट्रिकच्या वर्गांतील बोर्डिंगमधील मुलींची मिस् बर्न विशेष काळजी घेत. वजन करावयाचें यंत्र मुद्दाम बोर्डिंगसाठीं आणविलें होतें. दर पंधरा दिवसांनीं मेट्रन मुलींचें वजन करीत. मुलीचें वजन कमी झालेलें आढळल्यास तिला ताबडतोब डॉक्टरकडे पाठवून कांहींतरी शक्तिवर्धक औषध घ्यावयास त्या लावीत. मॅट्रिकच्या वर्गांतील मुलींना रोज रात्रीं कोको देण्यास त्या सांगत. बहुधा दर रविवारीं त्यांना आपल्या माडीवर बोलावून त्यांच्यासाठीं त्या कांहींतरी खेळ खेळत. लपविलेली वस्तु शोधून काढणें, म्यूझिकल चेअर्स (Musical Chairs), निरीक्षण (Observation race) अशा प्रकारचे करमणुकीचे खेळ खेळण्यांत मुलींचा वेळ आनंदांत जात असे. वर्षाच्या शेवटीं मिस् बर्न मॅट्रिकमधील विद्यार्थिनींना त्या शाळा सोडून जाणार म्हणून चहापार्टी देत असत. मॅट्रिकची परीक्षा जसजशी जवळ येईल तसतशी मुलींच्या प्रकृतीची त्या अधिक काळजी घेत. एकदां तर प्रत्येक मुलीला परीक्षेच्यापूर्वी एक महिनाभर रोज एक क्विनीनची गोळी देण्याचा त्यांनीं परिपाठ ठेविला होता. परीक्षेच्या वेळीं त्या मुलींच्याबरोबर जाऊन त्यांची नीट व्यवस्था आहे किंवा नाहीं हें स्वतः पाहात व परीक्षा चालू असतां प्रत्येक मुलीच्या पेपरची अतिशय काळजीनें चौकशी करीत. दुपारच्या फराळाच्या वेळीं मेट्रन हजर असतांना आपणहि स्वतः येत व निराश झालेल्या मुलींशीं ममतेनें बोलून सर्व प्रकारें उत्तेजन देत. विद्यार्थिनींबद्दल त्यांना किती प्रेम व सहानुभूति असे हें यावरून सहज कळेल.

त्यांच्या कारकीर्दींत युरोपमध्यें महायुद्ध सुरू झालें होतें. युद्धफंडासाठीं पैसा जमविण्यासाठीं त्यांनीं नाना तऱ्हेचे प्रयत्न केले. १० जुलै १९१६ हा दिवस 'Children's Day' म्हणून ब्रिटिश साम्राज्यांतील सर्व शिक्षणसंस्थांनीं साजरा करावा अशा प्रकारचें विनंतिपत्रक २७ मे १९१६ रोजीं मुंबईच्या टाइम्समध्यें "Empire Children's Day—An Appeal to Indian Schools" या मथळ्या-खालीं प्रसिद्ध झालें होतें. त्यामध्यें प्रत्येक शाळेंतील मुलामुलींनीं कांहीं तरी मनोरंजक कार्यक्रम करून पैसे जमवावे व बेल्जमूमधील लक्षावधी आपद्‌ग्रस्त मुलांना ते पाठवावे अशी विनंति करण्यांत आली होती. इंग्लंडमधील शिक्षणमंत्री मिस्टर

आर्थर हेंडरसन् यांनीं इंग्लंडमधील शाळांना १० जुलै हा दिवस साजरा करण्याचा हुकुम केला होता. हिंदुस्थानांतील सरकारी शिक्षणसंस्थांना शिक्षणखात्यानें असाच हुकुम सोडला होता. त्याप्रमाणें मिस् वर्न यांनींहि १० जुलै १९१६ रोजीं हायस्कूल-मध्यें इंग्लिश, संस्कृत व मराठी संभाषणें, गाणीं इत्यादिकांचा उत्कृष्ट कार्यक्रम मुलींच्याकडून करविला. त्या वेळच्या 'संदेश' वर्तमानपत्रांत या कार्यक्रमाचा सविस्तर वृत्तांत आला होता. संस्कृत-शिक्षक श्री. रड्डीशास्त्री यांनीं अत्यंत परिश्रम करून संस्कृत शाकुंतलाचा अंक बसविला होता, तो सर्वांना फार आवडला. मिस् वर्न यांना तो इतका पसंत पडला कीं, शाळा पाहावयास कोणी आलें कीं पाहुण्यांच्यासमोर त्या मुलींना बोलावून शाकुंतलाचा प्रयोग करावयास लावीत. मुलींनीं गोड गळ्यावर म्हटलेले संस्कृत श्लोकहि त्यांना फार आवडत असत. श्री. रड्डीशास्त्री यांनीं शिकविलेला 'इयं हि सर्वमंगला स तु स्मशानमंदिरः।' इत्यादि श्लोक त्यांना अतिशय आवडत असून 'तुमचे यं म्हणा' असा त्या मुलींना नेहमीं आग्रह करीत. असो. वेल्जमफंडासाठीं केलेल्या खेळाचें सुमारें साडेतीनशें रुपये उत्पन्न झालें व तें शाळेमार्फत वेल्जम् फंडास मदत म्हणून पाठविण्यांत आलें.

इ. स. १९१५ मध्यें हायस्कूल व ट्रेनिंग कॉलेज या दोन्ही संस्था एकत्र असतां मुलींनीं तयार केलेल्या वस्तूंचें "फॅन्सि फेअर" भरविण्यांत आलें होतें, त्याचें उत्पन्न युद्धफंडास मदत म्हणून लेडी वुइलिंग्डन् यांच्याकडे रवाना करण्यांत आलें. इ. स. १९१६ व १९१७ सालीं ४ मार्च रोजीं मुलींनीं गाणीं, संभाषणें यांचे फक्त मुलींच्यासाठीं कार्यक्रम केले. खेळ पाहावयास येणाऱ्या विद्यार्थिनींकडून थोडी वर्गणी घेण्यांत आली होती. खेळांचें उत्पन्न युद्धफंडास मदत म्हणून शाळेनें पाठविलें. इ. स. १९१४ सालीं युद्धावर गेलेल्या शिपायांच्यासाठीं मुलींनीं खाकी शर्ट शिवून दिले. इ. स. १९१६ मध्यें मुंबईंतील 'War Fete' करितां शाळें-तील मुलींनीं सुबक वस्तु व खेळणीं पाठविलीं. अशा रीतीनें पुढाकार घेऊन मिस् वर्न यांनीं शाळेंतील मुलींच्याकडून युद्धाप्रीत्यर्थ बरीच कामगिरी करविली. युद्धाकडे मुलींचें लक्ष असावें यासाठीं दर आठवड्यास मिस् वर्न युद्धासंबंधीं माहिती सांगत. 'War-Lecture' म्हणून एक स्वतंत्र तासच वेळापत्रकांत घालण्यांत आला होता. याशिवाय श्री. घाटे यांचीं युद्धविषयक सदीप व्याख्यानें त्यांनीं करविलीं.

लेडी वुइलिंग्डन् यांनीं मुंबईस 'वुइमेन्स वॉर फंड' म्हणून संस्था सुरू केली होती. त्यांनीं 'वॉर रिलीफ फंड–शिशुशाखा' ही संस्था स्थापून हायस्कूलमधील

मुलींना तिचे सभासद करण्याविषयीं मिस् बर्न यांना विनंति केली. युद्धांत जखमी झालेल्या शिपायांना लहान मुलांनींहि आपल्या परीनें मदत करावी हा त्या संस्थेचा हेतु होता. शिशुशाखेच्या पहिल्या सेक्रेटरी मिसेस् टर्नबुल या होत. शिशुशाखेच्या सभासदांना वार्षिक एक रुपया वर्गणी असून प्रत्येकाला संस्थेचा बॅज देत असत. मिस् बर्न यांच्या प्रोत्साहनामुळें हायस्कूलमधील बऱ्याच मुली शिशुशाखेच्या सभासद झाल्या व शाळेच्या वतीनें जमलेला द्रव्यनिधी मुंबई येथील 'क्वीन् मेरी टेक्निकल स्कूल' या संस्थेकडे जखमी झालेल्या हिंदी शिपायांच्या उपयोगाकरितां पाठविण्यांत आला.

इ. स. १९१७ पासून हायस्कूलमध्यें नीतिशिक्षणाचे पाठ (Moral Lessons) सुरू झाले. इंग्लिश पांचवीपर्यंत पाठ मराठीमधून देण्यांत येत. सहावीला मात्र सर्वच विषय इंग्रजीमधून शिकवीत. ज्यांत सुंदर नीतितत्त्वें गोंवलेलीं आहेत अशा मनोरंजक गोष्टी शिक्षक वर्गात सांगत. केव्हां केव्हां मुली त्या गोष्टींतील मुख्य मुद्यावर वादविवाद करीत व आपणहि तशा प्रकारच्या गोष्टी सांगत. यावरून मुलींना तो गोष्टींचा तास फार प्रिय होता असें दिसतें. नीतिपाठांचा मुलींच्या रोजच्या वागणुकीवर उत्तम परिणाम होतो असें मिस् बर्न यांचें मत होतें.

इ. स. १९१३ पासून 'फर्स्ट एड' हा विषय हायस्कूलमध्यें आवश्यक करण्यांत आला. प्रथम शिक्षकवर्गाला त्या विषयाचा अभ्यास करून परीक्षा द्यावी लागली. या विषयासंबंधीं स्त्री-डॉक्टरचीं सुमारें सहासात व्याख्यानें होत. सेंट जॉन ॲम्ब्युलन्सतर्फे कोणीतरी डॉक्टर मुलींची परीक्षा घेत व पास झालेल्या मुलींना सर्टिफिकिटें देण्यांत येत. परीक्षेची तयारी करण्यांत मिस् बर्न मुलींना फार मदत करीत.

हायस्कूलमध्यें मुंबईच्या स्कूल ऑफ आर्टनें आंखलेला ड्रॉइंग कोर्स सुरू होता. शिवणकाम मिसेस् जेकब व त्यांच्यानंतर मिसेस् सॅम्युअल या शिकवीत असत. कपडे बेतावयास त्या प्रथमच शिकवूं लागल्या. त्यापूर्वी कपडे बेतून देण्याचें काम शिक्षकिणीस करावें लागत असे.

'बागकाम' या विषयाकडे मिस् बर्न बरेंच लक्ष पुरवीत. एंप्रेस व बॉटॅनिकल गार्ड्न्समधून बीं व रोपें आणवून त्या निरनिराळ्या वर्गांना देत. श्री. गोडबोले यांच्या साहाय्यानें इंग्रजी सहावींतील मुलींनीं एक गुलाबांची बाग (Rose Garden) तयार केली होती. तींतील कांहीं झाडें अद्याप आहेत.

इ. स. १९१५ पासून इंग्रजी पांचवीपर्यंतचें शिक्षणाचें माध्यम मराठी झालें. त्यामुळें इतिहास व भूगोल हे विषय मुलींना लवकर समजून, थोड्या वेळांत पुष्कळ अभ्यास होऊं लागला. इंग्रजी भाषा समजून घेण्यांत व स्पेलिंग पाठ करण्यांत मुलींचा जो वेळ व्यर्थ जात असे, त्या वेळांत त्यांना त्या विषयाचा खोल अभ्यास करण्यास फुरसत सांपडूं लागली. इंग्रजी विषय येत नसल्यास पूर्वी मुलींना इतिहास-भूगोलामध्येंहि अपयश येत असे. परंतु शिक्षणाचें माध्यम बदलल्यामुळें मुलींना हे विषय सोपे वाटूं लागले. त्याच सालापासून सायन्स हा विषय इंग्रजी पहिलीपासून शिकविण्यांत येऊं लागला. शास्त्रीय प्रयोग मुली स्वतः करूं लागल्यामुळें सायन्स हा त्यांच्या आवडीचा विषय झाला. शाळेंतील अभ्यासाच्या विषयांबद्दल मुलींना अधिक आवड उत्पन्न व्हावी म्हणून मिस् बर्न त्यांना बोटॅनिकल गार्डन, पर्वती, तळेगांवचा कांचकारखाना, मुंढव्याची कागदाची गिरणी, मांजरी येथील उंसाचें फार्म इत्यादि शैक्षणिक दृष्टीनें उपयुक्त अशीं स्थानें पहावयास पाठवीत.

मिस् बर्न यांच्या कारकीर्दींत बक्षिस-समारंभ झाले नाहींत. सोसायटीनें पैशाच्या अभावीं बक्षिस-समारंभ केले नसावेत असें वाटतें. परंतु त्यामुळेंच तत्कालीन बुद्धिमान् विद्यार्थिनींच्या हुषारीचें जितकें अभिनन्दन होणें जरूर होतें तितकें झालें नाहीं. ४ मार्च १८८५ रोजीं हायस्कूलच्या इमारतीचा पाया घालण्यांत आला. त्या दिवसाची सर्वांना स्मृति असावी म्हणून दर वर्षी ४ मार्च हा दिवस कांहींतरी मनोरंजक कार्यक्रम करून साजरा करण्याचा उपक्रम मिस् बर्न यांनीं सुरू केला. मुलींच्या अभ्यासाविषयीं पालक व आईबाप यांना पूर्ण माहिती असावी म्हणून प्रगति-पुस्तकेंहि त्यांच्या कारकीर्दींत सुरू करण्यांत आलीं.

मुली इंग्लिश भाषेमध्यें प्रवीण व्हाव्या यासाठीं मिस् रुबेन यांनीं Literary Society स्थापन केली होती. मिस् रुबेन ट्रेनिंग कॉलेजकडे गेल्यानंतर मिस् बर्न यांनीं ती चालू ठेविली. लिटररी सोसायटीतर्फे मिस् दस्तुर या "Literature Class" आठवड्यांतून एक तास शाळा सुटल्यानंतर घेत असत. मिस् रुबेन यांनीं टेनिसन्चें प्रिन्सेस काव्य व मिस् दस्तुर यांनीं टेनिसनचें 'Coming and Passing of Arthur', स्कॉटचें 'Lady of the Lake', शेक्सपिअरचीं नाटकें इत्यादि पुस्तकें मुलींना शिकवून त्यांच्यामध्यें इंग्लिश् वाङ्मयाची गोडी उत्पन्न केली. मिस् फील्डिंग व मिस् वाडिया यांच्या कारकीर्दींत हा क्लास चालू होता. पुढच्या लेडी सुपरिंटेंडेंटच्या कारकीर्दींत तो कां बंद पडला याचें कारण समजलें नाहीं.

'Lady of the Lake' या काव्यांतील उताऱ्यांचें गद्य-पद्यात्मक भाषांतर करून व त्यांतील प्रसंगांना अनुलक्षून सुंदर सुंदर चित्रें काढवून त्यांचें एक अतिशय मनोहर असें हस्तलिखित इ. स. १९१८ च्या डिसेंबरमध्यें इं. सहावी व सातवीच्या मुलींनीं मिस् बर्न यांना अर्पण केलें होतें. तें पुस्तक मिस् बर्न यांना इतकें आवडलें कीं शाळेंतील मुलींच्या बुद्धिमत्तेची व कलाप्राविण्याची साक्ष म्हणून त्या सर्वांना तें नेहमीं दाखवीत असत. एवढेंच नव्हे तर त्याचें स्मरण त्यांनीं अद्यापपर्यंत ठेविलें आहे. हें हस्तलिखित पुस्तक मुलींच्याकडून तयार करविण्याचें काम त्या वेळच्या उत्साही शिक्षक मिस् दस्तुर यांनीं केलें. यावरून "Literature Class" बद्दल मुलींना किती आवड होती हें स्पष्ट दिसतें.

माजी विद्यार्थिनींचा शाळेशीं संबंध राहावा म्हणून 'बालिकादर्श' नांवाचें मासिक त्यांच्या संपादकत्वाखालीं सुरू झालें. त्याप्रमाणेंच Old Girls' Association (माजी-विद्यार्थिनींचा-संघ) स्थापन करण्याचा मनोदय त्यांनीं शिक्षणखात्याकडे इ. स. १९१७ सालीं पाठविलेल्या शाळेच्या रिपोर्टांत स्पष्टपणें नमूद केलेला आढळतो.

मुलींचा सेवासंघ (Children's Guild of Service) या संस्थेची स्थापना लेडी वुइलिंग्डन् यांनीं इ. स. १९१७ सालीं केली. इ. स. १९१९ सालीं मिस् बर्न यांच्या प्रोत्साहनामुळें हायस्कूलमधील मुलींचीं नांवें या संघामध्यें दाखल करण्यांत आलीं.

इ. स. १९१८ मध्यें महायुद्धाची समाप्ति होऊन तह झाला. तो दिवस हायस्कूलमध्यें मिस्टर वेस्ट्रॉप यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला व ज्या मुलींनीं टेनिस, बॅडमिंटन, खोखो वगैरे खेळांत प्राविण्य दाखविलें होतें त्यांना मिसेस् वेस्ट्रॉप यांच्या हस्तें बक्षिसें मिळालीं.

मिस् रुबेन यांनीं स्थापन केलेल्या 'वनितासमाजा'स त्यांनीं चांगलें उत्तेजन दिलें. वनितासमाजाच्या सभेस त्या हजर राहात व एक दोन वेळां त्यांनीं अध्यक्ष म्हणून भाषणेंहि केलीं होतीं. वनितासमाजाचा वार्षिकोत्सव पार पाडण्यास त्यांचें मुलींना अमूल्य साहाय्य होत असे.

त्यांच्या कारकीर्दीच्या अखेरीस फार थोडया मुली फ्रेंच भाषा घेत, म्हणून तो विषय अजिबात गाळण्यांत आला. त्याऐवजीं मुसलमान मुलींच्यासाठीं म्हणून पर्शियन शिकविण्याची शाळेंत तजवीज करण्यांत आली.

इ. स. १९१९ मध्यें डेक्कन जिमखान्यावर श्री. वी. एन्. भाजेकर यांनीं पुढाकार घेऊन प्रेसिडेन्सी वुइमेन्स स्पोर्ट्स् ॲंड गेम्स् टूर्नमेंट भरविली. त्या टूर्नमेंट-मध्यें पुण्यांतील सर्व स्त्री-संस्थांनीं भाग घेतला होता. त्या वेळीं हायस्कूलच्या कु. वर्धा नायडू, कु. महालक्ष्मी नायडू, कु. शरयु किर्लोस्कर (मिसेस पुणतांबेकर) इत्यादि मुलींनीं टेनिस, बॅडमिंटनमध्यें मोठा विजय संपादन करून बक्षिसें मिळविलीं. खो खो, हुतूतू वगैरे देशी खेळांमध्यें हायस्कूलच्या टीम्स विजयी झाल्या. या टूर्नमेंटमध्यें हायस्कूलचें नांव विशेष गाजलें. त्यामुळें मिस् बर्नना साहजिक फार आनंद व अभिमान वाटला.

मुलींच्या शिक्षणासंबंधीं सरकारी शिक्षणखात्यानें निरनिराळ्या शाळांवरील मुख्य अधिकाऱ्यांचीं मतें इ. स. १९१७ मध्यें मागविलीं होतीं. त्या वेळीं मिस् बर्न यांनीं मुलींच्या शिक्षणासंबंधीं उपयुक्त सूचना केल्या होत्या. त्यांच्या मतें इंग्रजी चौथीपर्यंतचा हल्लींचा शिक्षणक्रम कायम ठेवून पांचवीपासून मॅट्रिकच्या विद्या-र्थिनींचा एक व व्यावहारिक शिक्षणाचा एक असे दोन स्वतंत्र अभ्यासक्रम शाळे-मध्यें सुरु करावे. व्यवहारोपयोगी शिक्षणक्रमांत इंग्लिश, मराठी, गायन, ड्रॉइंग, गृहोपयोगी कला (Home-craft) या विषयांचा समावेश करावा. हे विषय मॅट्रिक परीक्षेस ऐच्छिक करावे अशी विश्वविद्यालयास विनंति करावी अशीहि त्यांनीं सूचना केली. ती सूचना मंजूर झाल्यास हे विषय घेणाऱ्या मुलींना कॉलेजमध्यें प्रविष्ट करून घेऊन त्यांना गृहजीवनशास्त्र, शारीरशास्त्र, शिशुमानसशास्त्र इत्यादि विषयांचा अभ्यास करतां येईल अशी विश्वविद्यालयानें व्यवस्था करावी असें स्पष्ट मत त्यांनीं प्रदर्शित केलें आहे. त्यांच्या या सूचना महत्वाच्या असून विचारणीय आहेत ही गोष्ट कबूल केली पाहिजे.

इ. स. १९१३ पासून हायस्कूलमधील मुलींची संख्या अधिकाधिक वाढूं लागली. ता. ३१ मार्च १९१३ रोजीं हायस्कूलमध्यें २५३ मुली होत्या. ३१ मार्च १९१७ रोजीं हायस्कुलांतील मुलींची संख्या ३२५ पर्यंत गेल्याचें आढळतें.

मिस् बर्न यांच्या कारकीर्दीत ६२ मुली मॅट्रिक्युलेशन परीक्षेंत उत्तीर्ण झाल्या. फर्स्ट एड् परीक्षेंतहि दरवर्षी एखाद्या दुसऱ्या मुलीखेरीज सर्व पास होत. इ. स. १९१८ सालीं पहिली जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति मिळविणारी विद्यार्थिनी इंग्रजी सहावी-पर्यंत याच शाळेंत शिकलेली होती. इ. स. १९१९ मध्यें हायस्कूलमधील एका विद्यार्थिनीनें यमुनाबाई दळवी संस्कृत प्राइस व चॅटफील्ड प्राइझ मिळविलें.

१९२० सालींहि हायस्कूलमधील मुलीनें दळवी प्राइझ संपादन केलें. ड्रॉइंगच्या परीक्षेंतहि मुली चांगलें यश संपादन करीत.

इ. स. १९१९ च्या वार्षिक अहवालामध्यें हायस्कूलमधील ३६९ मुलीं-पैकीं ३३६ अविवाहित, १२ विवाहित व २१ विधवा असल्याचें आढळतें. यावरून मुलींची विवाहमर्यादा हळुहळू वाढत जाऊन त्यांच्या शिक्षणक्रमांतील अडचणी दिवसेंदिवस दूर होत चालल्याचें स्पष्ट दिसून येतें.

इ. स. १९१९ मध्यें शिक्षणखात्याचे इन्स्पेक्टर (दक्षिण विभाग) यांनीं शाळेविषयीं पुढीलप्रमाणें मत दिलें आहेः—" The School is a good one, well organized and capably managed. The girls are keen on their work and it appeared to me that the work done was less mechanical than in most Schools, and appealed more to the intelligence of pupils. The manners and demeanour of the pupils are admirable. There are debating and literary Societies; the general impression created was that much is done to make School-life interesting."

त्या वर्षी मिस् एल्टन, मिसेस् वेस्ट्रॉप्, औंधचे श्रीमंत चीफसाहेब, मद्रासचे लट्टु गोविंददास जमीनदार, श्री. गो. रा. रेशीमवाला व इ. स. १९१९ मध्यें हर एक्सलन्सि लेडी लॉइड्, मिस् डेला हे, प्रिन्सिपॉल, क्वीन मेरी कॉलेज, मिस् चेंबर्स, संयुक्त प्रांतांतील शाळांच्या इन्स्पेक्ट्रेस, सर के. जी. गुप्त इत्यादि मंडळींनीं शाळेस भेटी देऊन मिस् बर्न यांच्या कामगिरीचें अभिनंदन केलें.

इ. स. १९१९ मध्यें इन्स्पेक्टरनीं पुढील उद्गार काढलेले आहेतः—

" I formed a very high opinion of the education given in this School. The standard of English in the VII Standard is far higher than in most of the boys' schools I have recently seen. The girls are bright and pleasant and seemed to be happy."

शाळेच्या इंग्लिशसंबंधीं वर काढलेले उद्गार खरे आहेत. कारण या शाळेंतून मॅट्रिक झालेल्या विद्यार्थिनी कॉलेजमध्यें गेल्यावर मुलांच्यापेक्षां नेहमीं जास्त मार्क मिळवितात असा अनुभव आहे. असो.

वरील वृत्तान्तावरून मिस् बर्न यांनीं शाळेच्या उन्नतीप्रीत्यर्थ जे प्रयत्न केले त्यांचें स्वरूप वाचकांच्या लक्षांत येईल. त्यांच्यासारखी विद्वान्, प्रेमळ व कर्तव्यदक्ष अध्यापिका क्वचितच आढळते. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें इ. स. १९२० सालीं

त्यांनीं रजा घेतली त्या प्रसंगीं सर्व मुली व शिक्षकवर्ग यांना अत्यंत वाईट वाटलें. त्यांना थाटाची मेजवानी देण्यांत येऊन शिक्षकांनीं व मुलींनीं त्यांच्याविषयींचें आपलें प्रेम व आदरभाव व्यक्त केला. रजा संपल्यानंतर त्या शाळेवर परत येतील असा अंदाज होता. परंतु पंजाबांतील एक्झिक्युटिव एन्जिनिअर मिस्टर ग्रीन यांच्याशीं त्यांचा विवाह झाल्यामुळें त्या सेवानिवृत्त झाल्या. इ. स. १९२१ सालीं त्या पुण्यास येऊन शाळेंतील मुलींना व शिक्षकिणींना भेटून गेल्या होत्या. हल्लीं त्या लाहोरला असून शाळेविषयीं व जुन्या विद्यार्थिनींच्याबद्दल प्रेमानें नेहमीं चौकशी करीत असतात. हुजुरपागेच्या विद्यार्थिनींच्याबद्दल त्यांना फार अभिमान वाटतो. युरोपिअन असूनहि त्यांच्याबद्दल परकेपणा वाटत नसे ही एकच गोष्ट शाळेच्या कार्याशीं त्या किती समरस झालेल्या होत्या हें सिद्ध करण्यास पुरेशी आहे. असो.

त्यांच्या हाताखालच्या शिक्षक-शिक्षकिणींसंबंधीं दोन शब्द लिहून शाळेचा पुढील वृत्तान्त पाहूं.



हायस्कूल–अध्यापक वर्ग ई. स. १९२०

Wagle Press, Bombay, 1

प्रकरण पंधरावें

प्रमुख अध्यापक

मिस् के. एम्. बर्न (मिसेस ग्रीन), मिस् फील्डिंग् व मिस् वाडिया यांच्या कारकीर्दीतील प्रमुख शिक्षकांविषयीं दोन शब्द लिहिणें अगत्याचें होईल. शाळेची उन्नति मुख्य अधिकाऱ्यांवर अवलंबून असली तरी अध्यापक वर्गाच्या मनःपूर्वक सहकार्यावांचून त्यांना आपल्या कल्पना अंमलांत आणतां येणें कठीण आहे. तेव्हां ज्यांच्या कर्तव्यदक्षतेमुळें निरनिराळ्या लेडी सुपरिंटेंडेंट यांना आपल्या कार्यांत अपूर्व यश संपादन करतां आलें त्या अध्यापकवर्गाच्या कार्याचा कृतज्ञताबुद्धीनें येथें उल्लेख करणें आवश्यक होय.

श्रीयुत श्रीधर गणेश गोखले, एम्.ए., एस्.टी.सी.डी., हे इसवी सन १९१४ सालीं हायस्कूलमध्यें रुजू झाले. ट्रेनिंग कॉलेज हायस्कूलपासून विभक्त झाल्यावर जे शिक्षक हायस्कूलकडे होते त्यांमध्यें हे एकटेच ट्रेन्ड शिक्षक असून मिस् बर्न यांना त्यांनीं उत्तम साहाय्य केलें. भूगोल हा विषय त्यांचा चांगला तयार असून निरनिराळे नकाशे, चित्रें व उपयुक्त माहिती इत्यादि साधनांनीं ते आपले भूगोलाचे पाठ मनोरंजक करीत. त्यांचे भूगोलाचे पाठ मिस् बर्न यांना फार आवडत असत. इतर शिक्षकांना त्या श्री. गोखले यांचे पाठ ऐकावयास नेहमीं सांगत. इंग्लिश विषयाची त्यांची तयारी नांवाजण्यासारखी असून त्यांचे उच्चार विशेष शुद्ध असल्यानें मिस् बर्न व मिस् फील्डिंग यांनीं त्यांना वरच्या वर्गाचें इंग्लिश दिलें होतें. पर्शियन भाषेवर त्यांचें प्रभुत्व होतें व निरनिराळ्या कॉलेजांतील पर्शियनचे अध्यापक त्यांना आपल्या शंका विचारावयास येत. त्यांनीं प्रयत्न केला असता तर कोणत्याहि सरकारी कॉलेजमध्यें पार्शियनचे अध्यापक म्हणून त्यांना जागा मिळाली असती. परंतु त्यांचा स्वभाव फार भिडस्त असल्यानें ते नेहमीं मागें मागेंच राहात.

विद्यार्थिनींच्याविषयीं त्यांना पराकाष्ठेची कळकळ असून हुषार विद्यार्थिनींना " तुमचा अभ्यास चांगला आहे. तुम्ही पुढें चांगल्या विद्यार्थिनी व्हाल, " असा आशीर्वाद त्यांच्याकडून नेहमीं मिळत असे. मुलींच्यासाठीं स्वतः पुस्तकें खरेदी करून ते त्यांना वाचावयास देत. कित्येक मुलींना त्यांनीं इंग्लिश वाङ्मयाची गोडी

लाविली होती. त्यांच्या प्रेमळ स्वभावाचा मुली फार फायदा घेत. मुलींनीं त्यांचीं किती तरी पुस्तकें व नकाशे हरवले असतील ! पुस्तक हरवल्याबद्दल वाईट वाटून त्या मुली त्यांना तसें सांगूं लागल्यास ते म्हणत, "हरकत नाहीं. आपण नवें पुस्तक आणूं!" त्यांच्या वर्गांत मुलींना पूर्ण स्वराज्य असे. दरारा बसविण्यासाठीं क्वचित् प्रसंगीं खोडकर मुलींच्यावर ते रागावत. परंतु दुसऱ्याच क्षणीं ते त्यांची समजूत घालूं लागत. त्यांच्या वर्गांतील मुलींना दुसऱ्या शिक्षकांनीं शिक्षा वगैरे केल्यास ते त्यांच्याकडे जाऊन आपल्या विद्यार्थिनींची बाजू राखीत. त्यांचा प्रेमळपणा व सात्त्विकपणा उच्च दर्जाचा असून ज्ञानप्राप्तीच्या मार्गांतील ते प्रेमळ मित्र होते. श्री. गोखले यांचें मुलींशीं केवळ गुरुशिष्याचें नातें नसून त्यांच्यामध्यें प्रेमळ पित्याचा स्नेह व वत्सलता वास करीत होती.

इंग्लिश, भूगोल इत्यादि विषय शिकवीत असतां ते स्वतःला पूर्णपणें विसरत व कित्येक वेळां विषयांतरहि करीत. इतिहास विषय शिकवितांना एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीचा उल्लेख आला कीं तीविषयीं ते अनेक उतारे वाचून दाखवीत. त्यांचा स्वभाव कांहींसा विसराळू होता व खोडकर मुली त्याचा फायदा घेतल्यावांचून राहात नसत. मुलींनीं कितीहि खोड्या केल्या तरी त्यांना श्री. गोखले यांच्यासंबंधीं फार आदर वाटत असे. वार्षिक परीक्षा झाल्यानंतर कित्येक वेळां पश्चात्ताप होऊन त्या मुली त्यांच्याकडे जाऊन त्यांची मनापासून क्षमा मागत व श्री. गोखले मास्तर यांच्याकडून त्यांना तत्काळ क्षमा होई हें न सांगतांहि समजण्याजोगें आहे. गरीब विद्यार्थिनींना ते पैसे न घेतां शिकवीत.

जुन्या विद्यार्थिनी एकत्र जमल्या म्हणजे गोखले मास्तरांचा विषय निघाला नाहीं असें क्वचितच होत असे. त्यांच्यासंबंधींच्या मौजेच्या आठवणींमध्यें वेळ केव्हां जाई तें कळतहि नसे.

सोसायटीच्या ताब्यांत शाळा आल्यामुळें त्यांची धुळें हायस्कूलमध्यें बदली झाली. शाळा म्हणजे त्यांना आपलें घरच वाटे. सतरा वर्षे या संस्थेंत काम केल्यावर जेव्हां ते बदलून गेले त्या वेळीं त्यांना फारच वाईट वाटलें. प्रत्येक वर्गांत जाऊन त्यांनीं शिक्षकांचा व मुलींचा निरोप घेतला त्या वेळीं त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. गेल्या वर्षीं पुणें येथील त्यांच्या राहत्या घरीं त्यांचें देहावसान झालें. त्यांच्यासारखा प्रेमळ अध्यापक शाळेचा हा सुवर्णमहोत्सव पाहावयास हयात नाहीं म्हणून फार वाईट वाटतें.

वेदशास्त्रसंपन्न रंगाचार्य बाळकृष्ण रड्डी हे प्रथम ट्रेनिंग कॉलेजमध्यें संस्कृत शास्त्री होते. मिस् मेरी भोर यांनीं त्यांची हायस्कूलमध्यें नेमणूक करविली. संस्कृत व्याकरण ते उत्कृष्ट शिकवीत. त्यांनीं शाकुंतलाचा चौथा अंक व भासकवीचें ' दूतवाक्यम् ' नाटक मुलींना उत्तम रीतीनें शिकवून समारंभांच्या वेळीं त्याचे प्रयोग करविले होते व ते सर्वांना फार आवडले. ते स्वतः संस्कृतमध्यें सहज रीतीनें काव्यरचना करीत. त्यांनीं केलेलीं अनेक संस्कृत पद्यें पूर्वीं मुली समारंभप्रसंगीं म्हणत असत. बालिकादर्श मासिकाचें संपादकत्व अनेक वर्षे त्यांच्याकडेच होतें. वनितासमाजाच्या उत्सवप्रसंगीं ते मुलींस मनःपूर्वक मदत करीत. संस्कृतप्रमाणेंच वरच्या वर्गांना ते मराठी विषय शिकवीत असत. विद्वान् व उत्साही शिक्षक असा त्यांचा शाळेमध्यें लौकिक होता. ते नेहमीं सुंदर संस्कृत श्लोक व संस्कृत गोष्टी सांगत, त्यामुळें त्यांचा तास मनोरंजक होत असे. इ. स. १९२० सालीं धारवाड कॉलेजमध्यें संस्कृत शास्त्री म्हणून त्यांची नेमणूक झाली.

एकदोन वर्षांपूर्वीं ते सेवानिवृत्त झाले व हल्लीं वांई मुक्कामीं वास करीत आहेत. त्यांच्या हाताखालीं तयार झालेल्या बऱ्याच मुलींनीं मॅट्रिकच्या परीक्षेंत संस्कृत विषयाच्या शिष्यवृत्त्या मिळविल्या. त्यांच्या मागून श्री. उपासनीशास्त्री यांची हायस्कूलमध्यें नेमणूक झाली. त्यांच्या हाताखालीं तयार झालेल्या दोन विद्यार्थिनींनीं जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति मिळविली ही गोष्ट त्यांच्या शिकविण्याचा उत्तमपणा सिद्ध करण्यास पुरेशी आहे. पांच सहा वर्षांपूर्वीं उपासनीशास्त्री सेवानिवृत्त झाले व त्यांच्या जागीं सातारा हायस्कुलांतील संस्कृत शिक्षक श्री. शिंत्रेशास्त्री यांची आमच्या हायस्कूलमध्यें बदली झाली. प्रात्यक्षिक रीतीनें (Direct Method) संस्कृत शिकविण्याचा उपक्रम त्यांनीं सुरू केला होता व तो यशस्वीहि झाला होता. एल्फिन्स्टन् कॉलेजमध्यें त्यांची बदली झाल्यामुळें त्यांना आमची शाळा सोडून जाणें भाग पडलें.

शास्त्री मंडळींना इंग्लिश भाषेची अडचण पडत असल्यानें संस्कृत वाङ्मय व भाषांतर हे विषय दुसऱ्या शिक्षकांना घ्यावे लागत. श्री. आर. बी. आठवले, श्री. दांडेकर, श्री. भागवत (प्रोफेसर, झेविअर कॉलेज), मिस् उकिडवे (मिसेस् टिळक), मिस् पाणंदीकर (मिसेस् खान) व श्री. जोशी इत्यादिकांनीं वेळोवेळीं संस्कृत वाङ्मय व भाषान्तर हे विषय इंग्लिश सहावी व सातवी इयत्तेस शिकविले. या सर्वांत श्री. आर. बी. आठवले हे संस्कृत विषयाचे नामांकित

शिक्षक होते. संस्कृत वाङ्मयाची त्यांनीं मुलींच्यामध्यें विशेष गोडी उत्पन्न केली. परंतु हे लौकरच शाळा सोडून गेल्यामुळें त्यांच्या शिकविण्याचा हायस्कूलच्या मुलींना फार दिवस लाभ झाला नाहीं.

श्री. भालचंद्र गोपाळ पुराणिक, बी.ए., एस्.टी.सी., हे मिस् बर्न यांच्या कारकीर्दीत हुजुरपागेमध्यें आले. फिजिक्स व केमिस्ट्री हे त्यांचे ऐच्छिक विषय होते व श्री. एस्. आर. गोडबोले यांची शाळेंत नेमणूक होईपर्यंत ते सायन्स विषयाचे शिक्षक होते. श्री. गोडबोले आल्यानंतर त्यांच्याकडे सायन्स विषय जाऊन श्री. पुराणिक हे वरच्या इयत्तांना गणित शिकवूं लागले. गणित विषय शिकविण्याची त्यांची शैली उत्कृष्ट असे. ज्या विद्यार्थिनींचा हा विषय कच्चा असे त्यांच्याकडे ते विशेष लक्ष देत. मुलींना त्यांच्याबद्दल फार दरारा वाटे. त्यांच्या ठिकाणीं उच्च दर्जाची कर्तव्यदक्षता असून त्यांचा घसा दुखत असल्यामुळें बोलतां येईनासें झालें तरी ते घरीं राहात नसत. फळ्याचा पुरेपूर उपयोग करून न बोलतां तें शिकवीत. इतर शिक्षकांशीं ते अतिशय सौजन्यानें वागत. त्यांना कामाचा फार उरक असे. वर्गाची वेळापत्रकें तयार करण्याची त्यांची हातोटी फार थोड्यांना साधेल. आपल्या विद्यार्थिनींच्याबद्दल त्यांना फार अभिमान असून त्या मुली शाळा सोडून कॉलेजांत गेल्या तरी त्यांच्या परीक्षांच्या निकालासंबंधीं ते काळजीपूर्वक चौकशी करीत. त्यांच्यासारखे स्वाभिमानी व स्वतंत्र बाण्याचे अध्यापक क्वचितच आढळतात. हुजुरपागेमध्यें त्यांनीं सुमारें एकोणीस वर्षें काम केलें. सोसायटीकडे शाळा आल्याकारणानें त्यांची सोलापूरच्या शाळेमध्यें बदली झाली व त्यांच्या उत्कृष्ट अध्यापनास हुजुरपागेंतील मुली मुकल्या. त्यांच्या विद्यार्थिनींना त्यांच्याबद्दल आत्यंतिक आदर वाटतो. इ. स. १९३४ सालीं ते सेवानिवृत्त झाले व हल्लीं पुणें मुक्कामीं राहात आहेत. जुन्या विद्यार्थिनी व जुने शिक्षक यांचें ते नेहमीं स्नेहपूर्वक स्मरण करीत असतात.

यांच्याखेरीज शाळेंत बरेच पुरुष शिक्षक काम करून गेले. परंतु या संस्थेंत ते फार थोडा काल असल्याकारणानें त्यांची कर्तबगारी दृष्टोत्पत्तीस येण्यास येथें वाव सांपडला नाहीं. डे. ए. सोसायटीचे प्रो. शिंत्रे, प्रो. पारसनीस, झेविअर कॉलेजचे प्रो. भागवत, सुरत कॉलेजचे प्रो. जोशी व प्रो. पाळंदे, ॲग्रिकल्चरल् कॉलेजचे श्री. गोडबोले, भाण्डारकर इन्स्टिटयूटचे कै. उटगीकर, डेक्कन कॉलेजमधील लेक्चरर श्री. दातार, सरकारी शिक्षणखात्यांत काम करणारे श्री. दाण्डेकर,

श्री. टिळक, श्री. केळकर, श्री. फणसळकर, श्री. ठोसर, श्री. घैसास, श्री. मोडक इत्यादि अनेक शिक्षक हायस्कूलमध्यें चांगलें काम करून गेले. परंतु त्यांना अधिक बढतीच्या जागा मिळाल्यामुळें ही सर्व मंडळी शाळा सोडून गेली. असो.

मिस् सुवार्ताबाई डेव्हिड, बी.ए., एस्.टी.सी.डी., या हुजुरपागेच्या माजी विद्यार्थिनी असून त्यांनीं मॅट्रिक परीक्षेंत संस्कृत विषयाची 'यमुनाबाई दळवी' शिष्यवृत्ति संपादन केली होती. मिस् बर्नच्या कारकीर्दींत फर्स्ट असिस्टंट म्हणून यांची नेमणूक झाली. या हुषार, उत्साही शिक्षक असून विद्यार्थिनींच्यावर त्यांचा विशेष दरारा असे. एखाद्या व्याख्यानाच्या वेळीं शाळेंतील सर्व मुली हॉलमध्यें अगर प्लेग्रेडमध्यें एकत्र जमून गडबड करीत असल्या तरी मिस् डेव्हिड यांचा 'मुलींनो' एवढा एकच शब्द ऐकतांच त्या शांत होत. त्यांच्या वर्गांत नेहमीं कडक शिस्त असे. मुलींनीं ताठ बसावें व व्यवस्थित रीतीनें उभें राहावें यासाठीं त्या नेहमीं प्रयत्न करीत. कोणी मुलगी अव्यवस्थित रीतीनें बसलेली आढळली कीं त्या बरोबर तिची नक्कल करून दाखवीत. मग अर्थात् ती मुलगी खजील होऊन तिच्यांत ताबडतोब सुधारणा होई. त्यांनीं Moral lesson च्या तासाच्या वेळीं सांगितलेल्या सुंदर गोष्टींचा मुलींच्या मनांवर अनुकूल परिणाम होऊन त्या गोष्टींतील मुलामुलीं-प्रमाणें आपण शहाणें झालें पाहिजे अशी महत्त्वाकांक्षा त्यांच्या मनांत उत्पन्न होत असे.

मिस् डेव्हिड यांच्याबद्दल शिक्षक वर्ग व मुली यांना फार आदर वाटे. त्या करारी बाण्याच्या असून आपलें प्रामाणिक मत स्पष्टपणें दुसऱ्यापुढें मांडण्यास केव्हांहि त्या भीत नसत. मिसेस् मोझेस् यांच्या कारकीर्दीच्या प्रारंभीं त्यांची ठाण्यास बदली होऊन तेथील सरकारी शाळेच्या मुख्य जागेवर त्यांची नेमणूक झाली व हल्लीं त्या तेथेंच काम करीत आहेत.

मिस् दस्तुर या मिस् बर्न यांच्या कारकीर्दींत हायस्कूलमध्यें काम करूं लागल्या. त्या बरींच वर्षें इंग्लिश सहावीच्या अध्यापिका असून त्या वर्गास इंग्लिश, भूगोल, इतिहास इत्यादि विषय शिकवीत. मॅट्रिकच्या वर्गाच्या दोन तुकड्या झाल्यापासून त्या मॅट्रिकच्या वर्गाला इंग्लिश शिकवूं लागल्या. हायस्कूलमधील विद्यार्थिनींचें इंग्लिश उत्तम होण्यास जर कोणाचे परिश्रम कारणीभूत झाले असतील तर ते मिस् दस्तुर यांचे होत. त्यांच्या तासाला प्रत्येक मुलगी इंग्लिशच्या धड्यांतील शब्द काढल्यावांचून शाळेस येत नसे. मुलींनीं शाळेच्या वेळामध्यें इंग्लिशमध्येंच

बोललें पाहिजे असा त्यांचा सक्त नियम असे. निरनिराळ्या उत्तम इंग्लिश पुस्तकांतील उतारे वाचून दाखवून त्या मुलींना इंग्लिश वाङ्मयाची गोडी लावीत. अभ्यासाव्यतिरिक्त मुली जीं इंग्रजी पुस्तकें वाचीत त्यांचा सारांश त्या मुलींना लिहावयास सांगत. दिवाळीच्या सुट्टींत कोण मुलगी अधिक इंग्रजी पुस्तकें वाचते याबद्दल त्यांच्या विद्यार्थिनींच्यामध्यें स्पर्धा चाले. त्यांच्या वर्गांत प्रवेश मिळाल्यास आपलें इंग्लिश सुधारेल अशी सर्व मुलींची खात्री असे व त्यांच्या तुकडींत आपलें नांव दाखल व्हावें यासाठीं त्या धडपड करीत. उत्साही अध्यापकांच्या विद्यार्थिनी उत्साही होतात हा सर्वमान्य सिद्धांत आहे. मिस् दस्तुर यांच्या वर्गांत नेहमीं उत्साहाचें साम्राज्य असे. त्यांच्या विषयांचा अभ्यास मुली अतिशय हौसेनें करीत; त्यामुळें त्या विषयामध्यें त्यांची न कळत सुधारणा होई. मुलींनीं चांगलीं उत्तरें दिलीं अगर चांगल्या रीतीनें इंग्लिश कविता म्हटली तर त्या त्यांचें मनापासून कौतुक करीत. त्यामुळें त्यांचा 'Good' शेरा मिळविण्यासाठीं मुली फार परिश्रम करीत.

आठवड्यांतून एकदां साडेचारनंतर त्या कोणतें तरी इंग्लिश काव्याचें पुस्तक मुलींच्या बरोबर वाचीत असें मागें एकदां लिहिलें आहे. हा त्यांचा तास मुलींना अतिशय आवडत असे. त्या वर्गांत मोकळेपणानें प्रश्न विचारण्याची मुलींना मुभा असे. Lady of the Lake या काव्याचें गद्यपद्यात्मक सचित्र हस्तलिखित पुस्तक त्यांनीं मुलींच्याकडून तयार करून घेतलें. यावरून त्यांच्या व मुलींच्या उत्साहाची कल्पना येईल.

वर्गांत त्यांचा दरारा असे. परंतु वर्गाच्या बाहेर आपल्या विद्यार्थिनींशीं प्रेमळ मैत्रिणीसारख्या त्या वागत व हरएक बाबतींत त्यांना सल्ला देऊन मदत करीत. मुलींचा त्यांच्यावर इतका पराकाष्ठेचा विश्वास असे कीं आपल्या सुखदुःखाच्या सर्व गोष्टी त्या मिस् दस्तुर यांना सांगत. मुली शाळा सोडून गेल्या तरी त्यांना वरचेवर येऊन भेटत व आपले नवीन अनुभव त्यांना सांगून अनेक बाबतींत त्यांची सल्ला विचारीत.

दर वर्षी मुलींच्याकडून कलाकौशल्याच्या वस्तू तयार करून त्या त्यांची विक्री करून पैसे जमवीत व डिप्रेस्ड क्लास मिशनसारख्या संस्थांना मदत करीत. वस्तू विकून केव्हां केव्हां दोनशें रुपये सुद्धां उत्पन्न होत असे. अशा रीतीनें त्यांच्या हाताखालीं मुली सार्वजनिक कार्याचे धडे गिरवावयास शिकत. अनाथ मुलामुलींच्या संस्था त्या मुलींना दाखवीत. त्या वेळीं त्या मुलांना देण्यासाठीं मुली कांहींतरी खाऊ

बरोबर नेत. अशा प्रकारें विद्यार्थिनींच्या अन्तःकरणामध्यें उदारता निर्माण करण्याचे त्यांचे प्रयत्न अहर्निश चालू राहात.

कांहीं वर्षांपूर्वी पाश्चात्य अध्यापनपद्धतींचें मार्मिक अध्ययन करण्यासाठीं त्या स्कॉटलंडला गेल्या होत्या. तेथील ॲबर्डीन विश्वविद्यालयाचा डिप्लोमा घेऊन परत आल्यानंतर निरनिराळे शैक्षणिक प्रयोग करण्याकडे त्यांचें लक्ष वेधलें. त्या आदर्श अध्यापिका असून प्रत्येक काम वेळच्यावेळीं करण्याची त्यांची शैली कित्ता घेण्याजोगी आहे. त्यांच्या हाताखालीं तयार झालेल्या विद्यार्थिनींनीं पुढें चांगलें नांव काढलें. इ. स. १९३१ सालीं हायस्कूल सोसायटीच्या ताब्यांत आल्याकारणानें त्यांची नाशिक येथील मुलींच्या सरकारी शाळेच्या मुख्य जागेवर नेमणूक झाली व आमची संस्था एका अनुभवी, शिक्षणशास्त्रज्ञ व अत्यंत कर्तव्यतत्पर अशा अध्यापिकेस मुकली.

ज्यांनीं येथें फक्त दोनच वर्षे काम केलें परंतु ज्यांच्या उदाहरणामुळें कित्येक विद्यार्थिनींच्या जीवितांत क्रान्ति झाली अशा अध्यापिका म्हणजे श्री. कु. अहल्याबाई भाण्डारकर, एम्.ए., या होत. त्यांनीं मुलींना स्वावलंबी होण्याचा धडा दिला व कित्येक मुलींना अभ्यासाचें वळण लाविलें. त्यांचे वडील प्रो. श्रीधर रामकृष्ण भाण्डारकर हे निवर्तल्यानंतर त्या इंदूर संस्थानांत नौकरीवर गेल्या. सध्यां त्या इंदूर येथील अहल्याश्रम व चंद्रावती गर्ल्स् स्कूल या संस्थेच्या प्रिन्सिपॉल असून त्यांच्या प्रयत्नानें ती शाळा उत्तर हिंदुस्थानांतील एक नामांकित व नमुनेदार शाळा म्हणून प्रख्यात झाली आहे. अजमीर एज्युकेशन बोर्डच्या त्या सभासद आहेत. उत्तर हिंदुस्थानांतील प्रसिद्ध शिक्षणशास्त्रज्ञ म्हणून त्यांना मान मिळतो. वरील हकीकतीवरून त्या हायस्कूल सोडून गेल्यानें एका विद्वान् व कर्तबगार अध्यापिकेचा आमच्या संस्थेस वियोग झाला असें म्हटल्यास त्यांत बिलकूल अतिशयोक्ति नाहीं. त्यांच्या विद्यार्थिनी त्यांचें नेहमीं स्मरण करतात व त्यांच्या भेटीची संधि वायां घालवीत नाहींत. मिस् भाण्डारकर यांच्या कार्याचें महत्त्व समजून घेण्यास त्यांच्या संस्थेस अवश्य भेट दिली पाहिजे.

मिसेस् गोरे (मिस् लॅझरस्) या हायस्कूलच्या माजी विद्यार्थिनी असून इ. स. १९०३ मध्यें मॅट्रिक झाल्या. इ. स. १९०४ मध्यें त्यांनीं ट्रेनिंगचें तिसऱ्या वर्षाचें सर्टिफिकेट मिळविलें व इ. स. १९०५ मध्यें त्या शाळेंत काम करूं लागल्या. प्रारंभीं त्या प्रायमरी स्कूलकडे शिकवीत. ट्रेनिंग कॉलेजमध्येंहि त्यांनीं

कांहीं काल शिकविलें. पुढें हायस्कूलकडे त्यांची नेमणूक झाली. मिस् मून ह्या शाळा सोडून गेल्यानंतर हायस्कूलमधील पहिल्या तीन वर्गांना त्या इंग्लिश गाणीं शिकवीत. ट्रिनिटि कॉलेजच्या म्यूझिकच्या ज्युनिअर परीक्षेंत त्यांनीं ऑनर्स मिळविले होते. त्यांचा आवाज मधुर असून त्यांनीं कांहीं वर्षें श्री. बाळकोबा नाटेकर यांच्या हाताखालीं हिंदुस्थानी संगीताचा अभ्यास केला होता. ड्रिल व खेळ ह्या विषयांत त्या निष्णात होत्या. मिस् बर्न यांनीं प्रायमरी स्कूलवर देखरेख करण्याचें जबाबदारीचें काम त्यांच्याकडे सोंपविलें होतें. प्रायमरी स्कूलच्या ड्रिलवर त्या विशेष देखरेख करीत. मिस् फील्डिंग यांनीं प्रायमरी स्कूलच्या मुलींच्या वह्या, नकाशे इत्यादि गोष्टींवर नजर ठेवण्याचें काम त्यांना दिलें होतें. त्या तें काम किती चोख रीतीनें पार पाडीत हें सर्वांना माहीतच आहे. मिस् फील्डिंग यांनीं त्यांना सृष्टिनिरीक्षण या विषयावरील व्याख्यानें ऐकण्यासाठीं मुंबईस मुद्दाम पाठविलें होतें. तेथून आल्यानंतर इंग्लिश पहिली व दुसरी या वर्गांचें सायन्स त्यांच्याकडे देण्यांत आलें. सोलापूरच्या किंडरगार्टन क्लासेससाठींहि हायस्कूलतर्फे त्यांना पाठविण्यांत आलें होतें. इंग्लिश अक्षर, उच्चार व व्याकरण शिकविण्यासंबंधीं त्यांची ख्याति आहे. माजी-विद्यार्थिनी-संघाच्या या पहिल्या चिटणीस असून त्यांनीं संघाला पुष्कळ सभासद मिळवून दिले. प्रत्येक गोष्ट टापटिपीनें व व्यवस्थित रीतीनें पार पाडण्याविषयीं त्या नेहमीं दक्ष असतात. त्यांचा स्वभाव विनोदी असून कामाचा कंटाळा कसा तो त्यांना माहीत नाहीं. या अनुभवी व कर्तव्यतत्पर अध्यापिका याच वर्षी सेवानिवृत्त झाल्या. शाळा सोडली तरी सार्वजनिक कार्यांमध्यें त्या आपला फुरसतीचा वेळ खर्च करीत असतात. असो.

यंदाच्या वर्षी सेवानिवृत्त झालेल्या दुसऱ्या अध्यापिका म्हणजे मिस् चोण्डीकर या होत. मिस् भोरच्या वेळेपासून या शाळेंत काम करीत होत्या. त्यांच्याकडे इंग्लिश पहिली इयत्ता असे. त्यांच्या हाताखालीं शिकलेल्या मुलींचे इंग्लिश उच्चार नेहमीं चांगले असत. यांचा स्वभाव शांत व विनोदी असून शिक्षकवर्गास त्यांच्याविषयीं आदर असे. वर्गातील मुलींच्याकडून तिळगुळ समारंभ दरवर्षी करण्याची प्रथा त्यांनीं पाडली. यांचा विलायतेला जाण्याचा एकदोन वर्षांपूर्वी बेत होता. परंतु रजेच्या अभावीं त्यांना तो बेत रद्द करावा लागला. सर्व शिक्षकांशीं मिळून मिसळून वागण्याचा त्यांचा स्वभाव असल्यानें शाळेंतील त्यांचा अभाव सर्वांना भासतो.



प्रायमरी-ड्रिल्

Wagle Press, Bombay, 1

कांहीं शिक्षक

मिस् चौधरी, मिसेस् घाटे, मिसेस् खान, मिसेस् पाटणकर, मिसेस् काळे, मिसेस् हिर्लेकर, मिसेस् इझिकेल, मिसेस् मायदेव इत्यादि अध्यापिका या शाळेंतून चांगलें नांव मिळवून गेल्या. त्यांपैकीं पहिल्या पांच जणी निरनिराळ्या सरकारी व खाजगी शाळांमध्यें शिक्षकिणींचें काम करीत आहेत. बाकीच्या तिघी जणी गृहस्थाश्रमांतील आपलीं कर्तव्यें बजावून फावल्या वेळांत थोड्या फार प्रमाणांत सामाजिक कार्येंहि करीत असतात.

हल्लींच्या अध्यापकवर्गाचें कार्य सर्व जनतेसमोर आहे. तेव्हां त्यांच्यासंबंधीं कांहीं लिहिण्याची जरूर नाहीं. परंतु त्यांपैकीं सर्वांत जुने असे जे शिक्षक आहेत, त्यांच्याबद्दल लिहिणें अप्रासंगिक होणार नाहीं. श्री. लक्ष्मीबाई जोगळेकर (ज्यांना मिस् खरे या नांवानें सर्वजण जास्त ओळखतात) या इ. स. १९१४ मध्यें शाळेंत रुजू झाल्या. या फर्स्ट ॲसिस्टन्ट असून जबाबदारीचीं सर्व कामें शांतपणें व केव्हांहि न रागावतां पार पाडतात. त्यांच्याभोंवतीं हल्लीं सर्व नवीन व लहान वयाच्या शिक्षकिणी आहेत. तरी त्यांच्याशीं त्या मिळूनमिसळून वागून अनेक बाबतींत त्यांना मदत करितात. प्रायमरी शाळेवर देखरेख करण्याचें काम अतिशय जबाबदारीचें असल्यानें तें त्यांच्याकडे सोंपविण्यांत आलें आहे. त्यांना कामाचा विशेष उरक असून मोठमोठीं कामें गोंधळ न घालतां करण्याची त्यांची रीत वाखाणण्याजोगी आहे. शाळेचें काम करून इतरहि वाटेल तीं कामें करण्यास त्या उत्साहानें पुढें होतात. वनिता-समाजाचा उत्सव, बक्षिससमारंभ इत्यादि शाळेंतील मनोरंजक कार्यक्रम त्यांच्याच देखरेखीखालीं तयार होतात.

दुसरे जुने शिक्षक म्हणजे श्री. देशमुख हे होत. हे मॅट्रिकला गणित शिकवितात व इंग्लिश पांचवी ते सातवी या तीन वर्गांना सायन्स शिकवितात. गणित विषय शिकविण्याची त्यांची शैली अत्युत्कृष्ट असून त्यांच्या शिकवण्यामुळें मुलींमध्यें गणित विषयाविषयीं अतिशय गोडी उत्पन्न होते असा अनुभव आहे. उदाहरणें सोडविण्याच्या अनेक युक्त्या ते शिकवितात. अल्जिब्रा व जॉमेट्री हे दोन विषय ते विशेषच मनोरंजक रीतीनें शिकवितात. सायन्स शिकवितांना ते नेहमीं व्यवहारांतील उदाहरणें देतात; त्यामुळें तो विषय मुलींच्या मनावर चांगला ठसतो. त्यांच्या हाताखालीं शिकलेल्या अनेक विद्यार्थिनींनीं गणित व सायन्स या दोन्ही विषयांत मॅट्रिकच्या परीक्षेंत वैशिष्ट्य (Distinction) संपादन केलें आहे. मुलींना ते सदोदित उत्तेजन देत असतात; त्यामुळें विद्यार्थिनींना त्यांचा तास फार आवडतो.

गणित विषयांत मागें असलेल्या विद्यार्थिनींना ते दररोज शाळा सुटल्यानंतर एक तास शिकवितात. त्यांचे तास मॅट्रिकच्या परीक्षेपर्यंत चालू राहतात व मुलींना त्यांचा विशेष उपयोग होतो. सर्व प्रकारचीं जबाबदारीचीं कामें करण्यास ते नेहमीं तत्पर असतात. शाळेचीं वेळापत्रकें व बालिका वस्तु-भांडार हीं दोन्ही महत्त्वाचीं कामें त्यांच्याकडे आहेत. असो.

श्री. जोशी ड्रॉइंग-शिक्षक आहेत. यांच्या कर्तृत्वाची साक्ष म्हणजे हल्लींचा ड्रॉइंग हॉल होय. त्यांच्या देखरेखीखालीं मुलींनीं काढलेलीं मोठमोठीं सुंदर चित्रें पाहिलीं म्हणजे मन प्रसन्न होतें. मुंबई स्कूल ऑफ आर्टच्या परीक्षांना ते नेहमीं शाळेंतील मुली पाठवितात व त्या बहुतेक सर्व पास होतात. कित्येक वेळां ड्रॉइंग परीक्षेचा शेंकडा १०० निकाल लागलेला आहे. इ. स. १९१५ सालीं कँप गव्हर्मेंट इंग्लिश स्कूलमधून त्यांची मुलींच्या हायस्कूलमध्यें नेमणूक झाली, तेव्हांपासून त्यांनीं पूर्वीच्या शिक्षणाची दिशा बदलून टाकून त्यास निराळें वळण लावलें. त्यामुळेंच उत्तरोत्तर मुलींची ड्रॉइंग शिकण्याची हौस वाढत जाऊन प्रतिवर्षी ड्रॉइंगच्या परीक्षेस बसणाऱ्या मुलींची संख्या अधिक होत चालली. पूर्वी ड्रॉइंगच्या शिक्षकास प्रत्येक वर्गांत जाऊन शिकवावें लागे; त्यामुळें फार गैरसोय होत असे. ती दूर व्हावी म्हणून श्री. जोशी यांच्या सूचनेवरून प्रायमरी स्कूलचा हॉल ड्रॉइंगकरतां देण्यांत आला. परंतु तेथें निराळीं अशीं डेस्क्स् नसून चार पांच मुली बसतील अशीं बांकें होतीं व तींहि जरा गैरसोयीचींच होतीं. पूर्वी मुलींना ड्रॉइंगचें सर्व सामान घरून आणावें लागे व तांबडा, पिवळा आणि निळा असे तीन पातळ रंग शाळेकडून मुलींना पुरविले जात. परंतु ड्रॉइंगचे इन्स्पेक्टर मिस्टर होगार्थ यांच्या सर्क्युलरवरून मुलींच्या कडून दर सहामाहीस रंगासाठीं ८ आणे घ्यावे असें ठरलें. दुसरे वर्षापासून ड्रॉइंगची वर्गणी थोडी शिलकेंत पडूं लागल्यामुळें मुलींच्याकडून दर वर्षास १२ आणे वर्गणी घेण्यांत येऊं लागली. यानंतर दोन वर्षांतच मुलींच्याकडून वर्षाला फक्त ६ आणे वर्गणी घेऊन त्यांतून ड्रॉइंगला लागणारे कागद, रंगाच्या पेट्या, पेस्टल कलरच्या पेट्या, पट्ट्या, कंपास, ब्रश, स्पंज, पेन्सिली, रबर, क्लिप्स् इत्यादि सर्व सामान पुरविण्याची श्री. जोशी यांनीं हमी घेतली. ज्या मुलींना स्पेशल ड्रॉइंग शिकावयाचें असेल त्यांनाहि भारी किंमतीच्या पेस्टल कलर्सच्या पेट्या वापरण्यास दिल्या जातात.

इतका खर्च करून त्यांतून जे पैसे शिल्लक उरतात त्यांतून ड्रॉइंग शिकविण्यासाठीं लागणारीं भांडीं, निरनिराळे जिन्नस, मुलींनीं काढलेल्या चित्रांना चौकटी

व मुलींना लागणारें इतर सामान आणलें जातें. या पैशांतून यंदा एक कपाट व दोन टेबलेंहि विकत घेण्यांत आलीं आहेत. थोडक्या पैशांत मुलींना उत्तम प्रकारचें सामान पुरविलें जातें या गोष्टीचें सर्व श्रेय श्री. जोशी यांनाच आहे. मुलींची संख्या वाढल्यामुळें पूर्वीच्या ज्यू बोर्डिंगचा हॉल ड्रॉइंगसाठीं देण्यांत आला. ड्रॉइंग-साठीं योग्य अशीं डेस्क्स्‌हि विकत घेण्यांत आलीं असून त्या हॉलमध्यें चाळीस मुलींचा वर्ग मोठ्या अडचणीनें चालविला जातो. ड्रॉइंग हॉलसाठीं स्वतंत्र इमारतीची जरूरी आहे; परंतु ती केव्हां होईल ती होवो.

श्री. वि. लि. पानसे हेहि जुन्यापैकीं शिक्षक असून अंकगणित हा विषय शिकविण्यांत ते निष्णात आहेत. ते पहिल्या तीन इयत्तांना गणित व मराठी हे विषय शिकवितात. वनिता-समाजाचा ग्रंथसंग्रह त्यांच्या ताब्यांत बरींच वर्षें होता. शाळेंत विशेष कार्यक्रम असला तर श्री. पानसे यांची हरएक प्रकारें मदत होते. मुलींना त्यांच्याबद्दल विशेष दरारा वाटतो. असो.

पुढील प्रकरणीं मिस् फील्डिंग् व मिस् वाडिया यांच्या कारकीर्दीचें रहस्य समजून घेण्याचा यत्न करूं.

प्रकरण सोळावें

यशाचें रहस्य

मिस् एच्. एम्. फील्डिंग यांची आठ वर्षांची कारकीर्द अत्यंत यशस्वी झाली. पुण्याच्या हायस्कूलवर त्यांची नेमणूक होण्यापूर्वी त्यांनीं धारवाड येथील स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेजमध्यें व त्याचप्रमाणें राजकोट येथील स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेजांत लेडी सुपरिंटेंडेंटचें काम केलें होतें. दक्षिण विभागांतील मुलींच्या शाळांच्या त्या कांहीं महिने इन्स्पेक्ट्रेस होत्या. यावरून येथें येण्यापूर्वी शैक्षणिक कामाचा यांना बराच अनुभव आला होता असें स्पष्ट दिसतें.

हायस्कूल व प्रायमरी स्कूल यांची सर्वांगीण उन्नति करण्याचे त्यांनीं दीर्घ प्रयत्न केले व त्या कामीं त्यांना यशहि मिळालें. त्यांच्या हाताखालीं असलेल्या शिक्षकवर्गांपैकीं बहुतेक मुंबईच्या सेकंडरी टीचर्स कॉलेजमधून ट्रेन्ड होऊन बाहेर पडलेले होते व ज्या कांहीं नव्या शिक्षकिणींना शिकविण्याचा अनुभव नसे त्यांच्या वर्गावर वेळोवेळीं जाऊन त्या त्यांचें काम पाहात व नंतर आपल्या ऑफिसमध्यें बोलावून अध्यापनासंबंधीं अमूल्य सूचना करीत, व अनुभवी शिक्षकांच्या वर्गास जाऊन त्यांची शिक्षणपद्धति अवलोकन करण्यास त्यांना सांगत. अशा रीतीनें अननुभवी शिक्षकिणी त्यांच्या शिस्तीखालीं चांगल्या तयार होत. प्रत्येक शिक्षकानें नेमलेलें काम नेमक्या वेळीं केलेंच पाहिजे असा त्यांचा कडक हुकूम असल्यानें शाळेच्या कामाचा तेव्हांच उरक पडून इतर दुसऱ्या शैक्षणिक गोष्टींत लक्ष घालण्यास अध्यापकवर्गास सवड मिळे. वर्गांचीं हजिरी-पुस्तकें, प्रगति-पुस्तकें, आठवड्याच्या परीक्षेच्या मार्कांच्या याद्या ठराविक वेळीं ऑफिसमध्यें न आल्यास त्या तात्काळ नोटीस पाठवीत. प्रत्येक शिक्षकानें घंटा झाल्याबरोबर वर्गांत गेलेंच पाहिजे हा सर्वसामान्य नियम शिक्षक बरोबर रीतीनें पाळतात किंवा नाहीं याकडे त्या बारीक लक्ष ठेवीत. एखादा शिक्षक दुपारच्या सुटीनंतर एक दोन मिनिटें उशिरा वर्गांत गेल्यास त्याला केव्हां केव्हां मिस् फील्डिंगची मूर्ति वर्गांत आढळत असे. त्या स्वतःच प्रत्येक गोष्ट शिस्तीनें व पद्धतीनें अगदीं वेळच्या वेळीं करीत व शिक्षकां-कडून करवून घेत. त्यांचा दिनक्रम नियमित असे. पहाटे पांच वाजतां त्या उठत व सर्व कामें आटपून सुमारें साडे सहाच्या सुमारास शाळेच्या कामास सुरुवात करीत.

दहा वाजतां जेवण करून बरोबर साडे दहाच्या ठोक्याला त्या ऑफिसमध्यें हजर राहात. शाळेची घंटा होण्यापूर्वी मुलींचीं, शिक्षकवर्गाचीं व कारकुनाचीं जीं कांहीं कामें असतील तीं सर्व त्या उरकून टाकीत. अकरानंतर मुलींनीं घरच्या चिठ्या वगैरे आणल्या तर त्यांना बिलकूल आवडत नसे. बरोबर साडेदहा वाजतां शाळेचा कारकून ऑफिसशीं उभा राहिलेला नसल्यास त्यांना राग येई. सकाळच्या सामुदायिक प्रार्थनेच्या वेळीं सर्वत्र शांतता असली पाहिजे असा त्यांचा नियम होता. शिक्षकिणींना आपल्या मुलींना शिस्तीनें प्रार्थनेकरितां आणावें लागे. त्यांच्या वेळीं प्रार्थनेचीं गाणीं इंग्लिश असत.

त्यांच्याबद्दलची विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे मिस् बर्न जितकें म्हणून काम करीत तितकें सर्व काम त्यांनीं जबाबदारीनें आपल्याकडे घेतलें व मिस् बर्न यांच्या कारकीर्दीतील नवीन गोष्टी कायम ठेवून आपल्याकडून होईल तितकी शाळेची प्रगति करण्याचा अटोकाट प्रयत्न केला. मॅट्रिकचे इंग्लिशचे तास, हायस्कूल, प्रायमरी स्कूल, मोठा अध्यापकवर्ग व मुलींचें बोर्डिंग यांच्यावर देखरेख व शिवाय ऑफिसमधील काम, एवढें सगळें कार्य एका माणसाच्या खरोखर आवांक्याबाहेरचें आहे. परंतु मिस् फील्डिंग् यांचा उद्योग, उत्साह व सामर्थ्य दांडगें असल्या-कारणानें त्या इतक्या मोठ्या कामाचा सहज उरक पाडीत. प्रत्येक वर्गास भेट देण्याचा त्यांचा रोजचा परिपाठ असून वर्गाची टापटीप, मुलींच्या रफ् व फेअर वह्या, शिक्षकांचें शिकविणें इत्यादि सर्व गोष्टींकडे त्या रोजच्या रोज बारीक नजर ठेवीत. एखादें चित्र भिंतीला वांकडें लावलेलें आढळलें अगर कोठें शाई सांड-लेली दिसली कीं लागलीच मिस् फील्डिंग् त्या सर्व गोष्टी वर्गावरच्या मुख्य शिक्षकाच्या व वर्गनियंत्रिणीच्या (Monitress) नजरेस आणून देत. अशा प्रकारची मिस् फील्डिंग् यांची साऱ्या शाळेवर एकसारखी देखरेख असल्यानें सारा अध्यापकवर्ग आळस झाडून आपआपलें काम अत्यंत मनःपूर्वक व उत्साहानें करीता असे याबद्दल नवल वाटण्याचें कारण नाहीं. ‘जेथें हात फिरे तेथें लक्ष्मी वास करे’ ही म्हण फक्त ‘लक्ष्मी’ या शब्दाऐवजीं ‘सरस्वती’ हा शब्द बदलून घातल्यास येथें बरोबर लागू पडेल. मिस् फील्डिंग् यांच्या दक्षतेमुळें अध्यापकवर्गाला ‘आळस’ हा शब्द शब्दकोशांत पाहावा लागत होता व प्रत्येकजण आपलें काम अत्यंत काळजी-पूर्वक व कसोशीनें करीत; त्यामुळें साऱ्या संस्थेंत उत्साहाचें वारें संचार करीत होतें असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं.

इंग्लिश पहिलीपासून सातवीपर्यंतच्या मुलींच्या सर्व विषयांच्या वह्या त्या वर्षांतून दोन वेळां पाहात. अमुक मुलीनें हें अक्षर वाईट लिहिलेलें आहे अगर अमुक मुलीची कॉपी उत्तम आहे, अमुक मुलीला टांक बरोबर धरतां येत नाहीं, अमुक मुलीनें खराचा फार उपयोग केला आहे अशा तऱ्हेचे बारीक सारीक गोष्टींच्याबद्दलचे शेरे लिहून त्या प्रत्येक शिक्षकिणीकडे पाठवीत. प्रत्येक मुलीच्या तीन वह्या धरल्या तरी पांचशें मुलींच्या १५०० वह्या होतात. एवढें प्रचंड काम त्या कसें पार पाडीत तें त्यांचें त्यांनाच माहित! इतकें काम करून त्या बरोबर साडेचार वाजतां आपली माडी चढूं लागत. साडेचारानंतर ऑफिसच्या खोलींत बसलेलें त्यांना कोणी कधींहि पाहिलें नाहीं. कामाचा गोंधळ न घालतां चटकन् उरक पाडण्याचें त्यांचें कौशल्य अवर्णनीय आहे.

आपल्या शाळेंतील शिक्षकिणी उत्कृष्ट रीतीनें तयार व्हाव्यात यासाठीं त्यांनीं नानाप्रकारचे प्रयत्न केले. मिस् अँड्र्यूज् व मिस् मोतीवाला यांचे ड्रिल कोर्सेस पुण्यास इ. स. १९२३ व १९२४ सालीं झाले. त्यांसाठीं हुजुरपागेची जागा निवडण्यांत आली होती. मिस् फील्डिंग यांच्या प्रोत्साहनावरून हायस्कूल व प्रायमरीच्या बहुतेक शिक्षकिणींनीं ड्रिलच्या क्लासांत आपलीं नांवें दाखल केलीं. त्यामुळें सर्व शाळेचें ड्रिल उत्तम होऊन ड्रिलच्या खेळासंबंधीं मुलींच्या मनांत विशेष गोडी उत्पन्न झाली. अर्थात् व्यायाम व करमणूक या दोन्ही गोष्टींचें एकीकरण झालें. ड्रिलच्या तासाच्या वेळीं मिस् फील्डिंग मुद्दाम हजर राहात व मुलींची ड्रिल व खेळ यांविषयींची उत्सुकता व उत्साह पाहून त्यांना फार समाधान होई.

सृष्टिज्ञान (Nature Study) या विषयाच्या अध्यापनांत त्यांनीं बरीच सुधारणा घडवून आणिली. त्या विषयाचें उत्तम शिक्षण मुलींना मिळावें यासाठीं इ. स. १९२४ सालीं Nature Study चीं व्याख्यानें ऐकून नवीन शिक्षणपद्धतीचा अभ्यास करण्यास त्यांनीं हायस्कूलचे सायन्स शिक्षक श्री. देशमुख व मिसेस् गोरे या दोघांना मुद्दाम मुंबईस पाठविलें होतें. त्या वेळचे शेतकी कॉलेजचे प्रिन्सिपॉल डॉ. बर्न्स् यांनीं स्थापन केलेल्या "Nature Study Club" तर्फे होणाऱ्या व्याख्यानांचा व सहलींचाहि शिक्षकांना सृष्टिज्ञान शिकविण्याच्या कामीं विशेष उपयोग होत असे. हा विषय अधिक मनोरंजक करण्यासाठीं विटांचा कारखाना, फर्गसन् कॉलेजची बाग, गुरांचा दवाखाना, इत्यादि स्थळें पाहण्यास त्या शिक्षकांच्या बरोबर मुलींना पाठवीत.

बागकामाविषयीं शिक्षकवर्गाला
खात्याचे अधिकारी श्री. ह. पु. परांजपे
त्या व्याख्यानांचा शिक्षकांना चांगला
आहे तें त्या लक्षपूर्वक पाहात व ज्या व
शाबासकी देत. त्यांची शाबासकी मिळ
बागेंत काम करीत.

गर्ल गाइड्स् अथवा कन्यासंघ
करण्यांत आला. तो त्या वेळीं मुलींना
पन्नास मुलींनीं गाइड्स् म्हणून आपलीं
पथकें काढावीं लागलीं. त्याबद्दलचा स
यांच्या प्रेरणेमुळेंच कन्यासंघ या हायस्कू
होय. मिसेस् सेराबाई सॅम्युएल व मिस्
कांच्या मुख्य अधिकारी होत्या. त्यांच्य
कंठानें अनेक वेळां केलेली आहे.

मुलींनीं रोजचे अभ्यास उत्साह
चांगलें यश मिळवावें म्हणून त्यांनीं ए
सरी गुण अधिक होतील त्या वर्गाला
दुसऱ्या एखाद्या तुकडीचें सरासरी माव
दुसऱ्या वर्गांतील मुलींना मिळे. या यु
मधून चित्र मिळविण्याची स्पर्धा होऊ
मार्कांच्या यादीवर मिस् फील्डिंग यांच
टाळ्या वाजवून मुली स्वतःचें अभि
निराळ्या तुकड्यांमध्यें ड्रिल व खेळ य

मुलींना इंग्लिश चांगलें बोलत
याव्या यासाठीं दर महिन्याला ' Engl
आणीत. प्रत्येक मुलगी त्यामध्यें भाग
शिक्षक एकत्र जमत असत. मुलींचे
अतिशय उपयोग होई. सर्व शाळेचें इ
त्यांनीं Script-Writing ची पद्धति

बागकामाविषयीं शिक्षकवर्गाला चांगली माहिती व्हावी म्हणून शेतकी खात्याचे अधिकारी श्री. ह. पु. परांजपे यांचीं व्याख्यानें त्यांनीं करविलीं होतीं. त्या व्याख्यानांचा शिक्षकांना चांगला उपयोग झाला. प्रत्येक वर्गाची बाग कशी आहे तें त्या लक्षपूर्वक पाहात व ज्या वर्गाची बाग चांगली असेल त्या वर्गाला शाबासकी देत. त्यांची शाबासकी मिळविण्यासाठीं शाळा सुटल्यावरहि मुली हौसेनें बागेंत काम करीत.

गर्ल गाइड्स् अथवा कन्यासंघ यांच्याच कारकीर्दीत हायस्कूलमध्यें स्थापन करण्यांत आला. तो त्या वेळीं मुलींना इतका प्रिय झाला कीं थोडक्याच काळांत पन्नास मुलींनीं गाइड्स् म्हणून आपलीं नांवें नोंदविलीं. त्यामुळें हायस्कूलमध्यें दोन पथकें काढावीं लागलीं. त्याबद्दलचा सविस्तर वृत्तान्त पुढें येईलच. मिस् फील्डिंग यांच्या प्रेरणेमुळेंच कन्यासंघ या हायस्कूलमध्यें सुरू झाला एवढीच येथें मुद्याची गोष्ट होय. मिसेस् सेराबाई सॅम्युएल व मिस् पाणंदीकर (मिसेस् खान) या त्या पथकांच्या मुख्य अधिकारी होत्या. त्यांच्या कार्याची प्रशंसा मिस् फील्डिंग यांनीं मुक्तकंठानें अनेक वेळां केलेली आहे.

मुलींनीं रोजचे अभ्यास उत्साहानें करावे व प्रत्येक आठवड्याच्या परीक्षेंत चांगलें यश मिळवावें म्हणून त्यांनीं एक युक्ति काढली होती. ज्या तुकडीचे सरासरी गुण अधिक होतील त्या वर्गाला एक चित्र त्या बक्षीस देत. दुसऱ्या परीक्षेंत दुसऱ्या एखाद्या तुकडीचें सरासरी मार्कांचें प्रमाण अधिक पडलें तर तेंच चित्र दुसऱ्या वर्गातील मुलींना मिळे. या युक्तीमुळें प्रत्येक वर्गाच्या निरनिराळ्या तुकड्यांमधून चित्र मिळविण्याची स्पर्धा होऊन मुलींचा अभ्यास विशेष चांगला होई. मार्कांच्या यादीवर मिस् फील्डिंग यांच्या हातचा P (Picture) हा शेरा पाहतांच टाळ्या वाजवून मुली स्वतःचें अभिनन्दन करून घेत. त्याचप्रमाणें वर्गाच्या निरनिराळ्या तुकड्यांमध्यें ड्रिल व खेळ यांची चढाओढ नेहमीं चालू असे.

मुलींना इंग्लिश चांगलें बोलतां यावें, इंग्लिश कविता उत्तम रीतीनें म्हणतां याव्या यासाठीं दर महिन्याला 'English Recitations' चा त्या कार्यक्रम घडवून आणीत. प्रत्येक मुलगी त्यामध्यें भाग घेई. त्यासाठीं हॉलमध्यें शाळेच्या सर्व मुली व शिक्षक एकत्र जमत असत. मुलींचे इंग्लिशचे उच्चार सुधारण्याला या कार्यक्रमांचा अतिशय उपयोग होई. सर्व शाळेचें इंग्लिश लेखन व स्पेलिंग चांगलें व्हावें व यासाठीं त्यांनीं Script-Writing ची पद्धति अंमलांत आणिली. आमच्या शाळेंतील मुली

कोठेंहि गेल्या तरी त्यांच्या हस्तलेखनावरून त्या कोणत्या शाळेच्या असाव्यात हें सहज ओळखतां येतें.

चिल्ड्रेन्स् गिल्ड ऑफ् सर्विस् (बाल-सेवासंघ) या संस्थेच्या आमच्या शाळेंतील सभासद मुलींची संख्या मिस् फील्डिंगच्या कारकीर्दीत दोनशेंवर गेली. मुली सेवा-संघाच्या सभासद होसेनें होतात व त्याप्रमाणें सेवासंघाच्या मदतीसाठीं शिक्षकांच्या साहाय्यानें मनोरंजक कार्यक्रम करतात असा आपला अनुभव त्यांनीं नमूद केला आहे. Poppy Day साठीं दरवर्षी मुली शेंकडों पॉपीचीं फुलें तयार करून देत असत व त्याप्रमाणेंच मिस् फील्डिंग यांच्या कारकीर्दीत त्यांनीं मुंबईतील Infant Welfare Centre ला लहान मुलांचे कपडे शिवून पाठविले होते.

हायस्कूलमधून मॅट्रिक परीक्षेस पाठविलेल्या विद्यार्थिनींचे निकाल त्यांच्या कारकीर्दीत सर्वोत्कृष्ट झाले. इ. स. १९२१ सालीं कुमारी सुलभाबाई पाणंदीकर यांनीं पहिली जगन्नाथ-शंकरशेट शिष्यवृत्ति, एलिस प्राइझ, चॅटफील्ड प्राइज, दळवी शिष्यवृत्ति इत्यादि अनेक शिष्यवृत्त्या व बक्षिसें मिळवून हायस्कूलच्या कीर्तींत अनुपम भर टाकली. त्यानंतर कु. कमलाबाई उकिडवे (मिसेस टिळक) यांनीं १९२३ सालीं जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति व दळवी या शिष्यवृत्त्या संपादन केल्या. कु. शकुंतला परांजपे या पुण्यांतील मुलींत पहिल्या आल्यामुळें त्यांना मिस् मॅनिंग प्राइज् व कर्कहॅम् प्राइझ मिळालें. कु. इरावती करमरकर (मिसेस् कर्वे) यांनींहि दळवी शिष्यवृत्ति मिळविली. यानंतर इ. स. १९२६ सालीं कु. वेणूबाई अभ्यंकर यांनीं मुंबई विश्वविद्यालयाच्या मॅट्रिकला बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांत पहिला नंबर मिळविला. त्यामुळें त्यांच्यावर अनेक बक्षिसें व शिष्यवृत्त्या यांचा वर्षाव झाला. इ. स. १९२७ सालीं श्रीमती कमला कानेटकर याहि पुण्यांतील विद्यार्थिनींमध्यें पहिल्या आल्या व त्यांना त्याबद्दल बक्षिसें देण्यांत आलीं. याशिवाय १९२८ सालीं एका विद्यार्थिनीनें चॅट्फील्ड प्राइज व दळवी शिष्यवृत्ति मिळविली. त्याचप्रमाणें दरवर्षी गणित, संस्कृत व सायन्स यांमध्यें बऱ्याच मुली वैशिष्ट्य (Distinction) संपादन करीत.

मुलींना बक्षिसें व शिष्यवृत्त्या मिळत एवढेंच नव्हे तर मॅट्रिकच्या परीक्षेचा एकंदर निकालहि शेंकडा ९०, शें. ९५, शेंकडा १०० असा मिस् फील्डिंग यांच्या कारकीर्दीत लागलेला आढळतो. या अपूर्व यशाचें श्रेय मिस् फील्डिंग यांनाच देणें श्रेयस्कर होय. त्यांच्या शिस्तप्रधान उत्तेजनपर देखरेखीखालीं शिक्षकवर्गाला आपल्या अंगचे उत्तम गुण दाखविण्यास वाव मिळत होता. त्यामुळेंच त्यांच्या कारकीर्दीत




वसतिगृह – भोजनगृह

Wagle Press, Bombay, 1




वसतिगृह् – भोजनगृह्

Wagle Press, Bombay, 1



वसतिगृह – रुग्णालय (सिक्-रूम)

Wagle Press, Bombay,



मुली नमस्कार घालीत आहेत

शाळेची झपाट्यानें प्रगति होत जाऊन 'हुजुरपागेचा मॅट्रिकचा निकाल उत्तमच लागायचा' असा उद्गार सर्वतोमुखीं झाला. हुजुरपागेच्या मॅट्रिकच्या उत्तम निकालासंबंधीं निरनिराळ्या तऱ्हेचे दुसरेहि उद्गार ऐकावयास सांपडतात. शाळेच्या यशाचें रहस्य शोधतां शोधतां त्यामध्यें कांहीं तरी गोम असली पाहिजे असे क्षुद्र विचारहि कित्येकांच्या डोक्यांत येतात. परंतु आमचें त्यांना इतकेंच सांगणें आहे कीं, लेडी सुपरिंटेंडेंट व अध्यापकवर्ग यांचे दीर्घ परिश्रम व विद्यार्थिनींची मनःपूर्वक व नियमित अभ्यास करण्याची जात्याच प्रवृत्ति याच गोष्टींमुळें हुजुरपागेला कीर्ति-मंदिरांत अढळ स्थान प्राप्त झालें आहे. इतर कोणताच जादूटोणा आमच्यापाशीं नसून अन्तःकरणपूर्वक परिश्रम हेंच एक आमचें साधन आहे. याउपर ज्यांच्या मनांत विकल्प शिल्लक राहिला असेल त्यांनीं शाळेस भेट देऊन तेथें चाललेलें कार्य अवश्य प्रत्यक्ष पाहावें अशी आमची त्यांना नम्र सूचना आहे. असो.

बोर्डिंगमध्येंहि मिस् फील्डिंग यांनीं बऱ्याच सुधारणा केल्या. प्रत्येक मुलीनें मच्छरदाणी वापरली पाहिजे असा नियम त्यांनीं केला. त्याचप्रमाणें मिस् बर्न यांच्या वेळचा दर महिन्यास मुलींचें वजन करावयाचा नियम त्यांनीं तसाच कायम ठेवून आठवड्यांतून एकदां प्रत्येक मुलीचें Temperature घेण्याची पद्धति चालू केली. कित्येक मुली अंगांत ताप असतांना तशाच वर्गाला जात. परंतु वर सांगितलेल्या नियमामुळें कोणालाहि आपलें दुखणें लपवून ठेवणें अशक्य झालें. मुली दूर दूरच्या प्रांतांतून घर सोडून केवळ विद्येसाठीं बोर्डिंगमध्यें राहतात. त्यामुळें त्यांना घरांतील सुखसोयींची उणीव भासणें स्वाभाविक आहे. त्यांच्या बोर्डिंगांतील जीवनक्रमांत कांहीं तरी नावीन्य उत्पन्न व्हावें म्हणून त्यांनीं बोर्डिंगमधील प्रत्येक वर्गांतील मुलींनीं आळीपाळीनें दर शनिवारीं रात्रीं एखादा गाणीं, संभाषणें, इत्यादि मनोरंजक कार्यक्रम तयार करून तो पाहण्यासाठीं लेडी सुपरिंटेंडेंट, बोर्डिंगमधील शिक्षकिणी व मुली यांना आमंत्रण करावें असें ठरविलें. हे शनिवारचे कार्यक्रम मुलींना फार प्रिय झाले व केवळ स्वतःच्या प्रयत्नांनीं त्यांना उत्तम प्रकारचे कार्यक्रम तयार करतां येऊं लागले. त्यामुळें कित्येक मुलींची सुप्तावस्थेंत असलेली अभिनयकला जागृत झाली. एकदां बोर्डिंगच्या मुलींनीं शनिवारच्या कार्यक्रमांतील उत्तम उत्तम संभाषणें व गाणीं यांचा कार्यक्रम सर्व शाळेंतील मुली व शिक्षकवर्ग यांच्यासमोर करून दाखविला व कर्वे-टक फंडासाठीं पैसा मिळविला. मुलींनीं कोणाच्याहि मदतीवांचून तयार केलेला तो कार्यक्रम शिक्षक मंडळींना इतका पसंत पडला कीं, त्यांनीं त्यांतील एक संभाषण

बाल सेवासंघाच्या (Children's Guild of Service) वार्षिक समारंभासाठीं पसंत केलें. याखेरीज मिस् फील्डिंग मुलींना एखादी चांगली फिल्म् असल्यास केव्हां केव्हां सिनेमाला पाठवीत. तसेंच नाताळच्या सुटींत ज्या मुली बोर्डिंगमध्यें राहत त्यांना शिक्षकिणींच्या बरोबर सिंहगड, भाटघर, पुरंदर इत्यादि प्रसिद्ध स्थळें पाहण्यास त्या पाठवीत असत.

त्यांच्या कारकीर्दींत शाळेंतील मुलींनीं करमणुकीचे खेळ करून मलबार फंडासाठीं पैसे मिळविले. मुलांच्या सेवासंघाच्यातर्फे निरनिराळ्या शाळांमध्यें होणाऱ्या खेळांच्या सामन्यांत आमच्या शाळेंतील मुलींनीं शील्ड मिळविलें. तीन वर्षें लागोपाठ हुजुरपागेकडे तें शील्ड होतें. अशा तऱ्हेनें अभ्यासाप्रमाणें खेळामध्येंहि आमची शाळा पहिली आहे ही गोष्ट त्यांनीं सिद्ध केली.

सेकंडरी टीचर्स कॉलेजमधून डिग्री घेऊन शिक्षकिणी पुनः शाळेंत काम करूं लागल्या म्हणजे मिस् फील्डिंग त्यांना हरप्रकारें उत्तेजन देत व कित्येक वेळां त्यांना इतर शिक्षकांच्या समोर पाठ घ्यावयास लावीत. शक्य तितक्या नव्या नव्या पद्धति आपल्या शाळेंतील शिक्षक मंडळींनीं शिकाव्या व आपल्या ज्ञानांत भर टाकावी एवढाच त्यांचा हेतु असे.

हुजुरपागा ही नमुनेदार शाळा आहे अशी खात्री असल्यामुळें तेथील शिक्षकांचें अध्यापन पाहून आपल्या विद्यार्थिनींना फायदा होईल या हेतूनें सेंट मेरीज् कॉलेजच्या प्रिन्सिपॉल यांनीं आपल्या विद्यार्थिनींसह शाळेस भेट देऊन निरनिराळ्या वर्गांतील पाठ पाहिले. निरनिराळ्या शैक्षणिक संस्थांतील अध्यापिकांनीं परस्परांच्या संस्थांना भेट देऊन विचारविनिमय केल्यास उभय संस्थांचा फायदा होतो. आमच्या शाळेच्या डॉइंग शिक्षकांना मिस् फील्डिंग यांनीं सेंट मेरीज् स्कूलमधील डॉइंगची शिक्षणपद्धति पाहण्यास पाठविलें होतें. एकदां कन्याशाळेचे शिक्षक व शिक्षकिणी आमच्या शाळेचें ड्रिल व इंग्लिश या विषयांचे पाठ पाहण्यास आल्या होत्या.

मिस् फील्डिंग यांच्या कारकीर्दींत शाळेची लोकप्रियता अधिकाधिक वाढत जाऊन हायस्कूल व प्रायमरी मिळून शाळेंत एकंदर सातशें मुली झाल्या. बोर्डिंगमध्यें ब्राह्मण, ज्यू, ख्रिश्चन, मुसलमान मिळून शंभर मुली होत्या. ज्यू व ख्रिश्चन मुलींची बोर्डिंगांतील संख्या कमी झाल्यानें त्यांची जेवणाची व्यवस्था मिस् बर्न यांच्या वेळेपासून हिंदु बोर्डिंगमध्यें होऊं लागली होती. अर्थात् त्यांचें जेवणघर मात्र भिन्न असे. असो.

मध्य व दक्षिण विभागांच्या इन्स्पेक्ट्रेस मिस् पेन यांचे वार्षिक इन्स्पेक्शनचे शेरे खालीं उद्धृत केले आहेत. त्यांवरुन मिस् फील्डिग यांच्या योग्यतेची सहज कल्पना येईल. इ. स. १९२५ च्या रिपोर्टांत मिस् पेन लिहितात, "The school continues to more than maintain its high state of efficiency under the very able supervision of Miss Fielding. An excellent school–well-organised, well-equipped and well-staffed."

इ. स. १९२७ सालीं त्या लिहितात, "The number of pupils has reached the limit in the present buildings and more still press for admission; increased accommodation has therefore become imperative. The standard of work is excellent. This is due largely to the remarkable way in which Miss Fielding keeps herself in personal touch with every detail in spite of the great size of the institution. Great credit is also due to her very keen and highly qualified staff. Outdoor games and Girl Guiding receive much attention."

मिस् फील्डिग यांच्या योग्यतेची कल्पना येण्यास वरील उतारे पुरे आहेत. इ. स. १९२८ सालीं त्या सेवानिवृत्त झाल्या. त्या वेळीं विद्यार्थिनी, अध्यापकवर्ग व सोसायटीच्या कौन्सिलची मंडळी यांनीं त्यांच्या अमूल्य कामगिरीचा मनापासून गौरव केला. समारंभ, मेजवान्या, फोटो वगैरे गोष्टींची त्या वेळीं शाळेंत धांदल उडून राहिली होती. याच वर्षी त्या विलायतेस गेल्या, त्या वेळीं सर्व शिक्षकवर्गाला व त्यांनाहि फार वाईट वाटलें. आपल्या यशाचें श्रेय स्वतःकडे न घेतां त्या तें अध्यापकवर्गास नेहमीं देत. यावरून त्यांच्या अंगचें सौजन्य व्यक्त होतें.


माजी विद्यार्थिनी-संघ (Old Girls' Association) ही संस्थाहि त्यांनींच शाळेंत स्थापन केली ही गोष्ट नमूद करण्याजोगी आहे. त्या संस्थेची सविस्तर माहिती पुढील प्रकरणीं येईल. मिस् फील्डिग् यांचा स्वभाव कर्तव्याच्या बाबतींत कडक व कायदेशीर असला तरी त्या अन्तःकरणाच्या प्रेमळ असून अतिशय निःपक्षपाती असत. त्यांचा स्वभाव न्यायी व विनोदीहि होता. परंतु तो विनोद ऑफिसमध्यें मात्र केव्हांहि दिसत नसे. आईबापांवेगळ्या अनाथ मुलींच्याबद्दल त्यांना फार दया वाटे व त्यांनीं एक दोन गरीब मुलींना बोर्डिंगमध्यें थोडेंसें काम देऊन फुकट ठेविल्या होत्या. त्या व्यवहारदक्ष व धोरणी असून त्यांना मनुष्याची फार चांगली पारख असे.

हल्लीं त्या विलायतेमध्यें असून शाळेंतील कांहीं शिक्षकिणींना त्यांचीं पत्रें येतात. त्या पत्रांत शाळेची व येथील अध्यापिकांची त्या नेहमीं प्रेमानें चौकशी करतात. शाळेला ज्या उत्कृष्ट लेडी सुपरिंटेंडेन्टस् लाभल्या त्यांच्यामध्यें मिस् फीलिंडग यांची गणना होते. सरकारनेंहि केसर-इ-हिंद पदक त्यांना देऊन त्यांच्या कार्याचा व गुणांचा गौरव केला व त्या मानास मिस् फीलिंडग सर्वथैव पात्र आहेत. 'टाइम्स ऑफ इंडिया'मधून ही आनंदाची बातमी समजल्यावर त्यांच्या जागीं आलेल्या नवीन लेडी सुपरिंटेंडेंट मिस् वाडिया, शाळेंतील अध्यापकवर्ग व विद्यार्थिनी या सर्वांना फार आनंद झाला व त्या सन्मानाप्रीत्यर्थ त्यांचें अभिनंदन करण्यासाठीं मिस् वाडिया यांनीं त्यांना विलायतेस तार पाठविली. असो.

इ. स. १९२८च्या जून महिन्यांत मिस् वाडिया, बी.ए. (फर्स्ट क्लास), एस्.टी.सी.डी., या आपल्या अधिकारावर रुजू झाल्या. या हायस्कूलमध्यें पूर्वीं त्यांनीं सुमारें दहा अकरा वर्षें काम केलें असल्यानें त्या येथील अध्यापकवर्गास चांगल्या परिचित होत्या. ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन या संस्थेमध्यें मुख्य अध्यापिकेचें त्यांनीं दोन तीन वर्षें काम केलें होतें. ह्या हायस्कूलकडे बदली होण्यापूर्वीं मिस् वाडिया अहमदाबादेच्या महालक्ष्मी गर्ल्स् हायस्कूल या संस्थेच्या लेडी सुपरिंटेंडेंट होत्या. त्या पुण्याच्याच असल्यानें व येथील समाजाच्या संस्कृतीची व विचारभावनांची त्यांना पूर्ण माहिती असल्याकारणानें त्यांच्या देखरेखीखालीं शाळेची उत्तरोत्तर भरभराट होईल याची सर्वांना खात्री होती. इंग्लिश, गुजराथी व मराठी या तिन्ही भाषांवर त्यांनीं प्रभुत्व संपादिलें आहे.

दोन वर्षांच्या कारकीर्दींत शाळेच्या प्रगतीला त्यांनीं चांगलाच हातभार लाविला. हायस्कूलच्या विद्यार्थिनींचा बौद्धिक विकास व्हावा यासाठीं मुलींचें स्वतंत्र वाचनालय त्यांनीं स्थापन केलें व त्याप्रीत्यर्थ पुष्कळ नवीन सुंदर पुस्तकें खरेदी केलीं आणि वर्तमानपत्रें व मासिकें सुरु केलीं. मुलींचें इंग्लिश उत्तम व्हावें या हेतूनें त्यांनीं वेळापत्रकांत वाचनालयांतील पुस्तक वाचण्याचा आठवड्यांतून एक तास व 'चालू बातमी' (Current News) या विषयाचा एक तास असे दोन तास मुद्दाम राखून ठेविले. Current News च्या तासाला मुली स्वतः इंग्लिश वर्तमानपत्रांत वाचलेल्या बातम्या सांगत व नंतर अध्यापिकाहि मुलींनीं न वाचलेल्या अशा कांहीं महत्त्वाच्या बातम्या त्यांना तोंडी सांगत अगर वाचून दाखवीत. या पद्धतीमुळें जगांतील घडामोडींशीं मुलींचा सहज परिचय होऊन त्यांच्या ज्ञानांत अनायासें भर पडे. मॅट्रिकच्या

हुजुरपागा–इंग्रजी शाळेंतील विद्यार्थिनींच्या पटावरील व हजर असलेल्या संख्येची वाढ दाखविणारा आलेख




पटावरील संख्या–अखंड रेषा.

हजर असलेल्यांची संख्या–तुटक रेषा

हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स्

मॅट्रिकमध्यें पास झालेल्या विद्यार्थिनींची शेंकडेवारी



आडवी रेघ वर्षे व उभी रेघ शेंकडेवारी दाखविते.

हुजुरपागेच्या पासांची शेंकडेवारीची आलेख–रेषा अखंड.

विश्वविद्यालयाच्या पासांची शेंकडेवारीची आलेख–रेषा तुटक.

वर्गाचें इंग्लिश त्याच घेत व कित्येक मॅट्रिकच्या विद्यार्थिनींना आपल्या खाजगी वेळांतून वेळ काढून त्या इंग्लिश शिकवीत असत. विद्वान् व उत्कृष्ट अध्यापिका असा त्यांचा लौकिक हायस्कूलमध्यें होता. त्यांचा इंग्लिशचा तास मुलींना फार प्रिय असे.

इंग्लिश सहावी व सातवी या दोन वर्गांमध्यें इतिहास हा विषय इंग्रजीमधून शिकविला जावा असें त्यांचें मत होतें व त्याप्रमाणें इतिहास इंग्रजींतून शिकविण्याची सुरुवातहि त्यांनीं केली. इंग्रजी चौथ्या इयत्तेस संस्कृत विषय प्रात्यक्षिक पद्धतीनें (Direct Method) शिकविण्याची त्यांनीं योजना केली.

शेक्स्पिअर, कालिदास, तुकाराम व शिवाजी यांसारख्या थोर पुरुषांचे जन्म-दिन साजरे करण्याची प्रथा त्यांनीं पाडिली. त्यांच्या इच्छेप्रमाणें इंग्लिश सहावींतील विद्यार्थिनींनीं प्रख्यात आंग्ल कादंबरीकार चार्ल्स् डिकन्स् यांचा स्मृतिदिन मिस् वाडिया यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा केला. यामुळें त्या त्या प्रसिद्ध पुरुषाची माहिती मुलींना गोळा करावी लागल्यामुळें त्यांच्या ज्ञानांत भर पडे.

चित्रें जमविण्याची त्यांना विशेष हौस असे. शिक्षणक्रमांत चित्रांना विशिष्ट स्थान आहे हें जाणून विद्यार्थिनींच्या ज्ञानवर्धनासाठीं त्या चांगलीं चांगलीं चित्रें सर्वांच्या सहज दृष्टीस पडतील अशा जागीं शाळेमध्यें टांगून ठेवीत. त्यामुळें जिज्ञासा उत्पन्न होऊन मुली तीं चित्रें पाहात व त्या चित्रांखालीं असलेला मजकूर वाचीत. वर्गांत शिकवितांना शिक्षकांनीं चित्रांचा उपयोग करून आपला विषय अधिक मनोरंजक करावा असें त्यांचें मत होतें व शिक्षकहि शक्य असेल तेथें चित्रांच्या साहाय्यानें आपले पाठ देत. प्रत्येक वर्गातील मुलींनींहि चित्रांचा संग्रह करावा अश त्यांनीं सूचना केल्यावरून मुलींनीं चित्रसंग्रहाचें पुस्तक (Album) तयार करण्याच उपक्रम सुरू केला व तो अत्यंत यशस्वी झाला.

शाळेंत विद्यार्थिनींची शारीरिक उन्नति व्हावी यासाठीं त्या मनापासून झटत. इंग्लिश चौथी ते सातवीपर्यंत प्रत्येक वर्गानें दर आठवड्यास शाळा सुटल्यानंतर वर्गाच्या शिक्षकिणीच्या देखरेखीखालीं एक तास खेळावें असा नियम त्यांनीं केला. या खेळांच्या वेळीं त्या स्वतः क्रीडांगणामध्यें हजर राहून मुलींचे खेळ पाहात व केव्हां केव्हां स्वतःहि खेळांमध्यें भाग घेत. Captain-ball, Ping-pong इत्यादि नवीन खेळांचा उपक्रम त्यांनीं शाळेमध्यें केला व पिंगपाँगचें टेबल, झोंपाळा, सी-सॉ इत्यादि खेळांचे बरेंच साहित्य विकत घेऊन मुलींना करमणुकीचीं साधनें त्यांनीं

करून दिलीं. शिक्षकिणींनींहि सर्व खेळांमध्यें हौसेनें भाग घ्यावा असें त्यांचें मत होतें. खो खो, हुतुतू यांसारखे मर्दानी खेळ त्यांना विशेष प्रिय नसावेत असें वाटतें. बोर्डिंगमधील मुलींना कित्येकदां रविवारीं सकाळीं त्या कांहीं तरी खेळ खेळावयास लावीत व त्यांच्या खेळांमध्यें स्वतः भाग घेत. मुलींच्यांत मिसळण्याची त्यांना फार आवड असे.

सहल करण्यास जाणें (Trips) हें शिक्षणाचें महत्त्वाचें अंग आहे; व तें जाणून प्रत्येक वर्गाला वर्षातून एकदां तरी एखादें प्रेक्षणीय स्थान पाहण्यासाठीं पाठविण्याची पद्धति त्यांनीं सुरू केली. त्यांच्या कारकीर्दींत शाळेंतील मुलींनीं निरनिराळीं अनेक प्रसिद्ध ठिकाणें पाहिलीं. या सहलींमध्यें कांहीं तरी नवीन पाहण्यास मिळून ज्ञान व आनंद यांचा मुलींना लाभ होत असे.

गर्ल-गाइडिंग् (बालिका-संघ) या विषयाची त्यांना फार आवड असे. त्यांच्या प्रोत्साहनावरून अनेक मुलींनीं 'गाइड' म्हणून आपलीं नांवें नोंदविलीं होतीं. गाइड्सना त्या वरचेवर ट्रेनिंगसाठीं अथवा कँपसाठीं निरनिराळ्या ठिकाणीं पाठवीत.

प्रायमरी स्कूलमध्यें ब्ल्यूबर्ड-संघ मिस् वाडिया यांनींच इ. स. १९२९ सालीं स्थापन केला. प्रारंभीं २४ मुलींनीं त्यामध्यें नांवें नोंदविलीं. या संघामुळें मुलींच्या अंगीं लहानपणापासून आज्ञाधारकपणा, नियमितपणा, टापटीप व दुसऱ्याला मदत करण्याची इच्छा इत्यादि गुणांचा विकास होतो.

माजी विद्यार्थिनी-संघाच्या (Old Girls' Association) अध्यक्ष या नात्यानें त्यांनीं त्या संघातर्फे गायनवादनाचे वगैरे बरेच मनोरंजक कार्यक्रम घडवून आणून माजी विद्यार्थिनींच्या मनांत या संघाविषयीं अधिक औत्सुक्य निर्माण केलें.

वनितासमाजाच्या सभेला त्या स्वतः हजर राहून मुलींना उत्तेजन देत. माजी-विद्यार्थिनी-संघ व वनितासमाज या दोन्ही संस्थांचें वार्षिक संमेलन एकाच वेळीं भरविण्याचा प्रघात त्यांनीं पाडला होता. त्यामुळें नव्या व जुन्या विद्यार्थिनींना एकत्र येऊन विचारविनिमय करण्यास त्यांनीं अपूर्व संधि दिली.

शाळेंत भिन्न भिन्न जातींच्या व धर्मांच्या मुली असल्यानें प्रत्येक धर्माविषयीं मुलींना थोडथोडी माहिती असावी असें त्यांना वाटे. म्हणून निरनिराळ्या जातींच्या सणांच्या दिवशीं त्यांच्या त्यांच्या धर्माबद्दल चौकशी करून माहिती मिळविण्यास मुलींना त्या आग्रह करीत.

मुलींनीं व शिक्षकांनीं एकमेकांची गांठ पडली असतां शिष्टाचार पाळावे असें त्यांचें मत असे. ओळखीच्या मंडळींनीं गांठ पडली असतां ओळखीचें चिन्हहि न दाखवितां आपआपल्या मार्गानें जाणें खरोखर फार वाईट दिसतें. संकोच, भिडस्तपणा व भीति या कारणांमुळेंच ' नमस्कार ' करण्याचा शिष्टाचार पुण्यांतील वातावरणांत तितकासा जोरांत सुरू नसावा असें वाटतें. परंतु अशा शिष्टाचाराची अत्यंत जरूरी आहे यांत शंका नाहीं.

मुलींनीं बागेंतलीं झाडांचीं पानें व फुलें तोडणें त्यांना आवडत नसे. इतकेंच नव्हे तर झाडांचीं पानें व फुलें तोडलेलीं पाहिलीं कीं त्यांना वाईट वाटे. शिस्तीच्या त्या कट्टया भक्त आहेत. मुलींनीं प्रार्थनेच्या वेळीं ओळीनें उभें राहणें, शिस्तीनें प्लेशेडमध्यें येणें व पुनः वर्गांत जाणें, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ठेवणें, वर्गाची व एकंदर शाळेची स्वच्छता राखणें, मुलींनीं परीक्षेच्या आदल्या दिवशीं पेपर विकत घेणें, परीक्षांच्या निकालांच्या याद्यांवर नापास विद्यार्थिनींचे मार्क शिक्षकिणींनीं तांबड्या रेषेनें दाखविणें, एक ना दोन अशा कित्येक बारीकसारीक, परंतु शाळेच्या शिस्तीला उपकारक गोष्टींकडे विशेष लक्ष देण्याबद्दल त्यांचा कटाक्ष असे. त्यांच्या कारकीर्दीपासून शाळेचा बक्षिस-समारंभ दरवर्षी होऊं लागला. दोन्ही वर्षी शाळेंतील मुलींनीं केलेल्या कामाचें त्यांनीं प्रदर्शन भरविलें होतें.

त्यांच्या अमदानींत हर एक्सलन्सी लेडी वुइल्सन् व सर फ्रेड्रिक व लेडी साइक्स्, सर जे. पी. हार्टोग व हार्टोग कमिटीचे सभासद, नामदार प्रधान व नामदार जाधव, ग्वाल्हेरचे महाराज, महाराणीसाहेब व राजकन्या यांनीं शाळेस भेट देऊन शाळेबद्दल स्तुतिपर उद्गार काढले. " The school was absolutely the best girls' school the Committee had seen in their all-India tour," असा शेरा सर जे. पी. हार्टोग यांनीं व्हिझिटर्स बुकमध्यें लिहून ठेविला आहे.

वनितासमाजाचा वार्षिकोत्सव, माजी विद्यार्थिनींचें वार्षिक संमेलन, शाळेचा संस्थापना दिन (४ मार्च), बालसेवासंघाचे कार्यक्रम, वार्षिक बक्षिस समारंभ इत्यादि अनेक कार्यक्रम मिस् वाडिया यांनीं अत्यंत उत्साहानें पार पाडले. याशिवाय मिस् फील्डिंग यांनीं केलेल्या सर्व गोष्टी त्यांनीं जशाच्या तशा पुढें चालू ठेविल्या.

त्यांच्या कारकीर्दींत हायस्कूलमध्यें ५१७ व प्रायमरीमध्यें २२६ मिळून ७५३ पर्यंत शाळेंतील मुलींची संख्या वाढली. बोर्डिंगमध्येंहि १०७ पर्यंत मुलींची संख्या झाली. यावरून बोर्डिंगमधील व्यवस्थेविषयीं मुली व त्यांचे पालक यांचें मत

दिसून येतें. पुढें देवीची सांथ सुरू झाली. त्या वेळीं शाळेंतील सर्व मुलींची व शिक्षकांची चौकशी करून ज्यांनीं देवी काढविल्या नव्हत्या त्या सर्वांची सोय त्यांनीं शाळेमध्यें केली. प्रायमरी शाळेमध्येंहि त्यांनीं बऱ्याच सुधारणा केल्या. बालवर्गाला मधला झोपेचा तास त्यांनीं सुरू केला. तो तास मुलींना प्रिय झाला असून दोन चार मुलींना तरी त्या तासाला छान झोंप लागते. लहान लहान मुली त्यांना फार आवडतात. त्यामुळें मुलींना त्यांच्याविषयीं भीतीपेक्षां प्रेमच अधिक वाटतें.

त्या मितभाषणी असून प्रत्यक्ष कृतीनें आपलें कर्तव्य व कामाचें वैशिष्ट्य व्यक्त करीत. एखादी गोष्ट मनाप्रमाणें न झाल्यास त्या केव्हां केव्हां रागावत. परंतु त्या रागावरूनहि त्यांची उद्योगाची हौस व कामाचा उत्साह स्पष्ट दिसतो. त्यांच्या वेळीं दोन्ही वर्षी मॅट्रिकचे निकाल चांगले लागले. त्यांचें कर्तृत्व, उत्साह, उद्योगी-पणा, चिकाटी व कामाची आवड हे गुण खरोखर प्रशंसनीय आहेत. १ एप्रिल १९३० रोजीं मुंबई व उत्तर विभागांतील मुलींच्या शाळेच्या इन्स्पेक्ट्रेस् म्हणून त्यांची नेमणूक झाली. हल्लीं त्या वुइमेन्स ट्रेनिंग कॉलेजच्या लेडी सुपरिंटेंडेन्ट असून 'नेचर स्टडी क्लब'च्या अध्यक्ष, 'वुइमेन ग्रॅज्युएट्स् युनिअन्'च्या सेक्रेटरी, 'ज्यूनिअर रेड क्रॉस' या संस्थेच्या सेक्रेटरी म्हणून बरींच सार्वजनिक कामें करीत आहेत.



मिस् वाडिया, लेडी सुपरिंटेंडेंट – १९२८ ते १९३० | ७



मिसेस् मोझेस, लेडी सुपरिंटेंडेंट – १९३० ते १९३३

प्रकरण सतरावें

गेलीं चार वर्षें

मिस् वाडिया यांच्यानंतर ठाणें येथील मुलींच्या सरकारी शाळेंतील हेड मिस्ट्रेस् मिसेस् मोझेस्, बी.ए., एस्.टी.सी.डी., यांची इ. स. १९३० च्या एप्रिल महिन्यांत लेडी सुपरिंटेंडेंट म्हणून आमच्या हायस्कूलवर नेमणूक झाली. मिसेस् मोझेस् यांनीं मिस् बर्न यांच्या हाताखालीं पूर्वी कांहीं वर्षे येथें अध्यापिका म्हणून काम केलें होतें. इंग्लंडला जाऊन London Day Training College चा डिप्लोमा त्यांनीं मिळविला होता व तेथील शिक्षणसंस्थांच्या कार्याचें त्यांनीं काळजीपूर्वक निरीक्षण केलें होतें.

भूगोल हा त्यांचा आवडता विषय असून हाताखालच्या कांहीं अध्यापिकांच्या मनांत त्यांनीं या विषयाबद्दल गोडी उत्पन्न केली. त्या आल्यानंतर बऱ्याच अनुभवी व कर्तबगार अध्यापक-अध्यापिकांच्या बदल्या झाल्या व त्यामुळें अननुभवी, शिक्षण-शास्त्रानभिज्ञ अशा सात आठ नवीन शिक्षकिणी शाळेंत आल्या. त्यांना मिसेस् मोझेस् अध्यापनासंबंधीं उपयुक्त सूचना करीत व केव्हां केव्हां एखाद्या वर्गांत स्वतः पाठ घेऊन दाखवीत.

शाळेंत मुलींना कागद, पेन्सिली वगैरे स्टेशनरी सामान पुरविण्यासाठीं त्यांनीं 'बालिका-वस्तु-भाण्डार' या संस्थेची स्थापना केली. शिक्षकिणींच्या हाताखालीं शाळेंतील विद्यार्थिनी स्वयंसेविका होऊन 'भांडारा'च्या विक्रीचें काम पाहात. सहकार्याचें महत्त्व मुलींना शिकवावें याच हेतूनें ही संस्था अस्तित्वांत आली.

मुलींचें आरोग्य चांगलें राहावें या हेतूनें त्यांनीं वेळापत्रकांत पंधरा मिनिटांचा 'Physical exercise'चा तास घातला. त्याप्रमाणें प्रत्येक वर्गाचे अभ्यासाचे तास संपल्यानंतर पंधरा मिनिटें ड्रिल होत असे. त्यांच्या कारकीर्दींत त्यांनीं आठवड्याच्या परीक्षा बंद करून टाकून दर आठवड्याला 'Surprise test' घेण्याचा उपक्रम सुरू केला व तिमाही, सहामाही व नऊमाही अशा परीक्षा घेण्याचें ठरविलें.

ड्रॉइंग, गायन व शिवण हे तीन्ही विषय मुलींना अत्युपयुक्त असल्यामुळें त्या विषयांचे स्पेशल वर्ग त्यांनीं सुरू केले. चौथीपासून सहावीपर्यंतच्या मुलींकरितां हे वर्ग असतात. परंतु आठवड्यांतून एका तासापेक्षां अधिक वेळ या वर्गाला देतां

येत नाहीं. ड्रॉइंग, गायन व शिवण या तीन विषयांपैकीं प्रत्येकीला एकच विषय निवडून घेऊन त्या विषयाचा अधिक अभ्यास करावा लागतो.

बोर्डिंगमध्येंहि त्यांनीं कांहीं सुधारणा केल्या. पूर्वी मुलींना घरून ताट, भांडीं, पाट वगैरे सामान आणावें लागत असे; परंतु मिसेस् मोझेस्‌नीं बोर्डिंगच्या मुलींच्यासाठीं भांडीं वगैरे सर्व सामान आणविलें. तेव्हांपासून बोर्डिंगच्या मुलींना स्वतःचे कपडे व बिछाना यांशिवाय दुसरें कांहीं सामान आणावें लागत नाहीं.

मिसेस् मोझेस् मुलींच्यामध्यें मोकळेपणानें मिसळत. मुलींनीं नियम मोडले तर त्यांना राग येई. परंतु मुलींच्या भावनांकडे लक्ष देऊन त्या त्यांना केव्हां केव्हां मोकळीक देत. रात्रींच्या वेळीं ठरलेल्या वेळानंतर जर हंसण्याचा आवाज त्यांनीं ऐकला तर त्या तेथें स्वतः जात. मिसेस् मोझेस् आतां आपणांस शिक्षा करतील या विचारानें मुली घाबरत. परंतु मुलींच्या गडबडीचें खरें कारण कळलें म्हणजे त्या रागावत नसत. उलट त्यांच्याशीं गप्पागोष्टी करून मुलींना हंसवून सोडीत.

बोर्डिंगमधील मुलींना हिंदु सणांची माहिती करून देण्यासाठीं त्यांनीं वे. शा. सं. गणेशशास्त्री शेंडे यांचीं सणांसंबंधीं व्याख्यानें करविलीं. त्यामुळें मुलींना प्रत्येक सणाचें महत्त्व समजूं लागलें.

याशिवाय वनितासमाज, माजी विद्यार्थिनी संघ, बालसेवासंघ, बालिकासंघ, वार्षिक बक्षिस समारंभ, बालकदिन, संस्थापनादिन इत्यादि शाळेचे कार्यक्रम त्यांच्या कारकीर्दींत समाधानकारक रीतीनें पार पडले.

इ. स. १९३२ सालीं मिस् रुबेन यांच्या हस्तें शाळेचा बक्षिस-समारंभ झाला. त्या प्रसंगीं मिस् रुबेन यांचें सुविचारपरिप्लुत व अत्यंत स्फूर्तिदायक भाषण झालें. इ. स. १९३३ सालीं बक्षिस-समारंभाच्या वेळीं सांगलीच्या राणीसाहेब श्रीमंत सौ. सरस्वतीबाई पटवर्धन यांनीं अध्यक्षस्थान मंडित केलें होतें. त्यांनीं आपल्या भाषणांत "Extension Class"च्या कल्पनेचा पुरस्कार केला.

मॅट्रिक होऊन कॉलेजशिक्षण न घेणाऱ्या विद्यार्थिनींच्यासाठीं Extension Classes सुरू करून त्यांमध्यें उच्च दर्जाचें इंग्लिश व मराठी वाङ्मय व शरीरशास्त्र, गृहजीवनशास्त्र, बालसंगोपन, रुग्णशुश्रूषा, पाकशास्त्र, चित्रकला, संगीत, शिवणकाम इत्यादि, गृहिणींना आवश्यक अशा विषयांचें ज्ञान द्यावें अशी कल्पना मिसेस् मोझेस् यांनीं शाळेच्या सोसायटीकडे लेखी कळविली व ती सोसायटीला फार पसंत पडली. परंतु ती अस्तित्वांत आलेली पाहण्यास दुर्दैवानें त्या हयात नव्हत्या.

त्यांच्या कारकीर्दीत महाराष्ट्र गर्ल्स् एज्युकेशन सोसायटीचे सन्मान्य अध्यक्ष श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांनीं श्रीमंत युवराजसाहेब, श्रीमंत सौ. महाराणीसाहेब व इतर मंडळी यांच्यासमवेत संस्थेस भेट देऊन तेथील कार्य पाहिलें. प्ले-शेडमध्यें त्यांच्या सन्मानार्थ सभा भरविण्यांत आली. दिवाणबहादुर गोडबोले यांनीं महाराजांचें स्वागत केल्यानंतर महाराजांनीं एक तासपर्यंत भाषण करून संस्थेनें चालविलेल्या उत्कृष्ट कार्याची प्रशंसा केली. शिक्षणाचें महत्त्व सांगून 'पाश्चात्य देशांतील लोकांचे शैक्षणिक प्रयोग पाहा, परंतु अंधानुकरण न करतां त्यांच्या चांगल्या तेवढ्याच गोष्टींचा स्वीकार करा' असा कळकळीचा उपदेश त्यांनीं केला.

त्याचप्रमाणें मिस् सोराबजी यांच्या भगिनी मिस् कॉर्नेलिया सोराबजी यांनीं शाळेस भेट देऊन तेथील सर्व कार्य उत्सुकतेनें पाहिलें. शाळेची प्रगति पाहून त्यांना फार आनंद झाला. त्यांनीं संस्थेविषयीं दिलेलें मत पुढीलप्रमाणें आहे:—

"I did not see a dull pupil in the School whether the lesson was about Fairies to a 6-year old or in Sanskrit to a last year student. The methods adopted and the equipment compare favourably with Modern Schools in Europe and America. Maharashtra is to be congratulated on its High School for Indian Girls."

मॅट्रिक परीक्षेचे निकाल त्यांच्या कारकीर्दीत शें. ९४, शें. ९० असे लागून दोन वर्षी मुलींनीं चॅटफील्ड प्राइझ व दळवी शिष्यवृत्ति संपादन केली. त्यांच्याच कारकीर्दीपासून मुलींची वैद्यकीय तपासणी दरवर्षास करण्याची पद्धति सुरू झाली.

तीन वर्षांच्या कारकीर्दीमध्यें मिसेस् मोझेस् यांना बिलकुल प्रकृतिस्वास्थ्य लाभलें नाहीं. परंतु अंगच्या सहनशक्तीच्या जोरावरच त्या सर्व कर्तव्यें पार पाडीत असत. त्या जात्याच आनंदी होत्या. शारीरिक वेदना होत असतांनाहि त्यांना आपला आनंदी स्वभाव कायम ठेवितां आला यांतच त्यांच्या कर्तबगारीचें सार आहे. इ. स. १९३३ च्या जून महिन्याच्या अखेरीस त्यांनीं रजा घेतली व त्यानंतर त्यांची प्रकृति अधिकाधिक बिघडत जाऊन मुंबई येथें एक महिन्याच्या आंतच त्या कालवश झाल्या.

हुजुरपागेच्या माजी विद्यार्थिनी व माजी अध्यापिका मिस् वेरुळकर (रेचल-बाई बेंजमीन) या बंगाल्यांतील शिक्षणखात्यांतील आपलें कार्य संपवून विश्रान्ति घेण्यासाठीं त्याच वर्षी पुणें येथें राहावयास आल्या होत्या. मिसेस् मोझेस् यांच्या

येत नाहीं. ड्रॉइंग, गायन व शिवण या तीन विषयांपैकीं प्रत्येकीला एकच विषय निवडून घेऊन त्या विषयाचा अधिक अभ्यास करावा लागतो.

बोर्डिंगमध्येंहि त्यांनीं कांहीं सुधारणा केल्या. पूर्वी मुलींना घरून ताट, भांडीं, पाट वगैरे सामान आणावें लागत असे; परंतु मिसेस् मोझेस्‌नीं बोर्डिंगच्या मुलींच्यासाठीं भांडीं वगैरे सर्व सामान आणविलें. तेव्हांपासून बोर्डिंगच्या मुलींना स्वतःचे कपडे व बिछाना यांशिवाय दुसरें कांहीं सामान आणावें लागत नाहीं.

मिसेस् मोझेस् मुलींच्यामध्यें मोकळेपणानें मिसळत. मुलींनीं नियम मोडले तर त्यांना राग येई. परंतु मुलींच्या भावनांकडे लक्ष देऊन त्या त्यांना केव्हां केव्हां मोकळीक देत. रात्रींच्या वेळीं ठरलेल्या वेळानंतर जर हंसण्याचा आवाज त्यांनीं ऐकला तर त्या तेथें स्वतः जात. मिसेस् मोझेस् आतां आपणांस शिक्षा करतील या विचारानें मुली घाबरत. परंतु मुलींच्या गडबडीचें खरें कारण कळलें म्हणजे त्या रागावत नसत. उलट त्यांच्याशीं गप्पागोष्टी करून मुलींना हंसवून सोडीत.

बोर्डिंगमधील मुलींना हिंदु सणांची माहिती करून देण्यासाठीं त्यांनीं वे. शा. सं. गणेशशास्त्री शेंडे यांचीं सणांसंबंधीं व्याख्यानें करविलीं. त्यामुळें मुलींना प्रत्येक सणाचें महत्त्व समजूं लागलें.

याशिवाय वनितासमाज, माजी विद्यार्थिनी संघ, बालसेवासंघ, बालिकासंघ, वार्षिक बक्षिस समारंभ, बालकदिन, संस्थापनादिन इत्यादि शाळेचे कार्यक्रम त्यांच्या कारकीर्दींत समाधानकारक रीतीनें पार पडले.

इ. स. १९३२ सालीं मिस् रुबेन यांच्या हस्तें शाळेचा बक्षिस-समारंभ झाला. त्या प्रसंगीं मिस् रुबेन यांचें सुविचारपरिप्लुत व अत्यंत स्फूर्तिदायक भाषण झालें. इ. स. १९३३ सालीं बक्षिस-समारंभाच्या वेळीं सांगलीच्या राणीसाहेब श्रीमंत सौ. सरस्वतीबाई पटवर्धन यांनीं अध्यक्षस्थान मंडित केलें होतें. त्यांनीं आपल्या भाषणांत "Extension Class"च्या कल्पनेचा पुरस्कार केला.

मॅट्रिक होऊन कॉलेजशिक्षण न घेणाऱ्या विद्यार्थिनींच्यासाठीं Extension Classes सुरू करून त्यांमध्यें उच्च दर्जाचें इंग्लिश व मराठी वाङ्मय व शरीरशास्त्र, गृहजीवनशास्त्र, बालसंगोपन, रुग्णशुश्रूषा, पाकशास्त्र, चित्रकला, संगीत, शिवणकाम इत्यादि, गृहिणींना आवश्यक अशा विषयांचें ज्ञान द्यावें अशी कल्पना मिसेस् मोझेस् यांनीं शाळेच्या सोसायटीकडे लेखी कळविली व ती सोसायटीला फार पसंत पडली. परंतु ती अस्तित्वांत आलेली पाहण्यास दुर्दैवानें त्या हयात नव्हत्या.

त्यांच्या कारकीर्दींत महाराष्ट्र गर्ल्स् एज्युकेशन सोसायटीचे सन्मान्य अध्यक्ष श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांनीं श्रीमंत युवराजसाहेब, श्रीमंत सौ. महाराणीसाहेब व इतर मंडळी यांच्यासमवेत संस्थेस भेट देऊन तेथील कार्य पाहिलें. प्ले-शेडमध्यें त्यांच्या सन्मानार्थ सभा भरविण्यांत आली. दिवाणबहादुर गोडबोले यांनीं महाराजांचें स्वागत केल्यानंतर महाराजांनीं एक तासपर्यंत भाषण करून संस्थेनें चालविलेल्या उत्कृष्ट कार्याची प्रशंसा केली. शिक्षणाचें महत्त्व सांगून 'पाश्चात्य देशांतील लोकांचे शैक्षणिक प्रयोग पाहा, परंतु अंधानुकरण न करतां त्यांच्या चांगल्या तेवढ्याच गोष्टींचा स्वीकार करा' असा कळकळीचा उपदेश त्यांनीं केला.

त्याचप्रमाणें मिस् सोराबजी यांच्या भगिनी मिस् कॉर्नेलिया सोराबजी यांनीं शाळेस भेट देऊन तेथील सर्व कार्य उत्सुकतेनें पाहिलें. शाळेची प्रगति पाहून त्यांना फार आनंद झाला. त्यांनीं संस्थेविषयीं दिलेलें मत पुढीलप्रमाणें आहे:—

"I did not see a dull pupil in the School whether the lesson was about Fairies to a 6-year old or in Sanskrit to a last year student. The methods adopted and the equipment compare favourably with Modern Schools in Europe and America. Maharashtra is to be congratulated on its High School for Indian Girls."

मॅट्रिक परीक्षेचे निकाल त्यांच्या कारकीर्दींत शें. ९४, शें. ९० असे लागून दोन वर्षीं मुलींनीं चॅटफील्ड प्राइझ व दळवी शिष्यवृत्ति संपादन केली. त्यांच्याच कारकीर्दीपासून मुलींची वैद्यकीय तपासणी दरवर्षास करण्याची पद्धति सुरू झाली.

तीन वर्षांच्या कारकीर्दीमध्यें मिसेस् मोझेस् यांना बिलकुल प्रकृतिस्वास्थ्य लाभलें नाहीं. परंतु अंगच्या सहनशक्तीच्या जोरावरच त्या सर्व कर्तव्यें पार पाडीत असत. त्या जात्याच आनंदी होत्या. शारीरिक वेदना होत असतांनाहि त्यांना आपला आनंदी स्वभाव कायम ठेवितां आला यांतच त्यांच्या कर्तबगारीचें सार आहे. इ. स. १९३३ च्या जून महिन्याच्या अखेरीस त्यांनीं रजा घेतली व त्यानंतर त्यांची प्रकृति अधिकाधिक बिघडत जाऊन मुंबई येथें एक महिन्याच्या आंतच त्या कालवश झाल्या.

हुजुरपागेच्या माजी विद्यार्थिनी व माजी अध्यापिका मिस् वेरुळकर (रेचल-बाई बेंजमीन) या बंगाल्यांतील शिक्षणखात्यांतील आपलें कार्य संपवून विश्रान्ति घेण्यासाठीं त्याच वर्षीं पुणें येथें राहावयास आल्या होत्या. मिसेस् मोझेस् यांच्या

वेळीं वनितासमाजाचा उत्सव यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. वनितासमाजाच्या आद्य जनकांपैकीं त्या असल्यानें त्या वर्षीच्या उत्सवास विशेष महत्त्व प्राप्त झालें. Extension Class ला मिस् वेरुळकर यांनीं इंग्लिश शिकवावें व सर्वप्रकारें मदत करावी अशी मिसेस् मोझेस् यांनीं त्यांना विनंति केली व शाळेविषयीं त्यांना फार प्रेम असल्यानें मिस् वेरुळकर यांनीं ती आनंदानें मान्य केली.

परंतु योगायोग निराळा होता. मिसेस् मोझेस् यांच्या निधनानें शाळेच्या लेडी सुपरिंटेंडेंटची जागा कोणास द्यावी असा पेंच सोसायटीला येऊन पडला व त्यांनीं निदान दोन वर्षें तरी मिस् वेरुळकर यांनीं शाळेवर देखरेख करून येथील काम पाहावें अशी त्यांना विनंति केली. मिस् वेरुळकर यांना आपल्या शाळेविषयीं पराकाष्ठेचें प्रेम व कळकळ असल्यानें स्वतःची प्रकृति बरी नसतांना मातेप्रमाणें प्रिय वाटणाऱ्या शाळेची आपल्या हातून होईल तितकी सेवा करावी या उच्च हेतूनें प्रेरित होऊन त्यांनीं सोसायटीच्या विनंतीस रुकार दिला. सोसायटीकडून बिलकूल पगार न घेतां त्या येथील कार्य करीत आहेत. यावरून त्यांचा स्वार्थत्याग किती उच्च दर्जाचा आहे हें सर्वांच्या दृष्टोत्पत्तीस आलेंच आहे.

मिस् वेरुळकर यांच्या येथील कामगिरीचा उल्लेख करण्यापूर्वीं त्यांच्या बंगाल्यांतील अमूल्य कार्याचें महत्त्व येथें सांगणें इष्ट वाटतें. मिस् मेरी सोराबजी यांच्या भगिनी मिस् लीना सोराबजी यांना मिस् वेरुळकर यांचें आमच्या शाळेंतील काम इतकें पसंत पडलें कीं, डाक्का येथील ईडन् गर्ल्स् हायस्कूलसाठीं त्यांनीं त्यांना सरकारकडून मागून घेतलें. त्याप्रमाणें १९०९ सालीं ईडन् गर्ल्स् हायस्कूलच्या प्रिन्सिपॉल मिस् लीना सोराबजी यांच्या हाताखालीं काम करण्यास त्यांना सरकारनें डाक्का येथें पाठविलें. त्यांचें येथील उत्कृष्ट अध्यापन पाहून तेथील शिक्षणखात्यानें उच्च शिक्षणासाठीं विलायतेला जाण्यासाठीं म्हणून न मागतांहि दीडशें पौंडांची शिष्यवृत्ति त्यांना दिली. इ. स. १९११ सालीं त्यांनीं विलायतेस प्रयाण केलें व इ. स. १९१४ सालीं L.L.A.ची डिग्री मिळविली. अध्यापन या विषयामध्यें त्यांना फर्स्ट क्लास मिळाला. १९१४ सालीं युरोपमध्यें महायुद्ध सुरू झाल्यामुळें त्यांना परत हिंदुस्थानांत बोलाविण्यांत आलें. त्यामुळें तेथील अभ्यास अर्धवट सोडून परत येणें त्यांना भाग पडलें. पांच वर्षें पुनः काम केल्यानंतर इ. स. १९१९ सालीं त्यांना विलायतेस जाण्याची संधि सांपडली. स्कॉटलंडमध्यें सेंट अँड्रयूज् विश्वविद्यालयांत त्यांचा प्रवेश झाला. परंतु त्या विश्वविद्यालयांत लॅटिन् भाषा हा

आवश्यक विषय असल्यानें तो विषय प्रारंभापासून तयार केल्याशिवाय एम्.ए.च्या परीक्षेस बसणें अशक्य झालें. लॅटिन् भाषा ही संस्कृतसारखी भाषा आहे एवढें सांगितलें म्हणजे मिस् वेरुळकर यांना ती भाषा आत्मसात् करण्यास किती परिश्रम करावे लागले असतील हें सहज लक्षांत येईल. दहा वर्षांचा लॅटिनचा अभ्यास अवघ्या तीन वर्षांत संपवून त्यांनीं एम्.ए. ही डिग्री इ. स. १९२२ सालीं संपादन केली. त्या वेळीं त्यांचें वय चाळिसांवर होते. यावरून त्यांची बुद्धिमत्ता किती उच्च दर्जाची आहे याची कल्पना येते. त्यांनीं सहा वर्षे विलायतेंत राहून तेथील सर्व आधुनिक शिक्षणपद्धतींचा अभ्यास करून अनेक शिक्षण-संस्थांच्या कार्यांचें मार्मिक अवलोकन केलें.

पडद्याच्या पद्धतीमुळें बंगाल्यांतील हिंदु समाज मागासलेला होता व मिस् वेरुळकर इ. स. १९०९ मध्यें ज्या वेळीं तेथें प्रथम गेल्या त्या वेळीं तेथील स्त्रीशिक्षणाची घडी नीट बसलेली नव्हती. शिवाय बंगालचा सारा समाज क्षुब्ध झालेला होता. तो काळ म्हणजे जाज्वल्य स्वदेशीचा होता. स्त्रीशिक्षणाच्या कार्यास अनुकूल वातावरण निर्माण करण्याची दुर्घट कामगिरी त्यांनीं केली. असहकारितेच्या काळांत त्यांच्या शाळेच्या इमारतीसमोर असहकारी तरुण आडवे पडून शाळेवर पिकेटिंग करीत. त्यामुळें बिकट परिस्थिति निर्माण झाली. परंतु अध्यापकवर्गाच्या साहाय्यानें मुलींना शाळेंत आणण्याचें व घरीं सुखरूप पोहोंचविण्याचें काम त्यांनीं अतिशय जबाबदारीनें पार पाडलें. असहकारितेच्या वादळामध्यें अत्यंत चातुर्यानें वागून त्यांनीं सरकार व जनता यांच्याकडून शाबासकी मिळविली.

इ. स. १९२५ सालीं मैमनसिंग हायस्कूलच्या लेडी सुपरिंटेंडेंट म्हणून त्यांची मुद्दाम नेमणूक करण्यांत आली. त्या शाळेची सुधारणा व्हावी म्हणून मिस् वेरुळकर यांना त्या जागेवर बंगालच्या शिक्षणखात्यानें नेमिलें. तीन वर्षांच्या अवधींत मिस् वेरुळकर यांनीं त्या शाळेची इतकी उन्नति केली कीं त्यांच्या या अपूर्व कामगिरीबद्दल मिस्टर गर्नर, कमिशनर, (हे पुढें व्हाइसरॉयचे सेक्रेटरी होते) यांनीं त्यांची अतिशय प्रशंसा केली. इ. स. १९२८ सालीं मैमनसिंग येथील विद्यामयी गर्ल्स् स्कूलचा मॅट्रिकचा उत्कृष्ट निकाल लागलेला ऐकून मिस्टर गर्नर यांनीं जें पत्र लिहिलें त्यांत ते म्हणतातः—

" Allow me to congratulate you on the remarkably fine results the Vidyamayee School girls have obtained in this year's Matriculation Examination.......The boy's Schools can't compare with it.

They please me more because you manage to bring your girls up to this point with so little cramming and so much else in their School-life."

इ. स. १९२८ सालीं त्यांची डाक्का येथील ईडन् इन्टरमीजिएट् कॉलेजवर प्रिन्सिपॉल म्हणून नेमणूक झाली. तेथें पांच वर्षे काम केल्यानंतर इ. स. १९३३ सालीं त्या सेवानिवृत्त झाल्या. उत्कृष्ट अध्यापिका म्हणून त्यांचा ज्याप्रमाणें पूर्वी येथें लौकिक होता तसाच बंगाल्यांतहि झाला. युनिव्हर्सिटीच्या परीक्षक, हिंदी विद्यार्थ्यांच्या Provincial Advisory Committee च्या सभासद म्हणून त्यांनीं काम केलें आहे. बंगालमध्यें उत्तम व अनुभवी शिक्षणशास्त्रज्ञ म्हणून त्या ओळखल्या जातात. संस्थेंतील निरनिराळया घटकांना सुव्यवस्थित वळण देण्याचें त्यांच्या अंगीं अप्रतिम कौशल्य आहे.

या शाळेंतील त्यांच्या दीड वर्षांच्या कारकीर्दींत त्यांनीं कितीतरी नवीन गोष्टी अस्तित्वांत आणल्या व बोर्डिंगांतील मुली व शाळेंतील अध्यापिका यांच्या पुष्कळ सुखसोयीहि करून दिल्या.

गरीब विद्यार्थिनींच्यासाठीं म्हणून त्यांनीं 'Poor Fund' सुरू केला आहे. दर महिन्याला मुली पैसा, दोन पैसे, जशी आपली ऐपत असेल त्याप्रमाणें देतात. स्वार्थाचा विचार क्षणमात्र तरी बाजूला सारून परक्यांच्या दुःस्थितीविषयीं मुलींच्यामध्यें सहानुभूति उत्पन्न करणें हा या फंडाचा हेतु आहे. या फंडांतून शाळेमध्यें सध्यां १२ मुलींना फुकट शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. हा फंड जसजसा वाढेल त्याप्रमाणें अधिक गरीब विद्यार्थिनींना ज्ञानदान देण्याचें पवित्र कार्य शाळेला करतां येईल.

अभ्यास करून थकल्यानंतर विश्रांति व मनोरंजन व्हावें या हेतूनें त्यांनीं 'Amusement Club'ची स्थापना केली. इं. चौथी ते सातवीपर्यंतच्या प्रत्येक वर्गाच्या दोन प्रतिनिधी व चार पांच शिक्षकिणी या क्लबाच्या सभासद आहेत. निरनिराळया उत्सवप्रसंगीं मनोरंजक कार्यक्रम तयार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोंपविण्यांत आलेली आहे.

त्यांच्या कारकीर्दींत त्यांनीं शिक्षकांच्या व मुलींच्या ग्रंथालयासाठीं पुष्कळच पुस्तकें विकत घेतलीं व मुलींच्या वाचनालयासाठीं अनेक इंग्लिश व मराठी वर्तमानपत्रें, इंग्लिश व मराठी मासिकें सुरू केलीं. हीं वर्तमानपत्रें, मासिकें व पुस्तकें त्यांनीं नेमिलेल्या ग्रंथालय कमिटी (Library Committee)च्या सल्ल्यानें व अनुमतीनें

शाळेमध्यें घेण्यांत येतात. ग्रंथालय व वाचनालय सुंदर करण्यासाठीं त्यांनीं दोन कांचेच्या आलमाऱ्या, घड्याळ, चित्रें, आलमाऱ्यांत ठेवण्यासाठीं सुंदर वस्तु, आरामखुर्च्या इत्यादि सामान विकत घेतलें. त्यामुळें लायब्ररी ही मुलींचें व शिक्षकिणींचें एक सुंदर आरामस्थान झाली आहे. लायब्ररीकरितां खरोखर स्वतंत्र इमारत झाल्यावांचून तेथें आवश्यक ती सुधारणा करतां येणार नाहीं. शिक्षणाच्या दृष्टीनें उपयुक्त अशा रेकॉर्ड्स् मुलींनीं ऐकाव्या यासाठीं त्यांनीं नुकताच एक ग्रामोफोनहि शाळेसाठीं विकत घेतला आहे.

बोर्डिंगमध्येंहि त्यांनीं पुष्कळच उपयुक्त सुधारणा घडवून आणल्या. बोर्डिंगच्या सिकरूमची त्यांनीं कौन्सिलकडून नमुनेदार व्यवस्था घडवून घेतली आहे. डिस्पेन्सरीला जितकें म्हणून आवश्यक सामान हवें तेवढें सर्व त्यांनीं आणविलें असून डॉ. आगाशे यांची बोर्डिंगचे डॉक्टर म्हणून योजना झाली आहे. मुली आजारी असोत अथवा नसोत, डॉक्टरनीं रोज शाळेंत आलेंच पाहिजे अशी व्यवस्था त्यांनीं केली आहे. सिकरूम व बोर्डिंग यांच्यासाठीं घड्याळाची जरूर इतके दिवस भासत असे. दोन्ही ठिकाणीं ठेवण्यास त्यांनीं घड्याळें आणून बरेच दिवसांची गैरसोय दूर केली. प्रत्येक मुलीकडून महिना १३ रुपये जेवणखर्चासाठीं घेण्याचें त्यांनीं ठरवून टाकलें आहे. पैसे शिल्लक राहिल्यास त्यांतून मुलींच्या सुखसोयींसाठीं सामान घेण्यांत येतें, बोर्डिंगमधील प्रत्येक मुलीला दूध देण्याची पद्धति त्यांनीं सुरू केली. या दुधाचा खर्च वेगळा द्यावा लागत नाहीं. बोर्डिंगांतील लहान मुलींची व्यवस्था पाहण्यास एका बाईची नेमणूक करून तिच्या हाताखालीं लहान मुलींचें काम करण्यास दोन मोलकरणीहि ठेवण्यांत आल्या आहेत.

बोर्डिंगच्या जमाखर्चाची फार उत्कृष्ट व्यवस्था झाली आहे. प्रत्येक मुलीचे पैसे जमल्याबरोबर हातखर्चासाठीं थोडे पैसे मेट्रनच्या स्वाधीन करून बाकीचे सर्व बँकेंत टाकण्याची नवीन व्यवस्था त्यांनीं अंमलांत आणिली आहे. सर्व बिलें चेकनें देण्यांत येतात. त्यामुळें मेट्रनचा हिशेबाचा कितीतरी त्रास त्यांनीं वांचविला आहे. मुलींना किरकोळ जमाखर्चासाठीं त्यांनीं स्वतंत्र नोटबुकें दिलीं आहेत. मुलींना जमाखर्च शिकविण्याचें काम श्रीमती सोनूबाई काळे यांनीं फार उत्तम तऱ्हेनें केलें आहे.

बोर्डिंगांतील मुलींना 'नमस्कारां'चा व्यायाम त्यांनीं आवश्यक केला आहे. श्री. सोनूबाई काळे यांनीं मुलींना नमस्कार-पद्धति शिकविली व त्याच हल्लीं

मुलींच्याकडून नमस्कार घालून घेतात. सायंकाळची प्रार्थना श्री. सोनूबाई यांच्या-कडे देण्यांत आली आहे. परमेश्वराचे स्तुतिपर श्लोक, भूपाळ्या इत्यादि त्या मुलींना शिकवितात. श्री. सोनूबाई यांनीं या कामीं दाखविलेला उत्साह प्रशंसनीय आहे.

मिस् वेरुळकर शाळेंत आल्याबरोबर श्रीमंत सौ. गिरिजाबाई रास्ते यांच्या-हातून Extension Class चा उद्घाटन समारंभ थाटानें पार पडला. मिस् वेरुळकर त्या वर्गांतील मुलींना इंग्लिश शिकवीत असत. कॉलेज-शिक्षण घेण्याकडे मुलींचा अधिक कल असल्यानें या क्लाससाठीं ज्या प्रकारच्या मुली पाहिजे होत्या तशा मिळाल्या नाहींत. कोणत्याहि गोष्टीचा आरंभ लहान असून ती लोकप्रिय होण्यास कांहीं काळ लागतो. तेव्हां Extension Class आज ना उद्यां लोकप्रिय होईल अशी आम्हांस खात्री वाटत आहे.

प्रायमरी स्कूलच्या इन्फन्टच्या वर्गाखेरीज प्रत्येक वर्गाला आठवड्यांतून एकदां इंग्लिश शिकविण्याचा उपक्रम त्यांनीं नुकताच सुरू केला. लहान मुलींना इंग्लिश गाणीं अतिशय आवडतात. हा उपक्रम यशस्वी होईल याबद्दल आम्हांस बिलकुल शंका नाहीं.

लहान मुलांच्यासाठीं Nursery School काढण्याची योजना त्यांनीं सोसा-यटीपुढें ठेविली आहे. परंतु जागेच्या अभावीं त्यांची कल्पना अस्तित्वांत येणें अशक्य झालें.

त्यांच्या कारकीर्दींत वार्षिक बक्षिस-समारंभ डॉ. मिस् जिराड, एम्.डी., यांच्या हस्तें गेल्या वर्षी अत्यंत उत्साहानें साजरा करण्यांत आला. त्या प्रसंगीं मिस् जिराड यांनीं दिलेला स्फूर्तिदायक संदेश मननीय आहे. असो.

गेल्या वर्षी शाळेचा मॅट्रिकचा निकाल शेंकडा ९२ लागून एका मुलीनें संस्कृतची ‘ दळवी शिष्यवृत्ति ’ व बऱ्याच मुलींनीं गणित व सायन्स या विषयांत प्रावीण्यपद (distinction) मिळविलें. हायस्कूल व प्रायमरी स्कूल मिळून संस्थेंत हल्लीं साडेनऊशें मुली शिक्षण घेत आहेत. मुलींची इतकी संख्या आजपर्यंत शाळेंत केव्हांच झाली नव्हती. २९ सप्टेंबर १९३४ हा हायस्कूलचा खरा सुवर्ण महोत्सव-दिन असल्यानें त्या दिवशीं छोटासा समारंभ करून तो साजरा करण्यांत आला. मिस् वेरुळकर यांनीं मुलींना उद्देशून लहानसें भाषण केल्यावर मुलींना पेढे वांटण्यांत आले. मिस् वेरुळकर यांच्या हस्तें शाळेच्या बागेंत एक बकुळीचें झाड लावण्यांत येऊन त्यास ‘ Jubilee Tree ’ असें नांव देण्यांत आलें.



मिस् आर्. वी. वेरुळकर, एम्. ए. (स्कॉटलंड)
माजी प्रि.—ईडन् कॉलेज फॉर गर्ल्स
ऑ. प्रि.—हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स्



मिस् मोझेल ऐझॅक्स, एम्. ए., ए.म्. एस्सी.
ॲसिस्टंट लेडी सुपरिंटेंडेंट हायस्कूल फॉर इंडियन गर्ल्स

मिस् वेरुळकर यांनीं लहान मुलींना लाल किनारीचा परकर, पोलका व मोठ्या मुलींना लाल धारीचें पांढरें पातळ असा युनिफॉर्म दिला आहे. समारंभाच्या वेळीं सर्व मुली युनिफॉर्ममध्यें येतात त्या वेळीं समारंभास शोभा येते व मुलीहि अधिक शिस्तीनें वागतात.

मिस् वेरुळकर यांच्या प्रेमळ व सहानुभूतिपूर्ण नेतृत्वाखालीं शाळेची प्रगति जोरांत चालू आहे व अध्यापकवर्ग एकजुटीनें व उत्साहानें काम करीत आहे. त्यांच्यासारख्या सर्वांत जुन्या अशा हायस्कूलच्या विद्यार्थिनी व अध्यापिका सुवर्ण-महोत्सवासारख्या मंगल प्रसंगीं शाळेस प्रिन्सिपॉल म्हणून लाभल्या हा अपूर्वच योग आहे. शाळेची उन्नति कोणत्या रीतीनें होईल याचा त्या अहर्निश विचार करीत असतात. त्यांच्या अंगीं उच्च दर्जाची लेखनकला व वक्तृत्व आहे. शाळेंतील मुलींना त्यांच्याविषयीं अत्यंत प्रेम वाटतें. प्रार्थनेच्या वेळीं लहान मुलें व मुली त्यांना फुलें देण्यासाठीं जी धडपड करीत असतात ती पाहण्यासारखी असते. मिस् वेरुळकर यांना दीर्घ आयुष्य व उत्तम प्रकृति लाभून त्या आमच्या हायस्कूलच्या उत्कर्षास सदोदित हातभार लावोत.

गेल्या वर्षी मिस् मोझेल ऐझॅक्स् यांची असिस्टंट लेडी सुपरिंटेंडेंट म्हणून हायस्कूलमध्यें नेमणूक झाली. त्या एम्.ए., एम्.एस्सी., असून सध्यां कोल्हापूर येथील सेकंडरी ट्रेनिंग कॉलेजमध्यें शिक्षणशास्त्राचा अभ्यास करीत आहेत. उत्तम प्रकारचें यश मिळवून त्या लौकरच परत येतील व आपल्या ज्ञानाचा सर्वांना फायदा करून देतील अशी आम्हांस दृढ आशा आहे. असो.

प्रकरण अठरावें

शिक्षणक्रम व शिक्षणपद्धति

प्रायमरी स्कूलमध्यें दोनशेंवर मुली असून हायस्कूलला ट्रेन्ड अध्यापिकांच्या हाताखालीं तयार झालेल्या मुली मिळाव्या एवढ्यासाठींच त्याची प्रारंभीं स्थापना झालेली होती. पूर्वी ट्रेनिंग कॉलेज हुजुरपागेंत असतांना प्रायमरी स्कूलचा प्रॅक्टिसिंग स्कूल म्हणून उपयोग केला जात असे. प्रायमरी स्कूलमधील सर्व शिक्षकिणी ट्रेन्ड असून आधुनिक पद्धतीप्रमाणें तेथें सर्व विषयांचें शिक्षण दिलें जातें. लहान मुलांना कंटाळा न येईल अशा पद्धतीनें खेळत खेळत बालवर्गांत हल्लीं शिकवितात.

हस्तव्यवसाय, सृष्टिनिरीक्षण, गायन, खेळ व ड्रिल या विषयांना प्रायमरी-कडे फार महत्त्वाचें स्थान आहे. आधुनिक पद्धतीनें रंगीत खडूच्या कांड्यांनीं चित्रें काढावयास शिकविल्यानें चित्र भराभर तयार होऊन मुलींना त्यामुळें फार मजा वाटते. इतिहास गोष्टीरूपानें, चित्रें, नकाशे यांच्या साहाय्यानें शिकवितात. भूगो-लाच्या अध्यापनांत ‘ सृष्टिप्रधान पद्धती ’चा प्रामुख्यानें अवलंब केला जातो. भूगोल शिकवितांना पाऊस, हवामान, पिकें वगैरे दाखविणारे नकाशे तयार करतात. आरोग्यशास्त्राचें शिक्षण खेळ, गाणीं, गोष्टी इत्यादिकांच्या साहाय्यानें मुलींच्या मना-वर बिंबविण्याचा प्रयत्न करितात. त्याचप्रमाणें शाळेंत येणाऱ्या लहान मुलींचे कपडे, दांत व नखें स्वच्छ आहेत किंवा नाहींत यांकडे शिक्षकिणी विशेष लक्ष देतात. बालवर्गापासून नेमिलेल्या अभ्यासक्रमाप्रमाणें मुलींना शिवणकाम शिकवितात. अध्यापनाच्या बाबतींत ट्रेनिंग कॉलेजांतील पद्धतींच्याप्रमाणें पाठ घेण्याचा शिक्षकिणी प्रयत्न करितात.

प्रायमरी शाळेचा बक्षिस-समारंभ दरवर्षी स्वतंत्र रीतीनें साजरा करतात व त्या वेळीं गायन, ड्रिल, संभाषणें वगैरे गोष्टींचा त्यांचा कार्यक्रम असतो. त्या प्रसंगीं मुलींच्या पालकांना समारंभाचें आमंत्रण देतात.

प्रायमरी स्कूलमध्यें उत्तम प्रकारची शिस्त असून समारंभाच्या वेळीं त्या मुली एकत्र जमल्या तरी बिलकूल गडबड होत नाहीं असा अनुभव आहे. लहान लहान मुली अतिशय हौसेनें शाळेंत येतात. पूर्वी शाळेंतील नोकर रोज सकाळीं प्रायमरीं-तील प्रत्येक मुलीला घरीं बोलवायला पाठवीत असत. आतां न बोलावितां शेकडों

मुली शाळेंत प्रवेश करून घेण्यासाठीं धडपड करीत असतात. या शाळेंत उच्च व मध्यम वर्गातील मुलींचा अधिक भरणा आहे. असो.

इं. पहिलीचे ५, इं. दुसरीचे ३, तिसरीचे ३, चौथीचे ३, पांचवीचे २, सहावीचे २, व सातवीचे २ असे हायस्कूलचे एकंदर २० वर्ग आहेत.

अध्यापकवर्गात चार अध्यापक व बावीस अध्यापिका आहेत. त्यांमध्यें नवीन आलेल्या सात आठ अध्यापिकांखेरीज सर्व अध्यापक-अध्यापिका ट्रेन्ड आहेत. त्यांतील बऱ्याच जणी मुंबईच्या सेकंडरी कॉलेजांतून शिक्षण घेऊन आल्या आहेत.

मुलींना मुंबई विश्वविद्यालयाच्या परीक्षेसाठीं तयार करणें हें हायस्कूलचें सांप्रतचें ध्येय आहे. सरकारी शिक्षणखात्यानें ठरविलेला अभ्यासक्रम शाळेंत चालू आहे. अभ्यासक्रमाच्या पद्धतींच्यासंबंधीं येथें दोन शब्द लिहिणें इष्ट वाटतें. शाळेंत सध्यां चालू असणाऱ्या शिक्षणपद्धतींचें संक्षिप्त वर्णन पुढें दिलें आहे.

(१) **Direct Method** :—इंग्लिश भाषा शिकवितांना या पद्धतीचा उपयोग हायस्कूलमधील सर्व वर्गांत करतात. खालच्या वर्गांत या पद्धतीचा उपयोग अधिक प्रमाणांत होतो. इंग्लिश पहिलीमध्यें पहिल्या सहा आठवड्यांत शिक्षकिणी कोणत्याहि टेक्स्टबुकचा उपयोग करीत नाहींत. प्रश्नोत्तररूपानें प्रत्यक्ष वस्तु व क्रिया दाखवून मुलींचा इंग्लिश शब्दांचा संग्रह त्या अवधींत तयार केला जातो. वर्गातील वस्तु, गृह, बाग, शाळा, रस्ता, बाजार इत्यादि विषयांवर अध्यापिका प्रात्यक्षिक रीतीनें पाठ देतात. यानंतर त्यांना माहित असलेलीं वाक्यें Phonetic पद्धतीनें फळ्यावर लिहितात. हाच मुलींचा पहिला वाचनाचा धडा होय. इंग्लिश उच्चार प्रारंभापासून Phonetic पद्धतीनें शिकविले जातात. फळ्यावरचें इंग्लिश-वाचन एक दोन आठवडे झाल्यावर मग मुलींच्या हातांत इंग्लिशचीं पुस्तकें देण्यांत येतात. चित्रांच्या साहाय्यानें प्रश्न विचारण्यांत येतात. शिक्षकिणीनें प्रथम धडा वाचून दाखवावा लागतो (Model Reading) व नंतर सर्व वर्गाचें मिळून व प्रत्येकीचें वेगळें वाचन घेण्यांत येतें. प्रश्न व उत्तरें यांची सर्व वर्गाकडून व प्रत्येकीकडून पुनरुक्ति करवितात (simultaneous and individual repetition). धड्यामध्यें गोष्ट असेल तर ती नाट्यरूपानें तयार करून मुलींना शिकवितात. प्रारंभीं Composition तोंडीं चालतें. निरनिराळ्या प्रकारच्या "English Language Games" वर्गांत रोज घेतात. त्यामुळें इंग्लिशमध्यें बोलण्याची संवय लागते. मुलींचें इंग्लिश थोडेंसें वाढलें म्हणजे अध्यापिका त्यांना इतर इंग्रजी गोष्टी

इंग्रजींतून सांगतात. त्यांचेंहि रूपांतर नाट्यांत होऊन मुली निरनिराळीं सोंगें मोठ्या हौसेनें घेतात. याशिवाय त्यांना पुष्कळ इंग्रजी अभिनयगीतें (action songs) व लहान लहान कविता शिकवून त्या त्यांच्याकडून पाठ करून घेतात. शक्य तोंपर्यंत अध्यापिका मराठी शब्द वापरीत नाहींत.

प्रात्यक्षिक पद्धतीनें इंग्लिश भाषेचें शिक्षण दिल्यास व्याकरणाकडे दुर्लक्ष होतें असें कित्येक टीकाकार म्हणतात. परंतु ही त्यांची गैरसमजूत होय. Direct Method चा उपयोग करावयाचा असल्यास व्याकरण शिकवूं नका असें कोण-त्याहि ट्रेनिंग कॉलेजमध्यें अद्याप शिकविलें जात नाहीं; उलट व्याकरण शक्य तितक्या मनोरंजक रीतीनें शिकवावें असें शिक्षणशास्त्रज्ञांचें मत आहे. अगोदर भाषा व मग व्याकरण असा खरा क्रम आहे. तरी शिक्षकानें व्याकरणाचा नियम नुसता सांगून मुलांच्याकडून तो पाठ म्हणून न घेतां निरनिराळीं पुष्कळ उदाहरणें देऊन त्यांवरून नियम मुलांच्याकडून काढून घ्यावा, म्हणजे पाठ न करतांच तो सहज विद्यार्थ्यांच्या ध्यानांत राहील असें Direct Method चे पक्षपाती नेहमीं सांगतात. आमच्या हायस्कूलमध्यें व्याकरणाकडे बिलकूल दुर्लक्ष होत नाहीं व वर सांगितलेल्या पद्धतीप्रमाणें तें शिकविलें जातें. इंग्रजी पहिल्या इयत्तेच्या सर्व तुक-ड्यांना Direct Method नें इंग्रजीचें शिक्षण B. T. झालेल्या अध्यापिकाच देतात.

आधुनिक जगांत गुरूचें महत्त्व कमी होऊन शिष्यांचें महत्त्व अधिक वाढलें आहे. आधुनिक शिक्षणपद्धतींच्यामुळें शिक्षकाचें काम किती तरी पटीनें वाढलें व त्या मानानें विद्यार्थ्यांचें काम पुष्कळच कमी झालें. Inductive Method चा उपयोग जास्त करावयाचा असल्यानें शिक्षकांना घरीं दोन तीन तास तरी तयारी करावी लागते. अध्यापिका फळ्यावर कॉपी लिहितात. त्या नमुन्याकडे पाहून मुली आपल्या वहीमध्यें कॉपी लिहितात. नवीन शिक्षणपद्धतीमुळें शिक्षकांना उभें राहून फळ्याचा व खडूचा उपयोग एकसारखा करावा लागतो. त्यामुळें खुर्चीचा उपयोग शिक्षक क्वचितच करतात.

Direct Method चा उपयोग थोड्या फार फरकानें इतर सर्व वर्गांत करितात. इंग्रजी पहिलींत दुसऱ्या टर्मपासून English Composition लिहिण्याला सुरुवात होते. एखादें मोठें चित्र वर्गांत लावून अगर लहान लहान स्वतंत्र चित्रें प्रत्येक मुलीला देऊन त्यांचें वर्णन त्यांना लिहावयास सांगतात. क्वचित् प्रसंगीं प्रत्येक चित्रावर अध्यापिका प्रश्न लिहितात व मुली त्या प्रश्नांचीं उत्तरें लिहितात.

प्रत्येक वर्गाला आठवड्यांतून एकदां English Composition असून लिहून झालेल्या Compositionमधील चुका मुलींनीं अध्यापिकेच्या मदतीनें दुरुस्त केल्यानंतर नवीन Composition लिहावयास देतात. Grammar Exercises आठवड्यांतून दोनदां लिहून घेऊन तपासण्यांत येतात. खालच्या वर्गांतून इंग्रजी अक्षर चांगलें व्हावें म्हणून English Transcription आठवड्यांतून निदान दोनदां लिहून घेतात. हायस्कूलमध्यें इंग्लिश लेखनावर विशेष भर दिला जातो.

वरच्या वर्गांत प्रत्येक मुलीजवळ Oxford Dictionary असलीच पाहिजे असा शाळेचा नियम आहे. या वर्गांत 'Silent Reading' चा अवलंब विशेष प्रमाणांत करतात. त्या वेळीं परिचित नसलेल्या शब्दांचा अर्थ त्या कोशांतून शोधून काढतात. फळयावर लिहिलेल्या प्रश्नांचीं उत्तरें म्हणून Silent Reading देतात. यामुळें विशिष्ट हेतु धरून वाचल्याकारणानें मुली अधिक लक्षपूर्वक वाचून प्रश्नांचीं चांगलीं उत्तरें देऊं शकतात असा अनुभव आहे. इंग्लिश काव्याचा अभ्यास करतांना काव्याचें सौंदर्य ज्या रीतीनें मुलींच्या सहज ध्यानांत येईल अशा रीतीनें प्रश्न विचारण्यांत येतात. Appreciation पद्धतीचा भरपूर उपयोग केला जातो व त्या पद्धतीमुळें विद्यार्थिनींच्यामध्यें काव्याची आवड उत्पन्न होते. इंग्लिश भाषेचे उच्चार व Recitation हे विषय आमच्या शाळेंत फार महत्त्वाचे समजले जातात.

Script-writing मुळें अक्षर सुंदर होऊन स्पेलिंगच्या चुका फार कमी होतात. वरच्या वर्गांतील मुलींना अक्षरें जोडून लिहिण्याची परवानगी असते. Script-writing मुळें लिहावयास वेळ लागतो अशी कित्येकांची समजूत आहे. परंतु मुली संवयीनें भराभर लिहून ठराविक वेळेंत पेपर संपवूं शकतात असा येथील अध्यापिकांचा अनुभव आहे. कित्येक मुली कॉलेजांत गेल्यानंतर ही लेखनपद्धति चालू ठेवून विश्वविद्यालयाच्या परीक्षेंत पहिला वर्ग मिळवूं शकतात. यावरून Script-writing नें विद्यार्थ्यांचा वेळ फार जातो ही समजूत बरोबर नाहीं हें कोणाच्याहि ध्यानांत येईल. पूर्वींची जोडून तिरपीं अक्षरें काढण्याची पद्धति व हल्लींची सर्व सुधारलेल्या शाळांमध्यें प्रचलित असलेली Script-writing ची पद्धति ताडून पाहिली असतां सौंदर्य व टापटीप या दोन्ही गुणांमध्यें नवीन लेखनपद्धति श्रेष्ठ आहे याबद्दल संशय उरत नाहीं. स्पेलिंग चांगलें होण्यास Script-writing ची मदत होते. याशिवाय निरनिराळ्या Spelling Games अध्यापिका वर्गांत शिकवितात, त्यामुळेंहि स्पेलिंग सुधारतें.

इतिहासः—इतिहासाच्या अध्यापनांत नाट्यपद्धति व Pupil Teacher पद्धति यांचा विशेष उपयोग करतात. इंग्रजी पहिलीमध्यें इतिहास गोष्टीरूपानें शिकवितात. इतिहासांत घडलेल्या प्रसंगांचा कार्यकारणभाव विशिष्ट तऱ्हेनें प्रश्न विचारून विद्यार्थिनींच्याकडून काढून घेण्यांत येतो. ऐतिहासिक चित्रें, नकाशे, जुनीं नाणीं व ऐतिहासिक कागदपत्रें इत्यादि साहित्याचा, इतिहास-शिक्षक उपयोग करतात. मुलींच्याकडून इतिहासाच्या तासाला दिलेल्या माहितीचे मुद्दे काढून घेऊन शिक्षक ते फळ्यावर लिहितात. तो मुद्दा लक्षांत राहावा यासाठीं त्याला अनुलक्षून फळयावर चित्रें काढतात व मुलीहि आपल्या वहींत मुद्दे लिहून चित्रें काढतात. इतिहासाचा तास मनोरंजक करण्याकरितां, इतिहासांतील व्यक्ती व प्रसंग यांच्यासंबंधीं गोष्टी सांगून शिक्षक महत्त्वाचे उतारे वाचून दाखवितात. त्यामुळें नेमलेलें पुस्तक न वाचतांहि इतिहास मुलींच्या ध्यानांत राहतो. ऐतिहासिक प्रदर्शनें व स्थळें दाखविण्यास मुलींना नेतात व केव्हां केव्हां इतिहासज्ञांचीं ऐतिहासिक व्याख्यानें व कीर्तनें शाळेंत करविण्यांत येतात. बहुवा प्रत्येक वर्गांत ऐतिहासिक चित्रांचा संग्रह करण्यांत येतो व वार्षिक प्रदर्शनासाठीं ऐतिहासिक प्रसंगांचे देखावे मुली तयार करतात.

मॅट्रिकच्या परीक्षेला जो इतिहासाचा भाग नेमलेला आहे त्यासंबंधीं सूचना कराव्याशा वाटतात. विश्वविद्यालयानें परीक्षेसाठीं नेमलेला इतिहासाचा भाग खरोखर अफाट आहे. हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास, मोंगलांपासून आतांपर्यंतचा इतिहास व शासनपद्धति; शिवाय इंग्लंडचा ट्यूडर राजांपासूनचा इतिहास एवढा सागर ओलांडून पलीकडे जातांना विद्यार्थ्यांचे फार हाल होतात. परीक्षेंत जरी महत्त्वाचेच तेवढे प्रश्न विचारले जातात तरी बारीक सारीक गोष्टी लक्षांत ठेविल्या-वांचून त्यांचीं उत्तरें लिहिणें शक्य नसतें. ट्यूडर राजे, मोंगल राजे व मराठे यांच्या इतिहासाची शाळेच्या अभ्यासक्रमांत एकसारखी पुनरुक्ति होत असते. तेव्हां त्यांचा अभ्यास मॅट्रिकच्या परीक्षेला विद्यार्थ्याला पुनः करावयास लावण्यांत खरोखर कांहींच फायदा नाहीं. उलट त्याच त्याच गोष्टी पुनःपुनः वाचण्यानें त्यांतील सारें स्वारस्य नाहींसें होतें. त्यापेक्षां इ. स. १८५७ पासूनचा हिंदुस्थानचा इतिहास, हल्लींची शासनपद्धति व त्याचप्रमाणें इंग्लंडचा व्हिक्टोरिया राणीपासून चालू कालापर्यंतचा इतिहास जर विद्यार्थ्यांना शिकविला तर त्यांच्या ज्ञानांत अधिक भर पडून त्यांचा वेळ त्याच त्याच जुन्या हकीकती वाचण्यामध्यें फुकट जाणार नाहीं. गेल्या शंभर वर्षांचा दोन्ही देशांचा इतिहास अधिक महत्त्वाचा आहे.

भूगोलः—भूगोलाच्या अध्यापनांत 'प्रादेशिक पद्धति' (Regional Method) व 'मानवप्रधान पद्धति' या दोन अगदीं अलीकडे निघालेल्या नवीन पद्धतींचा उपयोग केला जातो. मानवप्रधानपद्धतीमध्यें लोकांना महत्त्व असल्यामुळें त्या प्रदेशांतील लोक, त्यांच्या चालीरीति, राहणी, धंदे इत्यादिकांविषयीं मनोरंजक माहिती विद्यार्थिनींना देण्यांत येते. प्रादेशिक पद्धतीनें ज्यांचें हवामान, पर्वत, नद्या, धंदे, पिकें इत्यादि बाबतींत साम्य आहे अशा प्रदेशांचा तुलनात्मक रीतीनें अभ्यास करण्यांत येऊन प्रत्येक गोष्टीचें कारण व त्याचा परिणाम यांचें योग्य पृथक्करण केलें जातें. चित्रें व नकाशे यांचा प्रत्येक पाठाच्या वेळीं उपयोग करण्यांत येतो. प्रत्येक विद्यार्थिनीजवळ छापील ॲटलस व नकाशाची वही असून तीमध्यें निरनिराळ्या देशांचे आराखडे असतात. पर्वत, नद्या, शहरें, समुद्रप्रवाह, वारे इत्यादिकांच्या खुणा करून ते नकाशे शिक्षकांच्या सूचनेप्रमाणें मुली वर्गांतच भरतात. हिंदुस्थानचा भूगोल इंग्रजी पहिलीपासून सातवीपर्यंत पुनः पुनः शिकविला जातो. अभ्यासक्रमांत शक्य तितकी विषयांची पुनरुक्ति न झाल्यास विद्यार्थिनींचा बराच वेळ वाचेल.


मराठीः—इंग्रजी पहिल्या तीन इयत्तांमध्यें रोज मराठीचा तास असतो. इंग्रजी चौथी ते इंग्रजी सहावीपर्यंत मराठीच्या वांट्याला आठवड्यांतून दोनच तास येतात. कारण चौथीपासून अभ्यासक्रमांत अधिक विषयांची भर पडते. मराठीला निदान चार तास मिळाल्यास मुलींना अनेक उपयुक्त गोष्टी सांगतां येऊन त्या विषयाची विशेष चांगली तयारी होईल. मॅट्रिकला मराठी व संस्कृत हे ऐच्छिक विषय आहेत. एकंदर वर्गांतील ६०—६२ मुलींपैकीं १०—१२ मुली मराठी घेतात. इंग्रजी चौथीपासून कवितेचीं वृत्तें व अलंकार शिकविण्यांत येतात. मराठीला अधिक वेळ मिळाल्यास हल्लींपेक्षां उच्च दर्जाचें निबंधलेखन मुलींना करतां येईल अशी खात्री वाटते. निबंधलेखनास उत्तेजन म्हणून स्वतंत्र बक्षिसें ठेवण्यांत आलीं आहेत. मराठीचें इंग्रजी व इंग्रजीचें मराठी भाषांतर शिकविण्यांत येतें. परंतु या विषयाचा मराठीच्या अभ्यासक्रमांत समावेश करतात.

संस्कृतः—प्रात्यक्षिक (Direct) पद्धतीनें संस्कृत शिकविण्याचा प्रयत्न कांहीं वर्षांपूर्वी करण्यांत आला होता. परंतु सर्वच शिक्षकिणी त्या विषयाच्या अध्यापनशास्त्रांत प्रवीण नसल्यानें प्रात्यक्षिक पद्धति सर्वत्र चालू करणें अशक्य झालें. पूर्वी संस्कृत विषयाचे शास्त्री सर्व वर्गांचें संस्कृत घेत. परंतु शास्त्र्यांची जागा हल्लीं रद्द झाल्यामुळें संस्कृत शिकविण्याचें काम चार पांच शिक्षकिणींच्याकडे देण्यांत आलें

आहे. व्याकरणापेक्षां वाङ्मय अधिक महत्त्वाचें आहे हें लक्षांत घेऊन वाङ्मय बरेंच वाचून घेतात. Sanskrit Composition आठवड्यांतून एकदां लिहून घेण्यांत येतें. मुलींना संस्कृत वाचनाची गोडी लागावी म्हणून रोज एका मुलीनें घरून एक श्लोक आणून वर्गातील फळ्यावर लिहावा व त्याचा अर्थ सांगावा अशी पद्धति कांहीं वर्गांत सुरू करण्यांत आली आहे. मुली आळीपाळीनें न विसरतां श्लोक आणतात व बाकीच्या मुली तो आपल्या वहींत टिपून घेऊन पाठ करून टाकतात असा अनुभव आहे.

सायन्सः—सायन्स हा विषय फक्त वरच्या वर्गातील प्रौढ विद्यार्थ्यांनाच समजावयाचा असा समज पूर्वी रूढ होऊन बसला होता. लहान वयाच्या विद्यार्थ्यांना तो समजेल व त्यांना समजावून देतां येईल असें त्या वेळीं कोणास वाटतच नसे. यामुळें इ. स. १९१५ पर्यंत हा विषय फक्त ७ व्या इयत्तेंतच शिकवीत असत आणि तो शिकवितांना जर कांहीं प्रयोग करणें जरूर असेल तर ते शिक्षकानेंच केवळ करावयाचे अशी त्या वेळीं स्थिति असे. विद्यार्थ्यानें प्रयोग करून पाहावा ही कल्पनाहि त्या वेळीं नसल्यानें विद्यार्थ्याला प्रयोग करण्याची संधि मिळत नसे हें उघड आहे. परंतु पुढें ही स्थिति पालटली. जी जी नवीन वस्तु दिसेल ती ती हातांत घेऊन तिचें सूक्ष्म निरीक्षण करणें आणि अशा कित्येक वस्तूंचा संग्रह करणें हा मुलांचा एक अगदीं स्वाभाविक धर्म होय. त्यांच्या या स्वभावाला उत्तेजन देऊन त्यांस वळण लाविलें तर शैक्षणिक दृष्ट्या चांगला उपयोग होईल ही कल्पना हळूहळू पुढें आल्यामुळें इ. स. १९१४–१५ सालापासून हा विषय, अगदीं खालच्या इयत्तेपासून वरच्या इयत्तेपर्यंत सातहि इयत्तांत क्रमवार वांटून देण्यांत आला. आणि प्रत्यक्ष पदार्थ, नमुने, चित्रें व प्रयोग इत्यादि विविध साधनांच्या साहाय्यानें सृष्टिनिरीक्षण, आरोग्यशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र व रसायनशास्त्र इत्यादि विषय शिकविण्याची व्यवस्था करण्यांत आली. यामुळें या विषयांचा रूक्षपणा सहजच नाहींसा होऊन ते विषय मुलींना अधिक मनोरंजक व चित्ताकर्षक वाटतात व वर सांगितलेल्या साधनांच्या योगानें त्यांच्या मनावर ते चांगल्या रीतीनें ठसतात.

सृष्टिनिरीक्षण हा विषय खालच्या तीन इयत्तांना शिकवितात. वनस्पतींच्या संबंधीं धडा असल्यास त्या वनस्पतींचे नमुने प्रत्येक मुलीजवळ असतात व त्यांच्या सायन्सच्या वहींत त्या ते चिकटवून ठेवितात. निरनिराळ्या वस्तूंचें निरीक्षण व संग्रह मुली करतात. इंग्रजी चौथीला आरोग्यशास्त्र शिकविलें जातें व पांचवी, सहावी व सातवी या इयत्तांत मुख्यतः पदार्थविज्ञानशास्त्र व रसायनशास्त्र या



सायन्स – प्रयोगशाला

अंकगणितापेक्षां बीजगणित व भूमिति हे विषय विद्यार्थिनींना अधिक प्रिय वाटतात. भूमितीमध्यें पृथक्करणात्मक पद्धतीचा अवलंब केला जातो.

संगीत:—गायनानें मनोरंजन होऊन शिवाय कंठ व फुप्फुसें यांचा चांगला परिपोष होऊन आरोग्याची अभिवृद्धि होते. सामुदायिक गायनानें मनाची एकाग्रता होऊन ताल व लय यांच्यामुळें शरिरांत तरतरी उत्पन्न होते.

या संस्थेंत संगीताचें शिक्षण पुढीलप्रमाणें दिलें जातें. प्रायमरी शाळेमध्यें मराठी चौथ्या इयत्तेपर्यंत दहा बारा स्वरपाठ, त्यांच्या क्रमिक पुस्तकांतील कविता, रागताल्युक्त व्यायामाचीं गाणीं, स्वागतगीतें, प्रार्थनागीतें, आभाराचीं गाणीं व अभिनयगीतें याप्रमाणें सर्व मिळून ५० ते ६० गीतें शिकविलीं जातात. शिवाय मुख्य व सोप्या अशा पांच सहा तालांची माहिती दिली जाते. व्यायामास संगीताची जोड देऊन संगीतयुक्त व्यायामाचें शिक्षण देण्यांत येतें.

हायस्कूलच्या शिक्षणक्रमांत सुमारें चाळीस राग व दहा ताल यांचा समावेश केला आहे. प्रत्येक रागांत एक लक्षणगीत व एक सुभाषित किंवा प्रार्थनागीत शिकविलें जातें. प्रचारांतील मुख्य चाळीस रागांचे आरोह, अवरोह, वादी-संवादी, तीव्रकोमल, वर्ज्यावर्ज्य, राग म्हणण्याची वेळ वगैरे सर्वसाधारण आवश्यक माहिती दिली जाते. त्याचप्रमाणें प्रचारांतील मुख्य दहा तालांचे तबल्याचे ठेके मात्रा मोजून शिकविले जातात.

विशेष प्रसंगीं वृंदवादनाकरितां (Orchestra) मुलींना सतार, दिलरुबा, जलतरंग वगैरे वाद्यें शिकविण्याची व्यवस्था केली जाते. थोड्या दिवसांपूर्वीच शाळेसाठीं दिलरुबे, तंबोरे, ऑर्गन, जलतरंग इत्यादि वाद्यें खरेदी केलीं आहेत. त्यामुळें वाद्यें वाजविण्याचा तास वेळापत्रकांत घालतां येऊन अनेक विद्यार्थिनींना त्याचा फायदा होईल. इंग्रजी पांचवी व सहावी या इयत्तांकरिता गायनाचा आठवड्यांतून एक तास अधिक (ऐच्छिक) म्हणून ठेवण्यांत आला आहे. सुमारें पाऊणशें मुली या वर्गाचा फायदा घेतात. या वर्गाला हिंदी गायकी चिजा तान पलटयांसह शिकविल्या जातात. बारा वर्षांपूर्वीचें संगीत-शिक्षण व हल्लींचें संगीतशिक्षण यांत जमीनअस्मानाचा फरक दिसतो. पूर्वीच्या पद्धतीमुळें गायनाची आवड उत्पन्न होण्याऐवजीं मुलींना गायनाचा कंटाळा येई. परंतु हल्लीं लहान मुलींच्या वर्गापासून तों वरच्या इयत्तेच्या वर्गापर्यंत सर्व मुली पद्धतशीर रीतीनें व गोड गळ्यानें गातांना पाहून मनास आनंद वाटतो. संगीतप्रियता दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत चाल-



ऑर्केस्ट्रा – हायस्कूल

Wagle Press, Bombay, 1





शिवणकला – वर्ग

त्याचें रोज प्रत्यन्तर येतें व त्याचें श्रेय संगीतशिक्षक श्री. तांबेशास्त्री यांनाच आहे. निरनिराळ्या समारंभप्रसंगीं ते स्वत: गाणीं रचून शिकवितात. ते आमच्या संस्थेचे गायनशिक्षक व कवि आहेत.

शिवण:—मुलींचा शिवणाचा शिक्षणक्रम ठरलेला असून प्रत्येक वर्गाला कपडे बेतावयास शिकवितात. वर्षांतून प्रत्येक मुलीला दोन शिवणकामें पुरीं करावीं लागतात. नक्षीचे टांके व कशिदाहि शिकविण्यांत येतो. शाळेंतील शिवण्याच्या यंत्राचा उपयोग करण्याची मुलींना मुभा दिली जाते. वार्षिक परीक्षेंत मुलींना कपडे बेतून शिवावयास लावितात. शिवणासंबंधीं आवड दिवसेंदिवस अधिक वाढत चालली आहे हें सुचिन्ह होय.

चित्रकला:—चित्रकलेसंबंधीं मागल्या प्रकरणीं सविस्तर हकीकत दिलीच आहे. Bombay School of Artचा अभ्यासक्रम चालू आहे. चित्रकला-शिक्षणांत आधुनिक सर्व शिक्षणपद्धतीचा उपयोग केला जातो. मुलींच्या चित्रांनीं शोभणाऱ्या चित्रकला-मंदिरास भेट दिल्यास चित्रकलेची मुलींना किती आवड आहे हें लक्षांत येईल.

ड्रिल:—मिस् मोतीवाला यांनीं शिकविलेल्या पद्धतीप्रमाणें ड्रिलचें शिक्षण दिलें जातें. ज्या योगानें शरिराच्या प्रत्येक भागास व्यायाम होईल अशा प्रकारचे वेगवेगळे व्यायामाचे प्रकार ड्रिलच्या प्रत्येक तासाला घेण्यांत येतात. ड्रिलला खेळाची जोड दिल्यामुळें ड्रिलचा तास विशेष मजेंत जातो. पहिल्या तीन इयत्तांना आठवड्यांतून ड्रिलचे दोन तास असून सातव्या इयत्तेशिवाय बाकीच्या वरच्या वर्गांना आठवड्यांतून एकदांच ड्रिल असतें.

बागकाम:—बागकामाचा तास प्रायमरींतील सर्व वर्गांना व हायस्कुलांतील सातवीखेरीज इतर वर्गांना असतो. बागकामाची मुलींना विशेष हौस असून त्यामुळें सृष्टिनिरीक्षणाचें काम अधिक सोपें झालें आहे. बागेंतील जमीन खणणें, विटा लावणें, झाडांना पाणी घालणें इत्यादि कामें करण्यांत मुलींचा उत्साह दिसून येतो.

या ठराविक अभ्यासक्रमाखेरीज इतर अनेक शैक्षणिक उद्योग संस्थेमध्यें चालू आहेत. कारण केवळ पुस्तकी शिक्षण अपुरें असून, त्याची पूर्तता होण्यास विविध व्यवसायांची त्यास जोड देणें आवश्यक आहे.

प्रकरण एकोणिसावें

शैक्षणिक व्यवसाय

वनितासमाज:—आपल्या मनांतील विचार इतरांच्यासमोर परिणामकारक रीतीनें मांडून त्यांना अनुकूल करून घेणें ही मोठी कौशल्याची गोष्ट आहे. राजकीय व सामाजिक क्षेत्रांत वक्तृत्वकलेइतकी महत्त्वाची दुसरी कोणतीहि कला नाहीं. सुधारलेल्या राष्ट्रांतील सर्व शिक्षणसंस्थांत विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना वक्तृत्वकलेमध्यें तरबेज करण्यासाठीं वक्तृत्वसभा (Debating Societies) असतात.

आमच्या संस्थेच्या वक्तृत्वसभेचा वृत्तान्त मौजेचा आहे. कृष्णाबाई केळवकर, कृपाबाई जेकब, रतनबाई दीक्षित, काशीबाई नवरंगे यांनीं शाळेंत शिकत असतांना एक लहानसा 'बालसमाज' काढला होता. त्या वेळीं या मुलींचें वय १२–१३ वर्षांचें होतें. शनिवारीं दुपारीं एकत्र जमून त्या लहान लहान भाषणें व वादविवाद करीत. पुढें रेचलबाई बेंजमिन मॅट्रिक होऊन शाळेंत अध्यापिकेचें काम करूं लागल्या. त्या वेळीं त्यांचें वय फक्त सतरा वर्षांचें होतें. कृष्णाबाई केळवकर, श्री. वेणुबाई नामजोशी व रेचलबाई या तिघींनीं मिळून 'बालसमाजा'चें 'वनिता-समाजां'त रूपांतर केलें. तेव्हां या तिघी वनितासमाजाच्या आद्य संस्थापक होत. फुरसतीच्या वेळीं त्या विविध विषयांवर चर्चा करीत. श्री. वेणूबाई नामजोशी या कै. आगरकरांच्या जवळच्या आप्त असल्यानें सुटीच्या दिवशीं घरीं गेल्यावर सामाजिक विषयांवरील चर्चा त्यांच्या कानांवर पडे. ती सर्व हकीकत मैत्रिणींना सांगितल्यावर त्यांच्या वादविवादास खूप रंग चढे. इ. स. १९०९ सालीं रेचलबाई डाक्का येथें बदलून गेल्याकारणानें वनितासमाज चालेनासा होऊन त्याच्या सभा थांबल्या.

परंतु या सभेचें पुनरुज्जीवन करण्याचा मान मिस् रुबेन यांना मिळाला. ४ जानेवारी १९१४ रोजीं हायस्कूल व ट्रेनिंग कॉलेज या दोन्ही संस्थांतर्फे त्यांनीं 'वनिता समाजा'ची पुनः स्थापना केली. मिस् रुबेन याच वनितासमाजाच्या पहिल्या अध्यक्ष होत. वनितासमाजातर्फे मुलींनीं त्यांच्या प्रोत्साहनावरून एक स्वतंत्र ग्रंथालय सुरू केलें. या ग्रंथालयांत फक्त मराठी पुस्तकें आहेत. त्या वेळीं

शिक्षकांच्या अध्यक्षतेखालीं सभा होत व मुली ठरलेल्या विषयावर निबंध वाचीत अगर भाषणें करीत. त्यानंतर वादविवाद होऊन शिक्षक समारोप करीत. वनिता-समाजाच्या कार्यकारी मंडळाच्या दर वर्षी निवडणुकी होत. अध्यक्षांच्या मदतीस एक चिटणीस व खजिनदार असून सभेचे विषय ठरविण्यास चार पांच मुलींचें व्यवस्थापक मंडळ असे. त्या वेळीं ट्रेनिंग कॉलेजच्या विद्यार्थिनी व हायस्कूलच्या वरच्या वर्गांतील वसतिगृहांत राहणाऱ्या विद्यार्थिनी सभेस हजर राहात. कारण तेव्हां वनिता-समाजाची सभा शनिवारीं दुपारीं होत असे. त्यामुळें घरून शाळेला येणाऱ्या विद्यार्थिनींपैकीं हौशी विद्यार्थिनी तेवढ्याच दुपारीं सभेकरितां मुद्दाम शाळेला येत.

इ. स. १९१६ सालीं ट्रेनिंग कॉलेज हुजुरपागेंतून गेल्यानंतर हायस्कूलचा वनितासमाज मिस् रुबेन यांच्या अमूल्य साहाय्यास व उत्तेजनास मुकला. त्या वेळीं श्री. सारजाबाई बापट या वसतिगृहांतील अंतर्व्यवस्था पाहात असत. त्या कवयित्री असून त्यांना मराठी वाङ्मयाचा विशेष नाद असल्यामुळें वनितासमाजाच्या कार्यकारी मंडळास मदत करण्याचें त्यांनीं कबूल केलें. कांहीं वर्षेपर्यंत वनितासमाजाचें काम त्यांच्या देखरेखीखालीं चालू होतें. परंतु पुढें वसतिगृहांतील काम वाढल्यामुळें हायस्कूलच्या शिक्षकिणींपैकीं एकीनें वनितासमाजाचें काम पाहावें असें ठरलें त्याप्रमाणें मिस् डेव्हिड, मिस् खरे, मिस् पाणंदीकर (मिसेस् खान) इत्यादि शिक्षकिणींनीं वेळोवेळीं वनितासमाजाच्या कार्यकारी मंडळाच्या अध्यक्ष या नात्यानें काम केलें. हल्लीं श्री. विमलाबाई गोखले या कार्यकारी मंडळास मदत करीत असतात.

वनितासमाजाची सभा हल्लीं महिन्यांतून दोन वेळां भरते. त्या दिवशीं हायस्कूलच्या मुलींचे वर्ग चार वाजतां सोडतात. इंग्लिश ४ थी ते ७ वी पर्यंतच्या सर्व मुली व सर्व शिक्षक सभेस हजर राहतात. गेल्या वर्षापासून मुलींच्या अध्यक्षतेखालींच मुली भाषणें करतात. ज्या मुलींना अस्खलित बोलतां येत नाहीं त्या आपलीं भाषणें वाचून दाखवितात. मुलींनीं भाषणें वाचून न दाखवितां बोलावें असेंच वनितासमाजाचें धोरण आहे. सभा चालवून ती कशी पार पाडावी याचें शिक्षण मुलींना वनितासमाज देत आहे. मुलींच्या वादविवादामध्यें केव्हां केव्हां मिस् वेरुळकर व इतर शिक्षकिणीहि भाग घेतात. ज्यांवर भिन्न मतें पडून वादविवादास रंग चढेल असेच विषय मुली शिक्षकिणींच्या साहाय्यानें निवडतात. चालू सालांत मुलींनीं निवडलेले कांहीं विषय पुढीलप्रमाणें होतेः—(१) सहशिक्षण;

(२) जगांतील युद्धें थांबतील काय? (३) योद्धा श्रेष्ठ कीं तत्त्वज्ञानी? (४) जातिभेद असावा कीं नसावा? वगैरे.

याशिवाय मधून मधून वनितासमाजातर्फे प्रसिद्ध विद्वानांचीं व्याख्यानें व प्रसिद्ध कवींचीं काव्यगायनें करण्यांत येतात. प्रिन्सिपॉल कानिटकर, प्रो. पोतदार, प्रो. एस्. वी. रानडे, डॉ. झंकराय, श्री. रमाबाई रानडे, श्री. काशीबाई कानिटकर, श्री. कमलादेवी चटोपाध्याय, डॉ. रखमाबाई इत्यादि विद्वान् मंडळींचीं व्याख्यानें व श्री. मायदेव, श्री. गिरीश, श्री. यशवंत या कवींचीं काव्यगायनें वनितासमाजातर्फे झालेलीं आहेत. श्री. तांबेशास्त्री यांच्या गायनाचे कार्यक्रम दरवर्षी होतात. वर्षांतून दोन वेळां तरी भाषणें व वादविवाद इंग्लिशमधून होतात. एक दोन व्याख्यात्यांचीं संस्कृत भाषणेंहि झालीं आहेत.

दरवर्षी वनितासमाजाचा वार्षिक उत्सव करण्यांत येतो. हा उत्सव विद्वान् व कार्यकर्त्या स्त्रियांच्या अध्यक्षतेखालीं साजरा करतात. बहुधा माजी विद्यार्थिनींपैकीं प्रसिद्ध अशा व्यक्तींना या प्रसंगीं अध्यक्षाचा मान देण्यांत येतो. श्रीमती रमाबाई रानडे, सौ. वेणुबाई साठे (नामजोशी), मिस् रुबेन, डॉ. कृष्णाबाई केळवकर, डॉ. काशीबाई नवरंगे, डॉ. कमलाबाई देशपांडे, सौ. वेणूबाई मोडक, मिसेस् मोझेस, मिस् वेरुळकर, मिस् वाडिया इत्यादि विद्वान् व समाजहितैषी स्त्रियांनीं उत्सवप्रसंगीं अध्यक्षस्थान मंडित केलेलें आहे. उत्सवाच्या दिवशीं सकाळीं मुली टेनिस्, बॅडमिंटन् इत्यादि खेळ खेळतात. दुपारीं ११ वाजतां भोजनसमारंभ होतो. त्या प्रसंगीं शाळेच्या मुख्याध्यापिका, निमंत्रित अध्यक्ष, हायस्कूलमधील मुली व सर्व शिक्षक हजर असतात. दुपारीं ४॥ नंतर मुलींचीं गाणीं, संभाषणें वगैरे कार्यक्रम झाल्यानंतर अध्यक्षांचें उपदेशपर भाषण होतें. हा कार्यक्रम झाल्यावर इतर पाहुणे मंडळी व माजी विद्यार्थिनी व शिक्षक यांचा अल्पाहार होतो. त्या वेळीं केव्हां केव्हां स्काउटचा बँडहि असतो.

वनितासमाजाच्या सभासदांना महिना १ आणा वर्गणी ठेविली आहे. इं. चौथी ते इं. सातवीपर्यंतच्या सर्व मुली वनितासमाजाच्या सभासद असतात. दर वर्षीं जमलेल्या वर्गणीमधून उत्सव साजरा करतात. ग्रंथसंग्रहाला याच वर्गणीमधून पुस्तकें विकत घेतात. वनितासमाजाच्या ग्रंथसंग्रहाचें व वर्गणीचें काम कित्येक वर्षे श्री. पानसे मास्तर पाहात असत. हल्लीं मिस् कर्नाटकी यांच्याकडे ग्रंथसंग्रहाचें काम दिलें असून इतर कामें मिसेस् गोखले पाहतात. ग्रंथसंग्रहांत सुमारें ४७०

पुस्तकें आहेत. या ग्रंथसंग्रहाचा मुलींनाच नव्हे तर शिक्षकांनाहि उपयोग होतो. या प्रकारें मुलींच्या अंगीं सभाधीटपणा व वक्तृत्व आणण्याचें कार्य वनितासमाज करीत आहे. उत्सवाच्या वेळीं जबाबदारीचीं कामें कशीं पार पाडावीं याचेंहि प्रत्यक्ष शिक्षण या समाजाचें कार्य पार पाडतांना त्यांना मिळतें. पाहुण्यांचें आदरातिथ्य करणें, भोजनसमारंभाची व मनोरंजक कार्यक्रमांची व्यवस्था पाहणें इत्यादि कामें मुली स्वयंस्फूर्तीनें व हौसेनें करितात असा अनुभव आहे. वनितासमाज या संस्थेची संस्थापना व पुनरुज्जीवन माजी विद्यार्थिनींनींच केलें ही गोष्ट संस्मरणीय आहे.

बालिकादर्श:—वनितासमाजाप्रमाणें मुलींचा दुसरा महत्त्वाचा व्यवसाय म्हणजे ' बालिकादर्श ' मासिक होय. इ. स. १९१६च्या सप्टेंबरमध्यें प्लेगनिमित्त शाळा बंद झाली ती ३ जानेवारी १९१७ रोजीं पुनः उघडली. श्रीमती कमलाबाई देशपांडे, कु. बारुबाई पानसे (मिसेस् दाणी), कु. सोनुबाई पटवर्धन (मिसेस् सहागल) इत्यादि मॅट्रिकमधील विद्यार्थिनींच्या मनांत वनितासमाजातर्फे मुलींचें मासिक सुरू करावें अशी कल्पना आली. लगेच ती त्यांनीं वनितासमाजाच्या सभासद भगिनींना व श्री. सारजाबाई बापट यांना सांगितली. त्या सर्वांना ती पटली व त्याप्रमाणें ६ जानेवारी रोजीं जी वनितासमाजाची सभा भरली तीमध्यें मासिकाचें नांव ' बालिकादर्श ' ठेवावयाचें असें ठरून प्रथम हस्तलिखित अंक काढण्याचा विचार ठरला. हा हस्तलिखित अंक तयार करण्याची जबाबदारी श्री. कमलाबाई देशपांडे यांनीं स्वीकारली. अंक लिहून तयार झाल्यानंतर तो प्रसिद्ध करण्याचा गोड समारंभ लोकप्रिय अध्यापिका मिस् रुबेन यांच्या हस्तें २७ जानेवारी १९१७ रोजीं साजरा झाला. मिस् रुबेन यांनीं अंक प्रसिद्ध केल्याचें जाहीर करून समयोचित असे चार उपदेशाचे शब्द सांगितले. यानंतर फेब्रुआरीमध्यें श्री. कमलाबाईंनीं नमुन्याकरितां ' बालिकादर्शा 'चा एक अंक छापून प्रसिद्ध केला व त्यांनीं आपल्या सहाध्यायी मैत्रिणींच्या साहाय्यानें ' बालिकादर्शा 'करितां वर्गणीदार मिळविण्याची मोहीम सुरू केली. सहा महिन्यांच्या आंतच त्यांनीं शाळेंतील व बाहेरील मिळून सुमारें सव्वाशें वर्गणीदार मिळविले. वरील हकीकतीवरून मॅट्रिकचा अभ्यास संभाळूनहि मुली हौसेनें अवांतर उद्योग किती करीत याची कल्पना येते.

बालिकादर्शाच्या पहिल्या वर्षाचा पहिला अंक १९१७ सालच्या मार्च महिन्यांत मिस् बर्न यांनीं वनितासमाजाकरितां प्रसिद्ध केला. त्या अंकांतील

संपादकीय लेख श्री. कमलाबाई देशपांडे यांनीं लिहिला असून त्यांत बालिकादर्शाचें ध्येय त्यांनीं नमूद केलें आहे. तें महत्त्वाचें वाटल्यावरून खालीं उद्धृत केलें आहे.

'आदर्शा'चें ध्येयः—"आदर्शाचें ध्येय दुसरें काय असणार? बोलूनचालून तो आदर्शच. बालिकावर्गाच्या विचारांचें प्रतिबिंब पाडण्यावांचून आदर्श काय करणार? आपणांमध्यें विचार चित्रित करून त्यांच्या निर्मलत्वाची अथवा कलुषत्वाची साक्ष देणें हा आदर्शाचा नैसर्गिक धर्मच आहे. आदर्श हातांत धरून आम्ही तो फोडूं अगर त्याच्याकडे पाहात तोंडें वेडींवांकडीं करण्याची खोड लावून घेऊं अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. कारण आमच्या आदर्शांत तोंडाचें चित्र न पडतांच अन्तःकरणाची छाया पडणार आहे. आमचा आदर्श केसांचे कुरळ विसकटले आहेत कीं काय हें न दाखवितां आपले विचार विस्कळित आहेत कीं काय हें दाखवील, आमच्या रूपाचा नीटसपणा दाखविण्याच्या ऐवजीं आमच्या समजुती नीट, योग्य आहेत कीं नाहींत हें आम्हांस सांगेल. मुलींच्या लहानशाच पण निसर्गमोहक अशा काव्यसुमनांचें आणि आतां साधीं वाटलीं तरी भावी उत्कर्ष दाखविणाऱ्या चित्रांचें प्रतिबिंब वाचकवर्गाला आमच्या आदर्शांत दिसेल. आमच्या चुका आम्हांला आदर्शांत दिसतील व काय केलें म्हणजे आमचे विचार सर्वांगमनोहर होतील, हें आमचा आदर्शच आम्हांस सांगेल. आदर्शवत् चरित्रेंच आदर्शांत बिंबित होतील आणि हें सर्व घडल्यावर कालांतरानें आजचा छोटा आदर्श सर्व मासिकांचा आदर्श होऊन राहील. हा आमचा हेतु पूर्ण होवो अशी परमेश्वराची प्रार्थना करून हा प्रास्ताविक लेख संपवितें."

या उताऱ्यावरून बालिकादर्शाचें ध्येय वाचकांच्या ध्यानीं येईल. बालिकादर्शाला 'सर्व मासिकांचा आदर्श' करण्याची जबाबदारी हल्लींच्या विद्यार्थिनींवर आहे. जुन्या व नव्या विद्यार्थिनींचें सहकार्य झाल्यास ही गोष्ट खरोखर अशक्य नाहीं. असो.

प्रथम 'बालिकादर्श' दर महिन्याला निघत असे. परंतु दर महिन्याला अंक छापणें त्रासाचें होऊं लागल्यामुळें 'बालिकादर्श' त्रैमासिक झालें. बालिकादर्शाच्या मुखपृष्ठावरील श्लोक पुढीलप्रमाणें आहेः—

"असति सुगुण जे ते वाढवावे क्रमांनीं ।
कलुषित नच व्हावें चित्त तें दुर्गुणांनीं ॥
चतुर बहुत व्हाव्या बालिका सर्व कामीं ।
म्हणुनि जनन घेतों 'बालिकादर्श' हा मी ॥"

हा श्लोक गुरुवर्य रड्डीशास्त्री यांनीं रचलेला आहे. श्री. रड्डीशास्त्री, कै. गोखले मास्तर, मिसेस् जोगळेकर, मिसेस् खान, कै. अभ्यंकर मास्तर, श्रीमती सारजाबाई बापट इत्यादि मंडळींनीं 'बालिकादर्श'स साहाय्य करून उपकृत केलें आहे. हल्लीं 'बालिकादर्श'च्या संपादिका कुमारी अनसूयाबाई देवधर या आहेत. शिवाय श्री. तांबेशास्त्री हे लेख व गाणीं वगैरे देऊन बालिकादर्शास साहाय्य करीत असतात.

पूर्वी ज्यांची इच्छा असेल त्याच मुली बालिकादर्शाच्या वर्गणीदार होत. परंतु त्यामुळें छपाईचा खर्च भागेनासा झाला. अलीकडे इंग्लिश पहिलीपासून इंग्लिश सातवीपर्यंतच्या प्रत्येक मुलीनें बालिकादर्शाचें वर्गणीदार झालें पाहिजे असा नियम आहे. प्रत्येक वर्गणीदारास बालिकादर्शाची वर्षाला १२ आणे वर्गणी द्यावीच लागते.

अलीकडे बालिकादर्शात सध्यांच्या विद्यार्थिनींचेच लेख बहुधा येत असतात. परंतु जुन्या विद्यार्थिनी व शिक्षकवर्ग यांनीं मिळून बालिकादर्शाचें स्वरूप शक्य तितकें सर्वांगसुंदर केल्यावांचून बालिकादर्शाचें ध्येय साध्य होणार नाहीं. कलकत्त्याच्या 'Modern Student' या मासिकाप्रमाणें बालिकादर्शाचें बहिरंग व अंतरंग करण्याचा चालकांचा विचार आहे. बालिकादर्शास सतरा वर्षें पुरीं होऊन हल्लीं अठरावें सुरू आहे. त्यांत कांहींतरी क्रांति घडवून आणण्याची वेळ येऊन ठेपली आहे; तरी हल्लींच्या विद्यार्थिनींना व माजी विद्यार्थिनींना आमची अशी विनंति आहे कीं, बालिकादर्श मासिकास महाराष्ट्र वाङ्मयांत अढळ पद मिळवून देण्याचा त्यांनीं यथामति प्रयत्न करावा. बाललेखिकांनीं लेख लिहिण्यापूर्वी आपल्या विषयाची उत्तम तयारी करावी. कारण पूर्वतयारीवांचून अद्यापपावेतों एकाहि लेखकाला कोणत्याहि वाङ्मयीन क्षेत्रांत शाश्वत स्थान प्राप्त झालेलें नाहीं. वाचन व अवलोकन या दोन्ही गोष्टी होतकरू लेखिकांनीं अवश्य केल्या पाहिजेत. असो. बालिकादर्श सर्व मासिकांचा लवकरच आदर्श होवो!

बालसेवासंघ (Children's Guild of Service):—मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन (सध्यांचे व्हाइसरॉय) यांच्या पत्नी लेडी विलिंग्डन यांनीं इ. स. १९१७ सालीं शाळेंतील मुलींची युद्धफंड शाखा स्थापन केली. संघाच्या सभासदाला दरवर्षी १ रु. वर्गणी द्यावी लागे. हल्लीं ही वर्गणी कमी करण्यांत आली आहे. प्रथम या संघांत फक्त युरोपियन लोकांचीं मुलें होतीं त्या वेळीं शाळेंतील मुलें

युद्धामध्यें जखमी होऊन इस्पितळांत असलेल्या सैनिकांच्यासाठीं कपडे तयार करीत व करमणुकीचे खेळ करून त्यांचें उत्पन्न युद्धफंडाला देत असत.

महायुद्ध संपल्यानंतर शिशुशाखेचा उत्साह कमी झाला. १९१९ सालीं महायुद्धाची स्मृति मुलांच्या मनांत नेहमीं राहावी व त्यांच्या अंगीं देशाभिमान, पराक्रम व समाजसेवा इत्यादि गुणांचा विकास व्हावा या हेतूनें 'चिल्ड्रेन्स् गिल्ड ऑफ सर्व्हिस' ही संस्था स्थापन झाली. दीन दुबळ्या जीवांविषयीं लहान मुलामुलींच्या मनांत करुणा उत्पन्न करून त्यांना मदत करण्याची प्रवृत्ति मुलांच्यांत उत्पन्न करणें हा या संस्थेचा प्रधान हेतु आहे. हल्लीं संघाची जास्तींत जास्त वार्षिक वर्गणी १ रु. व कमींत कमी २ आणे आहे.

शाळांतील व ट्रेनिंग कॉलेजांतील सर्व मुलींना व चौदा वर्षांच्या खालील मुलांना या संघाचे सभासद होतां येतें. संघाच्या निरनिराळ्या शाखांतून जमा झालेली वर्गणीची रक्कम शहरांतील अनाथ मुलांच्या संस्थांना देण्यांत येते. आजपर्यंत या संघानें मंगळवार पेठेंतील रुग्णालय, महारोग्यांची संस्था, क्षयरोग्यांचें गृह, गरीब विद्यार्थिनी, अस्पृश्य जातीच्या विद्यार्थिनी, अनाथगृहें, सेवासदन, पुणें शहरांतील अनाथ बालाश्रम, इत्यादि संस्थांना द्रव्यसाहाय्य केलें आहे.

मिस् बर्न यांच्या कारकीर्दींत इ. स. १९१९ सालीं आमच्या हायस्कुलांतील विद्यार्थिनी संघाच्या वर्गणीदार झाल्या. संघाच्या शाळेंतील वर्गणीदारांची संख्या २५० पर्यंतहि असते. संघाच्या सभासदांसाठीं दरवर्षी एकदां जो कॉन्सर्ट केला जातो त्यामध्यें आमच्या शाळेंतील मुली भाग घेतात. या कॉन्सर्टचें उत्पन्न फंडांतच जमा करतात.

याशिवाय वर्षांतून एकदां निरनिराळ्या शाळांतील मुलींचे खेळाचे सामने होतात. ज्या शाळेंतील मुलींचा खेळांत पहिला नंबर येईल त्या शाळेला शील्ड देण्यांत येतें. आमच्या शाळेनें आजपर्यंत तीन वेळां शील्ड मिळविलें आहे.

खेळाच्या जागीं मुलींना नेण्याची व आणण्याची व्यवस्था संघाकडून फुकट केली जाते. त्या दिवशीं संघाकडून सभासदांना उपहार देण्यांत येतो व त्यांच्या करमणुकीसाठीं लाकडी घोड्याचीं चक्रें, रहाटगाडगें इत्यादि साधनांची व्यवस्थाहि संघाकडूनच करण्यांत येते.

संघाच्या अध्यक्ष:—मुंबईच्या गव्हर्नरसाहेबांच्या पत्नी या संघाच्या अध्यक्ष असून संघाच्या कार्यकारी मंडळांत पुण्यांतील मुलींच्या शिक्षण-संस्थांवरील मुख्य

अधिकारी स्त्रिया आहेत. युद्धाच्या स्मृतिदिनानिमित्त आमच्या शाळेंतील संघाच्या सभासद असणाऱ्या व इतर मुलीहि ' पॉपीज् ' तयार करितात. समाजसेवेचें तत्त्व मुलामुलींच्या मनांमध्यें लहानपणापासून बिंबविणारी ही संस्था अत्यंत उपयुक्त आहे.

गाइड्स् अथवा बालिकासंघः—स्काउट पद्धतीचे संस्थापक सर बेडन-पॉवेल यांच्या पत्नीनें गर्ल् गाइडस् (बालिकासंघ) ही संस्था स्थापन केली. परंतु पाश्चात्य समाजांतील चालीरीतींना अनुसरून या संस्थेचें कार्य असल्यानें प्रारंभीं ती येथें विशेष प्रिय झाली नाहीं. परंतु स्काउट पद्धतीप्रमाणें या संघांत प्रवेश केल्यानें मुली स्वावलंबी, आज्ञाधारक व धीट होऊन त्यांना सहकार्यानें व ऐक्यानें कामें करतां येतात व त्याचप्रमाणें भोंवतालच्या परिस्थितीस अनुसरून कल्पकतेनें व कौशल्यानें त्यांचेवरील जबाबदारी त्यांना पार पाडतां येते असा इतरांचा अनुभव असल्यानें आमच्या हायस्कूलमध्यें या संघाचें पथक सुरू करण्याचे प्रयत्न एकसारखे तीन वर्षें चालू होते. अखेर इ. स. १९२४ च्या ऑगस्ट महिन्यांत प्रसिद्ध गर्ल-गाइड ट्रेनर मिस् टेरी या हिंदुस्थानभर दौरा करीत असतां त्यांचा मुक्काम पुणें येथें होऊन त्यांनीं हुजुरपागेमध्यें गर्ल् गाइडिंगचा दहा दिवसांचा कोर्स सुरू केला. त्यामध्यें पुण्याच्या स्त्री-शिक्षणसंस्थांतील बऱ्याच अध्यापिकांनीं आपलीं नांवें नोंदविलीं होतीं. सकाळचे वर्ग हुजुरपागेंत व दुपारचे वर्ग यंग वुइमेन्स ख्रिश्चन असोसिएशन-मध्यें भरत. हायस्कुलांतील मिसेस् सेराबाई सॅम्युअल व मिस् पाणंदीकर (मिसेस् खान) या दोघी अध्यापिकांनीं त्या वेळीं मिस् हेवर्ड व मिस् टेरी यांच्या हाताखालीं गायाडिंगचें शिक्षण घेतलें. प्रारंभीं शाळेंतील मुलींना मिस् हेवर्ड व मिस् टेरी या शिकवीत असत. त्या वेळीं गाइड्सची संख्या पन्नासपर्यंत झाल्यामुळें मिस् पाणंदीकर व मिसेस् सॅम्युएल यांच्या नेतृत्वाखालीं दोन पथकें तयार करण्यांत आलीं. तळेगांव येथील Guiders' Training Camp मध्यें त्या दोघींना पाठविण्यांत आलें. या-प्रमाणें त्यांचें ट्रेनिंग पूर्ण झाल्यावर त्या दोघी गाइड्सच्या Rallies घेऊं लागल्या. इ. स. १९२४ च्या डिसेंबर महिन्यांत 7th and 8th Poona Companies या नांवानें दोन्ही रजिस्टर होऊन त्या चालविण्याचा अधिकार पथकांच्या कॅप्टन मिस् पाणंदीकर व मिसेस् सॅम्युअल यांना देण्यांत आला. सातारा येथें भरलेल्या गाइडर्स ट्रेनिंग कँपमध्यें शिक्षण घेण्यासाठीं मिसेस् सॅम्युअल यांना पाठविलें होतें. उटकमंड येथें दरवर्षी होणाऱ्या गाइडस् कँपला मिस् पाणंदीकर यांच्याबरोबर कांहीं गाइड्सहि गेल्या होत्या. या दोघींनींहि उत्कृष्ट कार्य करून गाइडिंगच्या चळवळीबद्दल

मुलींच्यांत गोडी उत्पन्न केली. मिस् मुंगे (मिसेस् अत्रे) व मिस् सखूबाई जोशी या कांहीं दिवस लेफ्टेनंट म्हणून काम करीत होत्या. मिसेस् खान व मिसेस् सॅम्यु-एल यांची बदली झाल्यानंतर गाइडिंगची जबाबदारी मिसेस् पाटणकर यांनीं चांगल्या रीतीनें पार पाडिली. हल्लीं सातव्या कंपनीच्या कॅप्टन् मिस् कर्नाटकी व लेफ्टेनंट मिस् गोखले या असून तीमध्यें ३५ गाइडस् आहेत. आठव्या कंपनीच्या कॅप्टन मिस् ऐझक व लेफ्टेनंट मिस् विजयाबाई घाटे या आहेत व त्या कंपनींत गाइड्स्‌ची संख्या ४० पर्यंत गेली आहे.

प्रत्येक गाइडकडून तीन वचनें व संघाचे दहा नियम पाळण्याविषयीं शपथ घ्यावी लागते. तीं तीन वचनें पुढीलप्रमाणें आहेतः—

(१) मी परमेश्वराविषयींचें व राजाविषयींचें कर्तव्य बजावीन. (२) परक्या लोकांस कोणत्याहि वेळेस मदत करण्यास मी मनापासून झटेन. (३) गाइडचे नियम मी पाळीन.


गाइडनें पाळावयाचे नियम फार महत्त्वाचे आहेत व ते पाळण्याचा प्रयत्न केल्यास शाळेंतील विद्यार्थिनींच्या अंतःकरणाची खरी उन्नति होईल. गाइडला पुढील नियम पाळावे लागतातः—(१) गाइड विश्वासार्ह असते. (२) गाइड राजनिष्ठ व देशभक्त असते. (३) गाइड लोकांना मदत करण्यास नेहमीं झटते. (४) गाइड इतर गाइडशीं व सर्वांशीं मित्रत्वानें वागते. (५) गाइड नम्र असून जनावरांना ममतेनें वागविते. (६) मातापिता, पॅट्रोल लीडर व कॅप्टन यांच्या आज्ञा गाइड पाळते. (७) संकटाच्या वेळींहि गाइड हंसतमुख असते. (८) गाइडचे विचार, आचरण व भाषण नेहमीं शुद्ध असतें.

वरील सर्व नियम पाळण्याची प्रत्येक गाइड खबरदारी घेते. प्रत्येक कंपनीच्या चार पॅट्रोल्स (Patrols) असून प्रत्येक पॅट्रोलमध्यें ८–१० मुलींचा समावेश होतो. प्रत्येक पॅट्रोलची एक मुलगी लीडर असून सध्यां ७ व्या कंपनीमध्यें डेझि, पॉपी व डॅफोडिल हीं तीन पॅट्रोल्स, व ८ व्या कंपनींत लिली, रेड रोझ, व्हाइट रोझ् व फरगेट-मी-नॉट अशीं चार पॅट्रोल्स आहेत. दर आठवड्यांतून एकदां 'रॅली' भरते त्या वेळीं एक तासपर्यंत क्रमाक्रमानें ठरलेलें शिक्षण गाइड्स्‌ना दिलें जातें. पॅट्रोलची लीडर आपल्या हाताखालच्या मुलींना शिकविते. नेहमीं आनंदी राहणें हें या संघाचें ध्येय असल्याकारणानें खेळ व गाणीं यांना रॅलीमध्यें महत्त्वाचें स्थान आहे. गाइडिंगमधील पहिल्या दोन वर्गांना Tender-foot व Second



गर्ल्-गाइड्स्-कंपनीज् ७ व ८

Wagle Press, Bombay, 1



ब्लू-बर्ड्स्–पथकें ७ व ८

Wagle Press, Bombay, 1

Class म्हणतात. एक दीड वर्षात या दोन वर्गांचें शिक्षण पुरें होऊं शकतें. चित्रकला, शिवण, बालसंगोपन, रुग्णशुश्रूषा, लेखनकला, संगीत, पाकशास्त्र, सायक्लिंग वगैरेमध्यें प्राविण्य संपादन करण्याबद्दल त्या त्या विषयांचीं गाइड्सना सर्टिफिकिटें देण्यांत येतात. प्रत्येक विषयाची वेगळी परीक्षा असते.

ही संस्था मुलींना सर्व प्रकारचें शिक्षण देते. ठिकठिकाणीं प्रवास करून सर्व गोष्टींचें काळजीपूर्वक अवलोकन करणें व सृष्टिनिरीक्षण करणें हें या संघाच्या शिक्षणाचें विशेष महत्त्वाचें अंग आहे. दर वर्षी कॅप्टन्स् संघांतील मुलींना सहल करावयास घेऊन जातात. इ. स. १९२८ सालीं हुजुरपागेंतील गर्ल गाइड्स्चा कॅंप दहा दिवसपर्यंत लोणीला होता. खडकवासला, तळेगांव, किर्लोस्करवाडी, कार्ला, भाटघर इत्यादि ठिकाणीं हुजुरपागेंतील गाइड असणाऱ्या मुलींना कॅंपसाठीं नेण्यांत आलें होतें. वर्षातून एकदां पुण्यांतील सर्व गाइड-कंपनीज् एकत्र आणण्यासाठीं गांवाबाहेर कॅंप काढला जातो. त्या वेळीं तंबू ठोकण्याखेरीज इतर सर्व कांहीं सुखसोयींची व्यवस्था मुलींना आपल्या बुद्धीनें व कौशल्यानें करावी लागते. त्या वेळीं सर्व कामांची मोठ्या शिस्तीनें विभागणी करण्यांत येते. मुलींना स्वयंपाकादि सर्व कामें स्वतः पार पाडून पुनः रॅली, खेळ वगैरे कार्यक्रम करावे लागतात. पशुपक्षी, फुलें, झाडें वगैरे निसर्गाविषयीं मुलींना कॅंपमध्यें पुष्कळच माहिती होते. कॅंपमुळें मुलींच्या अंगीं कार्यक्षमता, शिस्त, टापटीप, वक्तशीरपणा, स्वच्छता, आज्ञाधारकपणा, स्वार्थत्याग, धैर्य व व्यवहारचातुर्य इत्यादि गुणांचा विकास होतो. शाळेच्या शिक्षणक्रमांतील पुस्तकी विद्येच्या जोडीला व्यवहारज्ञानाचें उत्तम शिक्षण देणारी ही संस्था उपयुक्त नाहीं असें कोण म्हणेल ?

दिल्ली दरबारचा दिवस साजरा करण्याची गर्ल-गाइड्स्ची पद्धति आहे. त्या दिवशीं रॅली भरवून गाइड्स् साम्राज्याचें निशाण उभारतात व सायंकाळच्या वेळीं लहानसा खेळ करून दाखवितात. शाळेंतील उत्सवप्रसंगीं मुलींच्यावर देखरेख ठेवून शिस्त टेवण्याचें काम गाइड्स् हौसेनें करतात. बहुधा दर वर्षी गाइड कंपनींचे खेळांचे सामने होतात. त्यांमध्यें आमच्या शाळेंतील गाइड-मुलींनीं अनेक वेळां पहिलीं बक्षिसें मिळविलीं आहेत.

पांढरा पोलका व पांढऱ्या किनारीचें काळें लुगडें असा गाइडचा पोषाख असतो. याशिवाय प्रत्येक गाइडपाशीं एक खुणेचा बिल्ला असतो. आमच्या गाइड्स् Camp Fire नांवाचा विधि केव्हां केव्हां करतात. त्या प्रसंगीं खेळ व गाणीं

इत्यादि कार्यक्रम असतो. असो. पुस्तकी शिक्षणास पूरक असें व्यवहारोपयोगी शिक्षण देणारी ही संस्था शाळेच्या सर्वांगीण उन्नतीस उपकारक आहे.

प्रायमरी स्कूल व इं. पहिली व दुसरी यांमधील लहान मुलींच्यासाठीं ब्ल्यू बर्ड संघ मिस् वाडिया यांनीं इ. स. १९२९ सालीं स्थापन केला. ब्ल्यू बर्ड संघांत ७ ते ११ वर्षें वयापर्यंतच्या मुलींचा समावेश होतो व याच मुली पुढें गाइड होतात. ब्ल्यू बर्ड पथकांत प्रारंभीं २४ मुली होत्या. हल्लीं त्याच पथकांत ४८ मुली आहेत. ब्ल्यू बर्ड संघाची रॅली आठवड्यांतून एकदां घेतात. मैना, पोपट, बुल्बुल व होला असे पथकाचे चार भाग आहेत. गाइडप्रमाणें यांनाहि बॅज मिळविण्यासाठीं निरनिराळ्या परीक्षा द्याव्या लागतात. इ. स. १९३० च्या एप्रिल महिन्यांत मिस् वाडिया यांच्या अध्यक्षतेखालीं ब्ल्यू बर्ड संघाच्या मुलींनीं खेळ केले. त्या वेळीं एक मोठी सुंदर बाहुली व बरींच खेळणीं देऊन मिस् वाडिया यांनीं संघांतील मुलींना उत्तेजन दिलें. ब्ल्यू बर्ड संघांत प्रवेश करणाऱ्या मुलींच्या अंगीं आज्ञाधारकपणा, व्यवस्थितपणा, परक्याला मदत करण्याची इच्छा इत्यादि गुण येतात.

ग्रंथालय, वाचनालय व वस्तुसंग्रह:—हायस्कूलमधील प्रत्येक मुलीकडून दर महिन्याला २ आणे वर्गणी ग्रंथालयासाठीं घेतात. जमलेल्या वर्गणीमधून दरवर्षी मुलींना उपयुक्त व नवीन नवीन मनोरंजक अशीं इंग्लिश पुस्तकें विकत घेण्यांत येतात. मुलींच्या ग्रंथालयांत इंग्लिश वाङ्मयांतील उत्कृष्ट अशा पुस्तकांचा संग्रह आहे. दर आठवड्याला वर्गांच्या अध्यापिका मुलींना पुस्तकें वाचावयास देतात. प्रत्येक मुलीनें वर्षांत किती पुस्तकें वाचलीं याची नोंद करण्यांत येते. याशिवाय Times of India, Illustrated Weekly, Bombay Chronicle, आणि ज्ञानप्रकाश, सकाळ, केसरी इत्यादि वर्तमानपत्रें व Modern Student, Treasure Chest, मनोरंजन, किर्लोस्कर, स्त्री, आनंद, शाळापत्रक इत्यादि इंग्लिश व मराठी मासिकें मुलींच्या वाचनालयांत घेण्यांत येतात. मुलींना वर्तमानपत्रें वाचण्याची संवय लागावी यासाठीं 'Current News' चा व 'Library Reading' चा तास वेळापत्रकांत असल्याचें मागें सांगितलेंच आहे. शाळा सुरू होण्यापूर्वी व दुपारच्या सुटींत वाचनालयांत मुलींची गर्दी असते. लायब्ररीचा तासहि मुलींना फार आवडतो. त्यावरून ही नवी सुधारणा यशस्वी झाली आहे हें सिद्ध होतें.

अध्यापकवर्गासाठीं स्वतंत्र ग्रंथसंग्रहालय असून त्यांत सुमारें सात हजार पुस्तकें आहेत. शिक्षणशास्त्र, इतिहास, भूगोल, इंग्लिश-मराठी वाङ्मय, गणित, कल



मुलींचें ग्रंथालय व वाचनालय

इत्यादि विषयांवरील बहुतेक आधुनिक ग्रंथ व त्याप्रमाणेंच अनेक प्रकारचे संदर्भ-ग्रंथ व शब्दकोश यांचा संग्रह ग्रंथालयांत केला आहे. शिक्षकवर्गास उपयुक्त अशीं Child Education, Pictorial Education, Progress of Education, Geographical Magazine इत्यादि मासिकें शाळेंत घेण्यांत येतात. चित्रें, नकाशे, Charts इत्यादिकांचाहि चांगल्या प्रकारचा संग्रह शाळेंत असून सायन्स-शिक्षकांच्या देखरेखीखालीं अध्यापनास उपयुक्त असें Museum हि करण्यांत आलें आहे. विद्यार्थिनी व अध्यापकवर्ग Museum मधील वस्तुसंग्रह वाढविण्याचा प्रयत्न करीत असतात. वरील सर्व शिक्षणसाहित्याचा शिक्षकवर्गाकडून भरपूर उपयोग केला जातो.

वार्षिक प्रदर्शनः——बक्षिस समारंभ दरवर्षी साजरे करण्यांत येतात. त्या दिवशीं मुलींच्या हस्तव्यवसायाचें प्रदर्शन भरविण्यांत येतें. मुलींनीं काढलेलीं ऐतिहासिक, भौगोलिक व इतर चित्रें, नकाशे, सायन्ससंबंधीं चित्रें व Charts निराळ्या देशांतील देखाव्यांचे नमुने, नक्षीचें शिवणकाम, भरतकाम, आल्बम्स् इत्यादि गोष्टी प्रदर्शनांत ठेवण्यांत येतात. मिस् फील्डिंग वर्गांत झालेल्या लेखनकामाचेंहि प्रदर्शन भरवीत असत.

पुणें येथील कौन्सिल हॉलमध्यें चित्रकला प्रदर्शन दरवर्षी भरतें. तेथेंहि हायस्कूलमधील मुलींनीं तयार केलेलीं चित्रें पाठविण्यांत येतात. या प्रदर्शनांचा विद्यार्थिनींना व त्याचप्रमाणें अध्यापकवर्गास फार फायदा होतो. प्रदर्शनांत ठेविलेल्या वस्तूंचा शिक्षण-साहित्य म्हणून अध्यापनाच्या वेळीं शिक्षकांना उपयोग करतां येतो.

बक्षिसें:——दरवर्षी मुलींना सुमारें ५०० रुपयांचीं बक्षिसें वांटण्यांत येतात. वार्षिक परीक्षेंतील प्रत्येक वर्गांतील पहिल्या नंबराला, व वार्षिक परीक्षेंत शेंकडा ५० गुण मिळविणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना बक्षिसें असून शिवाय ड्रॉइंग, शिवण, बागकाम खेळ यांमध्यें पहिल्या येणाऱ्या विद्यार्थिनींना स्वतंत्र बक्षिसें देण्यांत येतात. मराठी निबंध व वक्तृत्व या विषयांच्या बक्षिसांसाठीं चढाओढ लावण्यांत येते. त्या चढाओढींत सुमारें ३०० विद्यार्थिनी भाग घेतात. मॅट्रिक्युलेशन वर्गांतील मुलींच्या इंग्लिश निबंधासाठीं डॉ. काशीबाई नवरंगे यांनीं २५ रुपयांचें बक्षीस ठेविलें आहे. निबंधाचे व भाषणाचे विषय सुमारें आठ दिवस अगोदर कळवून विद्यार्थिनींना तयारीसाठीं वेळ देण्यांत येतो.

या बक्षिसांखेरीज वार्षिक परीक्षेंत प्रत्येक वर्गांतील पहिला व दुसरा नंबर मिळविणाऱ्या विद्यार्थिनींना सोसायटीकडून दरमहा शिष्यवृत्याहि दिल्या जातात.

शिष्यवृत्त्या व बक्षिसें यांसाठीं सोसायटीला वर्षाला दोन हजारांपेक्षां जास्त रक्कम खर्च करावी लागते. उदार आश्रयदात्यांच्याकडून सोसायटीला शिष्यवृत्त्या व बक्षिसें यांसाठीं देणग्या मिळालेल्या आहेत.

समारंभः--पूर्वी बक्षीससमारंभ दरवर्षी होत नसत. रौप्यमहोत्सवानंतर अकरा वर्षांनीं इ. स. १९२२ मध्यें सर जॉर्ज लॉइड यांच्या हस्तें बक्षिससमारंभ झाला. इ. स. १९२९ पासून दरवर्षी सोसायटीची मंडळी शाळेचे बक्षिससमारंभ घडवून आणीत आहेत व त्यामुळें विद्यार्थिनींच्या गुणांचें कौतुक होऊन त्यांना सर्व प्रकारें उत्तेजन मिळतें. या समारंभप्रसंगीं मुली नाट्यप्रयोगादि कार्यक्रम करून दाखवितात. त्या वेळीं त्यांचें अभिनयकौशल्य, संगीतप्रावीण्य चांगल्या प्रकारें दृष्टोत्पत्तीस येतें. अभिनयांत विशेष प्रवीणता दाखविणाऱ्या मुलींना चांदीचीं पदकें देतात.

मॅट्रिकच्या विद्यार्थिनींच्या सन्मानार्थ व त्यांना निरोप देण्यासाठीं बोर्डिंगमधील मुली कांहींतरी कार्यक्रम करतात. युद्ध-फंड, मलबार रिलीफ् फंड, मालवण रिलीफ् फंड, बिहार रिलीफ फंड, इत्यादि फंडांसाठीं खेळांचे कार्यक्रम करून मुलींनीं शेंकडों रुपये आजपर्यंत मिळवून दिले आहेत. वनितासमाजाचा उत्सव म्हणजे मुलींचें वार्षिक संमेलन होय. त्या प्रसंगीं माजी विद्यार्थिनींनाहि आमंत्रणें पाठविण्यांत येतात. असो. सर्व प्रकारच्या खेळांचे कार्यक्रम तयार करण्याची जबाबदारी गेल्या वर्षापासून 'Amusement Club' कडे देण्यांत आली आहे. अभ्यासाचा शीण नाहींसा करून विद्यार्थिनींच्या शाळेंतील जीवनक्रमांत नाविन्य निर्माण करण्याचें कार्य अशा समारंभांमुळें उत्तम प्रकारें साधतें. ता. ४ मार्च हा Foundation Day म्हणून साजरा करतात. त्या दिवशीं निरनिराळ्या वर्गांत खेळांची चढाओढ लावून विजय मिळविणाऱ्या विद्यार्थिनींना बक्षिसें व इतर सर्वांना खाऊ देतात. बक्षिसें व खाऊ यांसाठीं विद्यार्थिनींच्या पालकांकडून वर्गणी जमवितात.

सदीप व्याख्यानें (Magic-lantern lectures):—वर्षांतून एकदां श्री. तोरो (Inspector for Visual Instruction) यांचें भूगोलविषयक अथवा आरोग्यविषयक व्याख्यान मॅजिक लॅंटर्नच्या साहाय्यानें होतें. कौन्सिलनें नुकताच एक एपिडायास्कोप शाळेसाठीं विकत घेतला आहे. शिक्षणविषयक फिल्म्स्, चित्रें, नकाशे इत्यादि गोष्टी वारंवार दाखविण्याची त्यामुळें सोय होईल. सिनेमाच्या शिक्षणविषयक फिल्म्स् मुलींना दाखविण्याची तजवीज अवश्य करण्यांत येते. त्यामुळें मनोरंजन होऊन मुलींच्या इतिहास व भूगोल या दोन्ही विषयांच्या ज्ञानांत महत्त्वाची भर पडते.



एक्स्टेन्शन्-क्लास

Wagle Press, Bombay, 1

सहली (Excursions):—दरवर्षीं प्रत्येक वर्गाला अध्यापिकांच्या देखरेखीखालीं कोठेंतरी सहल करावयास पाठविण्यांत येतें. लहान मुलींना तळेगांवचा कांचकारखाना, मुंढव्याची कागदाची गिरणी, बोटॅनिकल व एम्प्रेस् गार्डन्स, शिंद्यांची छत्री यांसारखीं ठिकाणें पाहावयास नेतात. वरच्या वर्गांतील मुलींना पुरंदर, शिवनेरी, भाटघर, बनेश्वर, कार्ल्यांचीं लेणीं इत्यादि दूरचीं स्थानें पाहावयास घेऊन जातात. सकाळीं जाऊन संध्याकाळला सहलीहून परत येण्याची व्यवस्था केली जाते. जीं स्थानें मुलींना दाखवितात त्यांची शक्य तेवढी माहिती त्यांच्या बरोबर गेलेल्या अध्यापिका देतात व त्या विषयावर मुलींना बहुधा इंग्लिश अथवा मराठींतून निबंध लिहावयास सांगतात.

व्यायामाचे खेळ:—आमच्या हायस्कूलमध्यें मुलींच्या शारीरिक शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविलें जातें. खेळण्यासाठीं प्लेशेडमध्यें मुबलक जागा आहे. खो खो, हुतुतू, इत्यादि देशी खेळांखेरीज मुली बॅडमिंटन् व टेनिस् हे विदेशी खेळहि खेळतात. परंतु याचा फायदा बोर्डिंगच्या मुलींना अधिक मिळतो. घराहून शाळेला येणाऱ्या विद्यार्थिनी अद्याप याचा चांगला फायदा करून घेत नाहींत. लहान लहान मुली फुगड्या, झिम्मा वगैरे खेळ हौसेनें खेळतात. प्रायमरीच्या मुलींना See-Sawवर बसणें फारच आवडतें. पुणें शहरांतील मुलींच्या शाळांमध्यें जे सामने होतात त्यांमध्यें आमची शाळा अवश्य भाग घेते. इ. स. १९२० सालच्या लेडीज् टूर्नमेंटमध्यें आमच्या अनेक विद्यार्थिनींनीं अपूर्व यश संपादिलें आहे. बालसेवासंघाच्या सामन्यांत आमच्या संस्थेच्या मुली भाग घेत असतात. ड्रिल व गाइडिंग यांमुळेंहि मुलींच्या प्रकृतीवर चांगला परिणाम होतो. दरवर्षीं कोणातरी स्त्री-डॉक्टरकडून सर्व शाळेंतील मुलींची वैद्यकीय तपासणी नियमानें होते. एकंदरीनें आमच्या संस्थेंतील मुलींचें आरोग्य चांगलें असतें असा त्यांचा अभिप्राय आहे. दररोज सायंकाळीं कोणातरी शिक्षकिणीच्या देखरेखीखालीं मुली खेळ खेळतात.

Extension Class :—गृहस्थाश्रम हेंच शेंकडा ९९ मुलींचें ध्येय आहे. परंतु त्या आश्रमास आवश्यक असलेल्या विषयांचें पूर्ण शिक्षण शाळेमध्यें देणें शक्य नसतें. सामान्यतः मॅट्रिकपर्यंत शिक्षण निदान शहरांत तरी रूढ झालेलें आहे. मॅट्रिक झाल्यानंतर ज्या मुलींना कॉलेजांत न जातां गृहिणीजीवनास उपयुक्त अशा विषयांचें शिक्षण घेण्याची इच्छा असेल त्यांच्या ज्ञानवर्धनासाठीं शाळेमध्यें एक वर्ग सुरू करावा अशी विनंति पुण्यांतील 'वुइमेन्स् कौन्सिल' व 'माजी विद्या-

र्थिनी संघ ' यांनीं सोसायटीला केली व ती कल्पना सोसायटीला मान्य होऊन त्यांनीं गेल्या वर्षी ' Extension Class ' हें नांव देऊन त्या वर्गाचा उद्घाटन समारंभ श्रीमंत सौ. गिरिजाबाई रास्ते यांच्या हस्तें करविला.

या वर्गाच्या अभ्यासक्रमांत गृहजीवनशास्त्र, आरोग्यशास्त्र, गृहव्यवस्था, कपडे धुण्याचें शास्त्रीय ज्ञान (Laundry work), शिवणकाम, विणकाम, भरतकाम, रुग्णशुश्रूषा, फर्स्ट एड्, शिशुसंगोपन, शिशुमानसशास्त्र, शिक्षणशास्त्र, उच्च प्रकारचें इंग्लिश व मराठी वाङ्मय, गायन, वादन, चित्रकला या ललितकला इत्यादि विषयांचें श्रेष्ठ दर्जाचें शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

मॅट्रिक झालेल्या विद्यार्थिनी मिळाल्याशिवाय या अभ्यासक्रमाचें खरें कार्य दिसून येणें कठीण आहे. तथापि कालांतरानें हा अभ्यासक्रम लोकप्रिय होऊन ज्या हेतूनें हा वर्ग स्थापन करण्यांत आला तो हेतु सफल होईल अशी आम्हांस दृढ आशा आहे. या वर्गाचा अभ्यासक्रम सध्यां एका वर्षाचाच असून निरनिराळ्या विषयांत पारंगतता मिळविल्यास त्या त्या विषयाचे डिप्लोमे देण्याचा चालकांचा विचार आहे.

बालिकावस्तुभाण्डार:––सहकार्याच्या तत्त्वाचें प्रत्यक्ष शिक्षण मुलींना देण्याच्या हेतूनें मिसेस् मोझेस् यांनीं १९ जानेवारी १९३१ रोजीं ' बालिकावस्तु-भाण्डार ' या संस्थेची स्थापना केली. भांडारासाठीं लागणारें भांडवल जमविण्यासाठीं मुलींच्याकरितां १ रुपयाचा व शिक्षकांसाठीं ५ रु. चे शेअर काढण्यांत आले. थोड्याच काळांत २७० मुली व २४ शिक्षक भागीदार होऊन ३९० रु. भांडवलावर भाण्डाराचें काम सुरु झालें.

भाण्डार मुलींचें असून शिक्षकिणींच्या देखरेखीखालीं सर्व व्यवस्था त्याच पाहतात. भाण्डाराचे कामीं मुलींना मदत व्हावी म्हणून पांच शिक्षकांचें मंडळ नेमण्यांत आलें. बाहेरच्या दुकानांतून माल खरेदी करणें, हिशेब लिहिणें आणि इतर बाबतींत मदत करणें वगैरे काम श्री. देशमुख व श्री. जोशी यांजकडे दिलें आहे. मंडळाच्या पहिल्या चिटणीस मिस् नागपूरकर यांच्या मदतीस मिस् मोडक व मिस् गोखले या शिक्षकिणी असत. भाण्डारास उत्तेजन देण्यासाठीं म्हणून सोसायटीनें भाण्डारासाठीं स्वतंत्र खोली बांधवून दिली. त्याचप्रमाणें माल ठेविण्यासाठीं एक कपाट, एक काउंटर, टेबल व खुर्ची इत्यादि वस्तूहि सोसायटीकडून मिळाल्या.

दररोज सुटीच्या वेळांत व शाळा सुटल्यानंतर एक तास भांडार उघडें असतें. जेव्हां जेव्हां ग्राहकांची गर्दी होण्याचा संभव असतो तेव्हां तेव्हां सकाळीं साडे-

आठ ते साडेनऊपर्यंत आणखी एक तास भाण्डार चालू ठेवितात. शाळेंतील वरच्या वर्गांतील बऱ्याच मुलींनीं स्वयंसेविकांच्या यादींत नांवें नोंदविलीं आहेत. ह्यांपैकीं दोन दोन स्वयंसेविका एक आठवडाभर नेमिलेल्या वेळीं विक्रीचें काम करतात. विक्री चालू असतां एखादी शिक्षकीण हजर असतेच.

मुलींना अवश्य लागणाऱ्या सर्व वस्तु भांडारांत विक्रीस ठेविल्या आहेत. शिवाय पेपरमिंट, बिस्किटें, मेवापाकिटें असा किरकोळ खाऊहि येथें मिळण्याची तजवीज केलेली आहे. कागद, वह्या, पेन्सिली, टांक, रबर, शालोपयोगी पुस्तकें, इत्यादि सर्व प्रकारचें उपयुक्त सामान या भाण्डारांत मिळतें.

भाण्डारांतील मालाच्या किंमती इतर दुकानांतील तसल्याच मालाच्या किंमतीइतक्याच असतात. कित्येक बाबतींत तर त्या किंचित् कमीच असतात. पुस्तकांच्या छापील किंमतीवर दर रुपयास एक आणा याप्रमाणें कमिशन दिलें जातें.

भाण्डाराचें वर्ष गुढीपाडव्यापासून धरलें आहे. पहिल्या वर्षी (इ. स. १९३१–१९३२ सालीं) खर्चवेंच वजा जाऊन भांडाराला रु. ५०० नफा राहिला. भागीदारांना दर रुपयास २ आणेप्रमाणें नफा वांटून देण्यांत आला. त्याच वर्षी स्वयंसेविकांनीं उत्साहानें व निरपेक्षबुद्धीनें केलेल्या कामगिरीचें कौतुक करण्याच्या हेतूनें श्री. तांबेशास्त्री यांचें गायन करवून मुलींना अल्प उपहार देण्यांत आला.

दुसऱ्या (१९३२–३३) व तिसऱ्या (१९३३–३४) वर्षी भाण्डाराला अनुक्रमें ३५० रु. व २०० रु. नफा राहिला आहे व भागीदारांना प्रत्येक वर्षास दर रुपयास १ आणा याप्रमाणें नफा वाटण्याचें ठरलें आहे.

मिस् नागपूरकर यंदा मुंबईच्या ट्रे. कॉलेजमध्यें गेल्या असल्यामुळें मिस् मोडक यांची भाण्डाराच्या चिटणीस म्हणून योजना झाली आहे व मिस् गुप्ते, मिस् देशपांडे, मिस् दळवी व मिस् टिळक या शिक्षकिणी त्यांना मदत करीत आहेत.

माजी विद्यार्थिनी संघ (Old Girls' Association):—माजी विद्यार्थिनींचा संघ स्थापन करण्याची आवश्यकता मिस्टर डडले (पूना हायस्कूलचे हेडमास्तर) यांनीं इ. स. १९०८ सालीं त्या वेळच्या लेडी सुपरिंटेंडेंट यांच्या नजरेस आणिली. परंतु बरींच वर्षे संघाची स्थापना झाली नाहीं. पुढें मिस् बर्न यांनीं Old Girls' Association या नांवाची संस्था स्थापन करण्याची कल्पना शिक्षणखात्याकडे जो वार्षिक अहवाल पाठविण्यांत येतो त्यामध्यें नमूद केली होती. इ. स. १९२०मध्यें मिस् बर्न शाळा सोडून पुढें सेवानिवृत्त झाल्यामुळें ती कल्पना तशीच राहून गेली.

इ. स. १९२५च्या जून महिन्यांत डाक्का येथील ईडन् गर्ल्स् कॉलेजच्या प्रिन्सिपॉल व अर्थशास्त्राच्या प्रोफेसर मिस् वेरुळकर यांनीं आपल्या जुन्या शाळेस भेट दिली. त्या वेळीं त्यांनीं Visitors' Book मध्यें शाळेविषयीं जो अभिप्राय लिहून ठेविला, त्यामध्यें 'जुन्या विद्यार्थिनींना शाळेविषयीं फार प्रेम वाटतें, तरी त्या सर्वांना एकत्र आणणारी एखादी संस्था शाळेंत स्थापन केल्यास त्यांचा या संस्थेशीं जिव्हाळ्याचा संबंध जडेल' अशी स्तुत्य सूचना केली. मिस् वेरुळकर यांच्याप्रमाणेंच शाळेच्या सन्मान्य विद्यार्थिनी डॉ. काशीबाई नवरंगे, जे.पी., यांनीं व इतर बऱ्याच माजी विद्यार्थिनींनीं अशी संस्था स्थापन करावी अशी इच्छा प्रदर्शित केली.

याप्रमाणें माजी विद्यार्थिनींचा उत्साह व शाळेविषयींचें प्रेम पाहून मिस् फील्डिंग यांनीं इ. स. १९२६ सालच्या जानेवारी महिन्यांत माजी विद्यार्थिनींची जाहीर सभा शाळेंत बोलाविली. त्या सभेमध्यें बरीच चर्चा झाल्यावर माजी विद्यार्थिनी-संघ स्थापन करण्याचें ठरलें. संघाची घटना त्याच वेळीं ठरली. ती पुढीलप्रमाणें:—

१. संघाचें नांव 'Old Girls' Association' असें असावें.

२. कोणत्याहि माजी विद्यार्थिनीला या संघाच्या सभासदत्वाचा अधिकार आहे.

३. ओल्ड गर्ल्स् असोसिएशनचे हेतु :—

१ माजी विद्यार्थिनींचा शाळेशीं व परस्परांशीं जिव्हाळ्याचा संबंध आणणें.

२ परस्परांच्या अनुभवांचा एकमेकींना फायदा देऊन रोजच्या कामकाजांत नवीन चैतन्य उत्पन्न करण्याची माजी विद्यार्थिनींना संधि देणें.


४. संघाची वार्षिक वर्गणी १ रु. असावी.

५. संघाचें काम पाहण्यास माजी विद्यार्थिनींची कमिटी नेमावी.

६. माजी विद्यार्थिनींचें वार्षिक संमेलन दिवाळीच्या सुटीनंतर नोव्हेंबरमध्यें भरवावें.

७. सभासद-भगिनींच्या ओळखीच्या स्त्रियांना संघाच्या कार्यक्रमांना व संघातर्फे होणाऱ्या व्याख्यानांना हजर राहण्याची परवानगी असावी.

याप्रमाणें संघाची घटना ठरल्यानंतर मिसेस् गोरे यांना संघाच्या चिटणीस नेमण्यांत आलें. लेडी सुपरिंटेंडेंट या कमिटीच्या व संघाच्या अध्यक्ष असून



माजी विद्यार्थिनींचें संमेलन इ. स. १९२७

Wagle Press, Bombay, 1



यांशिवाय कमिटीमध्यें पुण्यांतील फर्गसन्, सर परशुरामभाऊ, वाडिया इत्यादि कॉलेजांतील व बी. जे. मेडिकल स्कूल या संस्थेंतील माजी विद्यार्थिनींतर्फे निवडून दिलेल्या प्रतिनिधी यांचा समावेश होतो. चिटणीसांच्या जोडीला वर्गणी जमविण्यास खजिनदाराची योजना केलेली असून त्यांना कमिटीच्या सभांना हजर राहून संघाचीं सर्व कामें पाहावीं लागतात. समाजसेविकांच्या तर्फे एक प्रतिनिधी निवडून कमिटींत पाठवितात.

संघाचें संमेलन दरवर्षी होतें. गेल्या वर्षी मात्र पुण्यांत प्लेगचा कहर उडाल्यानें संमेलन भरविणें अशक्य झालें. संमेलन बहुधा कोणातरी विद्वान् अशा माजी विद्यार्थिनीच्या अध्यक्षतेखालीं साजरें करतात. माजी विद्यार्थिनींचा मनोरंजक कार्यक्रम, अध्यक्षांचें भाषण व नंतर सायंकाळीं छोटा उपहार अशा प्रकारचा संमेलनाचा कार्यक्रम असतो. आजवर झालेल्या संमेलनांस मिस् मूर, डॉ. काशीबाई नवरंगे, डॉ. सुंद्राबाई कीर्तने, डॉ. मिसेस् इरावती कर्वे, डॉ. कमलाबाई देशपांडे, सौ. यमुनाबाई हिर्लेकर, सौ. वेणूबाई मोडक इत्यादि विद्वान् स्त्रिया अध्यक्ष म्हणून लाभल्या होत्या.

वार्षिक संमेलनाखेरीज व्याख्यानें, विद्यार्थिनींच्या गायनाचे जलसे (Musical Evenings) संघातर्फे करण्यांत येतात. जमलेल्या वर्गणीमधून कॉलेजचा अभ्यास पुढें चालवितां यावा यासाठीं गरीब परंतु हुषार अशा माजी विद्यार्थिनींस हा संघ मदत करतो. मॅट्रिक अगर विश्वविद्यालयाच्या इतर परीक्षांत उत्तीर्ण होऊन यश संपादन करणाऱ्या माजी विद्यार्थिनींचें अभिनंदन करून संघ त्यांना उत्तेजन देतो. माजी विद्यार्थिनी-संघाच्या सूचनेवरून सोसायटीनें शाळेमध्यें 'Extension Class' सुरू केला आहे. संघ जसजसा अधिकाधिक सामर्थ्यवान् होत जाईल तसतशा त्याला समाजास उपयुक्त अशा गोष्टी करतां येतील. सामाजिक, राजकीय, औद्योगिक वगैरे बाबतींत संघशक्ति सर्वश्रेष्ठ ठरली आहे. तिचें सौंदर्य व महत्त्व जाणून माजी विद्यार्थिनींनीं ऐक्याच्या जोरावर, अद्भुत भासणारें कार्यहि किती सहज होऊं शकतें हें जगाच्या निदर्शनास आणावें अशी विनंति आहे.

प्रकरण विसावें

विद्यार्थिनी

कोणत्याहि संस्थेचें यश व लौकिक तींतून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थिनींच्यावर अवलंबून असतो. आमच्या शाळेंतून गेल्या पन्नास वर्षांत शेंकडों विद्यार्थिनी सुशिक्षित होऊन बाहेर पडल्या. त्या सर्व हिंदुस्थानभर पसरलेल्या असून निरनिराळ्या कार्यक्षेत्रांत आपलीं कर्तव्यें उत्कृष्ट रीतीनें पार पाडून आमच्या संस्थेचा सुयशपरिमल साऱ्या भारतवर्षांत पसरीत आहेत. वृक्षाची किंमत त्याच्या पुष्पफलांवरूनच नेहमीं ठरते. पन्नास वर्षांपूर्वी अनेक उदार महात्म्यांनीं जें ज्ञानबीज लाविलें त्याचा सुंदर वृक्ष होऊन नानाविध सुगंधित पुष्पांनीं व फलांनीं तो आतां भरून गेला आहे. सुवर्णमहोत्सवप्रसंगीं आमच्या संस्थेसच केवळ नव्हे तर या महाराष्ट्र देशास ललामभूत झालेल्या या सुकन्यकांचें प्रसन्न हृदयानें यशोगायन करणें हें आमचें सर्वांचें आनंदाचें व प्रथम कर्तव्य होय.

हुजुरपागेच्या माजी विद्यार्थिनी गृहिणी, डॉक्टर, अध्यापिका, समाजसेविका, कायदेपंडिता, शिक्षणशास्त्रज्ञ, देशसेविका, कायदे-कौन्सिलच्या सभासद, निरनिराळ्या स्त्रीशिक्षणसंस्थांच्या चालक, कवयित्री, कादंबरीकार, लघुकथालेखिका, संस्थानांच्या अधिकारी इत्यादि नाना तऱ्हांचीं कार्यें करीत आहेत. त्यांपैकीं कांहीं प्रमुख स्त्रियांचीं संक्षिप्त चरित्रें खालीं देत आहें. मिस् रुबेन, मिस् वेरुळकर, मिस् डेव्हिड, मिसेस् मोझेस्, यांच्यासंबंधीं मागील १-२ प्रकरणीं लिहिल्यामुळें त्यांच्यासंबंधीं पुनः येथें लिहिण्याची आवश्यकता नाहीं.

केळवकर भगिनी:—डॉ. सौ. **द्वारकाबाई कमलाकर**—इ. स. १८८६ च्या सुमारास द्वारकाबाई, कृष्णाबाई व यमुनाबाई या तिघी केळवकर भगिनींना हुजुरपागा दाखविण्यासाठीं म्हणून त्यांचे वडील व मातोश्री कोल्हापुराहून निघाले. कोल्हापुराहून पुण्यास बैलगाडीनें प्रवास करावा लागत असल्यामुळें त्यांस येथें येऊन पोहोंचण्यास आठ दिवस लागले. इ. स. १८८७ मध्यें मिरजेहून पुण्यापर्यंत आगगाडी झाली तेव्हां या तिघी भगिनी आपल्या आजीबरोबर शिक्षणासाठीं पुण्यास आल्या. प्रथम त्या न्या. रानडे यांच्या वाड्यांत राहात असत. नंतर त्या तिघी हुजुरपागेंत राहावयास गेल्या. त्या वेळीं त्यांच्या धाकट्या भगिनी यमुनाबाई केवळ चार वर्षांच्या होत्या.

श्री. द्वारकाबाई यांचें इंग्रजी चौथीपर्यंतचें शिक्षण घरींच झालें होतें. या बुद्धिमान्, विनोदी असून लोकप्रिय म्हणून शाळेंत व आतांहि प्रसिद्ध आहेत. या आमच्या शाळेच्या पहिल्या मॅट्रिक होत. मॅट्रिकमध्यें त्या काळीं त्यांचा बराच वर म्हणजे एकोणिसावा नंबर आला होता. कॉलेजमध्यें प्रवेश मिळण्यापूर्वी प्रि. डॉ. ग्रे यांनीं त्यांची परीक्षा घेतली. नॅशनल इंडियन असोसिएशनच्या पुण्याच्या शाखेनें त्यांना दरमहा १० रुपयांची शिष्यवृत्ति दिली. त्याचप्रमाणें वैद्यकीय शिक्षण घेण्यासाटीं लेडी डफरिन् फंडांतून त्यांना मदत मिळाली. त्या एल्.एम्. अँड एस्. असून उच्च वैद्यकीय ज्ञान मिळविण्यासाठीं विलायतेलाहि जाऊन आल्या आहेत. त्यांचीं बरींच वर्षे दक्षिण हिंदुस्थानांत आपल्या पतीबरोबर गेलीं. अलीकडे त्यांची बदली मध्यप्रांत व वऱ्हाडमधील प्रसिद्ध शहरीं डफरिन् हॉस्पिटलवर होत गेल्यानें त्या महाराष्ट्रियांच्या व वऱ्हाड, मध्यप्रांतांतील लोकांच्या चांगल्या परिचयाच्या झाल्या आहेत. यवतमाळ व नागपूर येथें स्त्रीशिक्षण, समाजसुधारणा यांसंबंधीं मेहनत घेऊन त्यांनीं चांगलें कार्य केलें. हल्लीं त्या बनारस डफरिन् हॉस्पिटलवरील मुख्य अधिकारी आहेत. त्यांनीं आपल्या कन्यांना उत्तम शिक्षण देऊन सुशिक्षित केल्या आहेत.

डॉ. कु. **कृष्णाबाई केळवकर**—बुद्धिमत्ता व गोड स्वभाव यांमुळें कृष्णाबाई बरोबरीच्या विद्यार्थिनींच्या व अध्यापिकांच्या फार आवडत्या असत. कृष्णाबाईची सतेज मुद्रा, सौजन्य व प्रेमळपणा यांमुळें मुलींना त्या एखाद्या 'Heroine' प्रमाणें वाटत. त्या जेथें जेथें जातील तेथील मंडळींच्यावर त्यांची चटकन् छाप बसे. मॅट्रिकमध्यें दहावा नंबर मिळवून त्यांनीं चांगलें यश मिळविलें. त्यांचें प्रीव्हिअसचें शिक्षण फर्गसन् कॉलेजमध्यें झालें. मेडिकल कॉलेजमधील त्यांची कारकीर्द अत्यंत यशस्वी झाली. मेडिकलच्या दुसऱ्या व तिसऱ्या वर्षांच्या परीक्षांमध्यें त्यांनीं पहिला वर्ग मिळविला व एल्. एम्. अँड एस्. च्या परीक्षेंत अनेक बक्षिसें व पदकें मिळविलीं. इ. स. १९२० सालीं त्या स्वतःच्या खर्चानें उच्च अभ्यासासाठीं विलायतेला गेल्या. कोल्हापूर संस्थानांत डॉक्टर म्हणून चोवीस वर्षे काम करून त्या नुकत्याच सेवानिवृत्त झाल्या आहेत. कुशल लेडी डॉक्टर व मेहनती समाजसेविका म्हणून त्या कोल्हापुरांत ओळखिल्या जातात. उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना कैसर-इ-हिंद पदक देण्यांत आलें आहे. अध्यात्मिक प्रगति व आत्मिक विकास यांकडे त्यांचें लक्ष वेधलेलें असून मुंबई येथील प्रार्थनामंदिरांत अनेक वेळां

उपासना चालवून त्यांनीं आपल्या भगिनींच्या अंतःकरणांत भक्ति व अध्यात्मिक जागृति यांची जाणीव निर्माण केली आहे.

श्री. सौ. **यमुनाबाई हरकिशनलाल**, बी.ए.–हुषार व मनमिळाऊ विद्यार्थिनी असा यांचा शाळेंत लौकिक होता. बोर्डिंगांतील एखादी मुलगी आजारी झाली व तिला जिव्हाळ्याचें कोणी नसलें तर यमुनाबाई त्या मुलीची मनापासून शुश्रूषा करीत. बी.ए. झाल्यावर पंजाबांतील लाला हरकिशनलाल यांच्याशीं त्यांचा विवाह झाला. अशा या प्रेमळ, सुशिक्षित व विद्वान् पत्नीचा लाला हरकिशनलाल यांना फार लवकर वियोग झाला. त्यांच्या प्रेमळ आठवणी काढीत त्यांचे पति व मुलें आज लाहोरमध्यें दिवस क्रमीत आहेत.

डॉ. कुमारी **काशीबाई नवरंगे**, बी.ए., एल्.एम्. अँड एस्.:—मुंबईमध्य पंडिता रमाबाईंनीं स्थापन केलेल्या 'शारदासदनां'तील पहिल्या विद्यार्थिनींत कुमारी काशीबाई होत्या. परंतु त्यांचे वडील श्री. वासुदेव बाबाजी नवरंगे यांनीं त्यांना हुजुरपागेमध्यें शिक्षणासाठीं पाठविलें. त्या वेळीं त्यांचें वय फक्त दहा वर्षांचें होतें. त्यांच्या वडील भगिनी सौ. सीताबाई देवल त्याच शाळेंत शिकत होत्या.

शाळेमध्यें त्या सुस्वभावी व हुषार विद्यार्थिनी म्हणून ओळखल्या जात होत्या. १८९६ सालीं त्या मॅट्रिक झाल्या. मुंबईस प्लेग असल्यामुळें त्या प्रीव्हिअससाठीं फक्त एक टर्म फर्गसन् कॉलेजमध्यें होत्या. प्रो. गो. कृ. गोखले हे त्या वेळीं प्रिन्सिपॉल नव्हते तरी त्यांच्या सुखसोयींकडे लक्ष पुरवीत. बी.ए. पर्यंतचें सर्व शिक्षण विल्सन् कॉलेजमध्यें होऊन इ. स. १९०१ सालीं त्यांनीं बी.ए.ची डिग्री घेतली. दक्षिणी हिंदु स्त्रियांमध्यें बी.ए.ची डिग्री मिळविणाऱ्या या पहिल्याच हिंदु विद्यार्थिनी होत. तसेंच पदार्थविज्ञानशास्त्र व रसायनशास्त्र हे विषय घेऊन बी.ए. झालेल्या त्या पहिल्या हिंदु स्त्री होत. एल्. एम्. अँड एस्. च्या परीक्षेंत इ. स. १९०५ मध्यें उत्तीर्ण झाल्यावर त्यांना अनेक ठिकाणांहून नोकऱ्या सांगून आल्या. परंतु त्यांतील एकहि त्यांनीं पतकरली नाहीं.

वैद्यकीय धंद्याचें काम उत्तम प्रकारें चालवून त्यांनीं जीं अनेक सार्वजनिक कार्यें चालविलीं आहेत तीं पाहून त्यांच्या उद्योगी स्वभावाचें विशेष कौतुक वाटतें. त्यांची पहिली महत्त्वाची कामगिरी म्हणजे त्यांनीं केलेली आर्यमहिला समाजाची पुनर्घटना ही होय. ३० नोव्हेंबर १८८२ रोजीं पंडिता रमाबाईंनीं मुंबई येथील आर्यमहिला समाजाची स्थापना केली. या आर्यमहिला समाजाच्या उन्नतीप्रीत्यर्थ



डॉ. कु. कृष्णाबाई केळवकर, एल्. एस्. अँड एस्.



कै. सौ. यमुनाबाई हरकिशनलाल, बी. ए.

Wagle Press, Bombay, 1



डॉ. कु काशीबाई नवरंगे बी. ए; एल्. एम्. ॲण्ड एस्. जे. पी.



श्री. सौ. काशीबाई हेर्लेकर, बडोदा.

Wagle Press, Bombay, 1

श्री. रमाबाई रानडे, श्री. रमाबाई भाण्डारकर, लेडी लक्ष्मीबाई चंदावरकर यांनीं पुष्कळ परिश्रम केलेले आहेत. डॉ. काशीबाई यांनीं पुष्कळ वर्षें या संस्थेच्या चिटणिसाचें काम केल्यानंतर त्या आर्यमहिला-समाजाच्या अध्यक्ष झाल्या. परंतु कोणी लायक स्त्री चिटणीसाचें कार्य करण्यास हौसेनें पुढें येत नाहीं असें पाहून आर्यमहिला-समाजाचें अध्यक्षपद सोडून त्या पुनः चिटणीस म्हणून काम करूं लागल्या. त्यांची कर्तव्यनिष्ठा खरोखर असामान्य आहे.

मुंबई विश्वविद्यालयामध्यें 'फेलो' म्हणून त्यांची नेमणूक झाली होती. मुंबई म्युनिसिपल स्कूल कमिटीच्या त्या पहिल्याच स्त्री-सभासद असून त्यांनीं तेथें सहा वर्षेपर्यंत अत्यन्त उपयुक्त काम केलें. त्या हल्लीं जे. पी. (Justice of Peace) असून ऑनररी प्रेसिडेन्सि मॅजिस्ट्रेट आहेत. नायगांव सोशल सर्व्हिस सेंटर या संस्थेच्या त्या अध्यक्ष आहेत. या संस्थेतर्फे शिशु-शिक्षणमंदिर (Nursery School), प्रौढ स्त्रीशिक्षणवर्ग, शिवणाचा वर्ग इत्यादि कार्य चाललेलें असून गरीब स्त्रिया व मुलें यांना एका स्त्री डॉक्टरकडून मोफत तपासण्याची व औषधें देण्याची तजवीज केलेली आहे. गरीब लोकांना उपयुक्त शिक्षण देण्याचें कार्य ही संस्था करीत आहे. या संस्थेंत कार्य करणाऱ्या स्त्रिया विद्वान् असून त्या दरिद्रीनारायणाची सेवा उत्साहानें करीत आहेत ही अभिनंदनीय गोष्ट होय.

डॉ. काशीबाई या मुंबई सेवासदनच्या कमिटीच्या सभासद असून मुंबई प्रार्थनासमाजाच्या अध्यक्ष आहेत. Home for Women Students ही संस्था त्यांनीं पुढाकार घेतल्यामुळेंच स्थापन झाली. या संस्थेमुळें मुंबईतील मेडिकल, आर्ट्स् वगैरे कॉलेजमध्यें शिक्षण घेणाऱ्या परगांवच्या विद्यार्थिनींची उत्कृष्ट सोय झाली आहे. हल्लीं ही संस्था दरमहा ६०० रु. भाड्याच्या हवाशीर जागेंत आहे. या संस्थेसाठीं Concert करून त्यांनीं पांच हजार रुपये मिळविले. कोणत्याहि कार्याची उत्कृष्ट रीतीनें व्यवस्थित मांडणी करण्याचा त्यांच्या अंगीं विशेष गुण आहे. त्यांच्या व सौ. सुंदराबाई शिरूर ह्यांच्या परिश्रमांनीं पंढरपूर-अनाथ-बालिका-श्रमाची विलेपार्ले येथें जी शाखा स्थापन करण्यांत आली होती तिच्यासाठीं इमारत उभारली गेली.

त्यांना सन्मानाची बिलकूल हाव नसून समाजकार्य व्हावें ही त्यांची उत्कट इच्छा असते आणि म्हणूनच प्रार्थनासमाजाच्या अध्यक्ष असून समाजातर्फे चाल-लेल्या संस्थेच्या चिटणीस म्हणून त्या काम करीत होत्या. त्यांचें औदार्य अनुपम

आहे. कोणत्याहि प्रकारचा गाजावाजा न करतां त्यांनीं अनेक व्यक्तींस व संस्थांस अमूल्य साहाय्य केलें.

त्यांचा स्वभाव अत्यंत प्रेमळ असून एकदां ज्यास आपलें म्हटलें त्या मनुष्यासाठीं वाटेल ती झीज सोसावयास त्या तयार असतात. त्यांची धर्मनिष्ठा उच्च दर्जाची आहे. इतरांविषयीं सहसा गैरसमज करून न घेण्याची संवय त्यांनीं स्वतःला लावून घेतली आहे. शिक्षणशास्त्र व समाजशास्त्र या विषयांचें मार्मिक अध्ययन त्यांनीं केलें आहे. सामाजिक विषयांसंबंधीं त्यांचे विचार उदार आहेत. नवमतवादावर त्या तुटून पडत नाहींत. परंतु उलटपक्षीं हा नवमतवाद दिवसेंदिवस कां पुढें येत आहे त्याचीं कारणें शोधून तीं नाहींशीं करण्यासासाठीं आपण झटलें पाहिजे असा त्यांचा अभिप्राय आहे. त्या निग्रही, निगर्वी असून समाजकार्याविषयीं त्यांच्या अन्तःकरणांत पराकाष्ठेची कळकळ वसत आहे. बिहारांतील भूकंपामुळें उध्वस्त झालेल्या प्रदेशांतील लोकांस साहाय्य करण्यासाठीं डॉ. जिराड व डॉ. काशीबाई यांनीं एक योजना तयार केली; व त्या योजनेप्रमाणें डॉ. काशीबाई यांच्या नेतृत्वाखालीं मुंबईतील स्त्री-डॉक्टरांचें एक पथक बिहारांतील भूकंपामुळें अनाथ झालेल्या लोकांच्या सेवेस धांवून गेलें. त्या पथकांत डॉ. सावित्रीबाई महाजन व डॉ. वसुंधरा वणीकर या शाळेच्या माजी विद्यार्थिनी होत्या. डॉ. काशीबाई यांनीं बिहारप्रांतीं अतिशय कष्ट सोसून जी कामगिरी केली ती लोकोत्तर होय. मुंबईतील सुप्रसिद्ध डॉक्टर व आदर्श समाजसेविका म्हणून त्यांचें नांव विख्यात आहे.

श्रीमती **काशीबाई हेर्लेकर**:—काशीबाईंचे वडील श्री. देव हे स्त्री-शिक्षणाचे कट्टे पुरस्कर्ते असून त्यांनीं आपल्या पत्नी सगुणाबाई यांना स्वतः शिक्षण दिलें होतें. आपल्या पहिल्या शिक्षकीण म्हणून श्री. रमाबाईसाहेब रानडे सगुणाबाईंचा नेहमीं उल्लेख करीत. श्री. देव यांनीं काशीबाईंच्या शिक्षणासाठीं बडोदें संस्थानांतून त्यांना शिष्यवृत्ति मिळवून दिली व इ. स. १८८५ मध्यें त्यांना मिस् हर्फर्ड यांच्या हाताखालीं शिक्षण घेण्यास हुजुरपागेमध्यें पाठविलें. अभ्यासी वृत्ति, बुद्धिमत्ता व प्रेमळ स्वभाव यांमुळें काशीबाई शाळेंतील सर्व मंडळींना प्रिय असत. मुलीचें शिक्षण पुढें चालविणारा जांवई मिळावा यासाठीं त्यांनीं त्या काळांत लोकमतास न जुमानतां आपल्या मुलीचा विवाह प्रौढपणीं केला. लग्न झाल्यावरहि काशीबाई हुजुरपागेंत शिकत होत्या. परंतु त्यांच्या शिक्षणक्रमांत कौटुंबिक अडचणींमुळें व्यत्यय येऊन इ. स. १८८९ सालीं शिक्षण सोडून यजमानांच्याबरोबर मुंबईत

राहून त्यांनीं संसार थाटला. मुंबईत असतांना स्टूडन्टस् लिटररी अँड सायंटिफिक सोसायटींत मुख्य शिक्षकीण म्हणून त्यांनीं काम केलें. त्या शाळेच्या हल्लींच्या मुख्य अध्यापिका श्री. कमळाबाई वैद्य या काशीबाईच्याच विद्यार्थिनी होत. इ. स. १८९१ मध्यें बडोद्याच्या कन्याशाळा नं. १ या संस्थेवर त्यांची हेड मिस्ट्रेस् म्हणून नेमणूक झाली. इ. स. १८९४ मध्यें अपुरें राहिलेलें शिक्षण पूर्ण करण्याच्या हेतूनें आपल्या लहान कन्येला (शांताबाई हेर्लेकर) बरोबर घेऊन त्या पुनः हुजुरपागेमध्यें आल्या. स्कूल फायनलची परीक्षा शाळेंतून पास झाल्यानंतर पुनः बडोद्यास परत जाऊन त्या नोकरीवर रुजू झाल्या. उत्तम अध्यापिका अशी त्यांची कीर्ति बडोदें संस्थानांत असून त्यांच्या हाताखालीं तयार झालेल्या मुली विद्वान व कर्तबगार होऊन निर-निराळ्या क्षेत्रांत आपलीं कार्यें जबाबदारीनें पार पाडीत असत.

मिस् मेरी भोर या बडोदें संस्थानांत स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेजच्या सुपरिंटेंडेंट व शाळांच्या इन्स्पेक्ट्रेस अशा दुहेरी अधिकारावर असतां त्यांनीं व काशीबाईंनीं लहान मुलांच्यासाठीं बरेंच शैक्षणिक वाङ्मय तयार केलें. वस्तुपाठ, सृष्टिज्ञान यांस उपयोगी अशीं अनेक सुबोध व मनोरंजक गाणीं त्या वेळीं मिस् भोर यांनीं काशीबाईंच्या-कडून लिहवून घेतलीं. त्यांतील कांहीं हल्लीं ‘ संजीवनी ’मध्यें प्रसिद्ध होत आहेत.

काशीबाईंनीं संसार व नोकरी संभाळून चांगल्या प्रकारचें समाजकार्य केलें. त्यांच्या उच्च दर्जाच्या शैक्षणिक कार्याबद्दल बडोद्याचे श्रीमंत सयाजीराव महाराज यांनीं त्यांस ‘ राजरत्न ’ ही बहुमानाची पदवी अर्पण केली. त्यांचीं सामाजिक मतें व विचार त्या काळींसुद्धां फार सुधारलेले होते. परंतु स्वतःला पटलेली गोष्ट आच-रणांत आणावयास त्या केव्हांहि भीत नसत.

काव्य, शास्त्र, विद्वानांचे लेख यांचें नित्य परिशीलन व साहचर्य राखून त्यांनीं स्वतः लेखन व काव्यनिर्मिती थोडीबहुत केली आहे. सामाजिक जीवन-सुधारणा करून स्त्रीजीवनांतील विषमता घालविण्यासाठीं त्यांनीं फार परिश्रम केले व पुष्कळ त्रास सोसला. प्रौढविवाहाचें महत्त्व जाणून त्यांनीं आपल्या दोघी कन्या श्री. सौ. शान्ताबाई कशाळकर व सौ. शालिनीबाई रानडे (गीताबाई) यांना बी.ए.पर्यंत शिक्षण दिलें. या दोघीहि आमच्या हायस्कूलच्या माजी विद्यार्थिनी आहेत. सौ. शान्ताबाई मुंबईतील म्युनिसिपल गर्ल्स् स्कूल्स्च्या इन्स्पेक्ट्रेस् असूनहि बरेंच सामाजिक कार्य करीत असतात. सौ. शालिनीबाई या बरींच वर्षें बडोदें येथील महाराणी गर्ल्स् स्कूलमध्यें अध्यापिकेचें काम चांगल्या प्रकारें करीत होत्या.

काशीबाई यांची धडाडी, निस्पृहता व साधु वृत्ती इतर ठिकाणीं क्वचित् दृष्टीस पडतात. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें हल्लीं त्या आपली ज्येष्ठ कन्या शान्ताबाई यांच्याकडे राहात असून शान्तपणें आपला काळ घालवीत आहेत.

डॉ. जिराड, एम्.डी.:—अप्रतिम बुद्धिमान् विद्यार्थिनी असा मिस् जिराड यांचा लौकिक विद्यार्थिनींत व अध्यापकवर्गांत असे. बुद्धिमत्तेच्या जोडीला त्यांचा स्वभाव गोड असल्यानें शाळेमध्यें त्या विशेष लोकप्रिय असत. इ. स. १९०७ सालीं मॅट्रिकमध्यें उत्तीर्ण होऊन त्यांनीं चॅटफील्ड प्राइझ् व दळवी स्कॉलर्शिप मिळविली. नंतर त्यांनीं वैद्यकीय ज्ञान संपादन करण्यासाठीं मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें प्रवेश केला. इ. स. १९१२ सालीं एल्. एम्. अँड एस्. या परीक्षेंत त्या पहिल्या वर्गांत पहिल्या आल्या व त्यांना स्कॉलर्शिप ऑफ दि मेडिकल वुइमेन् फॉर इंडिया, सर जेम्स् फर्गसन् स्कॉलर्शिप, लेडी रे सिल्व्हर मेडल, कामा गोल्ड मेडल इत्यादि अनेक बक्षिसें, पदकें व शिष्यवृत्त्या मिळाल्या. याप्रमाणें हिंदुस्थानांत अपूर्व यश संपादन केल्यानंतर पुढील अभ्यासाकरितां त्या विलायतेस गेल्या. वैद्यकीय ज्ञानाची उच्च अशी एम्. डी. ही पदवी घेऊन त्या हिंदुस्थानांत परत आल्या. कित्येक वर्षें त्या बंगलोर येथें सर्जनचें काम करीत होत्या. हल्लीं मुंबईच्या कामा हॉस्पिटलवरील मुख्य सर्जनचें काम त्या करीत असून अति प्रख्यात अशा स्त्री डॉक्टरांमध्यें त्यांची गणना होते. मुंबईत त्यांची फारच मोठी प्रॅक्टिस आहे व चोवीस तासांपैकीं फारच थोडे तास त्यांना विश्रांति घेतां येते. त्यांचें अंतःकरण उदार असून कित्येक गरीब रोग्यांना त्या फुकट औषधोपचार करीत असतात. वैद्यकीय धंद्याचें काम उत्कृष्ट तऱ्हेनें करून त्या अनेक सामाजिक कार्येंहि करितात. बिहारमधील लोकांना मदत करण्यासाठीं मुंबईतील स्त्री-डॉक्टरांनीं जावें ही कल्पना मूर्त स्वरूपांत आणण्यासाठीं त्यांनीं फार प्रयत्न केले. त्यांच्या ठिकाणीं पराकाष्ठेचा विनय व साधेपणा आहे. आमच्या या शाळेवर त्यांचें फार प्रेम आहे. गेल्या वर्षीच्या बक्षिस-समारंभप्रसंगीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत त्यांनीं प्रकट केलेले विचार व विद्यार्थिनींना दिलेला बहुमोल संदेश अत्यंत स्फूर्तिदायक आहे. आधुनिक सुशिक्षित स्त्रीचें ध्येय त्यांनीं पुढील शब्दांत व्यक्त केलें आहे:—" Every woman, whether married or single, rich or poor, will need to render service of some kind, whether it be in her own home trying to bring up children of her own, or out in the world helping others to live better lives and realise the joys and beauties of this earthly existence ; service is our watch-word,

particularly of us women, for, we are never so happy as when serving others." वरील शब्दांत व्यक्त केलेलें ध्येय मिस् जिराड यांनीं आचरणांत आणिलें आहे एवढें सांगितलें म्हणजे त्यांच्या योग्यतेची खरी कल्पना येण्यास अडचण पडणार नाहीं. आदर्श विद्यार्थिनी म्हणून त्यांचा कित्ता हुजुरपागेच्या विद्यार्थिनींनीं सतत समोर ठेवणें हें त्यांचें कर्तव्य होय.

श्री. काशीबाई देवधर:—काशीबाई यांजवर लहानपणींच वैधव्याचा दारुण प्रसंग आला. परंतु त्यांच्या वडिलांनीं लोकमतास न जुमानतां त्यांना येथील शारदासदनांत शिक्षणासाठीं ठेविलें. इ. स. १८९३मध्यें शारदासदनानें आपल्या कार्याची दिशा बदलल्यामुळें त्या संस्थेंतील ज्या हिंदु विद्यार्थिनी हुजुरपागेमध्यें दाखल झाल्या त्यांपैकीं काशीबाई या होत. इ. स. १९०४ मध्यें त्या मॅट्रिक झाल्या. परंतु ही परीक्षा उत्तीर्ण होण्यापूर्वीच त्यांनीं आपल्या जीवितकार्यास प्रारंभ केला होता. इ. स. १९०४ मध्यें त्या प्रो. कर्वे यांच्या अनाथबालिकाश्रमाच्या आजन्मसेविका झाल्या. आश्रमाच्या संस्थापनेपासून अनेक संकटांना तोंड देऊन बिलकूल न डगमगतां ह्यांनीं प्रो. कर्वे यांना फार उत्तम साहाय्य केलें. कॉलेजच्या शिक्षणासाठीं त्यांना आश्रमांतून कार्यनिवृत्त व्हावें लागलें तरी दर सुटीमध्यें त्या प्रो. कर्वे यांना मनापासून मदत करीत.

मद्रास विश्वविद्यालयाच्या बी.ए.पर्यंतचें शिक्षण झाल्यावर त्यांनीं आश्रमास पूर्णपणें वाहून घेतलें व आपलें कार्य निरपेक्ष बुद्धीनें विनावेतन अनेक वर्षे केलें. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रान्तांमध्यें हिंडून अनाथ बालिकाश्रमासाठीं वर्गणी जमविण्याचें काम त्यांनीं उत्तम प्रकारें केलें. सुपरिंटेंडेंट असतांना त्यांनीं आश्रमाची बहुमोल सेवा केली व उच्च प्रकारचा स्वार्थत्याग व्यक्त केला. पुण्यांतील एका स्त्री-शिक्षणसंस्थेच्या आद्य कार्यकर्त्या होण्याचा मान आमच्या हुजुरपागेंतील विद्यार्थिनीनें संपादन केला ही गोष्ट आमच्या संस्थेस अभिमानास्पद आहे. इ. स. १९१३ सालीं प्रामाणिक मतभेदामुळें, ज्या आश्रमासाठीं त्यांनीं सर्वस्वत्याग केला होता त्या आश्रमाच्या सेवेला मुकण्याचा त्यांना प्रसंग आला. त्यांच्या राजीनाम्याचा स्वीकार करतांना व्यवस्थापक मंडळास फार वाईट वाटलें. यानंतर त्यांनीं अहिल्याश्रम व चंद्रावती महिला विद्यालय, इन्दूर, या संस्थेच्या प्रिन्सिपॉलचें काम कांहीं वर्षे केलें. बनारस येथील वसंताश्रम व म्हैसूर येथील महाराणी हायस्कूल व त्याला जोडून असलेलीं वसतिगृहें या संस्थांमध्यें अध्यापिकेचें व देखरेखीचें काम केलें.

सेवानिवृत्त होऊन हल्लीं त्या पुण्यांतच आपला काळ घालवीत आहेत. पूर्वी त्या सामाजिक विषयावर भाषणें करीत व मासिकांतून गोष्टी व लेख लिहीत असत.

श्री. **वेणूबाई नामजोशी** (हल्लींच्या सौ. जानकीबाई साठे):--याहि काशीबाईच्याप्रमाणें हुजुरपागेंतून मॅट्रिक झाल्यानंतर अनाथ-बालिकाश्रमाच्या आजन्म सेविका झाल्या. कै. प्रि. आगरकर यांनींच त्यांना प्रथम शारदा-सदनांत ठेवून त्यांचें शिक्षण सुरू केलें.

काशीबाईच्यानंतर दोन वर्षे त्यांनीं अनाथ बालिकाश्रमाच्या लेडी सुपरिंटेंडेंटचें काम जबाबदारीनें पार पाडलें. वरींच वर्षे काम करून त्यांनीं आश्रमाच्या उन्नतींत चांगली भर टाकली. प्रो. कर्वे यांच्या साहाय्यास ज्या सुशिक्षित स्त्रिया प्रारंभीं धांवून गेल्या त्यांमध्यें हुजुरपागेच्याच दोन्ही विद्यार्थिनी होत्या ही एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. हुजुरपागेच्या माजी विद्यार्थिनी श्री. **दुर्गाताई किर्लोस्कर** यांनींहि आश्रमाच्या आजीवसेविका म्हणून आश्रमांत वीस पंचवीस वर्षे काम केलें आहे.

डॉ. **सुंदराबाई कीर्तने**, एल्.एम्. अँड एस्.:--दुर्दैवानें अकालीं वैधव्य प्राप्त झाल्यानंतर घरांतील सुशिक्षित मंडळींच्या प्रोत्साहनानें वयाच्या १६-१७ व्या वर्षी सुंदराबाई यांनीं हुजुरपागेमध्यें शिक्षण सुरू केलें. त्यांच्या धाकट्या जाऊबाईहि त्यांच्याबरोबर शाळेंत जाऊं लागल्या. त्यांचें घराणें जुन्या पद्धतीचें असल्यानें ह्या दोघी शाळेंत शिकूं लागल्या ही बातमी ऐकतांच त्यांचे आप्त, इष्ट मित्र वगैरे सर्व मंडळी सखेदाश्चर्यानें चकित झाली. एवढेंच नव्हे तर परगांवाहून पुण्यास येऊन त्यांनीं त्या दोघींचें शिक्षण बंद करण्याची प्रतिज्ञा केली. परंतु सुदैवानें त्यांची प्रतिज्ञा खोटी ठरून सुंदराबाई मॅट्रिक होऊन पुढें वैद्यकीय शास्त्राचा अभ्यास करण्यासाठीं मुंबईच्या मेडिकल् कॉलेजमध्यें जाऊं लागल्या. एल्. एम्. अँड एस्. ची वैद्यकीय पदवी संपादन केल्यावर त्या पुणें येथें स्वतंत्र प्रॅक्टिस करूं लागल्या. पुण्यांतील जुन्या, अनुभवी स्त्री-डॉक्टरांमध्यें त्यांची गणना होते. डॉक्टरीचा धंदा करून अनेक सामाजिक गोष्टींत त्या लक्ष घालतात. पुण्यांतील बहुतेक स्त्री-शिक्षणसंस्थांशीं त्यांचा निकट संबंध आहे. 'माजी विद्यार्थिनी' संघास प्रारंभापासून त्यांचें साहाय्य मिळालें आहे. हुजुरपागेमध्यें त्या कांहीं वर्षें 'First Aid' हा विषय मॅट्रिकच्या विद्यार्थिनींना शिकवीत असत. हुजुरपागेबद्दल त्यांना फार प्रेम असून शाळेसंबंधीं कोणतेंहि कार्य करावयास त्या नेहमीं तयार असतात. मिस् हर्फर्ड

यांच्यासंबंधीं पुढील सुंदर आठवण त्यांनीं दिली आहे: "आपली विद्यार्थिनी म्हटली म्हणजे मिस् हर्फर्ड यांच्यापाशीं श्रीमंत, गरीब, उच्च-नीच, जातगोत हा कसलाच भेद नसे. एकदां एक मराठ्याची बाई आपल्या काजळानें माखलेल्या तान्ह्या मुलाला घेऊन शाळेंत आली असतां 'Oh ! my grand-child, my grand-child' असें म्हणून त्या तान्हुल्याला पोटाशीं धरून त्यांनीं त्याचें अनेकवार चुंबन घेतलें. त्या मुलाच्या काजळानें त्यांचें तोंड काळें झालें व वर्गांत हंशा पिकला !" असो.

श्री. **आवडीबाई भिडे**:—रा. ब. विष्णु मोरेश्वर भिडे यांच्या या कन्या असून शाळेच्या पहिल्या विद्यार्थिनी होत. हुषार, सद्गुणी व बुद्धिमान् विद्यार्थिनी म्हणून त्या सर्वांना फार प्रिय असत. यांचें शिक्षण मॅट्रिकपर्यंत झालें व त्याच आमच्या शाळेच्या पहिल्या मॅट्रिक झाल्या असत्या; परंतु दुर्दैवानें त्यांना क्षयाची भावना होऊन आपलीं मातापितरें, अध्यापक वर्ग व मैत्रिणी यांस दुःखांत लोटून त्या अकालीं कालवश झाल्या. कै. गणेश जनार्दन आगाशे यांनीं 'सद्गुणमंजिरी' या नांवाचें त्यांच्या गुणवर्णनपर चरित्र लिहिलें आहे.

श्री. **रमाबाई भिडे**:—मुलीबरोबर रा. ब. भिडे यांनीं आपल्या सूनबाई श्री. रमाबाई यांनाहि हुजुरपागेमध्यें शिकावयास पाठविलें. श्री. रमाबाईचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण याच शाळेंत झालें. यांचा स्वभाव विनोदी व हौशी असे. त्यांच्या कन्या सौ. चंपूबाई साठये व श्री. कमलाबाई राजवाडे या दोघीहि या शाळेंतून मॅट्रिक होऊन गेल्या. श्री. कमलाबाई यांनीं चॅट्फील्ड प्राइझ व दळवी शिष्यवृत्ति मिळविली. हल्लीं त्या मुंबईच्या मेडिकल् कॉलेजांत शिक्षण घेत आहेत. श्री. रमाबाईच्या नातीहि हल्लीं शाळेंत शिक्षण घेत आहेत.


सौ. **सीताबाई परांजपे**:—सौ. सीताबाई या सुप्रसिद्ध डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या पुतणी होत. त्यांच्या आई श्री. यमुनाबाई जोशी या आपल्या कन्येसह हुजुरपागेमध्यें आल्या. इंग्रजी सहावीपर्यंत शिक्षण झाल्यानंतर श्री. यमुनाबाईंनीं नार्सिंगचा कोर्स घेतला. सईताई (सौ. सीताबाई) या बुद्धिमान्, खेळकर व सुस्वभावी विद्यार्थिनी म्हणून प्रसिद्ध होत्या. मॅट्रिकच्या परीक्षेमध्यें त्यांनीं दळवी शिष्यवृत्ति मिळविली. पुढें फर्गसन् कॉलेजमध्यें त्या शिकत असतां प्रिन्सिपॉल रँ. रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांच्याशीं त्यांचा विवाह झाला. विवाहानंतरहि त्यांनीं शिक्षण सुरू ठेविलें होतें. परंतु प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें बी. ए. च्या वर्गांत असतां त्यांना शिक्षण सोडावें लागलें. त्यांचा स्वभाव फार प्रेमळ व सरळ असून त्यांना काव्य-

गायनादि कलांची विशेष आवड असे. पुण्यांतील सर्व स्त्रीशिक्षणसंस्थांशीं त्यांचा संबंध होता. सेवासदनांत कित्येक वर्षे प्रौढ स्त्रियांना त्या इंग्लिश शिकवीत असत. आपल्या जुन्या शाळेवर त्यांचें फार प्रेम होतें. रौप्यमहोत्सवप्रसंगीं त्यांनीं बरीच वर्गणी जमा केली होती. समाजकार्याची त्यांना हौस होती. परंतु प्रकृतीच्या आधीन झाल्यामुळें त्यांच्या आवडीच्या गोष्टी त्यांना करतां आल्या नाहींत. डॉ. परांजपे इंडिया कौन्सिलचे सभासद असतां त्या त्यांच्याबरोबर विलायतेस गेल्या होत्या व तेथेंच न्युमोनियानें दोन वर्षांपूर्वी त्यांचा अंत झाला. त्यांची कन्या **शकुंतला** ही सुस्वभावी व बुद्धिमान विद्यार्थिनी म्हणून प्रसिद्ध असून मॅट्रिकच्या परीक्षेमध्यें पुण्यांतील विद्यार्थिनींमध्यें पहिला नंबर मिळविल्याबद्दल तिला मिस् मॅनिंग प्राइज् व मिसेस् कर्केहम् प्राइज् अशीं दोन बक्षिसें देण्यांत आलीं. बी.एस्सी. मध्यें तिनें पहिला वर्ग मिळविला. पुढें विलायतेला जाऊन ती केंब्रिज विश्वविद्यालयाची बी.ए. झाली व हल्लीं लीग् ऑफ् नेशन्स्च्या सेक्रेटेरिएटमध्यें जिनीव्हा येथें काम करीत आहे.

सौ. स्नेहलताबाई पगार (कु. राधाबाई पवार):—या हुजुरपागेंतून मॅट्रिक झाल्यानंतर अमेरिकेस गेल्या. या अमेरिकेंतील विश्वविद्यालयाच्या एम्.ए.,बी.एस्सी. असून बडोदें येथील ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन् या संस्थेच्या प्रिन्सिपॉल आहेत. बडोद्या म्युनिसिपॅलिटीच्या त्या सभासद असून बडोदें संस्थानांत उत्तम प्रकारचें शिक्षणकार्य करीत आहेत.

ताईबाई तुळसकर:—याहि अमेरिकेच्या एम्.ए. असून मुंबईमध्यें बरीच वर्षे समाजकार्य करीत असत. मुंबई येथील राष्ट्रीय कन्याशाळेच्या त्या कांहीं काळ लेडी सुपरिंटेंडेंट असून कॉलेजांतील विद्यार्थिनींची सोय व्हावी म्हणून त्यांनीं कांहीं वर्षे एक होस्टेलही चालविलें होतें.

श्री. आनंदीबाई प्रभुदेसाई:—श्री. काशीबाई हेर्लेकर यांच्या या धाकट्या भगिनी होत. मॅट्रिक होण्यापूर्वी त्यांचा विवाह श्री. प्रभुदेसाई यांच्याशीं झाला. मुलें मोठीं झाल्यानंतर आपल्या बुद्धीला उजळा देण्याच्या हेतूनें त्यांनीं चांगल्या ग्रंथांचें वाचन सुरू केलें व बौद्धिक उद्योगाची आवश्यकता वाटूं लागल्यानें बडोद्याच्या सेंट्रल लायब्ररीमध्यें काम पत्करलें. कर्तबगार मंडळींच्या साहचर्यानें यांच्या अंगची कर्तव्यदक्षता उत्तेजित होऊन बालवाङ्मयाकडे त्यांनीं विशेष लक्ष घातलें. सेंट्रल लायब्ररीच्या शिशुशाखेवरील ह्या मुख्य अधिकारी असून लहान मुलांना रोज लायब्ररींत येण्याची त्यांनीं चटक लाविली आहे. लहान मुलांना संभाषणें, खेळ व



कै. सौ. सीताबाई परांजपे



प्रि. सौ. स्नेहलताबाई पगार, एस्. ए. (अमेरिका)

Wagle Press, Bombay, 1



कु. द्वारकाबाई भट, बी. ए., बी. टी., टी. डी.



कु. मैनाबाई शहाणे, एम्. ए. (कोलंबिया), बी. एस्. (मिशिगन्)

Wagle Press, Bombay, 1

पुस्तकें यांच्या द्वारें त्या हंसत खेळत शिक्षण देतात. मासिकांतून अलीकडे त्या स्फुट गोष्टी लिहीत असतात. त्यांचा स्वभाव विनोदी, उत्साही व मनमिळाऊ असल्यानें तरुण मुली व लहान मुलें लायब्ररींत जाऊन त्यांना भेटण्याची संधि वारंवार घेत असतात.

श्री. **तान्हीबाई जाधव** (वणवे):—या हुजुरपागेच्या अत्यंत जुन्या विद्यार्थिनींपैकीं असून स्वभावानें प्रेमळ असत. पुण्यास वणवे यांचा छापखाना यांच्या देखरेखीखालीं बरींच वर्षें चालला होता. या मागासलेल्या वर्गापैकीं असूनहि मोठ्या कर्तबगार होत्या.

श्री. **गुलाबबाई जव्हेरे**:—बडोद्याची स्कॉलरशिप घेऊन यांनीं आपलें शिक्षण पुरें केलें. आज कित्येक वर्षें त्या बडोद्यास महाराणी गर्ल्स् स्कूलमध्यें अध्यापिका म्हणून काम करीत आहेत. बडोद्यांतील स्त्रीवर्गांत जागृति उत्पन्न करीत राहणें, Domestic Science चे पाठ देण्यासाठीं एक प्रयोगशाळा चालविणें आणि क्लबातर्फें स्त्रियांची सेवा करणें हीं त्यांचीं कामें जोरांत च[illegible] आहेत.

गेल्या १५ वर्षांमध्यें हुजुरपागेंतील विद्यार्थिनींनीं शिक्षण, वाङ्मय, राजकारण, समाज इत्यादि क्षेत्रांत बहुमोल कार्य केलें आहे. विलायतेमध्यें जाऊन मिस् एलिझबेथ शॅलोम, बी.ए.,बी.टी., मिसेस् झुबेदा सय्यद, एम्.ए., मिस् हॅना शिंदे, एम्.ए., कु. द्वारकाबाई भट, बी.ए., बी.टी., यांनीं टीचर्स डिप्लोमा मिळविला आहे. मिस् शॅलोम या धारवाड येथील स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेजच्या लेडी सुपरिंटेंडेंट असून मिसेस् सय्यद या पुणें येथील उर्दू ट्रेनिंग कॉलेज व उर्दू गर्ल्स् हायस्कूल या संस्थांच्या ले. सुपरिंटेंडेंट आहेत. त्या पुण्यांतील अनेक सामाजिक व शैक्षणिक चळवळींमध्यें प्रामुख्यानें भाग घेतात. मिस् शिंदे ट्रेनिंग कॉलेजच्या प्रॅक्टिसिंग् स्कूलमध्यें महत्वाचें शैक्षणिक कार्य करीत आहेत. कु. द्वारकाबाई या कांहीं वर्षें सेवासदनांतील ट्रेनिंग कॉलेजच्या प्रमुख होत्या. पुण्याच्या ' वुइमेन्स् कौन्सिल 'च्या चिटणीस म्हणून हल्लीं त्या काम करीत आहेत. माजी विद्यार्थिनींपैकीं सौ. गंगूबाई पटवर्धन यांनीं विलायतेला जाऊन मॉटेसरी शिक्षणपद्धतीचा अभ्यास केला आहे. त्या सध्यां बडोद्यास महाराणी गर्ल्स् स्कूलमध्यें अध्यापिकेचें काम करीत आहेत. कांहीं वर्षें त्यांनीं हिंगणें येथील महिला विद्यालयांत अध्यापनाचें काम केलें.

सौ. वेणूबाई मोडक, एम्.ए.,एस्.टी.सी.:—या नगर येथील ए. व्ही. गर्ल्स् स्कूलच्या हेड मिस्ट्रेस् असून कवयित्री म्हणून प्रसिद्ध आहेत. कै. पुतळाबाई पवार

या त्यांच्या सहाध्यायी असून नाशिक येथील ए. व्ही. गर्ल्स् स्कूलच्या हेड मिस्ट्रेस् होत्या.

डॉ. कमलाबाई देशपांडे:—प्रो. कर्वे यांच्या अनाथबालिकाश्रमाच्या आजन्म-सेविका आहेत. सुमारें सात वर्षें त्यांनीं सातारा येथील कन्याशाळा बिलकूल पगार न घेतां उत्तम प्रकारें चालविली. इ. स. १९२९ मध्यें त्या विलायतेला गेल्या. इ. स. १९३१ सालीं प्राग येथील जर्मन विश्वविद्यालयाची पीएच्. डी. डिग्री घेतली. त्या डिग्रीसाठीं "The Child in Ancient India" हा प्रबंध त्यांनीं लिहिला. एक वर्षभर श्री. नाथीबाई ठाकरसी महिला पाठशाळेंत संस्कृत विषयाच्या प्रोफेसरचें काम केल्यानंतर इ. स. १९३२ मध्यें त्याच संस्थेच्या प्रिन्सिपॉल म्हणून त्यांची नेमणूक झाली. विदर्भमहिला परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान त्यांना एकदां मिळाला होता. पुण्याच्या वुइमेन्स् कौन्सिलच्या अध्यक्ष म्हणून त्या काम करीत आहेत. त्या कवयित्री असून 'द्विदल' नांवाचा त्यांच्या व त्यांच्या बंधूंचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. समाजकार्याविषयीं त्यांना विशेष कळकळ आहे.

डॉ. सौ. इरावतीबाई करमरकर:—बुद्धिमान व कर्तबगार विद्यार्थिनी असा त्यांचा शाळेंत लौकिक असे. इ. स. १९२२ सालीं त्या मॅट्रिकमध्यें उत्तीर्ण होऊन त्यांना दळवी स्कॉलर्शिप मिळाली. 'चित्पावन कोंकणस्थ ब्राह्मण' या विषयावर समाजशास्त्रविषयक प्रबंध लिहून त्या इ. स. १९२६ मध्यें एम्.ए. झाल्या. इ. स. १९२६ मध्यें फर्गसन् कॉलेजांतील प्रोफेसर डॉ. दिनकर धोंडो कर्वे यांच्याशीं त्यांचा विवाह झाला. पुढें चार वर्षांनीं जर्मनीस जाऊन त्यांनीं मानववंश-शास्त्र, संस्कृत, तत्त्वज्ञान व प्राणिशास्त्र इत्यादि विषयांचा मार्मिक अभ्यास केला. संशोधनात्मक प्रबंध लिहून त्यांनीं बर्लिनची पीएच्.डी. पदवी मिळविली. हल्लीं त्या अनाथबालिकाश्रमाच्या आजन्म-सेविका असून श्री. नाथीबाई दा. ठाकरसी महिला विद्यापीठाच्या रजिस्ट्रार आहेत. प्रो. कर्वे यांनीं स्थापन केलेल्या महिला विद्यापीठाला आमच्या हुजुरपागेनें दोन प्रमुख कार्यकर्त्या विदुषी स्त्रिया दिल्या याबद्दल आम्हांस अभिमान वाटतो.

सौ. सुलोचनाबाई हुदलीकर, बी.ए.:—इ. स. १९११ सालीं या हुजुरपागेंतून मॅट्रिक झाल्या. त्यांचें पुढील शिक्षण डायोसीसन कॉलेज, कलकत्ता, येथें झालें. प्रो. सत्यबोध बा. हुदलीकर यांच्याशीं १९१६ सालीं त्यांचा विवाह झाला.

प्रोफेसर हुदलीकरांनीं इ. स. १९२७ मध्यें पुण्यांत 'बालकमंदिरा'ची स्थापना सौ. सुलोचनाबाई यांच्या सहकार्यानेंच केली.

कु. **मैनाबाई शहाणे**:––या हुजुरपागेंतून इ. स. १९१९ सालीं मॅट्रिक झाल्या. कांहीं वर्षे दिल्ली येथील लेडी हार्डिंग कॉलेजमध्यें घालविल्यावर वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठीं त्या अमेरिकेस गेल्या. तेथें सुमारें सात वर्षे राहून व कोलंबिया युनिव्हर्सिटीची एम्.ए. पदवी घेऊन त्या दोन तीन वर्षांपूर्वी हिंदुस्थानास परत आल्या. शैक्षणिक कार्य करण्याचा त्यांचा विचार असल्याचें समजतें.

प्रो. धर्मानंद कोसंबी यांच्या कन्या **माणिकबाई** या इ. स. १९१८ सालीं हुजुरपागेंतून मॅट्रिक झाल्या व एक वर्ष फर्गसन्मध्यें राहून वडिलांच्याबरोबर अमेरिकेस गेल्या. त्या हार्वर्ड विश्वविद्यालयाच्या पदवीधर असून कांहीं वर्षे त्यांनीं इंदूर येथील अहल्याश्रमांत अध्यापिकेचें काम केलें. पुढें त्यांचा विवाह झाल्यामुळें त्यांनीं तें काम सोडलें. हल्लीं त्या बंगलोर येथें असतात.

डॉ. सौ. **सीताबाई परमानंद** (आजगांवकर):—यांचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण हुजुरपागेंतच झालें. रत्नागिरी हायस्कूलमधून त्या इ. स. १९१८ मध्यें मॅट्रिक होऊन त्यांना संस्कृतची जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति मिळाली. ही शिष्यवृत्ति मिळविणाऱ्या या पहिल्याच विद्यार्थिनी होत. एल्फिन्स्टन् कॉलेजमधून इ. स. १९२३ त बी. ए. झाल्यानंतर विलायतेस जाऊन त्यांनीं इ. स. १९२५ मध्यें ऑक्स्फर्ड विश्वविद्यालयाची बी. लिट्. ही पदवी 'The Position of Women in Ancient India as Represented by the Dharma Shastras' हा प्रबंध लिहून मिळविली. इ. स. १९२६ मध्यें ऑक्सफर्डची डि. फिल्. (डॉक्टर ऑफ फिलॉसफी) ही पदवी त्यांनीं मिळविली. ही पदवी संपादन करणाऱ्या या पहिल्याच स्त्री बॅरिस्टर आहेत. इ. स. १९२७ मध्यें मिस्टर परमानंद, आय्. सी. एस्., यांच्याशीं त्यांचा विवाह झाला. इ. स. १९२८ सालच्या विदर्भ महिला परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान त्यांना देण्यांत आला होता. नागपूर विश्वविद्यालयाच्या फॅकल्टी ऑफ् आर्ट्स् या मंडळाच्या त्या सभासद आहेत. यवतमाळ येथें मुलींचें हायस्कूल स्थापन करण्याच्या बाबतींत त्यांनीं पुढाकार घेतला होता. मध्यप्रांत व वऱ्हाड येथील कार्यकर्त्या स्त्रियांत त्यांची गणना होते.

सौ. **अनसुयाबाई काळे**:––यांचें शिक्षण बडोदें व पुणें येथें झालें. इ. स. १९१३ सालीं हुजुरपागेमधून मॅट्रिक होऊन त्यांनीं फर्गसन् कॉलेजमध्यें प्रवेश केला.

इ. स. १९१६ सालीं त्यांचा विवाह झाला. सर्व्हंट्स् ऑफ् इंडिया सोसायटीचे रा. ठक्कर यांचे देखरेखीखालीं जमशेटपूर येथें त्यांनीं शिकविण्याचें काम केलें. इ. स. १९२४ सालीं नागपूर प्रांतिक महिला परिषदेचें काम स्वीकारून त्यांनीं सार्वजनिक कार्यास सुरुवात केली. इ. स. १९२७ मध्यें सरकारनें त्यांना कायदे कौन्सिलांत सभासद नेमिलें. कांहीं काळ त्यांनीं कैद्यांना शिकविण्याचें काम केलें. सरकारनें त्यांना ऑनररी मॅजिस्ट्रेटचे अधिकार दिले होते. कांहीं वर्षांपूर्वी मध्यप्रांतातर्फे त्यांची लेबर कमिशनवर असिस्टंट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यांत आली. कायदे-कौन्सिलमध्यें उत्कृष्ट वक्त्या म्हणून त्यांची चांगली छाप बसली. पुढें कौन्सिलच्या सभासदत्वाचा राजीनामा देऊन त्या काँग्रेसच्या प्रचारक झाल्या. इ. स. १९३० मध्यें प्रांतिक काँग्रेसच्या अध्यक्ष असतां कौन्सिल-पिकेटिंग केल्याबद्दल त्यांना अटक झाली. हल्लीं त्या काँग्रेसचें काम व ऑल-इंडिया वुइमेन्स् कॉन्फरन्ससंबंधीं प्रान्तिक कामें करीत असतात. त्यांच्या भगिनी श्री. सौ. यमुनाबाई हिर्लेकर (भाटे) या इ. स. १९१८ मध्यें हुजुरपागेंतून मॅट्रिक झाल्या. सेंट झेविअरमधून बी. ए. झाल्यावर प्रिन्सिपॉल शहा यांच्या हाताखालीं एम्.ए.साठीं गणित विषयाचा अभ्यास करण्यासाठीं त्या न्यू पूना कॉलेजमध्यें (हल्लींचें सर परशुरामभाऊ कॉलेज) आल्या. एम्. ए. झाल्यावर त्यांनीं एक दोन वर्षे हुजुरपागेंत अध्यापिकेचें काम केलें. मॅट्रिक परीक्षेच्या गणित विषयाच्या परीक्षकाचेंहि त्यांनीं काम केलें आहे. उच्च अभ्यासासाठीं त्या विलायतेस गेल्या होत्या. विलायतेहून आल्यावर त्यांचा विवाह झाला. शैक्षणिक चळवळींत त्या नेहमीं भाग घेत असतात.

कु. सुलभाबाई पाणंदीकर, एम्.ए., एम्. लिट्.:—हुजुरपागेंतील अप्रतिम बुद्धिमान् विद्यार्थिनी असा त्यांचा लौकिक आहे. गणित विषयांत त्या शेंकडा १०० गुण मिळवीत असें त्यांचे शिक्षक सांगतात. इ. स. १९२१ मध्यें मॅट्रिक परीक्षेंत उत्तीर्ण होऊन त्यांनीं संस्कृतची 'जगन्नाथ शंकरशेट' शिष्यवृत्ति, चॅटफील्ड प्राइझ इत्यादि बक्षिसें व दुसरा नंबर मिळविला. इंटरच्या परीक्षेंत 'गंगाबाई भट' शिष्यवृत्ति व एम्. ए. मध्यें 'मानकर' शिष्यवृत्त्या व पदकें त्यांनीं संपादन केलीं. इंग्लिश व संस्कृत या भाषांवर त्यांचें प्रभुत्व आहे. उच्च शिक्षणासाठीं इंग्लंडला जाऊन त्यांनीं एम्. लिट्. ही पदवीहि मिळविली आहे. त्या सध्यां मुंबईच्या सेकंडरी ट्रेनिंग कॉलेजमध्यें प्रोफेसरचें काम करीत आहेत. गेल्या महिन्यांत पुणें येथें भरलेल्या शिक्षण-सप्ताहांत त्यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता.



कु. लिला भट, बि. ए. (मुंबई), बि. ए. (केंब्रिज)



सौ. यमुनाबाई हिर्लेकर एम्. ए.



सौ. अनसूयाबाई काळे, नागपूर

Wagle Press, Bombay, 1



प्रि. सौ. कमलाबाई टिळक, एम्. ए.
(लेडीज् कॉलेज, बनारस)

प्रि. सौ. **कमलाबाई टिळक**, एम्. ए. :—शाळेमध्यें यांनीं पहिला नंबर केव्हांहि सोडला नाहीं. इ. स. १९२४ मध्यें मॅट्रिकच्या परीक्षेंत दुसरी जगन्नाथ शंकरशेट संस्कृत शिष्यवृत्ति, दळवी शिष्यवृत्ति व चॅटफील्ड प्राइझ्, इंटरमीजिएट-मध्यें पहिला वर्ग व लालकाका आणि गंगाबाई भट या दोन शिष्यवृत्त्या व एम्.ए.मध्यें पहिला वर्ग व मानकर शिष्यवृत्ति इत्यादि बक्षिसें व शिष्यवृत्त्या सौ. कमलाबाईंनीं मिळविल्या. यावरून त्यांच्या तैलबुद्धीची जितकी प्रशंसा करावी तेवढी थोडीच होईल. कांहीं काळ हुजुरपागेमध्यें अध्यापिकेचें काम केल्यानंतर इ. स. १९२९ मध्यें त्यांचा विवाह झाला. त्याच वर्षी बनारस हिंदु विश्वविद्यालयाच्या 'वुइमेन्स् कॉलेज'मध्यें अध्यापिका म्हणून त्यांची नेमणूक झाली. इ. स. १९३२ मध्यें त्याच कॉलेजच्या प्रिन्सिपॉलची बहुमानाची जागा त्यांना मिळाली. हें शैक्षणिक कार्य करून सौ. कमलाबाई या मराठी वाङ्मयामध्यें उत्कृष्ट भर घालीत आहेत. 'हृदयशारदा' हा त्यांचा कथासंग्रह वाङ्मयसेवकांच्या आदरास पात्र झाला आहे. निरनिराळ्या मराठी नियतकालिकांतून त्यांच्या गोष्टी प्रसिद्ध होत असतात. उत्कृष्ट लघुकथालेखिका अशी त्यांची कीर्ति आहे.

दुसऱ्या नामांकित लेखिका म्हणजे सौ. **शान्ताबाई नाशिककर** (भिडे), बी.ए., या होत. 'कौमुदी', 'हाच का धर्म?' 'लग्नाचा बाजार' इत्यादि कादंबऱ्या त्यांनीं लिहिल्या असून मराठी मासिकांत त्यांच्या अनेक लघुकथा प्रसिद्ध झाल्या आहेत. कादंबरीकार या दृष्टीनें त्यांनीं चांगला लौकिक मिळविला आहे.

सौ. **कमलाबाई बंबेवाले**, बी.ए., याहि चांगल्या प्रकारचें लेखनकार्य करीत आहेत. घटस्फोट या विषयावरील त्यांच्या 'बंधमुक्ता' कादंबरीनें महाराष्ट्रांत बरीच खळबळ उडवून दिली होती. स्त्री, मनोरमा इत्यादि मासिकांतून त्यांच्या लघुकथा प्रसिद्ध होत असतात.

श्री. **मुक्ताबाई लेले**, बी.ए., बी.टी., या बडोद्याच्या महाराणी गर्ल्स् स्कूलमध्यें अध्यापिका आहेत. रत्नाकर, पारिजात इत्यादि मासिकांत त्या नेहमीं लघुकथा लिहीत असतात. 'मानस-लहरी' हा त्यांचा लघुकथासंग्रह उच्च दर्जाचा आहे. मानस-शास्त्रीय दृष्ट्या स्वभावरेखन करण्याची त्यांची शैली सुंदर आहे. सध्यां त्या कादंबरी-वाङ्मयावर ग्रंथ लिहीत आहेत.

सौ. **इन्दिराबाई सहस्रबुद्धे**, बी.ए., यांनीं ग्रँट ॲलनच्या एका कादंबरीच्या आधारें 'केवळ ध्येयासाठीं' ही सामाजिक क्षेत्रांत क्रान्ति उत्पन्न करणारी

कादंबरी लिहिली. 'बाळूताई धडा घे' ही त्यांची दुसरी कादंबरीहि नवमत-दर्शक आहे.

श्रीमती **लक्ष्मीबाई प्रधान** या इ. स. १९१३ मध्यें हुजुरपागेमध्यें मॅट्रिक झाल्या. त्यानंतर कांहीं वर्षें त्यांनीं दक्षिण हैद्राबाद येथें तेथील महाराष्ट्रीय स्त्रियांत जागृति उत्पन्न करण्याचें कार्य केलें. पुढें पुण्यास येऊन त्यांनीं आचार्य विष्णुशास्त्री बापट यांना एकनाथी भागवत वगैरे ग्रंथांवर टीका लिहिण्याचे कामीं साहाय्य केलें. हल्लीं त्या 'आनंद' मासिकाच्या सहसंपादिका असून 'माजघरांतील चर्चा', 'झांशीची राणी लक्ष्मीबाईचें चरित्र' 'आचार्य विष्णुशास्त्री बापट यांचें चरित्र' इत्यादि पुस्तकें त्यांनीं लिहिलीं आहेत. नियतकालिकांमध्यें त्या नेहमीं विचारप्रवर्तक गोष्टी व लेख लिहीत असतात.

सौ. **विमलाबाई देशपांडे** (कोल्हटकर), एम्.ए., या इ. स. १९१९सालीं मॅटिक होऊन त्यांनीं चॅट्फील्ड प्राइझ् व दळवी शिष्यवृत्ति मिळविली. इंटरमीजिएट-मध्यें त्यांनीं गंगाबाई भट शिष्यवृत्ति व बी.ए.मध्यें तत्त्वज्ञानाची प्रल्हाद सीताराम पटवर्धन शिष्यवृत्ति मिळविली. इ. स. १९२५ मध्यें त्या एम्.ए. झाल्या. त्याच वर्षीं प्रसिद्ध कादंबरीकार श्री. पु. य. देशपांडे यांच्याशीं त्यांचा विवाह झाला. या पतिपत्नींनीं मिळून 'निर्माल्य-माला' नांवाचा एक कवितासंग्रह नुकताच प्रसिद्ध केला आहे. नागपूर विश्वविद्यालयाच्या सिनेटच्या त्या सभासद आहेत.

कु. **यमुनाबाई केळकर**, बी.ए., या औरंगाबाद येथील मुलींच्या हायस्कूलच्या सुपरिंटेंडेंट असून सध्यां कोल्हापूर येथील ट्रेनिंग कॉलेजांत बी.टी.चा अभ्यास करीत आहेत. मनोरंजनांतून त्यांनीं बऱ्याच लघुकथा प्रसिद्ध केल्या आहेत.

डॉ. कु. **सुलोचनाबाई श्रीखंडे** या इ. स. १९२६ मध्यें एम्.बी.बी.एस्. झाल्या. वैद्यकीय अभ्यासासाठीं त्या विलायतेस गेल्या होत्या. मँचेस्टर विश्वविद्यालयाचा बॅक्टिरिऑलजी या विषयाचा डिप्लोमा घेऊन परत आल्यानंतर दिल्ली येथील लेडी हार्डिंज मेडिकल कॉलेजमध्यें प्रोफेसर म्हणून त्यांची नेमणूक झाली.

डॉ. **शान्ताबाई सातवळेकर** इ. स. १९२० मध्यें मॅट्रिक होऊन फर्गसन् कॉलेजांतून इन्टर सायन्स झाल्या. पुढें लेडी हार्डिंज कॉलेजांतून एम्.बी.बी.एस्. झाल्यावर दक्षिण हैद्राबादेंत लेडी डॉक्टर म्हणून तेथील सरकारी हॉस्पिटलमध्यें त्यांनीं काम केलें. स्त्रिया व मुलें यांच्या रोगांसंबंधीं जास्त अभ्यास करण्याच्या हेतूनें दोन महिन्यांपूर्वीं त्या विलायतेला गेल्या आहेत.



डॉ. कु. सुलोचनाबाई श्रीखंडे, एम्. बी. बी. एस्. (मुंबई)
बी. डी. (मँचेस्टर); प्रोफेसर, लेडी हार्डिंग मेडिकल कॉलेज



कु. सुलभाबाई पाणंदीकर, एम्. ए. (मुंबई) एम्. लिट्
प्रोफेसर, सेकंडरी ट्रेनिंग कॉलेज (मुंबई)

Wagle Press, Bombay, 1

श्री. सौ. **कुसुमावतीबाई देशपांडे** (कु. जयवंत), बी.ए., या हुजुरपागेंतून
इ. स. १९२१ सालीं मॅट्रिक झाल्यानंतर त्यांनीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें प्रवेश केला.
हुषार विद्यार्थिनी असा त्यांचा शाळेंत व कॉलेजांत लौकिक होता. इ. स. १९२६
मध्यें नागपूर विश्वविद्यालयाच्या बी.ए.च्या परीक्षेंत त्यांनीं पहिला वर्ग मिळविला.
उच्च अभ्यासासाठीं त्यांनीं परदेशगमन केलें. ऑक्स्फर्ड विश्वविद्यालयाच्या त्या
बी.ए. असून, नागपूरच्या मॉरिस् कॉलेजमध्यें इंग्लिश वाङ्मयाच्या प्रोफेसर आहेत.
इ. स. १९२९ मध्यें प्रसिद्ध कवि श्री. आत्माराम रावजी देशपांडे ऊर्फ 'अनिल'
यांच्याशीं त्यांचा विवाह झाला. ललितकलांची त्यांना आवड असून मराठी
मासिकांमध्यें त्यांच्या गोष्टी व लेख प्रसिद्ध होत असतात. शैक्षणिक चळवळींमध्यें
त्या हौसेनें भाग घेतात.

कु. **कृष्णाबाई कोल्हटकर**, एम्.ए., या इ. स. १९१९ मध्यें मॅट्रिक झाल्या.
फर्गसन् कॉलेजांतून 'इतिहास व अर्थशास्त्र' हा विषय घेऊन त्या बी.ए. व
एम्.ए. झाल्या. कांहीं काल त्या हुजुरपागेंत अध्यापिका होत्या. हल्लीं बनारस
वुइमेन्स् कॉलेजमध्यें त्या प्रोफेसरचें काम करीत आहेत.

कु. **सुंद्राबाई सुखटणकर**, एम्.ए., या सेवासदन ट्रेनिंग कॉलेजच्या सुपरिंटेंडेंट
असून सेवासदन हायस्कूलमध्येंहि शिकवितात. महाराष्ट्र व्यायाम मंडळाच्या स्त्री-
शाखेच्या चिटणीसाचें व वसंत व्याख्यान मालेच्या चिटणीसाचेंहि काम त्यांनीं
केलें होतें.

कु. **चंद्राबाई पोंक्षे**, बी.ए., एल्एल्.बी., या इ. स. १९२० मध्यें मॅट्रिक
होऊन इ. स. १९२४ सालीं फर्गसन् कॉलेजांतून बी.ए. झाल्या. पुढें त्यांनीं
कायद्याच्या अभ्यासासाठीं पुण्यांतील लॉ कॉलेजमध्यें प्रवेश केला. एल्एल्.बी.
होऊन पुण्यांत वकिली करणाऱ्या या पहिल्याच हिंदु स्त्री होत.

कु. **राजुबाई शहा**, बी.एजी., हुजुरपागेंतून मॅट्रिक झाल्यावर फर्गसन्
कॉलेजमधून त्या इंटर सायन्स परीक्षेंत पास झाल्या. अतिशय खटपट करून त्यांनीं
डॉ. मॅन प्रिन्सिपॉल असतां शेतकी कॉलेजांत प्रवेश मिळविला. शारीरिक
मेहनतीचीं सर्व कामें पुरुष विद्यार्थ्यांच्या बरोबरीनें करून त्यांनीं शेतकी कॉलेजच्या
दुसऱ्या वर्षाच्या परीक्षेंत पहिला वर्ग मिळविला. बी.एजी. झाल्यावर परदेशांतील
कृषिशास्त्राच्या अभ्यासासाठीं त्या अमेरिकेस गेल्या होत्या. बी.एजी. झालेल्या या
पहिल्याच हिंदु विद्यार्थिनी होत.

कु. **लीलाबाई भट**, बी.ए., या इ. स. १९२८ मध्यें मॅट्रिक झाल्या. इ. स. १९३२ मध्यें फर्गसन् कॉलेजांतून गणित विषय घेऊन बी.ए. झाल्या. त्या परीक्षेंत त्यांनीं पहिला वर्ग मिळविला. त्या सुद्धां विलायतेंत असून नुकत्याच केंब्रिजच्या मॅथेमॅटिक्स् ट्रायपॉसमध्यें पास झाल्या आहेत व शिक्षणशास्त्राचा अभ्यास करीत आहेत. त्यांच्या भगिनी **इंदुमति भट** यांनीं इ. स. १९३१च्या मॅट्रिक परीक्षेंत चॅटफील्ड प्राइझ मिळविलें व हल्लीं त्या मुंबईस मेडिकल कॉलेजमध्यें शिकत आहेत.

कु. **वेणुबाई अभ्यंकर** या इ. स. १९२६च्या मॅट्रिक परीक्षेंत पहिल्या आल्या. या अपूर्व यशाबद्दल त्यांचें सर्वांनीं फार अभिनन्दन केलें. या एम्.ए.,बी.टी. असून डेहराडून येथील महिला पाठशाळेंत अध्यापिकेचें काम करीत आहेत.

सौ. **येसूबाई कुलकर्णी**, बी.ए., यांनीं बरींच वर्षे वुइमेन्स् कौन्सिलच्या चिटणिसाचें काम केलें. पुण्यांतील सामाजिक चळवळींत त्या आस्थेनें भाग घेत असतात. श्री. **जानकीबाई प्रधान** या शिवणकलेंत पारंगत असून त्या विषयावर त्यांनीं पुस्तकहि लिहिलें आहे. हरिजनकार्यांत त्या भाग घेत आहेत. कु. **वेणूबाई पाळंदे** या भरतकाम व कलाकौशल्याच्या कामांत निष्णात असून त्यांबद्दल त्यांना बक्षिसें मिळालीं. कु. **दुर्गाबाई गांधी** या मासिकांतून लघुकथा लिहीत असतात. कलाकौशल्याच्या नानाविध अंगांत त्या कुशल आहेत. कलाकौशल्याचीं कांहीं कामें त्यांनीं परदेशांत पाठविलीं होतीं व त्यांबद्दल त्यांना बक्षिसें व प्रशंसापत्रें मिळालीं आहेत.

कुमारी **गोदूबाई पिंपळखरे** या अहमदाबाद येथील 'Govt. Labour Office' मध्यें काम करीत असून कामकरी वर्गाच्या उन्नतीप्रीत्यर्थ झटत आहेत.

सौ. **शान्ताबाई जोशी** (येसूबाई बापट) या इ. स. १९२० सालीं मॅट्रिक झाल्या. त्याच वर्षी त्यांचा विवाह झाला व पुढें त्या विजापुरास स्थायिक झाल्या. १९२१ सालच्या असहकारितेच्या मोहिमेपासून त्यांनीं सार्वजनिक कार्यास प्रारंभ केला. तेथील राष्ट्रीय कन्याशाळेच्या उन्नतीचें श्रेय त्यांनाच आहे. स्त्रियांच्या कलाकौशल्याचीं दोन तीन प्रदर्शनें त्यांनीं विजापुरांत भरविलीं. सौ. अवन्तिकाबाई गोखले यांच्या अध्यक्षतेखालीं विजापुरास झालेली स्त्रीपरिषद् हें त्यांच्याच प्रयत्नाचें फल होय. विजापूर जिल्हा कॉंग्रेस कमिटी व कर्नाटक प्रांतिक कमिटीच्या त्या अखेर-पर्यंत सभासद होत्या. विजापूर म्युनिसिपॅलिटी व लोकल बोर्डच्या ह्या पहिल्या स्त्री-सभासद होत. इ. स. १९२९ सालीं या तरुण उत्साही कार्यकर्त्या अकालीं स्वर्गवासी झाल्या. यांच्या प्रयत्नानें विजापुरांतील स्त्रीशिक्षणाचें पाऊल बरेंच पुढें पडूं लागलें.



कु. चंद्राबाई पोंक्षे, बी. ए., एल्. एल्. बी.



कु. वेणूबाई अभ्यंकर, एम्. ए., बी. टी.
प्रि. मुरारीलाल गर्लस् हायस्कूल, आग्रा

Wagle Press, Bombay, 1



श्री. सरस्वतीबाई फाटक
लेडी सुपरिंटेंडेंट, मॅटर्निटी होमस् (ग्वाल्हेर स्टेट)



कै. सौ. शांताबाई जोशी

Wagle Press, Bombay,

श्रीमती **सरस्वतीबाई फाटक** (श्री. कृष्णाबाई कानेटकर) या बेडफर्ड कॉलेजमध्यें Public Health and Nursing चा कोर्स घेणाऱ्या पहिल्याच हिंदु स्त्री होत. या हल्लीं ग्वाल्हेर संस्थानांतील मॅटर्निटी होम्सच्या लेडी सुपरिंटेंडेंट आहेत. त्या ट्रेनिंग देऊं लागल्यापासून ग्वाल्हेरमध्यें एकहि दाई ट्रेनिंगवांचून नाहीं. कु. **शारदाबाई नायडू** यांनींहि हाच कोर्स घेतला होता व त्या हल्लीं मुंबईच्या भाटिया मॅटर्निटी होममध्यें काम करीत आहेत.

श्री. **मनुबाई बापट** यांनीं अकोला येथें कित्येक वर्षे होम क्लासेस चालविले आहेत. सौ. **कमलाबाई गरूड** (श्री. छोटूबाई तावडे) यांनीं नागपूरचें सेवासदन चालविलें आहे. सौ. **सुशिलाबाई कुलकर्णी**, बी. ए., या अकोला येथील मुलींच्या शाळेचा सुपरिंटेंडेंट आहेत.

श्री. **लिंब्राबाई केसकर** या दादर येथील म्युनिसिपल स्कूलच्या हेड मिस्ट्रेस असून अत्यंत परिश्रम करून ती शाळा त्यांनीं नांवारूपास आणिली आहे. सौ. **मथुराबाई द्रवीड** उमरावती गर्ल्स् हायस्कूलच्या सुपरिंटेंडेंट आहेत.

यांशिवाय अनेक माजी विद्यार्थिनी, अध्यापिका, डॉक्टर, नर्सेस म्हणून काम करीत आहेत. कित्येकांनीं आपआपल्या गांवीं निरनिराळीं सामाजिक कार्यें चालविलीं आहेत. त्या सर्वांच्या कार्याबद्दल सविस्तर लिहावयाचें झाल्यास एक स्वतंत्र ग्रंथच होईल. सर्व भगिनींच्याबद्दल संक्षिप्त माहिती परिशिष्टांत मिळेलच.


शेवटीं, हुजुरपागेमध्यें ज्यांनीं शिक्षण घेतलें आहे अशा राजघराण्यांतील स्त्रियांसंबंधीं लिहिणें अगत्याचें आहे. महोत्सव संमेलनाच्या अध्यक्ष **श्रीमंत अनुबाई वहिनीसाहेब घोरपडे** यांचें इंग्लिश सहावीपर्यंतचें शिक्षण हुजुरपागेमध्येंच झालें. पुढें बनारसच्या थिऑसॉफिकल स्कूलमधून त्या मॅट्रिक झाल्या. त्यांचा विवाह इचलकरंजीच्या युवराजांशीं होऊन त्यांना युवराज्ञीपद प्राप्त झालें. परंतु दुर्दैवानें पतिनिधनाचा शोचनीय प्रसंग त्यांजवर कोसळला. पुढें त्यांच्या एकुलत्या एका पुत्रास यौवराज्यपद मिळालें परंतु तोहि आपल्या अत्यंत सुशील व प्रेमळ मातेस शोकसागरांत लोटून लहान वयांतच परलोकवासी झाला. याप्रमाणें दुःखाचे पर्वत कोसळले असूनहि श्रीमंत वहिनीसाहेब या आपलीं सामाजिक कर्तव्यें तत्परतेनें पार पाडीत आहेत याबद्दल फार कौतुक वाटतें. पुणें येथें दोन वर्षांपूर्वी झालेल्या महिला परिषदेच्या अध्यक्ष या नात्यानें त्यांनीं आपलें काम फार सुंदर रीतीनें पार पाडलें. लेखन, वाचन व सामाजिक कार्यें या गोष्टींची त्यांना विशेष आवड आहे.

श्रीमंत राजपौत्री कु. **निर्मला राजेसाहेब गायकवाड** या बडोद्याच्या महाराजांच्या नात असून गेल्याच वर्षी हुजुरपागेंतून मॅट्रिक परीक्षेंत उत्तीर्ण झाल्या. शाळेंतील विद्यार्थिनींमध्यें त्या लोकप्रिय असत. हल्लीं बडोदा कॉलेजमध्यें त्या उच्च शिक्षण घेत आहेत. महोत्सव ग्रंथासाठीं त्यांनीं दीडशें रुपयांची देणगी पाठविली आहे. यावरून शाळेवरील त्यांचें प्रेम उत्तम रीतीनें व्यक्त होतें.

मिरज (मोठी पाती) **संस्थानच्या युवराज्ञी** श्रीमंत सौ. **लक्ष्मीबाईसाहेब** या कांहीं महिनेच हुजुरपागेमध्यें शिकत होत्या. तरीहि महोत्सव ग्रंथासाठीं त्यांनीं १०० रुपयांची देणगी दिली याबद्दल त्या अभिनंदनास पात्र आहेत. त्यांच्या कन्या हल्लीं हुजुरपागेमध्यें शिक्षण घेत आहेतच.

विशाळगड संस्थानच्या युवराज्ञी, भोर संस्थानच्या युवराज्ञी व **कुरुंदवाड** (मोठी पाती) **संस्थानच्या राणीसाहेब** यांनींहि या संस्थेंतच शिक्षण घेतलें असून आपआपल्या संस्थानांमध्यें त्या उपयुक्त कार्ये करीत आहेत. विशाळगडच्या युवराज्ञी व कुरुंदवाडच्या राणीसाहेब यांनीं महोत्सवग्रंथासाठीं ज्या देणग्या दिल्या त्यांबद्दल आम्ही फार आभारी आहों. असो.

आमच्या शाळेंतील माजी विद्यार्थिनी पुण्यांतील सेवासदन, प्रो. कर्वे यांचा अनाथ-बालिकाश्रम, महिला विद्यापीठ व इतर संस्था, पुण्यांतील स्त्रियांचें ट्रेनिंग कॉलेज, उर्दू गर्ल्स हायस्कूल व मुंबई, बंगाल, मध्यप्रांत, संयुक्त प्रांत, राजपुताना, गुजराथ, पंजाब, मद्रास वगैरे प्रांतांतील प्रमुख शिक्षणसंस्थांमध्यें उत्साहानें शैक्षणिक कार्य करीत आहेत. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतील दवाखान्यांमध्यें डॉक्टर व नर्सेस म्हणून त्या उपयुक्त कामगिरी करीत आहेत. शेंकडो विद्यार्थिनी उत्तम गृहिणी म्हणून आपल्या पतींस व मुलाबाळांस संतोषवीत आहेत. खुद्द या हायस्कुलांतील चौदा पंधरा अध्यापिका शाळेच्या माजी विद्यार्थिनीच असून ऑनररी प्रिन्सिपॉल मिस् वेरुळकर याहि हुजुरपागेच्या माजी विद्यार्थिनी व माजी अध्यापिका म्हणून सर्वांस माहीतच आहेत. लेडी सुपरिंटेंडेंट्स्‌ची उत्कृष्ट परंपरा लाभल्याकारणानें आमच्या हायस्कूलची एकसारखी उन्नति होऊन पन्नासाव्या वर्षाच्या सुवर्ण-महोत्सवाचा मंगल दिन आज आपल्या दृष्टीस पडत आहे. त्याबद्दल ज्यांनीं ज्यांनीं या संस्थेची स्थापना करून जोपासना केली त्या सर्व स्त्रीपुरुषांचे आम्ही अंत:करणपूर्वक आभारी आहोंत.



राजस्नुषा श्रीमंत अनुबाई वहिनीसाहेब घोरपडे (इचलकरंजी)



श्रीमंत राजपौत्री कु. निर्मलाराजे गायकवाड (बडोदें)

Wagle Press, Bombay, 1



श्रीमंत राजकन्या कु. सरोजिनीराजे निंबाळकर (फलटण)



श्रीमंत लक्ष्मीबाईसाहेब पटवर्धन युवराज्ञी-मिरज (मोठी पाती)

Wagle Press, Bombay, 1



श्रीमंत बाल राजे-कुरुंदवाड (मोठीपाती) संस्थेचे आश्रयदाते—
श्रीमंत राणीसाहेब कुरुंदवाड (रिजंट) यांच्या वतीनें श्रीमंतांनीं
स्मारकग्रंथास देणगी दिली

Wagle Press, Bombay 1

प्रकरण एकविसावें

आशावाद

पुण्यामध्यें उच्च स्त्रीशिक्षण सुरू झाल्यास पन्नास वर्षें पुरीं झालीं. ज्या सामाजिक रूढींच्या निर्मूलनार्थ स्त्रीशिक्षणाचा उपाय योजण्यांत आला त्या बाल-विवाहादि रूढी उच्च वर्गांमध्यें तरी आतां फारशा दिसत नाहींत. प्रौढविवाहाकडे बहुजनसमाजाचा कल असून बालविधवांचा वर्ग जवळजवळ नष्ट झाला आहे. गेल्या वर्षीं आमच्या हायस्कुलांतील सातशें मुलींच्यापैकीं पांच मुलींचीं लग्नें झालीं व लग्नानंतरहि त्यांचें शिक्षण चालू राहिलें. त्यावरून मुलीला निदान मॅट्रिकपर्यंत शिक्षण द्यावें या विचारसरणीकडे समाजाचा कल दिवसेंदिवस अधिक वाढत आहे. मुलींची सर्वसामान्य शिक्षणमर्यादा (Standard) मॅट्रिकपर्यंत गेल्याचें सर्वत्र आढळून येत आहे ही फार आनंदाची गोष्ट आहे. जो हेतु मनांत धरून या संस्थेची स्थापना झाली त्या हेतूची सफलता झालेली आहे यांत शंका नाहीं.

या पन्नास वर्षांच्या काळांत सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रांत पुष्कळच क्रान्ति झालेली आढळते. स्त्रीशिक्षण व प्रौढ विवाह हे शब्द आमच्या समाजांत रूढ झाले आहेत. शारदा बिलासारखे स्त्री-रक्षक कायदे कायदे-कौन्सिलांत पास झाले असून म्युनिसिपॅलिटी, लोकल बोर्ड, प्रांतिक कायदे-कौन्सिलें व लेजिस्लेटिव्ह असेंब्ली यांमध्यें उमेदवार म्हणून निवडून येण्याचा व निवडणुकींत मतें देण्याचा अधिकार स्त्रियांना प्राप्त झाला आहे. गोलमेज परिषदेमध्यें हिंदी स्त्रियांच्या प्रतिनिधि म्हणून हिंदी स्त्रियांची बाजू मांडण्याचा मान बेगम शहानवाज व मिसेस् सुब्रायन यांनीं संपादन केलाच होता. दर वर्षीं अखिल भारतीय महिला परिषदेचीं अधिवेशनें भरविण्यांत येऊन स्त्रियांचे सामाजिक व राजकीय हक्क मिळविण्यासाठीं प्रयत्न चालू आहेत. गृहांतील आपलें श्रेष्ठ स्थान राखून देशाच्या उन्नतीसाठीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतील स्त्रिया झटत आहेत.

युरोप व अमेरिका या खंडांतील सुधारलेल्या देशांतहि १९१४ च्या महा-युद्धापासून विलक्षण क्रान्ति झालेली दिसून येते. सर्व तरुण व मध्यम वयाचे पुरुष युद्धावर गेले असतां त्यांच्यामागें देशांत सुव्यवस्था राखण्याचें काम पाश्चात्य

महिलांनीं किती उत्कृष्ट रीतीनें पार पडलें हें सर्वांना माहीतच आहे. त्या वेळीं आगगाड्या, तारायंत्रें, टपालखातें, पोलिसखातें, शेती, कारखाने, गिरण्या, शिक्षण-संस्था इत्यादि सर्व क्षेत्रांत स्त्रियांनीं कामें करून आपली कर्तबगारी सिद्ध केली. युरोप व अमेरिका या देशांमध्यें स्त्रियांचा प्रवेश ज्यांत झाला नाहीं असें कोणतेंच खातें नाहीं. पोहणें, धांवणें, विमान चालविणें वगैरे शारीरिक मेहनतीच्या बाबतींत स्त्रिया मागें नाहींत. वाङ्मय, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र व शिक्षणशास्त्र या क्षेत्रांतहि त्यांनीं बहुमोल कामगिरी केली आहे. पार्लमेंटच्या सभासद म्हणून देशाच्या राज्यव्यवस्थेमध्येंहि त्या लक्ष घालीत आहेत. सामाजिक, राजकीय, औद्योगिक व शैक्षणिक बाबतींत देशांतील पुरुषवर्गास बरोबरीनें साहाय्य करून त्या आपल्या देशाची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करीत आहेत.

वायरलेस, रेडिओ, विमानें, आगगाड्या, आगबोटी, मुद्रणकला इत्यादि शास्त्रीय साधनांनीं सर्व जगांतील देशांचा परस्पर संबंध जोडून दिला आहे. एखाद्या देशांत एखादी महत्वाची गोष्ट घडली कीं, थोड्या तासांच्या अवधींत ती साऱ्या जगभर माहीत होते. त्यामुळें जगांतील कोणत्याहि देशाला इतरांपासून तुटक राहतां येणें आतां शक्य नाहीं. आम्हीं नाहीं म्हटलें तरी इतर देशांतील सामाजिक, राजकीय, औद्योगिक व शैक्षणिक इत्यादि चळवळींचा हिंदुस्थानावर परिणाम होणारच. रशियांतील सामाजिक व राजकीय विषयांवरील क्रांतिकारक वाङ्मयाचा, तसाच इतर पाश्चात्य देशांतील वाङ्मयाचा प्रवेश आमच्या देशांत झाला असून त्याचा परिणामहि दृग्गोचर होत आहे. आमचा समाज हल्लीं संक्रमणावस्थेंत आहे. नवीन नवीन विचारांचे प्रवाह समाजामध्यें चालू आहेत. नवमतवादाचें प्रस्थ वाढत चाललें आहे. समाजसत्तावादी वाङ्मयाचा फैलाव होत आहे. नवीन तरुण पिढी या मतामतांच्या गलबल्यांत क्षणमात्र बावरून गेली तर त्यांत कांहींच नवल नाहीं. या सर्व बिकट परिस्थितीला तोंड देण्यासाठीं आमच्या स्त्रियांना अधिक कार्यक्षम करण्याची आवश्यकता नाहीं काय ?

परंतु या नवीन निर्माण होत असलेल्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून त्याचें योग्य पृथक्करण न करतां, ‘ स्त्रियांचें शिक्षण आतां पुष्कळ झालें आहे, त्यांना पांच सहा इयत्तांपर्यंत शिकवून गृहव्यवस्थेचें ज्ञान द्यावें म्हणजे पुष्कळ झालें, ’ अशा तऱ्हेची विचारसरणी बरेच वेळां अनेकांच्याकडून पुढें मांडण्यांत येते. ती कितपत योग्य आहे याचा सुज्ञांनीं विचार करण्याची वेळ आतां येऊन ठेपली आहे.

